सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

सहाव्या
महाराष्ट्र वित्त आयोगाचा अहवाल

फेब्रुवारी, २०२६

सहाव्या
महाराष्ट्र वित्त आयोगाचा अहवाल

फेब्रुवारी, २०२६

डॉ. नितिन करीर
Dr. Nitin Kareer
अध्यक्ष
Chariman

सत्यमेव जयते

सहावा महाराष्ट्र वित्त आयोग
Sixth Maharashtra Finance Commission
महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA

महाराष्ट्र शासन

सहावा महाराष्ट्र वित्त आयोग

भारताचे संविधान याच्या अनुच्छेद २४३-झ आणि २४३-म मधील तरतुदी आणि महाराष्ट्र वित्त आयोग (संकीर्ण तरतुदी) अधिनियम, १९९४ याच्या तरतुदी आणि महाराष्ट्र शासनाद्वारे सहावा महाराष्ट्र वित्त आयोग पुनर्घटित करण्यासाठी जारी करण्यात आलेली अधिसूचना क्रमांक SFC.०६२४/C.R.५२/FCC च्या अनुसार, आयोग, महाराष्ट्राचे सन्मा. राज्यपाल यांच्यासमोर मांडण्यासाठी अंतिम अहवाल सादर करत आहे.

डॉ. नितिन करीर,
अध्यक्ष
सहावा महाराष्ट्र वित्त आयोग
महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन

प्रस्तावना

१ एप्रिल २०२६ पासून सुरू होणाऱ्या पाच वर्षांच्या कालावधीचा समावेश असलेल्या, सहाव्या महाराष्ट्र वित्त आयोगाचा अहवाल सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे.

या समितीच्या विचारमंथनाला "जे मोजता येते ते सुधारता येते" या तत्त्वाने दिशा दिली आहे. आम्ही, व्यापकपणे "सर्वात कमी खर्च करणाऱ्या घटकापर्यंत निधी प्रवाहाचा मागोवा घेणे आणि वापराच्या पद्धती समजून घेणे", "खर्चावर जास्तीत जास्त परतावा मिळवणे किंवा कार्यक्षमता वाढवणे", "लेखांकन प्रणाली मजबूत करणे", "माहितीतील उणिवा भरून काढणे आणि संनिरीक्षण व मूल्यांकनासाठी व्यवस्थापन माहिती प्रणाली मजबूत करणे" या बाबींवर लक्ष केंद्रित केले आहे. या चार मुद्यांवर काम केल्यास विकेंद्रीकरणाशी संबंधित स्वरूप व तपशील मोजता येते आणि स्थानिक संस्थांकडे होणाऱ्या निधी प्रवाहांची पातळी व त्यांची पर्याप्तता यांचे मूल्यमापन करता येते.

या अहवालाला अंतिम रूप देत असताना, १६ व्या केंद्रीय वित्त आयोगाचा अहवाल १फेब्रुवारी २०२६ रोजी संसदेत मांडण्यात आला. त्यांच्या शिफारशी या आयोगाच्या दृष्टिकोनाची पुष्टी करतात. महाराष्ट्रासाठीच्या आम्ही केलेल्या शिफारशी त्यांनी देशभरात केलेल्या चर्चांवर आधारित असून त्यांच्या मतांशी सुसंगत आहेत.

आम्हाला उपलब्ध झालेल्या आकडेवारीच्या विश्लेषणासोबतच, आम्ही ग्रामीण व नागरी स्थानिक संस्था, राज्याचे विविध विभाग, निवडून आलेले प्रतिनिधी आणि तज्ज्ञ यांच्यासोबत व्यापक विचारविनिमय केला. या विचारविनिमयामुळे आमचा दृष्टिकोन महाराष्ट्रातील स्थानिक प्रशासनाच्या वास्तवावर आधारित असल्याची खात्री झाली.

आयोगाच्या वतीने, महाराष्ट्र शासन, स्थानिक प्रशासन आणि आयोगाच्या कार्यात योगदान देणाऱ्या सर्व हितसंबंधितांनी दिलेले सहकार्य आणि सहाय्याबद्दल मी मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. तसेच माझ्या सहकारी सदस्यांचे त्यांची बांधीलकी, सम्यक ज्ञान आणि या संपूर्ण प्रक्रियेत दिलेला पाठिंबा याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो. ही महत्त्वाची सांविधानिक जबाबदारी आमच्यावर सोपविण्यात आल्याचा आम्हाला सन्मान वाटतो.

महाराष्ट्र, समतोल विकास आणि प्रगतीच्या दिशेने पुढे जात असताना, राज्य शासन या सर्व शिफारशी स्वीकारेल आणि अंमलात आणेल, असा आम्हाला विश्वास आहे. यामुळे स्थानिक संस्था प्रभावी स्वशासन संस्था म्हणून कार्य करू शकतील आणि जनतेच्या अपेक्षा पूर्ण करू शकतील.

दिनांकः २ फेब्रुवारी, २०२६. **डॉ. नितीन करीर**

सहाव्या महाराष्ट्र वित्त आयोगामध्ये कार्य केलेल्या कर्मचाऱ्यांचा तपशील :

अनुक्रमांक	नाव	पदनाम	कार्यालयाचे नाव
१	डॉ. करुणा ए. जुईकर	अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी	ग्रामविकास व पंचायतराज विभाग
२	श्रीम. नीतल लव्हाळे	उप संचालक (लेखा) (अतिरिक्त कार्यभार)	लेखा व कोषागार संचालनालय
३	श्री. सुनील एस. हांजे	सेवानिवृत्त सचिव	शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
४	श्रीम. विद्या व्ही. येरुणकर	मुख्य अधिकारी	नगरविकास विभाग
५	श्रीम. मुग्धा डी. बने	कक्ष अधिकारी	वित्त विभाग
६	श्रीम. संगीता एम. जाधव	सहायक लेखा अधिकारी	लेखा व कोषागार संचालनालय
७	श्रीम. सुनीता जी. चांदणे	सांख्यिकी अधिकारी	नियोजन विभाग
८	श्रीम. श्रद्धा एस. घाणेकर	सांख्यिकी सहायक	नियोजन विभाग
९	श्री. मिलिंद धागटे	शिपाई	वित्त विभाग
१०	श्रीम. आरती हरभजांका	सह-संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक	प्रायमस पार्टनर्स
११	श्रीम. ऋतुजा करकरे	व्यवस्थापक	प्रायमस पार्टनर्स
१२	श्रीम. गितिका वहाळ	व्यवस्थापक	प्रायमस पार्टनर्स
१३	श्री. धर्मेश मिनात	वरिष्ठ सल्लागार	प्रायमस पार्टनर्स

संक्षेपाक्षरे

ADTP	Assistant Director of Town Planning	सहायक संचालक, नगररचना
ARV	Annual Rateable Value	वार्षिक दर देय मूल्य
ASR	Annual Statement of Rates	वार्षिक दर विवरणपत्र
ATR	Action Taken Report	केलेल्या कार्यवाहीचा अहवाल
BPMS	Building Plan Management System	इमारत आराखडा व्यवस्थापन प्रणाली
CA	Chartered Accountant	सनदी लेखापाल
CAG	Comptroller and Auditor General	भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक
CAGR	Compound Annual Growth Rate	संयुक्त वार्षिक विकास दर
CEO	Chief Executive Officer	मुख्य कार्यकारी अधिकारी
CIP	Capital Investment Plan	भांडवली गुंतवणूक योजना
CSR	Corporate Social Responsibility	उद्योगाचे सामाजिक उत्तरदायित्व (निधी)
CV	Capital Value	भांडवली मूल्य
CVM	Capital Value Method	भांडवली मूल्य पद्धती
DES	Directorate of Economics and Statistics	अर्थ व सांख्यिकी संचालनालय
DLFAA	Directorate of Local Fund Accounts Audit	स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय
DMA	Directorate of Municipal Administration	नगरपरिषद प्रशासन संचालनालय
DPC	District Planning Committee	जिल्हा नियोजन समिती
DPR	Detailed Project Report	सविस्तर प्रकल्प अहवाल
DVDF	District Village Development Fund	जिल्हा ग्राम विकास निधी
FY	Financial Year	वित्तीय वर्ष
GDP	Gross Domestic Product	स्थूल दरडोई उत्पादन
GEM	Government e-Marketplace	शासकीय इ-बाजारपेठ (जेम)
GIS	Geographic Information System	भौगोलिक माहिती प्रणाली
GoI	Government of India	भारत सरकार
GoM	Government of Maharashtra	महाराष्ट्र शासन
GP	Gram Panchayat	ग्रामपंचायत
GRAS	Government Receipt Accounting System	शासकीय जमा लेखांकन प्रणाली (ग्रास)
GSDP	Gross State Domestic Product	स्थूल राज्यांतर्गत उत्पादन
GST	Goods and Services Tax	वस्तू व सेवा कर
IGR	Inspector General of Registration	नोंदणी महानिरीक्षक
IT	Information Technology	माहिती तंत्रज्ञान
LB	Local Body	स्थानिक संस्था
LGCI	Local Government Commercial Identifier	व्यावसायिक ओळख पटविणारी स्थानिक प्रशासनाची यंत्रणा
LIDAR	Light Detection and Ranging	लिडार
MCA	Ministry of Corporate Affairs	कॉर्पोरेट कार्य मंत्रालय

MCGM	Municipal Corporation of Greater Mumbai	बृहन्मुंबई महानगरपालिका
MFRBM Act	Maharashtra Fiscal Responsibility and Budget Management Act	महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम
MJP	Maharashtra Jeevan Pradhikaran	महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
MLBFRBM Act	Maharashtra Local Bodies Fiscal Responsibility and Budgetary Management Act	
MMC Act	Maharashtra Municipal Corporation Act	मुंबई महानगरपालिका अधिनियम
MMCNI Act	Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act	महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम
MMPTB	Maharashtra Municipal Property Tax Board	महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळ
MRSAC	Maharashtra Remote Sensing Applications Centre	महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र
MRTP Act	Maharashtra Regional and Town Planning Act	महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम
MVP Act	Maharashtra Village Panchayats Act	महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम
MZPPS Act	Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act	महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम
NA	Non-Agricultural	बिगर शेती
NAKSHA	National Geospatial Knowledge-based Land Survey of Urban Habitations	शहरी वस्त्यांचे राष्ट्रीय व भू-स्थानिक ज्ञान-आधारित भू-सर्वेक्षण (नक्षा)
NDDP	Net District Domestic Product	देशांतर्गत निवड जिल्हा उत्पादन
NDRMF	National Disaster Risk Management Fund	राष्ट्रीय आपत्ती जोखीम व्यवस्थापन निधी
NIPFP	National Institute of Public Finance and Policy	राष्ट्रीय सार्वजनिक वित्त आणि धोरण संस्था
NIRDPR	National Institute of Rural Development and Panchayati Raj	राष्ट्रीय ग्रामविकास आणि पंचायतराज संस्था
NMMC	Navi Mumbai Municipal Corporation	नवी मुंबई महानगरपालिका संस्था
NP	Nagar Panchayat	नगरपंचायत
OSR	Own Source Revenue	स्वतःच्या स्त्रोतांमधून मिळणारा महसूल
OTSP	Other Tribal Sub-Plan	इतर जनजाती उपयोजना
PCMC	Pimpri Chinchwad Municipal Corporation	पिंपरी चिंचवड महानगरपालिका
PMC	Pune Municipal Corporation	पुणे महानगरपालिका
PPP	Public Private Partnership	सार्वजनिक खाजगी भागीदारी
PS	Panchayat Samiti	पंचायत समिती
PT	Profession Tax	व्यावसायिक कर

PTEC	Profession Tax on Enrolment Certification	नावनोंदणी प्रमाणपत्रावरील व्यावसायिक कर
PTRC	Profession Tax on Registration Certification	नोंदणी प्रमाणपत्रावरील व्यावसायिक कर
PWD	Public Works Department	सार्वजनिक बांधकाम विभाग
QR	Quick Response	जलद प्रतिसाद
RDD	Rural Development and Panchayat Raj Department	ग्राम विकास व पंचायत राज विभाग
RLB	Rural Local Body	ग्रामीण स्थानिक संस्था
SE	Superintending Engineer	अधीक्षक अभियंता
SCI	Single Composite Index	एकल संयुक्त निर्देशांक
SCP	Special Component Plan	विशेष घटक योजना
SDMF	State Disaster Mitigation Fund	राज्य आपत्ती सौम्यीकरण निधी
SDRF	State Disaster Response Fund	राज्य आपत्ती प्रतिसाद निधी
SDRMF	State Disaster Risk Management Fund	राज्य आपत्ती जोखीम व्यवस्थापन निधी
SFC	State Finance Commission	राज्य वित्त आयोग
SIRD	State Institute of Rural Development	राज्य ग्रामविकास संस्था
SIUD	State Institute of Urban Development	राज्य नगरविकास संस्था
SOTR	State's Own Tax Revenue	राज्याचा स्वतःचा कर महसूल
SVAMITVA	Survey of Villages Abadi and Mapping with Improvised Technology in Village Areas	ग्रामीण क्षेत्रांमध्ये सुधारित तंत्रज्ञानाद्वारे ग्रामीण जनसंख्या (आबादी) आणि नकाशांचे सर्वेक्षण
TIN	Taxpayer Identification Number	करदात्याचा ओळख क्रमांक
TMC	Thane Municipal Corporation	ठाणे महानगरपालिका
TSP	Tribal Sub-Plan	जनजाती उप-योजना
UDCPR	Unified Development Control and Promotion Regulations	एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन विनियम
UDD	Urban Development Department	नगरविकास विभाग
UFC	Union Finance Commission	केंद्रीय वित्त आयोग
ULB	Urban Local Body	नागरी स्थानिक संस्था
ULBIS	Unified Local Bodies Information System	एकत्रित स्थानिक माहिती यंत्रणा
ULSG	Urban Local Self-Governments	नागरी स्थानिक स्वराज्य संस्था
VPDA	Virtual Personal Deposit Account	आभासी वैयक्तिक ठेव खाते
YASHADA	Yashwantrao Chavan Academy of Development Administration	यशदा
ZP	Zilla Parishad	जिल्हा परिषद

अनुक्रमणिका

		पृष्ठ क्रमांक
कार्यकारी सारांश		
१. प्रस्तावना	…	१२
२. राज्याची अर्थव्यवस्था	…	१३
३. ग्रामीण स्थानिक संस्थांचे राजकोषीय आरोग्य (आर्थिक स्थिती)	…	१६
४. नागरी स्थानिक संस्थांचे राजकोषीय आरोग्य (आर्थिक स्थिती)	…	२१
५. स्थानिक संस्थांच्या आर्थिक संसाधनातील तफावतीचे हस्तांतरण आणि मूल्यांकन	…	२८
६. निधीचे हस्तांतरण	…	३१
७. अभिहस्तांकित रकमा आणि करांचे हस्तांतरण	…	३५
८. स्वतःच्या महसुलात वाढ	…	४२
९. संस्थांचे बळकटीकरण	…	५१
१०. महाराष्ट्र वित्त आयोगाचे बळकटीकरण	…	६५
११. राज्य वित्त व्यवस्थेबाबतच्या शिफारशी	…	६८
परिशिष्टे		
परिशिष्ट क : हितसंबंधितांकडून सूचना	…	६९
परिशिष्ट ख : दृष्टिकोन व कार्यपद्धती	…	७४
परिशिष्ट ग : गुणांवर आधारित सुधारणा - संलग्न हस्तांतरण आराखडा	…	७७
जोडपत्रे		७८

तक्त्यांची यादी

तक्ता क्रमांक (१)	वर्णन (२)	पृष्ठ क्रमांक (३)
तक्ता २.१	भारताचे स्थूल देशांतर्गत दरडोई उत्पन्न (जीडीपी) आणि महाराष्ट्राचे स्थूल राज्यांतर्गत उत्पन्न (चालू किंमत)	१३
तक्ता २.२	महाराष्ट्राचे प्रमुख वित्तीय निर्देशक	१४
तक्ता २.३	शिल्लक राज्य सरकारी रोख्यांची रचना - एकूणाच्या टक्केवारीत (३१ मार्च २०२५ रोजी शिल्लक)	१५
तक्ता २.४	राज्याचा स्वतःचा कर महसूल	१६
तक्ता २.५	महाराष्ट्राच्या महसुली जमिनीची रचना	१६
तक्ता ३.१	महाराष्ट्रातील ग्रामीण स्थानिक संस्थांची संख्या	१७
तक्ता ३.२	महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींची त्यांच्या लोकसंख्येच्या आकारमानानुसार रचना	१७
तक्ता ३.३	महाराष्ट्रातील ग्रामीण स्थानिक संस्थांच्या विविध स्तरांमधील एकूण महसुलांचे कल आणि रचना	१९
तक्ता ३.४	महाराष्ट्रातील ग्रामीण स्थानिक संस्थांचा खर्चाचा कल	२०
तक्ता ४.१	महाराष्ट्रातील नागरी स्थानिक संस्थांचे वर्गीकरण आणि संख्या	२१
तक्ता ४.२	महाराष्ट्रातील नागरी स्थानिक संस्थांचे प्रादेशिक वितरण	२२
तक्ता ४.३	महाराष्ट्रातील नगरपरिषदांचे प्रादेशिक वितरण	२२
तक्ता ४.४	महाराष्ट्रातील नव्याने घटित झालेल्या / रूपांतरित झालेल्या नागरी स्थानिक संस्था	२३
तक्ता ४.५	महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांमधील नागरी स्थानिक संस्थांच्या स्वतःच्या महसुलातील तफावत	२३
तक्ता ४.६	महाराष्ट्रातील नागरी स्थानिक संस्थांच्या स्तरांनुसार एकूण महसूल कल (Trends) आणि महसुलाची रचना	२४
तक्ता ४.७	महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्तरांनुसार स्वतःचा महसुली कल आणि महसुलाची रचना	२५
तक्ता ४.८	महाराष्ट्रातील नागरी स्थानिक संस्थांच्या स्तरांनुसार खर्चाचा कल	२७
तक्ता ५.१	महाराष्ट्रातील स्थानिक संस्थांना केंद्रीय वित्त आयोगाकडून अनुदान	२८
तक्ता ५.२	महाराष्ट्रातील स्थानिक संस्था आणि पंचायतराज संस्थांना सहायक अनुदाने आणि अंशदाने	२८
तक्ता ५.३	महाराष्ट्रासाठी हस्तांतरणाचे पर्यायी अंदाज	२९
तक्ता ५.४	महाराष्ट्रातील अपेक्षेपेक्षा कमी होणाऱ्या खर्चाचे विश्लेषण	३०
तक्ता ६.१	महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी निधीचे किमान हमी वाटप	३४
तक्ता ७.१	महाराष्ट्राच्या वर्षनिहाय जमा झालेल्या व्यवसाय कराच्या रकमा	३५
तक्ता ७.२	वित्तीय वर्ष २०२४-२५ मधील महाराष्ट्रातील व्यवसाय कराच्या जमा रकमांचा तपशील	३५
तक्ता ७.३	महाराष्ट्रातील एकरकमी अधिमूल्याचा दर	३७
तक्ता ७.४	महाराष्ट्रातील नागरी स्थानिक संस्थांच्या स्तरांना वाटप करण्यात आलेल्या रस्ते अनुदानांची विभागणी	३९

तक्ता क्रमांक (१)	वर्णन (२)	पृष्ठ क्रमांक (३)
तक्ता ७.५	महाराष्ट्रातील जिल्हा नियोजन समिती (डीपीसी) निधीचे वितरण	४०
तक्ता ७.६	महाराष्ट्रातील वाहतूक नियमांच्या उल्लंघनावरील इ-चलनाचे वार्षिक विवरण	४१
तक्ता ८.१	महाराष्ट्रातील नागरी स्थानिक संस्थांसाठी मालमत्ता कर आधारसामग्री (डेटा)	४२
तक्ता ८.२	महाराष्ट्रातील ग्रामीण स्थानिक संस्थांसाठी मालमत्ता कर आधारसामग्री (डेटा)	४२
तक्ता १०.१	शिफारशींचा सारांश तक्ता	६५
तक्ता १०.२	स्वीकारलेल्या, अंशतः स्वीकारलेल्या आणि नाकारलेल्या शिफारशींचा सारांश	६५
तक्ता १०.३	अंमलबजावणी केलेल्या, अंशतः अंमलबजावणी केलेल्या आणि विचाराधीन असलेल्या शिफारशींचा सारांश	६६

आलेख सूची		
आलेख क्रमांक	वर्णन (आलेखाचे शीर्ष)	
आलेख २.१	३१ मार्च २०२५ रोजी राज्य सरकारच्या बाकी रोख्यांमधील राज्यांचा हिस्सा	१४
आलेख ४.१	वित्तीय वर्ष २०२३-२४ साठीचा स्वतःचा दरडोई महसूल (नागरी स्थानिक संस्था)	२६

कार्यकारी सारांश

भारताचे संविधान याच्या अनुच्छेद २४३-झ आणि अनुच्छेद २४३-म अन्वये, अधिसूचना क्रमांक SFC.०६२४/C.R.५२/FCC द्वारे **सहावा महाराष्ट्र वित्त आयोग** घटित करण्यात आला आहे. राज्यातील ग्रामीण आणि शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक स्थितीचे पुनर्विलोकन करणे आणि त्यांच्याकडे सोपवलेली कार्ये प्रभावीपणे व कार्यक्षमतेने पार पाडता यावीत, यासाठी त्यांच्या आर्थिक स्थितीचे बळकटीकरण करण्यासाठी उपाययोजना सुचवणे, हा या आयोगाचा मुख्य उद्देश (Mandate) आहे.

एक. संदर्भ आणि प्रमुख मुद्दे

नागरिकांच्या जीवनाचा दर्जा सुधारणाऱ्या मूलभूत नागरी आणि सामाजिक सेवा पुरवण्यात स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका अत्यंत महत्वाची असते. तथापि, मर्यादित महसुली स्वायत्तता, निधी पुरवठा यंत्रणेतील अनिश्चितता आणि क्षमता-संबंधित आव्हाने यांमुळे या संस्थांना त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडताना मर्यादा येतात.

राज्य वित्त व्यवस्था:

- **राज्याचा स्वतःचा कर महसूल (एस ओ टी आर):** हा राज्याच्या महसुली जमेतील सर्वात मोठा घटक आहे. २०२०-२१ मधील १.६४ लाख कोटी रुपयांवरून २०२४-२५ मध्ये तो ३.६७ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढला आहे. याच कालावधीत, एकूण महसुलातील राज्याचा स्वतःचा कर महसुलाचा (एस ओ टी आर) वाटा ६१% वरून ६८% पर्यंत सातत्याने वाढला आहे, यामध्ये राज्याचा महसूल आधार बळकट झाल्याचे दिसून येते.

- **निधी हस्तांतरण :** भारत सरकारच्या पंचायती राज मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या 'हस्तांतरण निर्देशांक २०२४' (Devolution Index 2024) मध्ये, 'राज्य वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार पंचायतींना निधी हस्तांतरण' या निकषांतर्गत महाराष्ट्राचा गुणांक शून्य [१] दर्शवण्यात आला आहे. हा एकूण निर्देशांकातील एक निर्देशांक आहे आणि त्यामुळे राज्याच्या हस्तांतरणाच्या गुणांकात त्याचा प्रभाव पडतो. आयोगाला ठळकपणे असे स्पष्ट करायचे आहे की, राज्य सरकार वित्त आयोगाच्या शिफारशींव्यतिरिक्त देखील इतर विविध शीर्षांखाली स्थानिक संस्थांना निधी प्रदान करत असते. २०२४-२५ मध्ये, विविध अनुदाने आणि नुकसान भरपाई याद्वारे राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाच्या २६.३% (सुमारे ९६,७३३ कोटी रुपये) इतके शहरी आणि ग्रामीण स्थानिक संस्थांना हस्तांतरित करण्यात आले आहेत.

ग्रामीण स्थानिक संस्था (आर एल बी):

ग्रामीण स्थानिक संस्थांचे वर्गीकरण ग्रामपंचायत (गाव स्तर), पंचायत समिती (गट स्तर) आणि जिल्हा परिषद (जिल्हा स्तर) अशा तीन प्रवर्गात केले जाते.

- **जिल्हा परिषद (झेड पी) आणि पंचायत समिती (पी एस):** या संस्थांचे स्वतःचे उत्पन्न (कर आणि करेतर) त्यांच्या एकूण जमेच्या केवळ १०-३०% आहे. परिणामी, या संस्था मोठ्या प्रमाणावर सरकारी अनुदाने आणि योजना-आधारित निधीवर अवलंबून आहेत. तसेच, एकूण खर्चाचा ६०-७०% मोठा हिस्सा आस्थापना खर्चावर (Establishment Expenses) खर्च होतो, ज्यामुळे विकासकामांसाठी प्राधान्य आणि स्वेच्छाधिकाराने खर्च करण्यासाठी मर्यादित वित्तीय वाव उरतो.

- **ग्रामपंचायती:** मालमत्ता कर आकारणी आणि वसुलीच्या अधिकारामुळे ग्रामपंचायतींच्या स्वतःच्या महसूल निर्मितीचे प्रमाण तुलनेने जास्त आहे. त्यांच्या एकूण जमेमध्ये स्वतःचा महसूल सुमारे ४०% आहे, ज्यामुळे ग्राम स्तरावर अधिक वित्तीय स्वायत्तता प्राप्त होते.

ग्रामीण स्थानिक संस्थांच्या खर्चाच्या पद्धती त्यांच्या वित्तीय संरचनेचे प्रतिबिंब दर्शवितात. एकूण खर्चापैकी, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांसाठी महसुली खर्चाचा वाटा अनुक्रमे ९३ टक्के आणि ७३ टक्के आहे, तर भांडवली खर्च अत्यंत अल्प आहे. याउलट, ग्रामपंचायतींमध्ये भांडवली खर्चाचा वाटा सर्वाधिक (सुमारे ३८ टक्के) असून आस्थापना खर्च तुलनेने कमी आहे.

नागरी स्थानिक संस्था (यू एल बीज्):

नागरी संस्थांचे वर्गीकरण महानगरपालिका, नगरपरिषदा आणि नगरपंचायतीं यांमध्ये केले जाते.

- **महानगरपालिका (मुंबई वगळून):** सरासरी, त्यांच्या एकूण महसुलाच्या सुमारे ५१% उत्पन्न हे (कर आणि करेतर महसूल) यांसह स्वतःच्या स्रोतांतून मिळते.

- **नगरपरिषदा आणि नगरपंचायती:** या स्थानिक संस्था बाह्य निधी हस्तांतरणावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असून, त्यांचे स्वतःचे उत्पन्न एकूण जमेच्या केवळ १७% आहे.

---

[१] हस्तांतरण निर्देशांक अहवाल, २०२४ पंचायती राज मंत्रालय, पृ. २२९

खर्चाच्य बाबतीत महानगरपालिका त्यांच्या एकूण खर्चाचा मोठा हिस्सा भांडवली खर्चासाठी (सुमारे ४८%) आणि आस्थापना खर्चासाठी सुमारे २७% हिस्सा राखून ठेवतात. त्या तुलनेत, नगरपरिषदा आणि नगरपंचायतींचा आस्थापना खर्च (२७%) सारखाच असला, तरी भांडवली खर्च (४५%) तुलनेने कमी आहे.

स्थानिक संस्थांना त्यांच्याकडे सोपवलेली कार्य प्रभावीपणे पार पाडण्यासाठी त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम असाव्यात, यादृष्टीने सर्व स्तरांवील संस्थांची आर्थिक बळकट करण्याची आवश्यकता या विश्लेषणातून अधोरेखित होते. यासाठी **निधी हस्तांतरणात वाढ (Enhanced Devolution), स्वतःच्या महसूल स्रोतांचे सक्षमीकरण** आणि **खर्च व्यवस्थापनातील सुधारणा** यांचा एकत्रित अवलंब करणे आवश्यक आहे.

दोन. शिफारशींचा सारांश

आयोगाच्या शिफारशींचे पुढीलप्रमाणे सहा प्रमुख क्षेत्रांमध्ये वर्गीकरण करण्यात आले आहेः

(अ)	**निधीचे हस्तांतरण**
# शिफारस १ (६.५)	आयोग दरवर्षी **राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाच्या (एस ओ टी आर) २७.३%** निधी स्थानिक संस्थांना हस्तांतरित करण्याची शिफारस करतो. ही शिफारस १ एप्रिल, २०२६ पासून सुरू होणाऱ्या पाच वर्षांच्या कालावधीसाठी लागू असेल. आयोगाच्या मूल्यमापनानुसार, सध्या, राज्य शासन विविध हस्तांतरणाद्वारे स्थानिक संस्थांना राज्याचा स्वतःच्या कर महसुलाच्या (एस ओ टी आर) अंदाजे २६.३% निधी प्रदान करते. हस्तांतरणाचा हा दर पुढेही चालू ठेवावा. या हस्तांतरणामध्ये राज्याचा स्वतःच्या कर महसुलाच्या (एस ओ टी आर) च्या अंदाजे २% निधी स्वेच्छाधीन (Discretionary) तत्त्वावर दिला जातो. आयोगाच्या विश्लेषणानुसार आणि या उद्देशासाठी नियुक्त केलेल्या अभ्यास गटानुसार, दरवर्षी सरासरी ८,२१७ कोटी रुपयांचा (एस ओ टी आर) च्या ३.६% इतका कमी खर्च होतो, जे स्थानिक संस्थांच्या वित्तामध्ये कायमस्वरूपी संसाधनांची कमतरता असल्याचे दर्शवते. या ३.६% तफावतीपैकी, अंदाजे २.६% तफावत पुढील शिफारशींद्वारे भरून काढली जाईल, असा आयोगाचा अंदाज आहेः व्यवसाय कराच्या अभिहस्तांतरणाद्वारे ०.८%, मोटार वाहन करातून रस्ते अनुदानाद्वारे ०.६% आणि कर व करेतर महसूल संकलनाच्या कार्यक्षमतेतील वाढीद्वारे १.२%. त्यामुळे, राज्याचा स्वतःच्या कर महसुलाच्या (एस ओ टी आर) उर्वरित १.०% हिस्सा स्थानिक संस्थांना अतिरिक्त हस्तांतरण (Additional Devolution) म्हणून देणे आवश्यक आहे. आयोग अशी शिफारस करतो की, राज्याचा स्वतःच्या कर महसुलाच्या (एस ओ टी आर) चा, हा अतिरिक्त १.०% हिस्सा आणि आधीच स्वेच्छाधीन तत्त्वावर दिला जाणारा २% हिस्सा पुढीलप्रमाणे वितरित केला जावाः १. नागरी स्थानिक संस्थांना (यू एल बी) ५५% आणि ग्रामीण स्थानिक संस्थांना (आर एल बी) ४५% . २. नागरी स्थानिक संस्था आणि ग्रामीण स्थानिक संस्थांना वाटप केलेल्या निधीपैकी ५% निधी 'कामगिरी अनुदाने' (Performance Grants) म्हणून राखीव असेल. ३. नागरी स्थानिक संस्था आणि ग्रामीण स्थानिक संस्थांना वाटप केलेल्या निधीपैकी आणखी ५% निधी 'ग्रामीण-शहरी संक्रमण' (Rural-Urban Transition) साठी राखीव असेल. ग्रामीण संस्थांना हस्तांतरित केलेल्या रकमेचे वाटप खालीलप्रमाणे असेलः ग्रामपंचायतींना ७०%, पंचायत समित्यांना १५% आणि जिल्हा परिषदांना १५%. नागरी स्थानिक संस्था आणि ग्रामीण संस्थांमधील आपापसातील (Inter-se) वितरण विशिष्ट सूत्रावर आधारित असेल. • **नागरी स्थानिक संस्थांसाठीः** लोकसंख्या (५०%), क्षेत्रफळ (२०%) आणि सर्वाधिक दरडोई स्वतःचे उत्पन्न असलेल्या नागरी संस्थेपासून संबंधित संस्थेच्या दरडोई स्वतःच्या उत्पन्नाचे अंतर (३०%). • **ग्रामीण स्थानिक संस्थांसाठीः** लोकसंख्या (५०%), क्षेत्रफळ (२०%) आणि सर्वाधिक दरडोई उत्पन्न असलेल्या जिल्ह्यापासून संबंधित जिल्ह्याच्या दरडोई उत्पन्नाचे अंतर (३०%).
	सर्व ग्रामीण स्थानिक संस्था (जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती), नगरपंचायती, नगरपरिषदा (अ, ब आणि क वर्ग) आणि महानगरपालिका (क आणि ड वर्ग) यांच्यासाठी हा निधी पूर्णपणे 'निबंधमुक्त' (Un-tied) आणि 'बिनशर्त' (Un-conditional) असेल.

	महानगरपालिका (अ+, अ आणि ब वर्ग) यांच्यासाठी निधीचे हस्तांतरण पूर्णपणे स्वतंत्रपणे नमूद केलेल्या सुधारणांच्या (Reforms) आधारावर असेल. राज्य शासन या सुधारणांच्या अटी इतर महानगरपालिका आणि नगरपरिषदांना (अ वर्ग) ३ वर्षांच्या कालावधीत लागू करू शकते.
(ब)	**करांचे अभिहस्तांकन आणि हस्तांतरण**
# शिफारस २ (७.६)	१९७५ पूर्वी, व्यवसाय कर स्थानिक संस्थांद्वारे आकारला आणि संकलित केला जात असे. 'महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्यांवरील कर अधिनियम, १९७५' लागू झाल्यामुळे, याचे संकलन राज्याकडे केंद्रीकृत करण्यात आले. आयोग, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचा कर संकलित करण्याचे अधिकार राज्याकडेच ठेवून आणि बहु-स्थानिक व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र (PTRC) धारकांसाठी एक स्वतंत्र यंत्रणा विकसित करून, व्यवसाय कर संकलनाचे अधिकार स्थानिक संस्थांकडे सोपवण्याची शिफारस करतो. संविधानाच्या अनुच्छेद २७६ आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या धर्तीवर, राज्य शासनाने जर तसे ठरवले असेल तर राज्याच्या वतीने स्थानिक संस्था हा कर संकलित करून स्वतःचा कर आकारणे सुरू ठेवू शकते.
# शिफारस ३ (७.९)	स्थानिक संस्थांसाठी अतिरिक्त मुद्रांक शुल्काची निधी पुरवठा यंत्रणा बहुस्तरीय आहे, यामध्ये संकलित रक्कम राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा केली जाते. त्यानंतर, नगरविकास विभाग (यू डी डी) थेट नागरी स्थानिक संस्थांना (यू एल बीज) निधी वितरित करतो, परंतु ग्रामविकास आणि पंचायत राज विभाग (आर डी डी) नोंदणी महानिरीक्षक (आय जी आर) कार्यालयामार्फत ग्रामीण स्थानिक संस्थांना (आर एल बीज) निधी वितरीत करतो. यामुळे प्रक्रियेत विक्षेपण (विलंब) होतो. आयोग अशी शिफारस करतो की, स्थानिक संस्थांसाठी स्वतंत्र लेखाशीर्षे (Account Heads) तयार करून आणि त्यासाठी वेगळेपणाचे तत्त्व लागू करून त्याद्वारे अतिरिक्त मुद्रांक शुल्काचे हस्तांतरण स्वयंचलित थेट हस्तांतरण यंत्रणेद्वारे (ऑटोमेटेड डायरेक्ट ट्रान्सफर) केले जावे आणि शासकीय जमा आणि लेखांकन प्रणाली आणि (ग्रास) 'अतिरिक्त मुद्रांक शुल्क' (ॲडिशनल स्टॅम्प ड्यूटी) ही संज्ञा सर्व संबंधित कायद्यांमध्ये स्वीकारली जावी. यासाठी स्थानिक संस्थांचे स्वतंत्र लेखा शीर्ष (Account Heads) तयार करावीत. 'शासकीय जमा आणि लेखा प्रणाली' (GRAS) द्वारे संकलनाच्या वेळीच अतिरिक्त मुद्रांक शुल्क आभासी कोषागाराने (व्हर्च्यूअल ट्रेझरी) संबंधित स्थानिक संस्थांना तात्काळ (Real time) हस्तांतरित करावे.
# शिफारस ४ (७.१२)	राज्य शासनाने ३१/१२/२०२५ च्या राजपत्रातील अधिसूचनेद्वारे निवासी, वाणिज्यिक आणि औद्योगिक इमारतींसाठीचा कृषितर (NA) कर पूर्णपणे रद्द करण्याचा निर्णय घेतला असून, जमिनीच्या वापरात कृषिवरून कृषितर असा बदल करण्याच्या वेळी, 'महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६' च्या कलम ४७ अन्वये एकरकमी अधिमूल्य वसूल करण्याचे प्रस्तावित केले आहे. आयोग शिफारस करतो की, जमिनीच्या वापरात बदल करताना आकारल्या आणि वसूल केल्या जाणाऱ्या एकरकमी अधिमूल्यावर १०% अतिरिक्त उपकर (Cess) अनिवार्यपणे आकारला जावा. आयोग आणखी अशीही शिफारस करतो की, स्थानिक संस्थांना मिळणाऱ्या या १०% इतक्या एकरकमी अधिमूल्यावर अतिरिक्त उपकराची नोंद करण्यासाठी स्वतंत्र लेखा शीर्ष तयार करावे. शासकीय जमा व लेखाकंन प्रणाली (ग्रास) द्वारे एकरकमी अधिमूल्य वसूल करताना यंत्रणेने एकरकमी अधिमूल्य आणि अतिरिक्त उपकर, स्वतंत्रपणे, निश्चित करावा आणि आभासी कोषागाराने (व्हर्च्युअल ट्रेझरी) १०% रक्कम संबंधित स्थानिक संस्थांना तात्काळ हस्तांतरित करावी.
# शिफारस ५ (७.१४)	जरी राज्याच्या कायद्यांनुसार जमिनीच्या महसुलावरील उपकर स्थानिक संस्थांना देय रकमेच्या आधारावर हस्तांतरित करणे अनिवार्य केले असले तरी, सध्या राज्य शासन प्रत्यक्ष वसुलीच्या आधारावर निधी हस्तांतरित करते. आयोग 'जमिनीच्या महसुलावरील उपकर' (Cess on Land Revenue) ही संज्ञा संबंधित स्थानिक संस्थांच्या संदर्भातील कायद्यांमध्ये प्रमाणित करण्याची आणि विद्यमान कायदेशीर तरतुदींनुसार, ग्रामविकास व पंचायतराज विभाग आणि नगरविकास विभागाच्या अर्थसंकल्पात वार्षिक मागण्यांचा समावेश करून हा निधी 'मागणी'च्या (Demand basis) आधारावर स्थानिक संस्थांना 'जमीन महसुलावरील उपकर' म्हणून देण्याची शिफारस करतो.

# शिफारस ६ (७.१७)	मोटार वाहन कर पूर्णपणे राज्याद्वारे आकारला आणि संकलित केला जातो. स्थानिक संस्थांना तो संकलित करण्यास मनाई करण्यात आली आहे. नागरी स्थानिक संस्थांना मोटार वाहन कराच्या १०% रक्कम रस्ते अनुदान म्हणून मिळते. आयोग शिफारस करतो की, ग्रामीण स्थानिक संस्थांना (केवळ जिल्हा परिषदांनाच) मोटार वाहन कराचा ४% हिस्सा रस्ते अनुदान म्हणून स्वतंत्रपणे दिला जावा. तसेच, या निधीचे आपापसातील वितरण #शिफारस १ मधील निधीचे (हस्तांतरण) सूत्राप्रमाणे असावे.
# शिफारस ७ (७.२१)	१५ व्या वित्त आयोगाच्या 'राष्ट्रीय आपत्ती जोखीम व्यवस्थापन निधी आणि राज्य आपत्ती जोखीम व्यवस्थापन निधी' आराखड्यामुळे राज्यस्तरीय आपत्ती निधी बळकट झाला आहे, परंतु आपत्तीच्या वेळी प्रथम प्रतिसादाची भूमिका बजावणाऱ्या स्थानिक संस्थांना मर्यादित निधी मिळतो. त्यामुळे स्थानिक आपत्ती सज्जता आणि निवारणासाठी प्राधान्याने निधी वाटप करण्याची आवश्यकता अधोरेखित होते. आयोग शिफारस करतो की, मदत व पुनर्वसन विभागाने राज्य आपत्ती सौम्यीकरण निधीचा (एस डी एम एफ) एक-तृतीयांश हिस्सा राज्यस्तरावर ठेवून दोन-तृतीयांश हिस्सा स्थानिक संस्थांना हस्तांतरित करावा. स्थानिक संस्थांना हस्तांतरित केलेल्या राज्य आपत्ती सौम्यीकरण निधीचे (एस डी एम एफ) जोखीम आधारित वितरण सुनिश्चित करण्यासाठी ग्रामविकास व पंचायत राज विभाग आणि नगरविकास विभागाने केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीच्या धर्तीवर 'आपत्ती जोखीम निर्देशांक' तयार करण्यासाठी आधारभूत म्हणून 'धोका आणि जोखीम संवेदनशीलता मूल्यमापना'चा (Hazard Risk Vulnerability Assessment) वापर करावा.
# शिफारस ८ (७.२४)	आयोगाने असेही निरीक्षण नोंदवले आहे की, जिल्हा नियोजन समिती (डी पी सी) यंत्रणेद्वारे अंदाजे १२,००० कोटी रुपये स्थानिक संस्थांना मिळतात, परंतु ग्रामीण-नागरी नियत वाटपासाठी सूत्र-आधारित यंत्रणा नसल्यामुळे, भांडवली नियोजनात अनिश्चितता निर्माण होते आणि संतुलित प्रादेशिक विकासात अडथळा येतो. आयोग शिफारस करतो की, न्याय्य आणि गरजेवर आधारित नियतवाटप सुनिश्चित करण्यासाठी, जिल्हा नियोजन समिती (डी पी सी) स्थानिक संस्थांमध्ये DPC निधीच्या वितरणासाठी त्या कालावधीसाठी टप्पे-निहाय रीतीने प्रकरण ६ मध्ये सुचवलेले प्रमाणित हस्तांतरण सूत्र वापरले जावे.
# शिफारस ९ (७.२६)	महाराष्ट्र शासनाने २०१९ मध्ये वाहतूक नियमांच्या उल्लंघनावर लक्ष ठेवण्यासाठी केंद्रीकृत इ-चलन प्रणाली सुरू केली आहे. या यंत्रणेमागचा उद्देश रस्ते सुरक्षा वाढवणे आणि पारदर्शक अंमलबजावणी करणे हा असला तरी, केंद्रीकृत कार्यान्वयनामुळे प्रलंबित दंड वसूल करण्यासाठी स्थानिक प्राधिकरणांशी समन्वय साधणे कठीण होत असल्याने दंडाची वसुलीचा दर सरासरी ३६% इतकी कमी आहे. आयोग शिफारस करतो की, स्थानिक संस्थांना त्यांना विद्यमान 'महा ट्रॅफिक ॲप'वर प्रवेश देऊन (लॉगिन एक्सेस) प्रलंबित वाहतूक इ-चलनाची थकबाकी वसूल करण्यासाठी वैधानिक अधिकार दिले जावेत. आयोगाने असेही अनिवार्य केले आहे की, राज्य शासनाने संकलित थकबाकीच्या २०% रक्कम सेवा शुल्क (Service Charges) म्हणून आकारावी आणि ही रक्कम वसूल करणाऱ्या स्थानिक संस्थेकडून 'अबद्ध अनुदाने' (Untied grants) म्हणून ठेवून देण्यात यावी.
(क)	**स्वतःच्या कर महसुलात वाढ**
# शिफारस १० (८.५)	'महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळ अधिनियम, २०११' मध्ये नागरी स्थानिक संस्थांची मालमत्ता कर प्रणाली बळकट आणि प्रमाणित करण्यासाठी तज्ज्ञ प्राधिकरणाची कल्पना मांडली होती. परंतु, असे मंडळ अद्यापही घटीत झालेले नाही. आयोग शिफारस करतो की, 'महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळ अधिनियम, २०११' अंतर्गत **महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळ (एम एम पी टी बी)** तात्काळ घटित केले जावे.
# शिफारस ११ (८.६)	महाराष्ट्र महानगरपालिका मालमत्ता कर मंडळाचा कार्यादेश सध्या 'महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९' अंतर्गत येणाऱ्या ग्रामीण संस्थांना (ग्रामपंचायतींना) लागू नाही. आयोग शिफारस करतो की, या संदर्भात लागू असतील अशा यथोचित कायद्यांच्या संबंधित कलमांमध्ये दुरुस्ती करून, महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळाचा कार्यादेश ग्रामपंचायतींनाही लागू केला जावा.

# शिफारस १२ (८.७)	सध्या महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळाच्या कार्यादेशात वापरकर्ता शुल्क (User charges), पाणी आणि विशेष पाणी कर (पाणीपट्टी), विकास कर आणि थकबाकी वसुली यांसारख्या स्थानिक महसूल स्त्रोतांचा समावेश होत नाही. आयोग शिफारस करतो की, सर्व स्थानिक महसूल स्त्रोतांच्या प्रभावी संकलनासाठी, यंत्रणा विहित करण्यासाठी महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळाच्या नियामक भूमिकेचा विस्तार करावा.
# शिफारस १३ (८.९)	काही मोठ्या नागरी स्थानिक संस्थांनी मालमत्ता कर व्यवस्थापनासाठी स्वतंत्र डिजिटल प्रणाली विकसित केली आहे. परंतु, बहुतेक स्थानिक संस्था आर्थिक सहाय्य आणि क्षमतेच्या अभावामुळे एकमेकांशी नीट न जोडलेल्या मंचाचाच वापर करत आहेत. त्यामुळे नोंदी प्रमाणित होत नाहीत आणि परिणामी राज्यस्तरीय संनियंत्रण आणि महसुलात सुधारणा करण्याचे प्रयत्न अधिक कमकुवत होतात. आयोग शिफारस करतो की, नागरी आणि ग्रामीण स्थानिक संस्थांच्या सर्व कर आणि करेतर महसुलाचे मूल्यांकन, आकारणी, संकलन आणि संनियंत्रण यासाठी, राज्यस्तरावर एकच **एकीकृत डिजिटल मंच (प्लॅटफॉर्म)** स्थापित केला जावा.
# शिफारस १४ (८.११)	काही नागरी स्थानिक संस्थांनी मालमत्ता मूल्यांकनात सुधारणा करण्यासाठी भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस)लीडार/ड्रोन सर्वेक्षणाचा वापर केला आहे. परंतु, बहुतेक स्थानिक संस्थांकडे अशी क्षमता नाही. भारत सरकारचा 'नकाशा' (NAKSHA) हा पथदर्शी (पायलट) प्रकल्प निवडक शहरांमध्ये ही कमतरता दूर करण्याचा प्रयत्न करत आहे. आयोग शिफारस करतो की, नगरविकास विभागाच्या सर्व नागरी स्थानिक संस्थांमध्ये कालमर्यादित आर्थिक मदतीसह भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस) आधारित मालमत्ता मॅपिंगसाठी 'नकाशा' (NAKSHA) योजनेचा अवलंब अनिवार्य करण्यात यावा.
# शिफारस १५ (८.१३)	'स्वामित्व' (SVAMITVA) योजनेने गावठाण भागातील मालमत्तांचे चिन्हांकन (मॅपिंग) केले आहे, परंतु या क्षेत्राबाहेरही मोठ्या प्रमाणावर विकास झाला आहे. ग्रामपंचायती नागरी सेवा पुरवत असूनही हे भाग सध्या चिन्हांकनाशिवाय (मॅपिंग) आणि कर न आकारता तसेच राहिले आहेत. आयोग शिफारस करतो की, ड्रोन-आधारित सर्वेक्षण आणि भौगोलिक माहिती प्रणाली द्वारे (जीआयएस) गावठाण क्षेत्राबाहेरील भागांचे चिन्हांकन (मॅपिंग) करण्यासाठी 'स्वामित्व' योजनेचा विस्तार करावा.
# शिफारस १६ (८.१४)	आयोग शिफारस करतो की, 'नकाशा', 'स्वामित्व' आणि विस्तारित 'स्वामित्व' योजनेअंतर्गत चिन्हांकन (मॅप) केलेल्या प्रत्येक मालमत्तेला अनन्य मालमत्ता ओळखपत्र **'युनिक प्रॉपर्टी ओळखपत्र' (आयडी) (Unique Property ID)** दिला जावा. हे ओळखपत्र (आयडी) 'महाराष्ट्र स्थानिक शासन महसूल पोर्टल'शी आणि जोडलेल्या इतर संबंधित आधार सामग्रीबरोबर अखंडपणे जोडलेले असावे.
# शिफारस १७ (८.१६)	वार्षिक दर विवरणपत्र (एएसआर) आणि मालमत्ता-विशिष्ट घटक यांच्यावर आधारित **भांडवली मूल्याधारित (Capital Value सीव्ही)** कर प्रणालीमुळे पारदर्शक स्वयं-मूल्यांकन शक्य होते आणि महसुलात भरीव वाढ दर्शवून, ग्रामपंचायती आणि बृहन्मुंबई महानगरपालिका, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका, कोल्हापूर महानगरपालिका, बदलापूर नगरपरिषद आणि सावदा नगरपरिषद यांसारख्या नागरी संस्थांमध्ये ही प्रणाली प्रभावी ठरली आहे. आयोग शिफारस करतो की, महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळाने (एमएमपीटीबी) याच्या भांडवली मूल्यावर आधारित मालमत्ता करप्रणालीच्या अंमलबजावणीवर आणि वार्षिक दर विवरणपत्र (ASR) जोडणीवर (लिंक) देखरेख ठेवून भांडवली मूल्यावर आधारित मालमत्ता करप्रणालीच्या सर्व नागरी संस्थांमध्ये एका वर्षाच्या आत भांडवली मूल्यावर आधारित मालमत्ता कर प्रणाली लागू करावी. ही मालमत्ता करासाठीची भांडवली मूल्याधारित (सीव्ही) प्रणाली कामगिरी अनुदानाशी जोडली जाईल.

# शिफारस १८ (८.२०)	व्यावसायिक परवाना (Trade Licensing) पद्धतीमुळे नागरी स्थानिक संस्थाना घातक उपक्रमांचे विनियमन करणे शक्य होते, परंतु अनेक व्यावसायिक आस्थापना आणि व्यावसायिक नोंदणीकृत नसल्यामुळे स्थानिक नियोजन, सेवा उपलब्धता, जोखीम व्यवस्थापन आणि व्यवसाय कर संकलनात अडचणी येतात. आयोग शिफारस करतो की, स्थानिक संस्थांच्या हद्दीत चालणाऱ्या सर्व आस्थापनांसाठी त्वरित मंजुरीवर आधारित स्थानिक प्रशासनाची व्यावसायिक ओळख पटविणारी यंत्रणा **'लोकल गव्हर्नमेंट कमर्शियल आयडेंटिफायर' (एल जी सी आय)** सुरू करावी आणि व्यावसायिक परवाना प्रक्रिया केवळ जोखीम-आधारित कामाच्या अनुसूची आधारित प्रवर्गांवर लक्ष केंद्रीत करून वर नमूद केलेल्या यंत्रणेची अंमलबजावणी अनिवार्य करावी.
# शिफारस १९ (८.२३)	मर्यादित महसूल क्षमता, कमकुवत पतपात्रता (credit worthiness), जाचक जमीन धोरणे आणि स्थिर भाडे उत्पन्न यांमुळे लहान स्थानिक स्वराज्य संस्था अनुदानावर अवलंबून राहतात, ही परिस्थिती, खाजगी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांची क्षमता बळकट करण्याची गरज अधोरेखित करते. स्थानिक स्वराज्य संस्थांना सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पी पी पी) साठी सक्षम करण्यासाठी सहा महिन्यांच्या आत क्षेत्रीय प्राधान्यक्रम समूहनिर्मिती (क्लस्टरिंग), संस्थात्मक सहाय्य, मंजुरी आणि प्रापण यासाठी प्रमाणित आराखडा उपलब्ध करणारी **'स्थानिक संस्था सार्वजनिक-खाजगी भागीदारी पुस्तिका' (Local Body PPP Handbook)** तयार करण्याची शिफारस आयोगाने केली आहे.
# शिफारस २० (८.२५)	नागरी स्थानिक संस्थांच्या भाड्याच्या उत्पन्नातील स्थिरता पाहता, अधिक कार्यक्षम मालमत्ता व्यवस्थापनासाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पी पी पी) द्वारे महसूल वाढवण्याची मोठी संधी असल्याचे दिसून येते. आयोग शिफारस करतो की, दीर्घकालीन गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी दीर्घकालीन भाडेपट्टा प्रमाणित करण्यासाठी, भाडेपट्ट्याच्या अधिमूल्यांमध्ये जास्तीत जास्त वाढ करण्यासाठी, आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी, स्थानिक संस्थांना, त्यांच्या स्तरावर ३० वर्षांपर्यंत मालमत्ता भाड्याने (Lease) देण्यासाठी मुभा देण्याकरिता संबंधित कायद्यांमध्ये दुरुस्ती करावी. स्थानिक संस्थांनी सार्वजनिक खरेदी मार्गदर्शक तत्त्वे आणि निविदा प्रक्रियेचे काटेकोरपणे पालन करावे. कोणत्याही अपवादासाठी शासनाची पूर्वमंजुरी आवश्यक असेल.
# शिफारस २१ (८.२८)	दुहेरी बांधकाम परवानगी प्रणालीमुळे ग्रामपंचायतींचे अधिकार केवळ 'गावठाण' क्षेत्रापुरतेच मर्यादित राहतात. परिणामी, रहिवाशांना गावठाण क्षेत्राबाहेरील बांधकामासाठी जिल्हा कार्यालयांकडून रीतसर परवानगी घ्यावी लागते. सेवा वितरणात सुधारणा करण्यासाठी आणि अतिरिक्त महसूल मिळवण्यासाठी ग्रामपंचायतींच्या अधिकारांची व्याप्ती वाढवण्यास येथे मोठा वाव आहे. आयोगाने अशी शिफारस केली आहे की, संबंधित कायद्यांमध्ये सुधारणा करून ज्या ग्रामपंचायतींची लोकसंख्या २००० पेक्षा कमी आहे आणि ज्या जवळच्या नागरी स्थानिक संस्थेपासून (ULB) ५ किमी पेक्षा जास्त अंतरावर आहेत, अशा ग्रामपंचायतींना गावठाण क्षेत्राबाहेरही बांधकामास परवानगी देण्याचे अधिकार प्रदान करण्यात यावेत. आयोगाने पुढे असेही अनिवार्य केले आहे की, ग्रामपंचायतींनी कामकाज प्रक्रिया सोपी करून आणि ९ मीटरपेक्षा कमी उंचीच्या आणि 'तळमजला अधिक एक' (G+1) अशा निवासी इमारतींसाठी वास्तुविशारदाची (Architect) अट शिथिल करून इमारत आराखडा व्यवस्थापन यंत्रणा **'बिल्डिंग प्लॅन मॅनेजमेंट सिस्टम'** मध्ये स्वतंत्र प्रवेश करणे (लॉगिन) उपलब्ध करून द्यावे. ग्रामपंचायतींना ग्रामपंचायत स्तरावर इमारत आराखडा व्यवस्थापन प्रणाली (बी पी एम एस) कार्यान्वित करण्यासाठी त्यांना आवश्यक माहिती तंत्रज्ञान (आय टी), हार्डवेअर सहाय्य आणि मार्गदर्शक तत्त्वे उपलब्ध करून देण्यात यावीत.
# शिफारस २२ (८.३०)	महाराष्ट्रातील स्थानिक संस्था सार्वजनिक वाहनतळांचे नियमन करताना हाताने काम करणाऱ्या विखंडित आणि कमकुवत अंमलबजावणी आणि माहितीच्या उपलब्धतेतील त्रुटी असणाऱ्या रोख आधारित यंत्रणेवर अवलंबून आहेत. ज्यामुळे महसुलाची गळती (महसूल कमी जमणे) आणि वाहतूक कोंडी यासारखी परिस्थिती उद्भवते, या परिस्थितीमुळे राज्य-स्तरीय वाहनतळ आराखड्याची (Framework) आवश्यकता अधोरेखित होत आहे. आयोग शिफारस करतो की, स्थानिक संस्थांच्या स्तरावर वाहनतळ वरील कामे, त्यांची क्षेत्ररचना (Zoning), डिजिटल एकत्रीकरण आणि विक्रेत्यांच्या व्यवस्थापना यांसाठी प्रमाणित आराखडा उपलब्ध करून देणारे टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करता येईल अशा योजनेसह एक 'राज्य वाहनतळ धोरण' तयार करून अधिसूचित करावे; माहिती तंत्रज्ञान (आयटी) विभागाने राज्य-स्तरीय डिजिटल वाहनतळ मंच (पार्किंग प्लॅटफॉर्म) विकसित व कार्यान्वित करावा.

# **शिफारस २३** (८.३३)	महाराष्ट्राचे राज्यव्यापी बाहेरच्या जागेत लावलेले जाहिरात फलक (Hoarding) धोरण आणि कायदे, स्थानिक संस्थांना जाहिरातींचे नियमन व त्यातून महसूल मिळवण्याचे अधिकार देतात. परंतु, विशेषतः खूप छोट्या स्थावर मालमत्तेच्या (Micro-real estate) बाबतीतील त्यांचा समावेश घेण्यामध्ये त्रुटी असल्याने, या क्षेत्रातील पूर्ण महसूल क्षमतेवर मिळण्याच्या मर्यादा येत आहेत. आयोग शिफारस करतो की, स्थानिक संस्थांना जाहिरातींसाठी खूप छोट्या स्थावर मालमत्ता भाड्याने देण्यास सक्षम करणारी मोठ्या जाहिरात फलकांऐवजी रस्त्यावरील सार्वजनिक ठिकाणच्या वस्तू (स्ट्रीट फर्निचर) (उदा. बस थांबे, बाकडी) यांसारख्या वारंवार नजरेस पडणाऱ्या साधनांवर लक्ष केंद्रित करणारी 'प्रमाणित कार्यचालन पद्धती' (SOPs) विकसित करून ती अनिवार्य करावी; आयोग पुढे असेही अनिवार्य करतो की, पथदिवे, बस थांबे, सार्वजनिक शौचालये आणि इतर तत्सम मालमत्तांना, परवाना देण्यासाठी व संनियंत्रणासाठी 'युनिक डिजिटल आयडी' ने (QR कोड) जोडण्यासाठी, ६० दिवसांच्या आत भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस) आधारित मालमत्ता गणना (Asset census) पूर्ण करावी.
(ड)	**संस्थांना बळकट करणे**
# शिफारस २४ (९.८)	'महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन' (एम एफ आर बी एम) अधिनियमाने राज्यस्तरावर वित्तीय शिस्त सुनिश्चित केली आहे. आयोग शिफारस करतो की, त्याच धर्तीवर **'महाराष्ट्र स्थानिक संस्था राजकोषीय उत्तरदायित्व आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन'** (एम एल बी एफ आर बी एम) अधिनियम तयार करून अधिनियमित करावा.
# शिफारस २५ (९.११)	स्थानिक संस्था अर्थसंकल्प तयार करतात, परंतु अहवाल देण्याच्या मानकांचे पालन न केल्यामुळे विश्वासार्ह लेखापरीक्षित खाती हिशेब उपलब्ध होत नाहीत. आयोग शिफारस करतो की, स्थानिक संस्थांनी विद्यमान लेखापुस्तिका आणि नियमावलींचे आणि संहितांचे लेखापरीक्षित खाती एका निश्चित केलेल्या अंतिम तारखेस (Cut-off date) सादर करणे आणि सर्व स्थानिक संस्थांची लेखापरीक्षित खाती प्राधान्याने शासन आणि संबंधित स्थानिक संस्थेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन प्रसिद्ध करणे यांसह काटेकोरपणे पालन करावे.
# शिफारस २६ (९.१४)	वैधानिक लेखापरीक्षण आराखडा (Statutory audit framework) अस्तित्वात असतानाही, स्थानिक संस्थांच्या लेखापरीक्षणात विलंब, लेखापरीक्षण हरकतींची मोठी प्रलंबित संख्या, कमकुवत अनुपालन (Compliance), आणि आर्थिक सुशासनासाठी लेखापरीक्षणाचा साधन म्हणून मर्यादित वापर यांसारख्या समस्या भेडसावत आहेत. 'ग्रामीण स्थानिक संस्थांसाठी' (आर एल बी) तंत्रज्ञान-आधारित लेखापरीक्षण मंच (प्लॅटफॉर्म) आधीच उपलब्ध आहे, परंतु तो 'नागरी स्थानिक संस्थांना' (यू एल बी) समान रीतीने लागू करण्यात आलेला नाही. आयोग अशी शिफारस करतो की, लेखापरीक्षण प्रक्रियेत समानता आणण्यासाठी, लेखापरीक्षण हरकतींचा प्रभावी मागोवा घेण्यासाठी आणि पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी सध्या ग्रामीण संस्थांसाठी वापरली जाणारी **'ऑडिट-ऑनलाइन' (Audit Online)** प्रणाली नागरी स्थानिक संस्थांनासुध्दा वापरण्यास उपलब्ध करून देण्यात यावी. आयोग पुढे अशीही शिफारस करतो की, 'इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ऑडिटर्स ऑफ इंडिया' आणि महाराष्ट्राचे महालेखापाल (Accountant General) यांच्याशी सल्लामसलत करून, **'जिल्हा स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालया'द्वारे (DLFAA)** स्थानिक संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी प्रमाणित असलेल्या सनदी लेखापाल (CA) (Empanelment) संस्थांचे नामिकीकरण करण्यात यावे. यथोचित भौगोलिक समूहांसाठी (Geographical clusters) या संस्थांचे नामिकीकरण केले जाऊ शकते.
# शिफारस २७ (९.१६) (९.१९) (९.२१) (९.२३)	महाराष्ट्रातील स्थानिक संस्थांना वाढत्या सेवा वितरण जबाबदाऱ्या आणि मर्यादित वित्तीय उपलब्धतेसह, दीर्घकालीन सार्वजनिक मूल्य, आर्थिक शाश्वतता आणि प्रभावी सेवा वितरण यांची सुनिश्चिती करण्यासाठी खर्चाची कार्यक्षमता सुधारणे आवश्यक आहे. आयोग पुढील शिफारशी करतो : • स्थानिक संस्थांद्वारे वस्तुनिष्ठ, परिणामकारक आणि मूल्याधारित प्रकल्पांची निवड करणे शक्य करण्यासाठी, प्रमाणित मूल्यमापन मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे **'प्रकल्प प्राधान्यक्रम सारणी' (Project Prioritisation Matrix)** सुरू करण्यात यावी.

	• जिल्हाधिकाऱ्यांमार्फत द्विवार्षिक संनियंत्रण (Monitoring) सह सर्व नागरी स्थानिक संस्थांना (ULBs) प्राधान्यक्रम सारणीशी जोडलेली **५ वर्षांची 'भांडवली गुंतवणूक योजना' (Capital Investment Plan CIP)** तयार करणे अनिवार्य करावे. • कामांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आणि सर्व विभागांमधील कामांची पूर्तता व देयकांचा मागोवा घेण्यासाठी माहिती तंत्रज्ञान (IT) सचिवांसोबत सामायिक केलेल्या, वास्तवकाल (रिअल-टाइम), भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस) सक्षम डॅशबोर्ड आणि 'युनिक ॲसेट आयडी'चा समावेश असलेल्या 'फ्लो चार्ट'च्या धर्तीवर **'राज्यव्यापी कार्य व्यवस्थापन प्रणाली' (Statewide Works Management System)** विकसित करण्यात यावी. • ई-निविदा प्रक्रिया संस्थागत करण्यासाठी, खरेदी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आणि स्थानिक संस्थांच्या कामकाजात शाश्वतता, हवामान प्रतिरोधकता (Climate resilience) आणि संसाधन कार्यक्षमता समाविष्ट करण्यासाठी **'प्रमाणित खरेदी साधनसंच' (Standardised Procurement Toolkit)** जारी करण्यात यावे.
# शिफारस २८ (९.२६)	स्थानिक स्वराज्य संस्थांकडून केल्या जाणाऱ्या कामांमध्ये पारदर्शकता, जबाबदारी आणि नागरिकांद्वारे पर्यवेक्षण सुनिश्चित करण्यासाठी एक संरचित आणि संस्थात्मक सामाजिक लेखापरीक्षण यंत्रणा आवश्यक आहे. आयोगाने शिफारस केली आहे की, नगर विकास विभाग (यूडीडी) आणि ग्राम विकास विभाग (आरडीडी) व पंचायत राज विभागाने स्थानिक स्वराज्य संस्थांकडून केल्या जाणाऱ्या कामांसाठी एक व्यापक 'सामाजिक लेखापरीक्षण चौकट' विकसित करावी आणि ती राज्यव्यापी कामकाज व्यवस्थापन प्रणालीमध्ये समाविष्ट करावी. आयोग पुढे असे आदेश देतो की, स्थानिक संस्थांनी राष्ट्रीय ग्राम विकास आणि पंचायती राज संस्था आणि भारतीय नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार स्वतंत्र सामाजिक लेखापरीक्षण युनिट्स स्थापन करून नागरिकांचा सहभाग संस्थात्मक करावा.
# शिफारस २९ (९.३०)	स्थानिक विकासासाठी सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) निधीचा लाभ घेण्याची महाराष्ट्रात मोठी क्षमता आहे, परंतु स्थानिक संस्थांकडे सध्या प्राधान्यक्रम द्यावयाचे असे प्रकल्प ओळखण्यासाठी आणि सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) निधीत योगदान देणाऱ्यांशी पद्धतशीरपणे संवाद साधण्यासाठी पूर्वनियोजित यंत्रणा उपलब्ध नाही. आयोगाने शिफारस केली आहे की, स्थानिक विकासाशी संबंधित प्राधान्यक्रमांशी सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) निधीचा सक्रियपणे मेळ घालण्यासाठी महानगरपालिका, जिल्हाधिकारी स्तरावरील जिल्हा प्रशासन कार्यालय आणि जिल्हा परिषदांमध्ये, या संदर्भातील त्यांची भूमिका आणि अपेक्षित परिणाम स्पष्ट करून, समर्पित **'सामाजिक उत्तरदायित्व कक्ष (सीएसआर सेल)** स्थापन करण्यात यावेत. आयोगाने पुढे अशीही शिफारस केली आहे की, स्थानिक संस्थांना प्राप्त झालेल्या सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) निधीचा मागोवा घेण्यासाठी आणि राज्यभरातील सीएसआर-समर्थित उपक्रमांचे दस्तऐवजीकरण करण्यासाठी एक **'राज्य सीएसआर पोर्टल'** स्थापन करण्यात यावे.
# शिफारस ३० (९.३४)	वाढत्या नागरी पायाभूत सुविधांच्या गरजा आणि मर्यादित सार्वजनिक निधीमुळे, **नागरी स्थानिक संस्थांना (यू एल बी)** महसूल स्त्रोतांमध्ये वैविध्यपूर्णता आणण्यासाठी आणि महानगरपालिका रोखे (म्युनिसिपल बाँड्स) यांसारख्या पर्यायी वित्तपुरवठा साधनांचा वापर करण्यासाठी क्षमता निर्माण करण्याची आवश्यकता आहे. आयोगाने अशी शिफारस केली आहे की, **नगरविकास विभागाने (UDD)** सर्व २९ महानगरपालिकांना स्वतःचे क्रेडिट रेटिंग करून घेणे आणि मार्च २०३० पर्यंत किमान एक महानगरपालिका रोखे (म्युनिसिपल बाँड्स) जारी करणे अनिवार्य करावे. यशदा (YASHADA) ने सेबी (SEBI), शेअर बाजार (स्टॉक एक्स्चेंज), क्रेडिट रेटिंग एजन्सी आणि मर्चेंट बँकर्स यांच्या सहकार्याने आयुक्त आणि मुख्य अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावेत, जेणेकरून म्युनिसिपल बाँड फायनान्सिंगसाठी संस्थात्मक क्षमता मजबूत होईल.
# शिफारस ३१ (९.३८)	स्थानिक संस्थांचे प्रभावी सनियंत्रण आणि धोरणनिर्मितीमध्ये विखुरलेल्या व प्रामुख्याने माहितीची वारंवार नोंद करावी लागते, अशा डिजिटल नसणाऱ्या माहिती (डेटा) प्रणालींमुळे अडथळे येतात, परिणामी माहितीत विसंगती निर्माण होते आणि प्रशासकीय कामाचा बोजा वाढतो.

	आयोग अशी शिफारस करतो की, नगर विकास विभाग (युडीडी), ग्रामविकास व पंचायत राज विभाग (आरडीडी) आणि माहिती तंत्रज्ञान (आयटी) विभागाने संयुक्तपणे एकत्रित स्थानिक संस्था माहिती यंत्रणा (युएलबीआयए) ही सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी हे राज्यस्तरीय माहिती संच (डेटा प्लॅटफॉर्म) म्हणून विकसित आणि कार्यान्वित करावे. माहितीची पुनरावृत्ती टाळून विश्वसनीय सनियंत्रण, पर्यवेक्षण आणि पुराव्यावर आधारित धोरणनिर्मिती करणे शक्य होण्यासाठी (डेटा प्लॅटफॉर्म)म्हणून विकसित आणि कार्यान्वित करावे. माहितीची पुरावृत्ती टाळून विश्वसनिय सनियंत्रण, पर्यवेक्षण आणि पुराव्यावर आधारित धोरणनिर्मिती करणे शक्य होण्यासाठी हे मंच विद्यमान प्रणालीशी जोडले असावे.
# शिफारस ३२ (९.४१)	स्थानिक प्रशासनातील वाढत्या जटिलतेमुळे (Complexity) सरकारी अधिकाऱ्यांमध्ये अधिक मजबूत प्रशासकीय, तांत्रिक आणि विशेष कौशल्यांची आवश्यकता वाढली आहे. आयोग शिफारस करतो की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकाऱ्यांसाठी 'यशदा' (YASHADA) मार्फत प्रशासकीय प्रशिक्षण, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या महानगरपालिका क्षमता उभारणी आणि संशोधन केंद्र (एमसीएमसीआर) यांसारख्या ठरावीक संस्थांमार्फत तांत्रिक कार्यक्रम संबंधित प्रशिक्षण आणि विनिर्दिष्ट संस्थांमार्फत अग्निशमन सेवांसारखे विशेष प्रशिक्षण देण्यासाठी एक व्यापक प्रशिक्षण आराखडा संस्थात्मक करण्याची शिफारस करतो.
# शिफारस ३३ (९.४४)	महाराष्ट्रातील ग्रामीण आणि शहरी दोन्ही स्थानिक संस्थांचे कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील निकष (Staffing norms) हे सध्याच्या सेवा वितरणाच्या मागण्या, तांत्रिक गरजा किंवा निम-शहरी (Peri-urban) क्षेत्रात स्थानिक प्रशासनातील वाढती जटिलता न दर्शवणाऱ्या अशा जुन्या चौकटींनुसार आहेत. आयोग शिफारस करतो की, स्थानिक संस्थांच्या संघटनात्मक संरचना आणि कर्मचारी निकषांचे पुनरावलोकन व पुनर्रचना करण्यासाठी योग्य तांत्रिक आणि प्रशासकीय भूमिकांसह स्तरनिहाय संस्थात्मक आराखडे (ऑर्गेनोग्राम) विकसित करण्यासाठी आणि बदलत्या प्रशासकीय गरजांशी सुसंगत राहण्यासाठी दर दहा वर्षांनी असे पुनरावलोकन करण्यासाठी राज्यस्तरीय तज्ज्ञ समिती स्थापन करण्यात यावी.
# शिफारस ३४ (९.४७)	महाराष्ट्रातील झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येने विद्यमान ग्रामीण प्रशासन चौकटीला मागे टाकल्याने, नियोजन क्षमता, सेवा वितरण आणि संस्थात्मक सज्जतेमधील त्रुटी अधोरेखित झाल्या आहेत. या वस्त्यांमध्ये जास्तीत जास्त शहरी वैशिष्ट्ये दिसत आहेत, परंतु त्यांच्याकडे अशा संक्रमणासाठी (Transition) कोणत्याही संरचनात्मक यंत्रणा उपलब्ध नाही. आयोग शिफारस करतो की, आयोगाच्या निरीक्षणांनुसार 'ग्रामीण-ते-शहरी संक्रमण धोरण' तयार करण्यासाठी, नगर विकास विभाग (युडीडी), ग्रामविकास व पंचायत राज विभाग (आरडीडी) आणि वित्त विभाग यांचा समावेश असलेली एक बहु-विभागीय समिती घटित करण्यात यावी. आयोगाच्या या निरीक्षणामध्ये, निम-शहरी ग्रामपंचायतींना औपचारिक मान्यता देणे; कर्मचारी निकष; अनिवार्य संरचनात्मक आराखडे (Structure plans); आणि संक्रमणासाठी मालमत्ता-दायित्व हस्तांतरण आणि संक्रमण अनुदानांच्या तरतुदींचा समावेश असलेला कालमर्यादित आराखडा (Roadmap) यांचा समावेश आहे.
# शिफारस ३५ (९.५०)	स्थानिक स्वराज्य संस्था अनेकदा एकाच वेळी अनेक प्रकल्पांना मंजुरी देऊन मर्यादित निधीचा अति-वापर (Over-commit) करतात, ज्यामुळे विनानिधी दायित्वे (Unfunded liabilities) निर्माण होतात आणि कामे अपूर्ण राहतात, परिणामी त्यांची आर्थिक स्थिती कमकुवत होते. नवीन प्रकल्प हाती घेण्यापूर्वी सुरू असलेली कामे पूर्ण करण्यास प्राधान्य देण्यावर राज्याच्या विद्यमान मार्गदर्शक तत्त्वांनी आधीच भर दिला आहे. आयोग शिफारस करतो की, आर्थिक दायित्वे मर्यादित करण्यासाठी स्थानिक संस्थांच्या नियमनाच्या संदर्भातील कायद्यांमध्ये औपचारिकपणे एक बंधनकारक चौकट समाविष्ट करण्यात यावी. आयोग पुढे असे निर्देश देतो की, आर्थिक शिस्त आणि प्रकल्पांची वेळेवर पूर्ण होणे याची सुनिश्चिती करण्यासाठी, चालू असलेल्या आणि मंजूर कामांचा विचार करूनच, त्या उर्वरित आर्थिक क्षमतेच्या १.५ पट मर्यादेपर्यंतच नवीन प्रशासकीय मान्यता देण्यात याव्यात .
# शिफारस ३६ (९.५४)	सर्व राज्य अधिनियम, नियम आणि अधिसूचना विविध मंचावर विखुरलेल्या असल्याने, स्थानिक संस्थांना प्रशासन आणि अनुपालनामध्ये (Compliance) आव्हानांचा सामना करावा लागतो. यामुळे माहितीचे अपूर्ण आकलन होते, अर्थ लावण्यात विसंगती येते आणि अधिकारी, नागरिक तसेच व्यावसायिकांकडून कार्यपद्धती विषयक चुका होण्याचा धोका वाढतो.

	आयोग शिफारस करतो की, सर्व राज्य अधिनियम, नियम, विनियम, शासन निर्णय (GR), अधिसूचना आणि सुधारणा एकत्रित असणारे एक 'एकल, संघटित डिजिटल विधिविषयक मंच' (युनिफाइड डिजिटल लीगल प्लॅटफॉर्म) स्थापन करण्यात यावा. या डिजिटल मंचाच्या निर्मितीसाठी सर्व विभागांनी आधारसामग्री (डेटा) किंवा माहिती पुरवणे आयोगाने अनिवार्य केले आहे. या मंचाला कायदेशीर स्पष्टता, सुसंगतता आणि प्रशासकीय कार्यक्षमता सुधारण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित परस्पर संदर्भ तपासणे (क्रॉस-लिंकिंग) विचारपूर्वक केलेला शोध (इंटेलिजेंट सर्च) आणि सततच्या अद्ययावतीकरणाचे पाठबळ असेल.
# शिफारस ३७ (९.५७)	या आयोगाने स्थानिक संस्थांच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून प्रमुख आर्थिक आणि कार्यात्मक आव्हाने निश्चित केली आहेत, जी 'परिशिष्ट अ' (Appendix A) मध्ये एकत्रित करण्यात आली आहेत. आयोग अशी शिफारस करतो की, राज्य सरकारने या मुद्यांची तपासणी करावी आणि त्यांच्या निराकरणासाठी योग्य उपाययोजना हाती घ्याव्यात.
(इ)	**महाराष्ट्र वित्त आयोग बळकट करणे**
# शिफारस ३८ (१०.८)	राज्य वित्त आयोगाची (एसएफसी) संस्थात्मक क्षमता बळकट करण्यासाठी, आयोग, 'महाराष्ट्र वित्त आयोग (एमएफसी) अधिनियम, १९९४' मध्ये सुधारणा करण्याची शिफारस करतो. राज्य वित्त आयोगाच्या स्थापनेसाठी कालमर्यादा विहित करून त्याची परिणामकारकता आणि प्रासंगिकता बळकट करणे हे सुधारित अधिनियमाचे उद्दिष्ट असावे. याबरोबरच या अधिनियमात स्पष्ट भूमिका आणि जबाबदाऱ्या परिभाषितही केल्या गेल्या पाहिजेत; संबंधित विचारार्थ विषय (Terms of Reference-TOR) प्रदान केले पाहिजे; शिफारसी स्वीकारण्याच्या स्थितीचा कालमर्यादित अहवाल दिला गेला पाहिजे आणि शिफारसी नाकारल्यास त्याची कारणे दिली पाहिजे; 'केलेल्या कार्यवाहीचा अहवाल' (Action Taken Report) पटलावर ठेवणे अनिवार्य केले पाहिजे; आणि योग्य सनियंत्रण यंत्रणा प्रदान केली पाहिजे.
# शिफारस ३९ (१०.९)	राज्य वित्त आयोगाने (एसएफसी) केलेल्या शिफारशींवरील कार्यवाहीवर लक्ष ठेवण्यासाठी (Monitoring) एका 'स्थायी कार्य दलाची' (Standing Task Force) स्थापना करण्यात यावी. या समितीचे अध्यक्ष राज्य सरकारद्वारे नियुक्त केले जातील, नगर विकास विभाग (युडीडी) आणि ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे (आरडीडी) सचिव सदस्य म्हणून असतील आणि सचिव (आर्थिक सुधारणा) हे सदस्य-सचिव म्हणून काम पाहतील. 'महाराष्ट्र वित्त आयोग अधिनियम, १९९४' च्या सुधारित मसुद्यात अशा कार्य दलाची आवश्यकता नमूद केली जाऊ शकते.
(फ)	**राज्य वित्त व्यवस्थेबाबतच्या शिफारशी**
# शिफारस ४० (११.२)	महाराष्ट्राच्या कर्जाच्या परतफेडीच्या वेळापत्रकाचे (Borrowing maturity profile) स्वरूप पाहता, २०३०-३३ दरम्यान मोठ्या प्रमाणावर कर्ज परतफेड करावी लागणार आहे असे दिसून येते. आयोगाने शिफारस केली आहे की, थकीत रोख्यांच्या (Outstanding securities) परतफेडीचे स्वरूप सुलभ करण्यासाठी, वित्त विभागाने भारतीय रिझर्व्ह बँकेबरोबर (RBI) विचारविनिमय करून 'मध्यम-मुदतीचे कर्ज व्यवस्थापन धोरण' (Medium-Term Debt Management Strategy) तयार करावे.
# शिफारस ४१ (११.४)	महाराष्ट्रातील विविध विभाग आणि स्थानिक संस्थांना केंद्र सरकारचे अनुदान मिळवण्यासाठीची जटिल प्रक्रिया, कठोर कालमर्यादा आणि वास्तवकालीन (रिअल-टाइम) अनुपालनचा (Compliance) पाठपुरावा करण्याचा अभाव यामुळे हे अनुदान मिळण्यात अडचणी येतात, परिणामी निधी मिळण्याची संधी हुकते. आयोग अशी शिफारस करतो की, योजना निश्चित करणे, त्यासाठी प्रस्ताव तयार करणे आणि केंद्र सरकारच्या अटींचे वेळेवर पालन करण्यात मदत करण्यासाठी, वित्त विभागात एक समर्पित 'अनुदान व्यवस्थापन आणि सनियंत्रण कक्ष' (Grant Management and Monitoring Cell) स्थापन करण्यात यावा.

# शिफारस ४२ (११.६)	राज्याचे विकेंद्रीकरण उपक्रम, निधीचे हस्तांतरण आणि ग्रामीण व नागरी स्थानिक संस्थांना मिळणारे आर्थिक सहाय्य याबद्दलची माहिती अधिकृत प्रकाशनांमध्ये सातत्याने किंवा सविस्तरपणे नोंदवलेली नसते. 'आर्थिक पाहणी' आणि 'राज्याचा अर्थसंकल्प' यांसारख्या महत्त्वाच्या कागदपत्रांमध्ये ही माहिती पद्धतशीरपणे जाहीर करणे महत्त्वाचे असते. आयोग शिफारस करतो की, वित्त विभागाने महाराष्ट्राच्या 'वार्षिक आर्थिक पाहणी' अहवालात विकेंद्रीकरण उपायांचा तपशील देणारा पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढविण्यासाठी स्थानिक संस्थांना मिळणाऱ्या निधीच्या प्रवाहाच्या स्तरनिहाय माहितीसह, त्यांना होणाऱ्या निधी हस्तांतरणाचा आराखडा (तपशील) देणारे, एक स्वतंत्र प्रकरण समाविष्ट करावे. स्थानिक संस्थांना देण्यात येणाऱ्या निधी प्रवाहाची माहिती राज्याच्या अर्थसंकल्पीय दस्तऐवजांचा भाग म्हणून उपलब्ध करून देण्यात यावी.

१. प्रस्तावना

१.१. भारताचे संविधान यांच्या १९९२ मध्ये करण्यात आलेल्या ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीद्वारे, पंचायती व नगरपालिका यांच्या आर्थिक स्थितीचे पुनर्विलोकन करण्यासाठी आणि त्याबाबत शिफारशी करण्यासाठी प्रत्येक राज्याने एक राज्य वित्त आयोग घटित करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

१.२. महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी क्र. एस एफ सी ०६२४/सी. आर. ५२/ एफसीसी दिनांक २७ मार्च २०२५ रोजीच्या या अधिसूचनेद्वारे सेवानिवृत्त स्वर्गीय श्री. मुकेश खुल्लर, भारतीय प्रशासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सहावा महाराष्ट्र राज्य वित्त आयोग घटित केला. आयोग त्याच्या अकाली निधनाबद्दल अत्यंत दुःख व्यक्त करीत असून आयोगाच्या प्रारंभीच्या कामकाजाची पायाभरणी करण्यामध्ये तसेच आयोगाच्या सुरुवातीच्या विचारविमर्शास दिशा देण्यासाठी त्यांनी दिलेल्या मूल्यवान योगदानाची कृतज्ञपूर्वक नोंद करीत आहे. त्यानंतर, क्र. एस एफ सी ०६२४/ सी. आर. ५२/एफ सी सी दिनांक ३१ जुलै २०२५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे आयोग पुनर्घटित करण्यात आला.

आयोगाची स्थापना (पुनर्घटित)

आयोगामध्ये पुढील सदस्यांचा समावेश होता :

अ. क्र.	सदस्य	पदनाम
१.	डॉक्टर नितीन करीर (सेवानिवृत्त भा. प्र. से.)	अध्यक्ष
२.	डॉ. क. ह. गोविंदराज, भा. प्र. से; अपर मुख्य सचिव (युडी-२), नगर विकास विभाग	सदस्य
३.	श्री. एकनाथ डवले, भा. प्र. से; प्रधान सचिव, ग्रामविकास आणि पंचायत राज विभाग	सदस्य
४.	प्रा. श्री. एस. चंद्रशेखर, अर्थतज्ज्ञ इंदिरा गांधी विकास संशोधन संस्था	सदस्य
५.	श्री षण्मुगराजन एस., भा. प्र. से.	सदस्य सचिव

विचारार्थ विषय

१.३. आयोगाला पुढील बाबीवर शिफारशी करण्याची जबाबदारी देण्यात आलेली आहे :

"आयोग पंचायत व नगरपालिका यांच्या आर्थिक स्थितीचे पुनर्विलोकन करील आणि राज्यपालांना शिफारसी करील

(अ) पुढील गोष्टीचे नियमन करणारी तत्वे :

(एक) संविधानाच्या भाग नऊ आणि भाग नऊ क अंतर्गत येणाऱ्या आणि राज्य पंचायत आणि नगरपालिका यांच्यामध्ये ज्यांची विभागणी करता येईल असे राज्यकडून आकारले जाणारे कर, शुल्क, पथकर आणि फी यांपासून मिळणारे निव्वळ उत्पन्न आणि अशा उत्पन्नाचे त्यांच्याशी संबंधित हिश्याचे सर्व पातळ्यावरील पंचायतीमध्ये आणि नगरपालिकामध्ये वाटप.

(दोन) पंचायती आणि नगरपालिका यांना नेमून देण्यात येतील किंवा त्यांच्याकडून विनियोजित केले जातील असे कर, शुल्क, पथकर व फी यांचे निर्धारण

(तीन) राज्याच्या आकस्मिकता निधीतून पंचायतींना व नगरपालिकांना सहायक अनुदान.

आणि,

(ब) स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजना.

आयोग, पुढील बाबींशी संबंधित शिफारशी देखील करील:—

(अ) स्थानिक संस्थांमधील निधी व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे करणे.

(ब) स्थानिक संस्थांच्या शिस्तबद्ध आर्थिक व्यवस्थापनाशी संबंधित इतर बाबी."

कार्यपद्धती

१.४. स्थानिक संस्थाची आर्थिक स्थिती मजबूत करण्याच्या उद्देशाने, आयोगाने, बहुआयामी कार्यपद्धती अवलंबिली. या कार्यपद्धतीमध्ये आधारसामग्रीचे (डेटा) विश्लेषण, हितसंबंधितांशी सल्लामसलत, विभागाकडून प्राप्त माहिती आणि प्रत्यक्ष क्षेत्रातील संवाद यांचा समावेश होतो. यांचा तपशील परिशिष्ट ब मध्ये दिलेला आहे.

२. राज्याची अर्थव्यवस्था

२.१. २०११ मध्ये महाराष्ट्राची लोकसंख्या ११२.३ दशलक्ष होती, जी भारताच्या लोकसंख्येच्या ९.३% होती. २०२६ मध्ये महाराष्ट्राची लोकसंख्या १२९.३ दशलक्ष पर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे, त्यातील ६३.८ दशलक्ष लोक नागरी क्षेत्रात राहतात. नागरी लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या अंदाजे ५०% असण्याची शक्यता आहे.[२]

२.२. राज्य, भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचे इंजिन आहे. २०२४-२५ मध्ये राज्याचे नाममात्र स्थूल राज्याअंतर्गत उत्पन्न हे अंदाजे ₹ ४५,३१,५१८ कोटी इतके आहे, हे उत्पन्न भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पन्नाच्या १४% इतके आहे, आणि त्याचा सर्व राज्यांमध्ये सर्वाधिक हिस्सा आहे. कोविडप्रभावित २०१९-२० आणि २०२०-२१ या वर्षानंतर राज्याच्या अर्थव्यवस्थेने भक्कमपणे उसळी घेतली आहे. स्थूल राज्यांतर्गत उत्पन्न नाममात्र स्वरूपात, २०२०-२१ आणि २०२४-२५ दरम्यान १.६ पटीपेक्षा अधिक वाढले आहे. तक्ता २.१ मध्ये २०१८ ते २०२५ पर्यंतच्या कालावधीत भारताचे स्थूल देशांतर्गत उत्पन्न आणि महाराष्ट्राचे स्थूल राज्यांतर्गत उत्पन्न यामधील वाढ दाखवली आहे.

तक्ता २.१. : भारताचे स्थूल देशांतर्गत दरडोई उत्पन्न (जीडीपी) आणि महाराष्ट्राचे स्थूल राज्यांतर्गत उत्पन्न (जीएसडीपी)

				(चालू दरानुसार)
वर्ष	भारताचे स्थूल देशांतर्गत दरडोई उत्पन्न (रुपये कोटीत)	वर्षभरात स्थूल देशांतर्गत उत्पन्नात झालेली वाढ %	स्थूल राज्यांतर्गत उत्पन्न (₹ कोटीत)	वर्षभरात स्थूल राज्यांतर्गत उत्पन्नात झालेली वाढ %
२०१८-२०१९	१,८८,९९,६६८	११%	२५,२८,८५४	७%
२०१९-२०२०	२,०१,०३,५९४	६%	२६,५६,८०६	५%
२०२०-२०२१	१,९८,५४,०९६	-१%	२६,१०,६५९	-२%
२०२१-२०२२	२,३५,९७,३९९	१९%	३१,४३,८२१	२०%
२०२२-२०२३	२,६८,९०,४७३	१४%	३६,४१,५४३	१६%
२०२३-२०२४	३,०१,२२,९५६	१२%	४०,५५,८४७	११%
२०२४-२०२५	३,३०,६८,०००	१०%	४५,३१,५१८	१२%

स्रोत : (१) २०२२-२०२३, २०२३-२४ व २०२४-२०२५ संक्षिप्त अर्थसंकल्प, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन.

(२) सध्याच्या किंमतीवर स्थूल देशांतर्गत उत्पन्नाचे वार्षिक अंदाज सांख्यिकी आणि कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालय, भारत सरकार, दिनांक २९ ऑगस्ट २०२५ रोजी प्रसिद्ध.

राजकोषीय निर्देशक

२.३. महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम (एम एफ आर बी एम), २००५ यांच्या कलम ३ नुसार, प्रत्येक आर्थिक वर्षात राज्य शासन विधानमंडळासमोर मध्यम मुदतीचे वित्तीय धोरण निवेदन आणि वित्तीय धोरण धोरणात्मक निवेदन सादर करते. राज्याची अर्थव्यवस्था २०२९ पर्यंत एक ट्रिलियन डॉलर्स आणि पुढे २०४७[३] पर्यंत पाच ट्रिलियन डॉलर्स पर्यंत वाढवणे, या राज्याच्या दृष्टिकोनाच्या पार्श्वभूमीवर, वित्तीय शिस्तबद्धता आणि शासनाच्या खर्चावरील परतावा यांना अत्यंत महत्त्व दिले जाते, याची जाणीव ठेवली आहे.

२.४. आयोगाने दहा वर्षाच्या कालावधीतील (तक्ता २.२) या निवेदनांचा अभ्यास केल्यानंतर पुढील निष्कर्ष समोर आले आहेत २०१८-१९ मध्ये महसुली आधिक्य असलेल्या परिस्थितीतून राज्य आता महसुली तुटीच्या स्थितीत आले आहे. २०२७-२८ मध्ये स्थूल राज्यांतर्गत उत्पन्नाच्या (जीएसडीपी) टक्केवारीतील महसुली तूट २०२२-२३ च्या तुलनेत अधिक राहण्याचा अंदाज आहे. आणखी एक चिंतेचा मुद्दा म्हणजे स्थूल राज्याअंतर्गत दरडोई उत्पन्नाच्या टक्केवारीच्या प्रमाणात एकूण कर्ज साठ्यात झालेली वाढ आणि २०२२-२३

---

२ जनगणना २०११, लोकसंख्या प्रक्षेपण अहवाल २०११-२०३६ तक्ता क्र. ८ व ९.

३ विकसित महाराष्ट्र २०४७ - नागरिक सर्वेक्षण, पृ. ३.

पासून महसुली जमेच्या तुलनेत व्याज प्रदानाच्या प्रमाणात सातत्याने वाढ होत असल्याचेही दिसून येते.

राज्याच्या एकूण आकस्मिकता दायित्त्वामध्ये, स्थूल राज्यांत्तर्गत उत्पन्नाचे प्रमाण आणि महसुली जमेची टक्केवारी या दोहोंतही वाढ झाली आहे.

तक्ता २.२: महाराष्ट्राचे प्रमुख वित्तीय निर्देशक

	२०१८-१९	२०१९-२०	२०२०-२१	२०२१-२२	२०२२-२३	२०२३-२४	२०२४-२५*	२०२५-२६@	२०२६-२७#	२०२७-२८#
स्थूल राज्यांतर्गत उत्पन्नाच्या टक्केवारीच्या प्रमाणात महसुली शिल्लक (+) / महसुली तूट (-)	०.४५	-०.६३	-१.५७	-०.५३	-०.०५	-०.३४	-०.५९	-०.९३	-०.८३	-०.७२
स्थूल राज्यांतर्गत उत्पन्नाच्या टक्के-वारीच्या प्रमाणात वित्तीय तूट (-)	०.८७	१.९७	२.७२	२.०७	१.८६	२.२३	२.९३	२.७६	२.३	१.६७
स्थूल राज्यांतर्गत उत्पन्नाच्या टक्केवारीच्या प्रमाणात कर महसूल	८.७२	८.२३	७.६४	८.८६	११.१४	१०.६२	११.८४	११.३६	११.४६	११.५६
स्थूल राज्यांतर्गत उत्पन्नाच्या टक्के-वारीच्या तुलनेत एकूण कर्जसाठा	१५.४६	१६.५	१९.७६	१८.५६	१७.२८	१७.७२	१८.५२	१८.४१	१९.०३	१८.९७
स्थूल राज्यांतर्गत उत्पन्नाच्या टक्के-वारीच्या तुलनेत एकूण आकस्मिक दायित्वे	०.२९	१.५१	१.५८	१.६५	१.८३	२.०१	२.४२	२.५६	२.६८	२.८
महसुली जमा रकमेच्या टक्के-वारीच्या एकूण आकस्मिक दायित्वे	२.७	१४.५४	१५.४३	१५.३८	१६.४५	१८.९३	२०.४२	२२.५१	२३.४२	२४.२
महसुली जमा रकमेच्या टक्के-वारीच्या तुलनेत व्याज प्रदान	१२.२	११.८५	१३.७२	१२.०५	१०.२८	१०.६	१०.१९	११.५३	११.४२	११.३२

* सुधारित अंदाज @ अर्थसंकल्पीय अंदाज # उद्दिष्ट

स्रोत : महाराष्ट्रासाठी मध्यममुदतीचे वित्तीय धोरण, वित्तीय धोरण विवरण व प्रकटीकरणे (२०२०-२०२१, २०२२-२०२३ आणि २०२३-२०२४) त्यासाठीचा फॉर्म अ-१.

२.५. ३१ मार्च २०२५ रोजी सर्व राज्ये व संघराज्यक्षेत्रामधील राज्य सरकारांच्या रोख्यांची एकूण बाकी रक्कम ६३,९९,५६४ कोटी रुपये इतकी होती. त्यापैकी महाराष्ट्राने ५,९३,७०८ कोटी रुपयांचे रोखे जारी केले असून, यावरून महाराष्ट्राचा हिस्सा ९.३% असल्याचे दिसते. तामिळनाडूचा हिस्सा सर्वाधिक ११.०%[४] टक्के होता (तक्ता २.१).



स्रोतः रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (२०२६) राज्य वित्तः २०२५-२६ च्या राज्यांच्या अर्थसंकल्पाचा अभ्यास (विवरण - २३).

२.६. आंध्रप्रदेश, केरळ, मध्यप्रदेश, ओडिशा, पंजाब, राजस्थान, तामिळनाडू, तेलंगणा आणि पश्चिम बंगाल यांच्या तुलनेत

४ रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (२०२६) राज्य वित्त- २०२५-२६ च्या अर्थसंकल्पाचा अभ्यास (विवरण २३)

महाराष्ट्राच्या बाबतीत दीर्घकालीन रोखे म्हणजेच २०४० ते २०६४ दरम्यान परिपक्व होणाऱ्या रोख्यांचा वाटा सर्वात कमी ८.३% इतका आहे. २०३१ पर्यंत महाराष्ट्राने जारी केलेल्या शिल्लक रोख्यांपैकी ४३ टक्के रोखे देय होतील. (तक्ता २.३) (यावरून हे स्पष्ट होते की महाराष्ट्राने जारी केल्या जाणाऱ्या मुदतीच्या रोख्यांचा वाट्यात वाढ करण्याची गरज आहे.

तक्ता २.३: शिल्लक राज्य सरकारी रोख्यांची परिपक्वतेची रुपरेषा-एकूण रोख्याच्या तुलनेत (३१ मार्च २०२५ रोजी शिल्लक)

टक्क्यांमध्ये %

	२०२५-२०२६	२०२६-२०२७	२०२७-२०२८	२०२८-२०२९	२०२९-२०३०	२०३०-२०३१	२०३१-२०३२	२०३२-२०३३	२०३३-२०३४	२०३४-२०३५	२०३५-२०३६	२०३६-२०३७	२०३७-२०३८	२०३८-२०३९	२०३९-२०४०	२०४०-२०६४
महाराष्ट्र	५.५	६.७	६	६.५	६.७	११.7	९.६	९.८	५.८	६.४	३.९	४.३	४.३	२.८	१.९	८.३
आंध्र प्रदेश	४.६	४.२	३.५	४.७	४.६	५.३	५.४	५.५	५.४	५.४	५.५	५.६	५.५	६.३	५.४	२२.९
केरळ	६.६	६.९	६.१	५.४	६.९	३	३.३	३.४	२.९	३.६	३.२	३.२	३.४	२.८	३	३६.३
मध्य प्रदेश	५.६	६.८	५.७	४.१	४.८	४.३	५.३	५.१	४.५	४.७	४.२	४.२	४.२	४.३	४	२८.३
ओडिशा	५.९	५.९	४.४	४.४	१०.२	८.१	९.९	२.९	१.५	८.८	७.३	२.९	१.५	७.३	२.९	१६
पंजाब	४.९	३.४	७.३	५.३	५.१	४.६	६.४	४	४.३	६.४	४.९	६.९	४.६	४.५	४.१	२३.३
राजस्थान	७.६	७.१	६.४	८.५	६.३	७.३	७.८	६.१	७.९	६.९	१.३	१.४	२.६	२.२	२.४	१८. ४
तामिळनाडू	५.६	६.२	६.८	७.१	६.९	८.६	६.६	५.९	७.१	५.७	०.९	०.१	१.१	०.४	१.२	२९.८
तेलंगणा	४.६	५.३	५.३	१.५	१.२	१.९	२.३	२.९	२.२	३.१	४.१	४	६.२	४	२.३	४९.१
उत्तरप्रदेश	५.८	७.७	८.१	८.५	१२.४	१३.४	१०.७	४.४	५.९	६.४	४.९	३	१.४	३.१	२.९	१.३
पश्चिम बंगाल	४.५	६.५	४.८	४.६	६	४.५	४.२	३.५	३.९	४.७	४.३	४.२	४.५	५.५	६	२८.४
सर्व राज्य आणि संघराज्य क्षेत्र	५.८	६.६	६.७	६.८	७.५	७.९	७.२	६.४	५.८	५.६	३.६	३.५	३.४	३.४	२.७	१७.१

स्त्रोतः रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (२०२६) राज्य वित्तः २०२५-२६ च्या राज्य वित्त अर्थसंकल्पाचा अभ्यास (विवरण - २३).

२.७. महाराष्ट्राची एकूण महसुली जमा आणि राज्याचा स्वतःचा कर महसूल (एसओटीआर) यात मागील चार वर्षात म्हणजे २०२०-२१ आणि २०२४-२५ दरम्यानच्या कालावधीत (तक्ता २.४) दुप्पट झाला आहे. या कालावधीत राज्योच्या एकूण महसुली जमेचा वार्षिक चक्रवाढ दर (सीए जीआर) १८.८% वाढलेला आहे, तर राज्याच्या स्वतःच्या कर महसुलात त्यापेक्षा जास्त म्हणजे २२. ३% वार्षिक चक्रवाढ दराने वाढ झाली आहे. यावरून असे दिसून येते की, या कालावधीत राज्याच्या स्वतःच्या महसूल उभारणी क्षमतेत सातत्याने वाढ झाली आहे.

२.८. २०२०-२१ मध्ये, केंद्रीय करांचा व अनुदानांचा हिस्सा (३३%) एकूण महसुलाच्या सुमारे एक तृतियांश इतका होता. २०२४-२५ मध्ये या हिश्यामध्ये २६% इतकी घट झाली आहे. केंद्रीय करा मधील हिस्सा सातत्याने वाढला आहे. तर सहायक अनुदानाचा हिस्सा १९% वरून ११% पर्यंत लक्षणीयरित्या घटला आहे, परंतु सहायक अनुदानाच्या संख्येत एक वर्षात वाढ झाली आहे (तक्ता २. ५).

तक्ता २.४ राज्याचा स्वतःचा कर महसूल (एसओटीआर)						
घटक		२०२०-२१	२०२१-२२	२०२२-२३	२०२३-२४	२०२४-२५
राज्य वस्तू आणि सेवा कर	₹ कोटीत	६९,९४९	९७,३०५	१,२१,२५६	१,४१,९७९	१,६७,९०५
	टक्के	४३%	४४%	४४%	४७%	४६%
विक्री, व्यापार इ. वरील कर	₹ कोटीत	३३,१६०	४५,९२४	५४,५६८	५३,३८०	६७,३७५
	टक्के	२०%	२१%	२०%	१८%	१८%
मुद्रांक आणि नोंदणी शुल्क	₹ कोटीत	२५,४२८	३५,५९४	४५,२८६	५०,८२४	६०,०००
	टक्के	१५%	१६%	१६%	१७%	१६%
राज्य उत्पादन शुल्क	₹ कोटीत	१५,०८९	१७,२२१	२१,५०७	२३,३२२	३०,५००
	टक्के	९%	८%	८%	८%	८%
वाहनावरील कर	₹ कोटीत	६,६५५	९,०८०	११,७४०	१२,९६९	१४,८७५
	टक्के	४%	४%	४%	४%	४%
विजेवरील कर आणि शुल्क	₹ कोटीत	८,३५४	८,३८४	१४,७२१	१२,६७२	१४,१८०
	टक्के	५%	४%	५%	४%	४%
जमीन महसूल	₹ कोटीत	२,०६३	३,०६५	२,४३१	२,६९०	५,०००
	टक्के	१%	१%	१%	१%	१%
इतर कर	₹ कोटीत	३,५८४	४,४१०	६,०७५	४,५९३	७,६३२
	टक्के	२%	२%	२%	२%	२%
एकूण राज्याचा स्वतःचा कर महसूल	**₹ कोटीत**	**१,६४,२८०**	**२,२०,९८२**	**२,७७,५८४**	**३,०२,४३१**	**३,६७,४६७**

स्रोत : २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२०२५, संक्षिप्त अर्थसंकल्प, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन.

तक्ता २.५ महाराष्ट्राच्या महसुली जमेची रचना									
वर्ष	राज्याचा स्वतःचा कर महसुल (₹ कोटीत)	महसुली जमेच्या तुलनेत राज्याचा स्वतःचा कर महसूलाची टक्केवारी	करेतर महसुल (₹ कोटीत)	महसुल जमेच्या तुलनेत करेतर महसूलाची टक्केवारी	केंद्रीय करातील हिस्सा (₹ कोटीत)	महसुली जमेच्या तुलनेत केंद्रीय करातील हिश्यांची टक्केवारी	सहायक अनुदान (₹ कोटीत)	महसुली जमेच्या तुलनेत अनुदानाच्या टक्केवारीतील हिस्सा	एकूण महसुली जमा (₹ कोटीत)
२०२०-२०२१	१,६४,२८०	६१%	१५,९७५	६%	३६,४७९	१४%	५२,७३३	१९%	२,६९,४६८
२०२१-२०२२	२,२०,९८२	६६%	१९,३०७	६%	५४,२६३	१६%	३८,७६०	१२%	३,३३,३१२
२०२२-२०२३	२,७७,५८४	६८%	१६,७७६	४%	५९,९०३	१५%	५१,४१४	१३%	४,०५,६७८
२०२३-२०२४	३,०२,४३१	७०%	२०,८५८	५%	७१,२६२	१७%	३६,०४५	८%	४,३०,५९६
२०२४-२०२५	३,६७,४६७	६८%	३०,१४०	६%	८१,१६३	१५%	५७,६९२	११%	५,३६,४६३

स्रोत : २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२०२५, संक्षिप्त अर्थसंकल्प, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन.

२.९. हा चिंतेचा विषय आहे की, २०२४-२५ मध्ये महसुली जमा आणि महसुली खर्च यांचे गुणोत्तर ९२% पेक्षा जास्त होते. दुसरा चिंतेचा विषय म्हणजे 'अनिवार्य खर्चाचा' वाटा म्हणजेच वेतन, निवृत्तिवेतन आणि व्याज प्रदान यावरील खर्च हा २०२४-२५ मधील ४६% टक्के वरून २०२५-२६ मध्ये ५१ टक्के पर्यंत वाढला आहे. राज्य उत्पादन शुल्क महसूल, वाहनावरील कर आणि वीज शुल्क यामध्ये मोठी वाढ होण्यास वाव असल्याचे दिसून येते, कारण गेल्या पाच वर्षात एकूण महसुलातील त्यांच्या वाट्यात कोणतीही वाढ झालेली नाही.

३. ग्रामीण स्थानिक संस्थांचे राजकोषीय आरोग्य (आर्थिक स्थिती)

३.१. महाराष्ट्राचा ग्राम विकास आणि पंचायत राज विभाग त्रि-स्तरीय संरचनेवर देखरेख करतोः ग्राम पंचायती (ग्राम स्तर) / पंचायत समित्या (गट स्तर) आणि जिल्हा परिषद (जिल्हा स्तर)

- ग्रामपंचायती (ग्रा पं) : ग्राम पंचायत हा या संरचनेतील मूलभूत घटक आहे आणि प्राथमिक स्तरावर त्या काम करतात; स्वतंत्र गावे किंवा गावांच्या समूहाचे त्या नियमन करतात.

● पंचायत समिती (पं.स.)ः पंचायत समित्या या जिल्ह्यातील गावांमधून पर्यवेक्षण आणि विकासात्मक उपक्रमां समन्वयासाठी जबाबदार असलेल्या गट स्तरीय नियामक संस्था आहेत.

● जिल्हा परिषद (जि.प.)ः जिल्हा परिषदा या ग्रामीण-स्तरावरील धोरण तयार करण्यासाठी, संसाधनांचे वाटप आणि पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांच्या एकूण देखरेखीसाठी जबाबदार असलेल्या, जिल्हास्तरावरील सर्वोच्च ग्रामीण प्रशासन संस्था आहेत.

पुढील तक्ता ३.१ मध्ये दर्शविल्यानुसार, त्रि-स्तरीय संरचनेत स्थानिक संस्थांची एकूण संख्या २९,२९८ आहे.

तक्ता ३.१ : महाराष्ट्रातील ग्रामीण स्थानिक संस्थांची संख्या	
स्तर	एकूण संख्या
ग्रामपंचायती	२७,९१३
पंचायत समित्या	३५१
जिल्हा परिषदा	३४
एकूण	**२९,२९८**
स्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२४-२५, (२०/०१/२०२६ रोजी प्रसिद्ध)	

३.२. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (एमझेडपीपीएस) अधिनियम, १९६१ अंतर्गत जिल्हा परिषदा व पंचायत समितींचे कामकाज चालविले जाते. तर, महाराष्ट्र ग्रामपंचायत (एमव्हीपी) अधिनियम, १९५९ अन्वये ग्रामपंचायतींचे कामकाज चालविले जाते. हे अधिनियम ग्रामीण स्थानिक संस्थांची प्रशासकीय रचना, महसूल आणि खर्चाचे अधिकार, राजकोषीय कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या विनिर्दिष्ट करतात.

३.३. मोठ्या प्रमाणावरील लहान लहान ग्रामपंचायती ही महाराष्ट्राची ओळख आहे (तक्ता ३.२). एकूण ग्रामपंचायतींपैकी ६.३% ग्रामपंचायतींची लोकसंख्या ५,००० पेक्षा जास्त आहे आणि या पंचायती ग्रामीण लोकसंख्येच्या २४% इतके आहेत. असे दिसून येते की ६३% ग्रामपंचायतींची लोकसंख्या २,००० पेक्षा कमी आहे आणि प्रत्यक्ष लोकसंख्येच्या ३५% लोकसंख्येला त्या सेवा पुरवतात. लहान स्थानिक संस्थांची जनतेला आवश्यक सुविधा पुरविण्याच्या आर्थिक क्षमतेच्या दृष्टीने आर्थिक व्यवहार्यता तपासण्याची आवश्यकता आहे.

तक्ता ३.२ : महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींची त्यांच्या लोकसंख्येच्या आकारमानानुसार रचना

लोकसंख्या	ग्रामपंचायतींची संख्या	एकूण ग्रामपंचायतींमधील हिस्सा	एकूण लोकसंख्येमधील हिस्सा
० ते १,०००	५,६९२	२०.४%	७%
१,००१ ते २,०००	११,८८४	४२.६%	२८%
२,००१ ते ३,०००	५,३१३	१९.०%	२१%
३,००१ ते ४,०००	२,२४६	८.०%	१३%
४,००१ ते ५,०००	१,०१८	३.६%	७%
५,००१ ते ६,०००	६१०	२.२%	५%
६,००१ ते ७,०००	३३४	१.२%	४%
७,००१ ते ८,०००	२२८	०.८%	३%
८,००१ ते ९,०००	१४६	०.५%	२%
९,००१ ते १०,०००	११३	०.४%	२%
१०,००० किंवा त्यापेक्षा जास्त	३२९	१.२%	८%
एकूण	**२७,९१३**	**१००%**	**१००%**
स्रोत : ग्रामविकास आणि पंचायत राज विभाग, महाराष्ट्र शासन			

महसुलाचा कल आणि रचना

३.४. आयोगाने, लेखापरीक्षणाच्या प्रयोजनार्थ ग्रामीण स्थानिक संस्थांद्वारे भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कॅग) यांच्या कार्यालयाकडे आधी सादर केलेल्या महसूल व खर्चा संदर्भातील आधारसामग्री (माहिती) उपलब्ध करून देण्याची विनंती ग्राम विकास भागाला केली आहे. त्यानुसार, ग्राम विकास विभागाने सदर माहितीची वारंवार छाननी करून, आणि प्रमाणित करून आयोगाकडे पाठविली आहे.

३.५. आयोगाला मिळालेल्या आधारसामग्री (माहिती) नुसार, ग्रामीण स्थानिक संस्थांसाठी महसुलाचे चार स्त्रोत आहेत.

- **कर महसूलः** यात मालमत्ता कर आणि इतर कर महसूल यांचा समावेश होतो.
- **करेतर महसूलः** यात फी आणि वापरकर्ता आकार, नगरपालिका मालमत्ता यांच्याकडून महसूल, अभिहस्तांकित महसूल, महसुली अनुदाने, अंशदाने, अर्थसहाय्य आणि इतर उत्पन्न यांचा समावेश होतो.
- **अनुदानेः** यात केंद्र पुरस्कृत योजना, राज्य योजना आणि इतर अनुदाने यांच्यासाठी मिळणाऱ्या अनुदानांसह केंद्रीय वित्त आयोगाचे अनुदान यांचा समावेश होतो.
- **कर्जाऊ रकमा/कर्जेः** ग्रामपंचायतींनी घेतलेल्या सर्व कर्जाऊ रकमा आणि कर्जे.

३.६. जिल्हा परिषदांचा एकूण महसूल २०१९ ते २०२४ या कालावधीत ८.९% इतक्या संयुक्त वार्षिक विकास दराने (सीएजीआर) सातत्याने वाढला आहे (तक्ता ३.३). जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या या दोन्ही संस्था, स्वतःचा कर महसूल आणि कर्जाऊ घेतलेल्या रकमा नगण्य असल्यामुळे, प्रशासकीय आणि विकासात्मक खर्चासाठी मोठ्या प्रमाणावर अनुदानांवर अवलंबून आहेत. ग्रामपंचायतींनी २०१९ ते २०२४ या कालावधीत एकूण महसुलात ९.३% दराने निकोप वृद्धी दर्शवली आहे. ग्रामपंचायतींच्या बाबतीत, त्यांना मालमत्ता कर वाढविण्याचा अधिकार असल्याने, त्यांच्या स्वतःच्या कर महसुलात लक्षणीय भर घातली जाते; त्यामुळे त्यांची महसुलाची रचना अधिक संतुलित आहे. ग्रामपंचायतींच्या एकूण महसुलात अनुदानांचा सर्वात मोठा वाटा असला, तरी कर महसूल आणि करेतर महसूल एकत्रितपणे ग्रामपंचायतीच्या महसुलात लक्षणीय हिस्सा (जवळजवळ ३७%) निर्माण करतात.

तक्ता ३.३ : महाराष्ट्रातील ग्रामीण स्थानिक संस्थांच्या विविध स्तरांमधील एकूण महसुलाचा कल आणि रचना					
(रुपये कोटींमध्ये)					
जिल्हा परिषदा					
वर्ष	कर महसूल	करेत्तर महसूल	अनुदाने	कर्जाऊ रकमा / कर्जे	एकूण
२०१९-२०	१२४	१,५८९	४८,३७३	०	५०,०८६
२०२०-२१	१४०	३,४८४	४९,११५	०	५२,७३८
२०२१-२२	१४१	४,००२	५२,११९	०	५६,२६२
२०२२-२३	२०४	३,८७४	५६,३७०	०	६०,४२१
२०२३-२४	१८९	३,८५८	६६,३२८	०	७०,३७५
सरासरी	१५९	३,३५६	५४,४६१	०	५७,९७६
सरासरीची टक्केवारी	०.३ टक्के	५.८ टक्के	९३.९ टक्के	० टक्के	१०० टक्के
पंचायत समित्या					
२०१९-२०२०	५३	१२१	१०२	०	२७६
२०२०-२०२१	३८	८३	७२३	०	८४४
२०२१-२०२२	५९	९६	६३२	०	७८८
२०२२-२०२३	७४	११८	३७१	०	५६३
२०२३-२०२४	७५	९४	२०३	०	३७२
सरासरी	६०	१०२	४०६	०	५६९
सरासरीची टक्केवारी	११ टक्के	१८ टक्के	७१ टक्के	० टक्के	१०० टक्के
ग्रामपंचायती					
२०१९-२०२०	१,५२८	१,३१४	५,४३५	१३	८,२८९
२०२०-२०२१	१,६९०	१,४५१	५,९८८	८	९,१३८
२०२१-२०२२	१,९९२	१,५८२	५,७०९	२०	९,३०३
२०२२-२०२३	२,१९४	२,३६१	६,६६२	१७	११,२३३
२०२३-२०२४	२,३३३	२,०५५	७,४२८	२५	११,८४१
सरासरी	१,९४७	१,७५३	६,२४४	१६	९,९६१
सरासरीची टक्केवारी	१९.५ टक्के	१७.६ टक्के	६२.७ टक्के	०.२ टक्के	१०० टक्के
स्रोतः ग्रामविकास आणि पंचायत राज विभाग, महाराष्ट्र शासन					

खर्चाचा कल आणि रचना

तक्ता ३.४: महाराष्ट्रातील ग्रामीण स्थानिक संस्थांचा खर्चाचा कल

जिल्हा परिषद

वर्ष	महसुली खर्च				भांडवली खर्च
	आस्थापना खर्च	कार्यान्वयन आणि देखभाल	व्याज आणि वित्त	इतर खर्च	
२०१९-२०२०	६४ टक्के	५ टक्के	० टक्के	२३ टक्के	८ टक्के
२०२०-२०२१	६५ टक्के	५ टक्के	० टक्के	२३ टक्के	७ टक्के
२०२१-२०२२	६२ टक्के	५ टक्के	० टक्के	२५ टक्के	८ टक्के
२०२२-२०२३	६४ टक्के	६ टक्के	० टक्के	२३ टक्के	६ टक्के
२०२३-२०२४	६४ टक्के	६ टक्के	० टक्के	२४ टक्के	६ टक्के
सरासरी	६४ टक्के	६ टक्के	० टक्के	२३ टक्के	७ टक्के
पंचायत समिती					
वर्ष	महसुली खर्च				भांडवली खर्च
	आस्थापना खर्च	कार्यान्वयन आणि देखभाल	व्याज आणि वित्त	इतर खर्च	
२०१९-२०२०	० टक्के	१७ टक्के	० टक्के	५० टक्के	३३ टक्के
२०२०-२०२१	० टक्के	१४ टक्के	० टक्के	५८ टक्के	२७ टक्के
२०२१-२०२२	० टक्के	१५ टक्के	० टक्के	५८ टक्के	२७ टक्के
२०२२-२०२३	० टक्के	१४ टक्के	० टक्के	६३ टक्के	२३ टक्के
२०२३-२०२४	० टक्के	१२ टक्के	० टक्के	६५ टक्के	२३ टक्के
सरासरी	० टक्के	१४ टक्के	० टक्के	५९ टक्के	२७ टक्के
ग्रामपंचायती					
वर्ष	महसुली खर्च				भांडवली खर्च
	आस्थापना खर्च	कार्यान्वयन आणि देखभाल	व्याज आणि वित्त	इतर खर्च	
२०१९-२०२०	१० टक्के	२२ टक्के	१ टक्के	२६ टक्के	४१ टक्के
२०२०-२०२१	११ टक्के	२० टक्के	२ टक्के	२९ टक्के	३९ टक्के
२०२१-२०२२	११ टक्के	२३ टक्के	१ टक्के	२७ टक्के	३८ टक्के
२०२२-२०२३	१२ टक्के	१९ टक्के	१ टक्के	३१ टक्के	३७ टक्के
२०२३-२०२४	१४ टक्के	२३ टक्के	१ टक्के	२८ टक्के	३४ टक्के
सरासरी	१२ टक्के	२१ टक्के	१ टक्के	२८ टक्के	३८ टक्के
स्रोतः ग्रामविकास आणि पंचायत राज विभाग, महाराष्ट्र शासन.					

३.७. खर्चाच्या पद्धतीवरून त्रि-स्तरीय पंचायत राज प्रणालीमध्ये, संस्थाविषयक आदेश, क्षमतेवरील मर्यादा आणि आर्थिक वस्तुस्थितीमुळे वेगवेगळे आर्थिक प्राधान्यक्रम दिसून येतात (तक्ता ३.४). आस्थापना खर्चामध्ये मुख्यतः वेतन आणि निवृत्तिवेतन यांचा समावेश असतो, त्याचबरोबर भाडे आणि वारंवार येणाऱ्या प्रशासकीय खर्चाचा सुद्धा समावेश होतो. जिल्हा परिषदांचा बऱ्याच अंशी खर्च वेतन, प्रशासन, आणि इतर मुख्य विकासकामांवर होतो. पंचायत समित्या, मुख्यतः जिल्हा परिषदांकडून ग्राम पंचायतींना दिल्या जाणाऱ्या निधी मधून स्वतःसाठी मर्यादित अनुदानाचे वाटप करून, शिल्लक निधीचे पर्यवेक्षण आणि समन्वय करतात. ग्राम पंचायती, सेवा वितरण, स्थानिक विकास भांडवली कामांसाठी त्यांच्या निधीचा उपयोग करतात.

थोडक्यात,

क. जिल्हा परिषदा, मोठ्या प्रमाणावर घेत असलेल्या आस्थापना खर्चामुळे, मर्यादित राजकोषीय स्वायत्ततेसह, बऱ्याच अंशी, अनुदानावर अवलंबून आहेत.

ख. पंचायत समितींना महसूल गोळा करण्यासाठी मर्यादित वाव आहे आणि त्यांची राजकोषीय स्वायत्तता ही अत्यंत कमी आहे.

ग. ग्रामपंचायतींना चांगली राजकोषीय स्वायत्तता आहे. मात्र स्वतःच्या महसुलातील वाढीपेक्षा सेवा पुरवठ्याच्या जास्त मागणीमुळे होणाऱ्या खर्चामुळे त्यांची राजकोषीय स्वायत्तता ही कमी होत आहे.

३.८. महाराष्ट्रातील ग्रामीण स्थानिक संस्थांमधील एकूण कल, हा महसूल निर्मितीसाठी नवीन उपाययोजना करण्याची (मार्ग शोधण्याची) गरज, तसेच, स्वयंपूर्ण ग्रामीण स्थानिक संस्थांची उभारणी करण्यात येणाऱ्या वर्तमान आव्हानांना तोंड देण्यासाठी क्षमता विकासाची नितांत गरज अधोरेखित करते.

४. नागरी स्थानिक संस्थांचे राजकोषीय आरोग्य (आर्थिक स्थिती)

४.१. महाराष्ट्रात एकूण ४२४ नागरी स्थानिक संस्था आहेत, या स्थानिक संस्थांमध्ये राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ४५ टक्के (२०११ च्या जनगणनेनुसार), किंवा जवळजवळ ५.०९ कोटी लोक राहतात. नागरी स्थानिक संस्थांचे महानगरपालिका, नगरपरिषद, आणि नगरपंचायती अशा तीन प्रकारात वर्गीकरण केले जाते (तक्ता ४.१).

तक्ता ४.१: महाराष्ट्रामधील नागरी स्थानिक संस्थांचे वर्गीकरण आणि संख्या

नागरी स्थानिक संस्थांची संख्या	४२४
महानगरपालिका	**२९**
वर्ग अ+ महानगरपालिका	१
वर्ग अ महानगरपालिका	२
वर्ग ब महानगरपालिका	३
वर्ग क महानगरपालिका	४
वर्ग ड महानगरपालिका	१९
नगरपरिषदा	**२४८**
वर्ग अ नगरपरिषदा	१५
वर्ग ब नगरपरिषदा	७७
वर्ग क नगरपरिषदा	१५६
नगरपंचायती	**१४७**

महाराष्ट्राच्या ५.०९ कोटी नागरी लोकसंख्येची रचना पुढील प्रमाणे आहे. शहरी लोकसंख्येपैकी ७५ टक्के लोकसंख्या महानगरपालिका क्षेत्रात, २१ टक्के नगरपरिषद क्षेत्रात आणि नगरपंचायती क्षेत्रात ४ टक्के आहे.

स्त्रोतः नगर पालिका प्रशासन संचालनालय, जनगणना (२०११)

४.२. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कामकाज 'मुंबई महानगरपालिका (एमसीजीएम) अधिनियम, १८८८' नुसार चालते, तर राज्यातील इतर सर्व महानगरपालिकांचे कामकाज 'महाराष्ट्र महानगरपालिका (एमएमसी) अधिनियम, १९४९' नुसार चालते. नगरपरिषद आणि नगरपंचायती या 'महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (एमएमसीएनआय) अधिनियम, १९६५' नुसार शासित केल्या जातात. या अधिनियमांमध्ये या नागरी स्थानिक संस्थांची संरचना, राजकोषीय कर्तव्ये, महसुलासंदर्भातील अधिकार, आणि प्रशासकीय कार्ये यांची संरचनाही दिली आहे.

नागरी स्थानिक संस्थांचे वर्गीकरण आणि जनसांख्यिकीय रूपरेखा

४.३. तक्ता ४.३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्रातील सहा प्रदेशांमध्ये राज्याच्या ४२४ शहरी स्थानिक संस्थांची विभागणी झाली आहे. तसेच तक्ता ४.३ मध्ये नगरपरिषदांची विभागणीची प्रदेशनिहाय माहिती नमूद केली आहे. २०११ च्या जनगणनेनुसार, महाराष्ट्राच्या शहरी लोकसंख्येपैकी कोकण विभाग ४३.९९ टक्के व पुणे विभाग १९.४५ टक्के लोकसंख्या राज्याच्या पश्चिम आणि किनारपट्टीच्या पट्ट्यात केंद्रित आहे, त्यामागोमाग नाशिक (११.१८ टक्के), छत्रपती संभाजीनगर (१०.२१ टक्के), नागपूर (९.५८ टक्के) आणि अमरावती (६.३९ टक्के) विभागांचा क्रम लागतो.

४.४. महाराष्ट्रातील अनेक स्थानिक संस्था नव्याने घटित झाल्या आहेत, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विविध प्रवर्गामध्ये विलीन करण्यात आल्या आहेत किंवा रूपांतरित झाल्या आहेत (तक्ता ४.४), यातून राज्याच्या शहरीकरणाचा सतत वेग प्रतिबिंबित होतो. लोकसंख्या वाढ, आर्थिक व्यवहार आणि उप-नगरांचा विस्तार यांमुळे वसाहतींचे शहरी भागांकडे सतत स्थलांतर सुरू असल्याने ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.

४.५. या संदर्भात, केवळ तदर्थ पुनर्वर्गीकरणावर अवलंबून न राहता, अशा संक्रमणांचे पद्धतशीरपणे व्यवस्थापन करण्यासाठी एक अंदाज बांधता येण्याजोगा आणि सुस्पष्ट असा संस्थात्मक आणि वित्तीय आराखडा आवश्यक आहे. २०१९ पासूनच्या कालावधीमध्ये अशा संक्रमणांमधून गेलेल्या स्थानिक संस्थांची संख्या तक्ता ४.४ मध्ये दर्शविलेली आहे.

तक्ता ४.२: महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रादेशिक वितरण

अ. क्र.	विभाग	महानगरपालिका	नगरपरिषदा	नगरपंचायती	एकूण नागरी स्थानिक स्वराज्य संस्था
१	कोकण	९	२२	२२	५३
२	नाशिक	५	४५	१६	६६
३	पुणे	६	५०	२५	८१
४	छत्रपती संभाजीनगर	५	४९	२६	८०
५	अमरावती	२	४१	१६	५९
६	नागपूर	२	४१	४२	८५
	एकूण	**२९**	**२४८**	**१४७**	**४२४**

स्रोतः महाराष्ट्र निवडणूक आयोगाचे संकेतस्थळ (डिसेंबर २०२५ मध्ये पहावयास मिळालेले)

तक्ता ४.३ : महाराष्ट्रातील नगरपरिषदांचे प्रादेशिक वितरण

अ. क्र	विभाग	अ वर्ग नगरपरिषदा	ब वर्ग नगरपरिषदा	क वर्ग नगरपरिषदा	एकूण नगरपरिषदा
१	कोकण	२	५	१५	२२
२	नाशिक	२	१६	२७	४५
३	पुणे	३	१३	३४	५०
४	छत्रपती संभाजी नगर	३	१४	३२	४९
५	अमरावती	२	१८	२१	४१
६	नागपूर	३	११	२७	४१
	एकूण	**१५**	**७७**	**१५६**	**२४८**

स्रोतः महाराष्ट्र निवडणूक आयोगाचे संकेतस्थळ डिसेंबर, २०२५ मध्ये पहावयास मिळालेले.

तक्ता ४.४: महाराष्ट्रातील नव्याने घटित झालेल्या / रूपांतरित झालेल्या नागरी स्थानिक संस्था	
• नव्याने गठित झालेल्या नागरी स्थानिक संस्थाः	३४
• रूपांतरित झालेल्या नागरी स्थानिक संस्थाः	५
• सीमांचा विस्तार केलेल्या नागरी स्थानिक संस्थाः	४
स्रोतः नगरपालिका प्रशासन संचालनालय	

तक्ता ४.५: महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांमधील नागरी स्थानिक संस्थांच्या स्वतःच्या महसुलातील तफावत

विभाग	स्वतःचा एकूण महसूल (₹ मध्ये)	लोकसंख्या (२०११)	स्वतःचा दरडोई महसूल (₹ मध्ये)
कोकण	२२,३६,६९,०७,९०,७०८	२,१९,७१,८१६	१,०१,७९८
पुणे	७,५१,०२,९७,२७,०८१	९८,९३,५७९	७५,९११
नाशिक	१,८०,४३,७१,०२,०३१	५६,८८,२९९	३१,७२१
नागपूर	८८,४०,५३,४२,५४०	४८,७१,३४०	१८,१४८
छत्रपती संभाजीनगर	६९,७९,८७,४५,०१४	५१,९५,३९१	१३,४३५
अमरावती	३४,६७, २४, २०, ७७४	३२,५२,२६८	१०,६६१
स्रोत : नगरपालिका प्रशासन संचालनालय			

४.६. नागरी लोकसंख्या राज्याच्या पश्चिम आणि किनारपट्टीच्या भागात केंद्रित झालेली आहे. तसेच, तीन प्रदेशातील मोठ्या नागरी स्थानिक संस्थेची संख्या जास्त आहे, आणि त्याचबरोबर या प्रदेशातील नागरी स्थानिक संस्था राज्याच्या पूर्वभागातील नागरी स्थानिक संस्थेच्या तुलनेत स्वतःचा दरडोई महसूल खूपच जास्त दर्शवतात. (तक्ता ४.५)

माला लालवानी, अजित कर्णिक आणि अभय पेठे (२०२५) या लेखकांच्या "महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवांचा पुरवठाः महानगरपालिकेद्वारे पाणीपुरवठा". या विषयावरील एका अलीकडील अभ्यासात असे ठळकपणे निदर्शनास आले आहे की, या लोकसंख्याशास्त्रीय केंद्रीकरणात संपूर्ण राज्यात सेवा वितरणातील लक्षणीय प्रादेशिक विषमता देखील प्रतिबिंबित होते. लेखकांनी असे मत व्यक्त केले आहे की, उत्तम कामगिरी करणाऱ्या महानगरपालिकांचे भौगोलिक स्थान "ऐतिहासिकदृष्ट्या प्रचलित प्रादेशिक असमतोलाशी" सुसंगत आहे. तर 'उर्वरित महाराष्ट्र' प्रदेश, प्रामुख्याने पश्चिम आणि किनारपट्टीचे क्षेत्र हे, आर्थिक आणि संस्थात्मक नैपुण्यामध्ये प्रमुख दावेदार म्हणून सेवा देतात.

उलटपक्षी, हा अभ्यास राज्याच्या पूर्व भागातील विदर्भ आणि मराठवाडा या मागासलेल्या प्रदेशांमध्ये प्रामुख्याने कमी कामगिरी करणाऱ्या महानगरपालिकांसह तीव्र प्रादेशिक असमतोल दर्शवतो.

महसुली कल आणि संरचना

४.७. आयोगाने नगरविकास विभागाला नागरी स्थानिक संस्थेच्या महसूल खर्चाची आधारसामग्री (डेटा) देण्याची विनंती केली होती. त्यानुसार, नगर विकास विभागांतर्गत नगरपालिका प्रशासन संचालनालयाने आधारसामग्रीची (डेटा) पडताळणी केली आणि ती आयोगाला दिली.

४.८. 'अ+' वर्गातील महानगरपालिकेत (बृहन्मुंबई महानगरपालिका) करेतर महसूल आणि अभिहस्तांकित महसूल यांचा वाटा अनुक्रमे ४२% आणि ३४% आहे, इतर महानगरपालिकांच्याबाबतीत, करेतर महसूल २८% आहे आणि अभिहस्तांकित महसूल २९% आहे. नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्याबाबतीत, ७०% महसूल हा अनुदानातून येतो. एकूण महसुलात स्वतःच्या कर महसुलाचा वाटा 'अ' वर्गातील महानगरपालिकांसाठी २०%, इतर महानगरपालिकांसाठी २३ % आणि नगरपरिषदा व नगरपंचायतीसाठी ८% इतका आहे.

४.९. २०१९-२० आणि २०२३-२४ दरम्यान महानगरपालिकांचा (अ, ब, क आणि ड वर्ग) एकूण महसूल, 'अ+' वर्ग महानगरपालिकेच्या (बृहन्मुंबई महानगरपालिका) (सुमारे ८.९%) तुलनेत वेगाने (सुमारे ११%) वाढलेला आहे (तक्ता ४. ६).

स्वतःच्या महसुलानेही असाच कल अनुसरला असून, तो बृहन्मुंबई महानगरपालिकांसाठी ८.८% च्या तुलनेत महानगरपालिकांसाठी (अ, ब, क आणि ड वर्ग) अंदाजे १०% ने वाढलेला आहे. याउलट, अनुदाने, अभिहस्तांकित महसूल, भरपाई आणि इतर महसुलातील वाढ ही महानगरपालिकांसाठी (अ, ब, क आणि ड वर्ग) सर्वाधिक होती, ही वाढ अंदाजे १२% असून तिने स्वतःच्या महसुलातील वाढीला मागे टाकले आहे, जेथे एकूण महसूल महानगरपालिकांच्या तुलनेतील दराने वाढला आहे, परंतु स्वतःच्या महसुलाचा वाटा संरचनात्मक दृष्ट्या कमकुवत आणि सतत २०% पेक्षा कमी राहिला आहे तेथे ही तफावत नगरपरिषदा आणि नगर पंचायतीमध्ये अधिक स्पष्ट आहे. नगरपरिषदा आणि नगरपंचायतीमध्ये, महसुलातील वाढीस प्रामुख्याने हस्तांतरण आणि भरपाईद्वारे चालना मिळते, त्यामुळे त्यांना सरकारी मदतीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहावे लागते.

तक्ता ४.६: महाराष्ट्रातील नागरी स्थानिक संस्थांच्या स्तरांनुसार एकूण महसुली कल (trends) आणि महसुलाची रचना

(रुपये कोटींमध्ये)

एकूण महसूल (वर्ग अ+ महानगरपालिका)						
वर्ष	स्वतःचा महसूल		इतर महसूल			एकूण
	कर	करेतर	अनुदाने	निर्धारित महसूल आणि नुकसान भरपाई	इतर	
२०१९-२०२०	५,४७३	१०,२३५	३९६	९,०९३	१४८	२५,३४५
२०२०-२०२१	५,८०८	७,९१७	१,५९२	९,८०६	१५३	२५,२७६
२०२१-२०२२	६,८९२	२१,६५६	६३१	१०,५८८	३५६	४०,१२४
२०२२-२०२३	६,४७१	११,०६१	६५३	११,४४५	४४५	३०,०७५
२०२३-२०२४	७,०९७	१४,९२१	७७५	१२,३५७	५३४	३५,६८४
सरासरी	**६,३४८**	**१३,१५८**	**८१०**	**१०,६५८**	**३२७**	**३१,३०१**
सरासरीची %	**२०%**	**४२%**	**३%**	**३४%**	**१%**	**१००%**
एकूण महसूल (वर्ग अ, ब, क, ड महानगरपालिका)						
वर्ष	स्वतःचा महसूल		इतर महसूल			एकूण
	कर	करेतर	अनुदाने	निर्धारित महसूल आणि नुकसान भरपाई	इतर	
२०१९-२०२०	६,५६१	७,९६०	३,४९८	८,५१२	१,५७२	२८,१०३
२०२०-२०२१	६,७५६	६,५८३	३,३९४	८,५८४	२,५१२	२७,८३१
२०२१-२०२२	८,३४७	११,९६२	३,५८९	१०,२६१	२,७८२	३६,९४०
२०२२-२०२३	९,५१७	११,०६४	४,६४७	१०,९४६	२,८३८	३९,०१३
२०२३-२०२४	९,५३७	११,७४१	८,६६७	११,७१६	१,०७५	४२,७३६
सरासरी	**८,१४४**	**९,८६२**	**४,७५९**	**१०,००४**	**२,१५६**	**३४,९२४**
सरासरीची %	**२३%**	**२८%**	**१४%**	**२९%**	**६%**	**१००%**
एकूण महसूल (नगरपरिषदा आणि नगरपंचायती)						
वर्ष	स्वतःचा महसूल		इतर महसूल			एकूण
	कर	करेतर	अनुदाने	निर्धारित महसूल आणि नुकसान भरपाई	इतर	
२०१९-२०२०	८०५	९१०	८,११९	८५०	४६१	११,१४४
२०२०-२०२१	८५०	८५६	७,७२७	७९८	३९२	१०,६२२
२०२१-२०२२	९३८	१,१३३	७,४५९	९३३	६०८	११,१०१
२०२२-२०२३	१,०८४	१,१६६	११,६७५	१,१५०	७१८	१५,७९३
२०२३-२०२४	१,१२७	१,३८४	८,२५०	१,३६१	५४०	१२,६६१
सरासरी	**९६१**	**१,०९०**	**८,६४६**	**१,०२४**	**५४४**	**१२,२६४**
सरासरीची %	**८%**	**९%**	**७१%**	**८%**	**४%**	**१००%**
स्रोतः नगर पालिका प्रशासन संचालनालय						

स्वतःचा महसूल कल आणि महसूलाचा रचना

तक्ता ४.७: महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्तरांनुसार स्वतःचा महसूली कल आणि महसूलाची रचना

स्वतःचा एकूण महसूल (महानगरपालिका वर्ग अ+) (रुपये कोटींमध्ये)

वर्ष	कर - महसूल		करेतर - महसूल				स्वतःचा एकूण महसूल
	मालमत्ता कर	इतर कर	फी आणि वापरकर्ता आकार	व्याज	इतर	महानगरपालिकेच्या मालमत्तांचे भाडे	
२०१९-२०	५,३८२	९१	६,०३९	५४	४,०८७	५५	१५,७०८
२०२०-२१	५,७८८	२०	५,०८६	६४	२,७१६	५१	१३,७२५
२०२१-२२	६,०५०	८४२	१८,९९३	९६	२,५१०	५७	२८,५४८
२०२२-२३	५,९०८	५६४	८,११७	३८	२,८२३	८२	१७,५३२
२०२३-२४	६,४७२	६२५	१०,४६०	८७	४,२५०	१२४	२२,०१८
सरासरी	**५,९२०**	**४२८**	**९,७३९**	**६८**	**३,२७७**	**७४**	**१९,५०६**
सरासरीची %	**३०.३५%**	**२.२०%**	**४९.९३%**	**०.३५%**	**१६.८०%**	**०.३७%**	**१००.००%**

स्वतःचा एकूण महसूल (अ, ब, क, ड वर्ग महानगरपालिका)

वर्ष	कर - महसूल		करेतर - महसूल				स्वतःचा एकूण महसूल
	मालमत्ता कर	इतर कर	फी आणि वापरकर्ता आकार	व्याज	इतर	महानगरपालिकेच्या मालमत्तांचे भाडे	
२०१९-२०	४,७२६	१,८३५	३,५३५	६५५	३,६१८	१५२	१४,५२१
२०२०-२१	४,८१९	१,९३७	२,६१७	५२७	३,३४७	९३	१३,३४०
२०२१-२२	६,२९२	२,०५४	६,५३७	५३७	४,७५३	१३४	२०,३०९
२०२२-२३	६,९८९	२,५२७	५,७७६	३७३	४,७४०	१७५	२०,५८१
२०२३-२४	६,२५९	३,२७८	५,८६९	३८४	५,३९१	९६	२१,२७८
सरासरी	**५,८१७**	**२,३२६**	**४,८६७**	**४९५**	**४,३७०**	**१३०**	**१८,००५**
सरासरीची %	**३२.३%**	**१३%**	**२७%**	**२.७५%**	**२४.२३%**	**०.७२%**	**१००%**

- स्वतःचा एकूण महसूल (नगरपरिषदा आणि नगर पंचायती)

वर्ष	कर - महसूल		करेतर - महसूल				स्वतःचा एकूण महसूल
	मालमत्ता कर	इतर कर	फी आणि वापरकर्ता आकार	व्याज	इतर	महानगरपालिकेच्या मालमत्तांचे भाडे	
२०१९-२०	६४८	१५७	३३०	२७४	३०३	२	१,७१५
२०२०-२१	६८१	१६९	३२९	२६४	२६१	२	१,७०६
२०२१-२२	७४८	१८९	५०४	२६३	३६४	२	२,०७१
२०२२-२३	८८६	१९८	५७८	२१८	३६८	३	२,२५०
२०२३-२४	८९२	२३५	६२९	२४६	५०३	४	२,५११
सरासरी	**७७१**	**१९०**	**४७४**	**२५३**	**३६०**	**२**	**२,०५०**
सरासरीची %	**३७.६०%**	**९.२६%**	**२३.१२%**	**१२.३५%**	**१७.५५%**	**०.१२%**	**१००%**

स्त्रोतः नगर पालिका प्रशासन संचालनालय

४.१०. तक्ता ४.७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सध्या १% पेक्षा कमी महसूल स्तर असणाऱ्या महानगरपालिकांना स्वतःच्या एकूण महसूलात महानगरपालिका मालमत्तांच्या भाड्याचा वाटा वाढवण्यासाठी खूप वाव आहे. त्याप्रमाणे, स्वतःच्या एकूण महसूल फी आणि वापरकर्ता आकाराचा वाटा वाढवण्यास वाव आहे. मालमत्ता कराच्या बाबतीत, बृहन्मुंबई महानगरपालिकेचा अनुभव विशेष अधिक माहिती देणारा आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये मालमत्ता करावर आधारित स्वतःचा महसूल मजबूत आणि अंदाज करता येण्यासारखा असतो, जो मजबूत वापरकर्ता आकाराच्या आधारे एकूण कर महसुलाच्या ९०% पेक्षा जास्त योगदान देतो, (तक्ता ४.७). उच्च वित्तीय स्वायत्ततेचा संबंध हा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता कर प्रणालीसाठीच्या अवलंबिलेल्या भांडवली मूल्य पद्धतीशी जवळून जोडलेला आहे, ज्यामुळे मूल्यमापन अचूकता आणि महसूल अंदाज मजबूत झाला आहे. 'अ', 'ब', 'क' आणि 'ड' वर्ग महानगरपालिकांसाठी, कर

महसूल हा त्यांच्या स्वतःच्या महसुलाचा मुख्य आधार आहे, तो एकूण स्वतःच्या महसूलाच्या सुमारे ४१-५०% इतका आहे. यामध्ये मालमत्ता कराचा कर महसुलातील वाटा अंदाजे ६५-७५% इतका आहे. त्यानंतर फी आणि वापरकर्ता आकार येतात; तर भाडे उत्पन्न आणि इतर महसूल मिळून त्यांच्या स्वतःच्या महसुलात तुलनेने स्थिर असा २४-२६% वाटा उचलतात. नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमध्ये, कर महसूल हा, कर वसुलीच्या ८०% हून अधिक अंशदान असणाऱ्या मालमत्ता करासह स्वतःच्या महसुलाचा मोठा भाग (अंदाजे ४५-५०%) उचलत आहे; तर भाडे उत्पन्न व इतर महसूल मिळून स्वतःच्या महसुलाच्या सुमारे एक पंचमांश इतका वाटा उचलतात. बृहन्मुंबई महानगरपालिकेची तुलना असे सूचित करते की इतर नागरी स्थानिक संस्थांमध्ये भांडवली मूल्याधारित मालमत्ता कर प्रणालीकडे प्रमाणित संक्रमण केल्यास त्यांच्या मालमत्ता कराच्या आधारभूत रचना लक्षणीयरीत्या मजबूत होण्यास आणि स्वतःच्या स्त्रोतातील महसुलाचा अंदाज आणि स्वायत्तता वाढवण्यास मदत होऊ शकते.

४.११. स्वतःच्या महसूलाच्या दरडोई परीक्षणातून असे दिसून येते की, एका बाजूला 'अ' वर्गातील महानगरपालिका आणि दुसऱ्या बाजूला 'ब' 'क' आणि 'ड' यांच्यामध्ये फारसा फरक नाही. अपेक्षेप्रमाणे, स्वतःचा दरडोई महसूल बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बाबतीत सर्वाधिक आणि नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या बाबतीत सर्वात कमी आहे. (तक्ता ४.१)

आलेख ४.१ वित्तीय वर्ष २०२३-२०२४ साठीचा स्वतःचा दरडोई महसूल
नागरी स्थानिक संस्था (₹ मध्ये)



खर्चाचा कल आणि संरचना

४.१२. सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये, आस्थापना खर्च आणि भांडवली खर्च हे खर्चाचे दोन सर्वात मोठे घटक आहेत (तक्ता ४.८). आस्थापना खर्चामध्ये प्रामुख्याने वेतन आणि निवृत्तिवेतने, त्यानंतर भाडे आणि आवर्ती प्रशासकीय खर्च यांचा समावेश होतो. 'अ +' श्रेणीतील महानगरपालिकेतील (बृहन्मुंबई महानगरपालिका), आस्थापना खर्चाचा, पुनरावलोकन कालावधीमधील एकूण आस्थापना खर्चाच्या केवळ वेतन व निवृत्तिवेतन यावरील सुमारे ३५% इतक्या खर्चासह, एकूण खर्चामध्ये सर्वात मोठा वाटा आहे. भांडवली खर्च हा दुसरा प्रमुख घटक आहे. याउलट, वर्ग 'अ', 'ब', 'क' आणि 'ड' महानगरपालिकामध्ये वेगळा कल दिसून येतो, भांडवली खर्च हा मुख्य घटक म्हणून समोर येतो आणि तो एकूण खर्चाच्या ५०% किंवा त्याहून अधिक आहे. त्यानंतर आस्थापना खर्च येतो, ज्यामध्ये वेतन आणि निवृत्तिवेतन एकत्रितपणे आस्थापना खर्चाच्या जवळपास ८८% आहे. नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमध्ये भांडवली खर्च हा एकूण खर्चाचा सर्वात मोठा हिस्सा आहे, ज्यामध्ये वेतन आणि निवृत्तिवेतन याचा वाटा आस्थापना खर्चाच्या जवळजवळ ९४% इतका आहे.

तक्ता ४.८: महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्तरांनुसार खर्चाचा कल

खर्चाचा कल (महानगरपालिकाः वर्ग अ+)

महसुली खर्च

वर्ष	आस्थापना	कार्यान्वयन आणि देखभाल	व्याज आणि वित्त	इतर	प्रशासकीय	भांडवली खर्च
२०१९-२०२०	४२%	११%	०%	१६%	२%	२९%
२०२०-२०२१	३८%	१४%	०%	१८%	२%	२८%
२०२१-२०२२	३६%	१३%	०%	१५%	२%	३५%
२०२२-२०२३	३६%	११%	०%	१५%	२%	३६%
२०२३-२०२४	३१%	१०%	०%	१८%	२%	४०%
सरासरी	**३६%**	**१२%**	**०%**	**१६%**	**२%**	**३४%**

खर्चाचा कल (महानगरपालिकाः वर्ग 'अ', 'ब', 'क' आणि 'ड')

महसुली खर्च

वर्ष	आस्थापना	कार्यान्वयन आणि देखभाल	व्याज आणि वित्त	इतर	प्रशासकीय	भांडवली खर्च
२०१९-२०	१६%	१२%	०%	१७%	३%	५२%
२०२०-२१	१०%	७%	०%	१०%	२%	७२%
२०२१-२२	१२%	७%	०%	११%	२%	६८%
२०२२-२३	१२%	७%	०%	१२%	२%	६८%
२०२३-२४	३४%	१५%	१%	१७%	३%	३१%
सरासरी	**१७%**	**१०%**	**०%**	**१३%**	**२%**	**५८%**

खर्चाचा कल (नगरपरिषदा आणि नगर पंचायती)

महसुली खर्च

वर्ष	आस्थापना	कार्यान्वयन आणि देखभाल	व्याज आणि वित्त	इतर	प्रशासकीय	भांडवली खर्च
२०१९-२०	२७%	८%	०%	१८%	१%	४५%
२०२०-२१	२७%	९%	०%	१८%	०%	४६%
२०२१-२२	२७%	९%	०%	१९%	०%	४४%
२०२२-२३	२८%	१२%	०%	१७%	१%	४२%
२०२३-२४	२७%	८%	०%	१६%	१%	४८%
सरासरी	**२७%**	**९%**	**०%**	**१८%**	**१%**	**४५%**

स्रोत : नगरपालिका प्रशासन संचालनालय

५. स्थानिक संस्थांच्या आर्थिक संसाधनातील तफावतीचे हस्तांतरण आणि मूल्यांकन

५.१. आयोगापुढचे प्रमुख आव्हान म्हणजे स्थानिक संस्थांकडे एकूण किती निधी दिला जात आहे हे निश्चित करणे. अचूक अंदाज काढण्यासाठी आवश्यक माहिती उपलब्ध नसल्यामुळे, आयोगाने दुहेरी पद्धतीचा वापर केला. पहिल्या पद्धतीत आयोगाने, राज्य शासनाच्या अर्थसंकल्पीय दस्तऐवजांमध्ये उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारावर केंद्रीय वित्त आयोग (यु. एफ. सी.) आणि राज्य अनुदानांमधून होणाऱ्या निधीचा पुरवठा अंदाजित केला. तथापि संबंधित विभागासोबत झालेल्या चर्चेदरम्यान आयोगाच्या निदर्शनास आणून देण्यात आले की, "स्थानिक संस्था व पंचायत राज संस्थांना सहायक अनुदान व अंशदाने" या अर्थसंकल्पीय बाबीमध्ये दर्शविण्यात आलेल्या राज्य सरकारकडून स्थानिक संस्थांना होणारा एकूण निधीचा पुरवठा दर्शविण्यात आलेल्या पुरवठ्यापेक्षा बराच जास्त असू शकतो. म्हणून, दुसऱ्या पद्धतीमध्ये, आयोगाने वित्त विभागाकडे स्थानिक संस्थांना निधीबाबत माहिती संकलित करून उपलब्ध करून देण्याची विनंती केली.

प्रकाशित झालेल्या दस्तऐवजावर आधारित अंदाज

५.२. स्थानिक संस्थांना केंद्रीय वित्त आयोगाकडून (यु.एफ.सी) अनुदाने आणि राज्य सरकारकडून सहायक अनुदान व अंशदाने प्राप्त होतात. २०२४-२५ या आर्थिक वर्षात महाराष्ट्रातील स्थानिक संस्थांना (तक्ता क्र. ५.१) केंद्रीय वित्त आयोगाकडून (यू.एफ.सी) अनुदानाच्या स्वरूपात एकूण ₹ ६,६०५ कोटी इतके अनुदान आणि राज्य शासनाकडून ₹ ३५,८९९ कोटी इतके अनुदान प्राप्त झाले. "स्थानिक संस्था आणि पंचायत राज संस्थांना सहायक अनुदान आणि अंशदाने" हे नगरविकास, ग्राम विकास, नियोजन, विधि व न्याय विभाग, महसूल आणि वन विभाग या पाच विभागांकडून येतात. या हस्तांतरणात जमीन महसूल, वाहनावरील कर, व्यवसायावरील कर, व्यापार, आजीविका आणि रोजगार, मुद्रांक शुल्क, मनोरंजन कर यांच्यातून मिळालेला राज्याच्या महसुलातील निश्चित भाग दर्शवितात आणि पुढे ते महानगरपालिका आणि नगरपरिषदा (वस्तू व सेवा कर आणि जकात भरपाई यांना सहाय्य प्रदान), जिल्हा परिषद / जिल्हा पंचायतींना सहाय्य आणि इतर संकीर्ण नुकसानभरपाई आणि नेमून दिलेली प्रदाने यांच्या स्वरूपात हस्तांतरित होतात.

५.३. अधिकृतपणे प्रसिद्ध करण्यात आलेल्या दस्तऐवजावरून असे स्पष्ट होते की, राज्याचा स्वतःच्या कर महसुलातील (एसओटीआर) हिस्सा म्हणून मिळणाऱ्या राज्य शासनाकडून प्राप्त होणाऱ्या अनुदानात सन २०२०-२१ मधील वाढलेल्या १२.४ टक्क्यांवरून, सन २०२४-२५ मध्ये ९.८ टक्के (तक्ता ५.२ दर्शविल्याप्रमाणे) इतकी घट झाली आहे. अर्थसंकल्पीय दस्तऐवजांचा काटेकोरपणे अभ्यास केल्यास असे दिसून येते की, राज्याच्या स्वतःच्या कर महसुलातील (एसओटीआर) किमान ९.८ टक्के हिस्सा एकतर स्थानिक संस्थांना हस्तांतरण म्हणून आणि / किंवा अभिहस्तांकन म्हणून दिला जातो.

तक्ता ५.१: महाराष्ट्रातील स्थानिक संस्थांना केंद्रीय वित्त आयोगाकडून अनुदान

(₹ कोटीत)

वित्तीय वर्ष	२०१९-२०	२०२०-२१	२०२१-२२	२०२२-२३	२०२३-२४	२०२४-२५
केंद्रीय वित्त आयोग अनुदाने	७,०३९	८,६३३	६,३८८	६,२९१	६,०७८	६,६०५

स्रोतः ग्राम विकास आणि पंचायत राज विभाग आणि नगरविकास विभाग

तक्ता ५.२: महाराष्ट्रातील स्थानिक संस्था आणि पंचायतराज संस्थांना सहायक अनुदाने आणि अंशदाने

(₹ कोटीत)

वित्तीय वर्ष	२०१९-२०	२०२०-२१	२०२१-२२	२०२२-२३	२०२३-२४	२०२४-२५
स्थानिक संस्था व पंचायतराज संस्थांना सहायक अनुदाने आणि अंशदाने	२१,२६४	२०,३९६	२५,९६३	३२,८७४	३१,८८९	३५,८९९
राज्याचा स्वतःचा कर महसूल	१,८८,९७१	१,६४,२८०	२,२०,९८२	२,७७,५८४	३,०२,४३१	३,६७,४६७
राज्याच्या स्वतःच्या कर महसुलातील टक्केवारी	११.३%	१२.४%	११.७%	११.८%	१०.५%	९.८%

सुधारित अंदाज

स्रोतः २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ चे मुख्य लेखाशीर्ष-नि-विभागणीय खर्चाचे लोकलेखे यांचा सारांश.

पर्यायी अंदाज

५.४. आयोगाने, दुसऱ्या पद्धतीत, सल्लामसलतीदरम्यान प्राप्त झालेल्या अभिप्रायाचा विचार करून स्थानिक संस्थांकडे होणाऱ्या महसूल हस्तांतरणाचा पर्यायी अंदाज निश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे.

५.५. आयोगाला अशी माहिती देण्यात आली की वर उल्लेखिलेली सहायक अनुदाने आणि अंशदानाव्यतिरिक्त असे काही निधी आहेत जे वेगवेगळ्या विभागाद्वारे स्थानिक संस्थांना थेट हस्तांतरित केले जात आहेत. असे इतर निधी निश्चित केल्यानंतर स्थानिक संस्थांना पुरविण्यात येणाऱ्या अशा एकूण निधी हस्तांतरणाचा वाजवी अंदाज आयोगाने मांडला आहे (तक्ता ५.३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे). या अंदाजामध्ये सहायक अनुदान व अंशदानाबरोबरच, हस्तांतरित योजना, वेतन अनुदाने व स्वेच्छाधीन निधी, यांचा समावेश करण्यात आला असून स्थानिक संस्थांना नेमून दिलेले कर यातून वगळण्यात आले आहेत. आयोगाच्या मते समाविष्ट गोष्टींमध्ये, स्थानिक संस्थांच्या कर्मचाऱ्यांमार्फत (functionaries) संस्थेचे कामकाज (functions) (उदा. वेतनावरील खर्च इ.) चालवण्यासाठी हस्तांतरित करण्यात आलेल्या 'निधींचा' समावेश होतो, तर वगळण्यात आलेल्या गोष्टींमध्ये नेमून दिलेल्या 'करांचा' समावेश होतो, कारण हे कर स्थानिक संस्थांच्या संदर्भातील अधिनियमांमध्ये नमूद केल्याप्रमाणे ते त्यांचे स्वतःचे महसूल (उत्पन्न) आहेत, परंतु राज्याकडून वसूल केले जातात व त्यानंतर ते स्थानिक संस्थांना नेमून दिले जातात (उदा. अतिरिक्त मुद्रांक शुल्क आणि जमीन महसुलावरील उपकर)

५.६. अशा पद्धतीने एकंदरीत या महसूल हस्तांतरणामध्ये हस्तांतरित योजना, सहायक अनुदाने, वेतन अनुदाने, स्वेच्छाधीन निधी, जकात व वस्तू व सेवा कर (जीएसटी) भरपाई, तसेच पूर्वी गोळा करण्यात येणारा व्यवसाय कर, वाहन कर किंवा मनोरंजन करांऐवजीची अनुदाने यांचा समावेश होतो; मात्र स्थानिक संस्थांना नेमून दिलेले कर यातून वगळले आहेत. याशिवाय, या हस्तांतरणामध्ये केंद्रीय योजनांसाठी समभाग अनुरूप हिस्सा म्हणून राज्याकडून मिळालेला कोणताही निधी किंवा केंद्रीय योजनांकडून आलेला निधी किंवा जिल्हा नियोजन समित्यांकडून मिळणारा निधी, यांचा समावेश केलेला नाही.

५.७. २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीत या निधी हस्तांतरणात एकूण निधी पाहता वाढ झाली आहे (तक्ता ५.३ दर्शविल्याप्रमाणे) परंतु, राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाच्या टक्केवारीचा (एसओटीआर) वाटा म्हणून त्यात घट झाली आहे. यावरून असे दिसून येते की, स्थानिक संस्थाकडे होणाऱ्या हस्तांतरणातील वाढीपेक्षा वस्तू व सेवा कर जीएसटी महसूलच्या भरपाईतील सुमारे ८ टक्के वाढ जकातीमधील सुमारे १०% वाढ आणि तसेच वेतन अनुदानातील १०% वाढ यावरून दिसून येते की, राज्याच्या स्वतःच्या कर महसुलात (एसओटीआर) जास्त दराने (सुमारे १२%) वाढ झाली आहे. तसेच, हस्तांतरित निधीचा लक्षणीय हिस्सा विशेषतः शहरी स्थानिक संख्या (युएलबीएस) व ग्रामीण स्थानिक संस्था (आरएलबीएस) मधील शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन खर्चासाठी राखून ठेवलेला आहे.

तक्ता ५.३: महाराष्ट्रासाठी हस्तांतरणाचे पर्यायी अंदाज

(₹ कोटीत)

वित्तीय वर्ष	२०१९-२०	२०२०-२१	२०२१-२२	२०२२-२३	२०२३-२४	२०२४-२५
ग्रामीण स्थानिक संस्था	३१,९०१	३०,८३१	३५,९३५	४२,०१४	५१,९९३	५४,३५१
राज्याचा स्वतःचा कर महसूल टक्केवारी प्रमाणे	१६.९%	१८.८%	१६.३%	१५.१%	१७.२%	१४.८%
नागरी स्थानिक संस्था	२५,००९	२८,७४०	३५,४९९	३४,२८८	४०,७२५	४२,४२२
राज्याचा स्वतःचा कर महसूल टक्केवारी प्रमाणे	१३.२%	१७.५%	१६.१%	१२.४%	१३.५%	११.५%
ग्रामीण स्थानिक संस्था + नागरी स्थानिक संस्था	५६,९१०	५९,५७१	७१,४३४	७६,३०२	९२,७१८	९६,७७३
राज्याचा स्वतःचा कर महसूल टक्केवारी प्रमाणे	३०.१%	३६.३%	३२.३%	२७.५%	३०.७%	२६.३%

स्रोतः वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

५.८. या संदर्भात हस्तांतरणाच्या एकूण (परिणामात्मक) आकडेवारीत वाढ दिसून येत असली तरी, त्यातील घटता सापेक्ष वाटा, तसेच हस्तांतरणाचे स्थिर व प्रामुख्याने वेतन केंद्रित स्वरूप लक्षात घेता, स्थानिक संस्थांची वास्तविक आर्थिक क्षमता व खर्चाच्या गरजांचा अधिक सखोल आढावा घेणे गरजेचे ठरते.

तफावतीचे विश्लेषण

५.९. आयोगाने, राष्ट्रीय सार्वजनिक वित्त व धोरण संस्था (एनआयपीएफपी, २०११) यांच्या पद्धतीचा आणि "महाराष्ट्रातील नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी आवश्यक असलेल्या आर्थिक संसाधनांचा तर्कसंगत अंदाज" या नावाने करण्यात आलेल्या तांत्रिक अभ्यासाचा वापर करून स्थानिक संस्थांच्या आर्थिक संसाधनातील तफावतीचे निर्धारण केले आहे. हा अभ्यास, राज्य वित्त आयोगाने (एसएफसी) प्राध्यापक माला लालवाणी यांच्याकडे सोपवला होता. या अभ्यासात, वास्तविक वित्तीय तफावतीचा अंदाज घेणे या उद्देशाने २०१९-२० ते २०२३-२४ या कालावधीतील आर्थिक आकडेवारीचा अभ्यास करण्यात आला असून, २०२९-३० पर्यंतच्या आवश्यकता त्यात प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

५.१०. या अभ्यासात द्विस्तरीय दृष्टिकोन अवलंबण्यात आला आहेः

- पहिल्या टप्प्यातः राज्यांचा स्वतःचा कर महसुलाचा हिस्सा म्हणून दर्शविण्यात आलेल्या, (राज्याचा) स्वतःच्या महसुलातील तुटीचा अंदाज घेण्यासाठी, स्वतःच्या राज्याचा महसुलाच्या खर्चाशी स्वतःच्याच महसुलाच्या जमा रकमेशी तुलना करून परिस्थितीचे विश्लेषण करण्यात येते.
- दुसऱ्या टप्प्यातः सरासरी दरडोई खर्च आणि सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या तीन संस्थांच्या सरासरीसह अनेक निकषांच्या आधारे कमी खर्चाचे मूल्यांकन करणारे एक मानकात्मक विश्लेषण करण्यात येते.

५.११. नागरी स्थानिक संस्थांसाठी, सेवेतील तफावत निर्धारण करण्यासाठी झाकरिया समितीने १९६३ मध्ये सुचवलेल्या कार्यचालन व देखभाल निकषांना २०११ च्या किंमतीनुसार अद्ययावत करण्यात आले.

५.१२. सविस्तर मूल्यांकन अभ्यास हा प्रामुख्याने सविस्तर सेवास्तरीय मानके आणि सेवांमध्ये अंतर्भूत असलेल्या खर्चाच्या निकषांच्या आधारे तयार केलेला असावा आणि या अभ्यासात स्वतंत्र स्थानिक संस्थांच्या स्तरावर पाणीपुरवठा, स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, रस्ते, पदपथ, दिवे तसेच इतर मूलभूत सेवासह प्रत्येक स्थानिक संस्थांच्या मुख्य कार्यासाठीच्या या मानकांपैकी किमान मानकांचा स्तर गाठण्यासाठी तफावतीचे मूल्यांकन करावे. तथापि, अशा सविस्तर अभ्यासासाठी आयोगाच्या कार्यकाळापेक्षा अधिक वेळ लागू शकला असता म्हणून, आयोगाने उपरोक्त नमूद केलेल्या अभ्यासाचा आधार घेतला आणि त्याला उपलब्ध आर्थिक व लोकसंख्याविषयक आकडेवारीचा वापर करून स्वतः केलेल्या विश्लेषणाची त्याला जोड दिली.

५.१३. ज्या स्थानिक संस्था सरासरी दरडोई खर्चापेक्षा कमी खर्च करत आहेत, त्यांच्याकडे आर्थिक तूट असल्याचे मानण्यात आले. खालील तक्ता ५.४ मध्ये दर्शविण्यात आलेल्या अपेक्षेपेक्षा कमी होणाऱ्या एकूण खर्चाचा अंदाज लावण्यासाठी या तफावतीचा संबंधित लोकसंख्येशी गुणाकार करण्यात आला.

तक्ता ५.४: महाराष्ट्रातील अपेक्षेपेक्षा कमी होणाऱ्या खर्चाचे विश्लेषण

(₹ कोटीत)

वित्तीय वर्ष	२०१०-२०	२०२०-२१	२०२१-२२	२०२२-२३	२०२३-२४
नागरी स्थानिक संस्थांचा अपेक्षेपेक्षा कमी खर्च	२,७६०	२,९९७	३,६७६	४,५१०	४,०६३
ग्रामीण स्थानिक संस्थांचा अपेक्षेपेक्षा कमी खर्च	४,६९१	४,९४४	५,१७९	४,४३६	३,८३१
एकूण अपेक्षेपेक्षा कमी खर्च (नागरी स्थानिक संस्था + ग्रामीण स्थानिक संस्था)	७,४५०	७,९४१	८,८५५	८,९४६	७,८९४
राज्याचा स्वतःचा कर महसूल (एस ओ टी आर)	१,८८,९७१	१,६४,२८०	२,२०,९८२	२,७७,५८४	३,०२,४३१
राज्याचा स्वतःचा कर महसूल टक्केवारीच्या प्रमाणात	३.९%	४.८%	४.०%	३.२%	२.६%

राज्याचा स्वतःचा सरासरी कर महसूल स्थानिक संस्था (२०१९-२० ते २०२३-२४)	२,३०,८५० कोटी
सरासरी अपेक्षेपेक्षा कमी खर्च (नागरी स्थानिक संस्था + ग्रामीण स्थानिक संस्था) (२०१९-२० ते २०२३-२४)	८,२१७ कोटी
राज्याचा स्वतःचा कर महसूल टक्केवारी मध्ये	३.६%

स्रोत : महाराष्ट्राच्या सहाव्या वित्त आयोगाचे विश्लेषण

५.१४. २०१९-२० ते २०२३-२४ या कालावधीदरम्यान अपेक्षेपेक्षा कमी झालेल्या वार्षिक खर्चाची एकूण सरासरी अंदाजे रक्कम ₹ ८,२१७ कोटी इतकी आहे. हा आकडा, त्या कालावधीतील राज्याच्या स्वतःच्या सरासरी कर महसुलाच्या (एसओटीआर) ३.६% इतका आहे. आयोग अधोरेखित करू इच्छितो की, हा अंदाज केवळ सध्याच्या सरासरी कामगिरीच्या संदर्भातील तूट दर्शवितो, परंतु पूर्ण सेवा मानके विचारात घेतल्यास, पुरेशा सेवा पुरवण्यासाठीची वास्तविक गरज यापेक्षा अधिक असण्याची शक्यता आहे.

५.१५. विश्लेषणामधील ग्रामीण स्थानिक संस्थांची (आर एल बी एस) अंदाजित तूट शहरी स्थानिक संस्थांच्या (युएलबीएस) तुलनेत किंचित जास्त दिसून येते. तथापि, हा निष्कर्ष विश्लेषणासाठी आधार म्हणून वापरण्यात आलेल्या २०११ च्या जनगणनेतील लोकसंख्येच्या आकडेवारीच्या संदर्भातील माहितीच्या संदर्भात विचारात घेण्याची गरज आहे. वेगाने होत असलेल्या नागरीकरणामुळे शहरी क्षेत्रातील वास्तविक आर्थिक तूट प्रत्यक्षात अधिक असण्याची शक्यता आहे. म्हणूनच, महाराष्ट्रातील संभाव्य सेवा पुरवठा, वित्तीय स्थैर्यात वाढ, आणि विकेंद्रित प्रशासन पद्धती बळकट करण्यासाठी या तुटीवर उपाययोजना शोधणे गरजेचे आणि महत्त्वाचे आहे.

६. निधीचे हस्तांतरण (Devolution)

६.१. मागील प्रकरण ५ मध्ये केलेल्या मूल्यमापनानुसार महाराष्ट्रातील स्थानिक संस्थांना, राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाच्या (एसओटीआर) सरासरीच्या सुमारे ३.६% इतका आर्थिक तुटवडा भासत आहे. आयोगाच्या मते हा तुटवडा, स्थानिक संस्थांच्या स्वतःच्या महसूल स्त्रोतांची मर्यादित उपलब्धता आणि सेवा पुरविण्याचा वाढता खर्च यांसह अनेक कारणांमुळे निर्माण झाला आहे. या अंदाजित तुटवड्याचा काही भाग, करांचे हस्तांतरण (assignment of taxes) आणि महसूल संकलन कार्यक्षमतेत सुधारणा करून भरून निघू शकतो, परंतु उर्वरित तुटवड्यासाठी राज्य सरकारकडून निश्चित आणि सूत्राधारित निधी हस्तांतरणाद्वारे (predictable and formula-based devolution) थेट आर्थिक मदतीची आवश्यकता आहे.

६.२. उपरोक्त ३.६% तुटवड्यापैकी, सुमारे २.६% इतका तुटवडा खालील शिफारशींमुळे भरून निघेल असा आयोगाचा अंदाज आहेः-

- व्यवसाय कराचे अभिहस्तांकन (राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाच्या (एसओटीआर) ०.८%) :—

  हा अंदाज २०२४-२५ या वित्तीय वर्षातील राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाच्या (एसओटीआर) सुमारे ०.८% इतका असलेल्या ₹ १३,११२.८ कोटी इतक्या व्यवसाय कर संकलनावर आधारित आहे.

- मोटार वाहन करातून रस्ते अनुदान (राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाच्या (एसओटीआर) ०.६%) :

  हा अंदाज वित्तीय वर्ष २०२४-२५ मधील 'मोटार वाहन करा'च्या संकलनातून (१४,८७५ कोटी रुपये) नागरी स्थानिक संस्था (युएलबीएस) आणि ग्रामीण स्थानिक संस्थांना (आरएलबीएस) 'रस्ते अनुदाने' (#शिफारस ६) हस्तांतरित करण्याच्या शिफारशीवर आधारित आहे, या हस्तांतरणाची रक्कम सदर कालावधीसाठी २,१२५ कोटी रुपये इतकी असून, ती 'राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाच्या' (एसओटीआर) ०.६% इतकी आहे.

- कर व करेतर महसूल संकलन कार्यक्षमतेमध्ये सुधारणा (राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाच्या (एसओटीआर) १.२%):

  ₹४,५६७ कोटींच्या अंदाजित वाढीचा आधार हा मालमत्ता कर मागणी आणि मूल्यमापन कार्यक्षमतेतील सुधारणा यावर आधारित आहे; या सुधारणा, आयोगाने पुढील प्रकरणांमध्ये शिफारस केल्यानुसार, जमीन व मालमत्तेची अधिक अचूक ओळख पटवणे आणि नोंदींचे डिजिटलीकरण करणे यामुळे साध्य होतील. ग्रामीण भागात, यामुळे मालमत्ता कर मागणीमध्ये अंदाजे ५०% ('तक्ता ८.१' मध्ये दर्शविल्याप्रमाणे) सुधारणा दिसून येईल, ही सुधारणा प्रामुख्याने 'गावठाणां'बाहेरील क्षेत्रांपर्यंत विस्तारलेल्या ग्रामीण क्षेत्रांमध्ये सुधारित तंत्रज्ञानाद्वारे ग्रामीण जनसंख्या (आबादी) आणि नकाशांचे सर्वेक्षण "स्वामित्व" योजनेमुळे शक्य होईल, ज्यामुळे करपात्र मालमत्तांची ओळख पटवणे, त्यांचे मूल्यमापन करणे आणि त्यांचा कराच्या कक्षेत समावेश करणे या प्रक्रिया अधिक प्रभावीपणे पार पडतील. नागरी स्थानिक संस्थांमध्ये (युएलबीएस), जिथे मालमत्तेचे मूलभूत नकाशे तयार करणे आणि मूल्यमापनाची मानके तुलनात्मकदृष्ट्या अधिक प्रगत आहेत, हा अंदाज अधिक 'सावध' (conservative) दृष्टिकोन स्वीकारतो, म्हणजेच, मागणीच्या कार्यक्षमतेमध्ये अंदाजे २०% सुधारणा होईल असे यात गृहीत धरले आहे. या वाढीचे श्रेय प्रामुख्याने मालमत्ता नोंदींचे डिजिटलीकरण आणि "शहरी वस्त्यांचे राष्ट्रीय भू-स्थानिक ज्ञान-आधारित भू-सर्वेक्षण (नक्षा)" (#शिफारस १४) या व्याप्ती योजनेला जाते.

६.३. वरील उपायांद्वारे राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाच्या (एसओटीआर) २.६% तुटवडा भरून निघाल्यानंतर, उर्वरित तुटवडा राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाच्या (एसओटीआर) सुमारे १.०% इतका राहतो.

६.४ आयोगाच्या मते हा उर्वरित तुटवडा भरून काढण्यासाठी राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाच्या (एसओटीआर) २६.३% इतक्या विद्यमान हस्तांतरणाव्यतिरिक्त स्थानिक स्वराज्य संस्थांना दिल्या जाणाऱ्या राज्याच्या स्वतःच्या कर महसुलात (एसओटीआर) अतिरिक्त १% इतकी वाढ करावी. आयोगाने असेही निरीक्षण नोंदवले आहे की, सध्याच्या २६.३% निधी हस्तांतरणांतर्गत (Devolution), नागरी स्थानिक संस्था (युएलबीएस) (सुमारे ५,००० कोटी रुपये) आणि ग्रामीण स्थानिक संस्था (आरएलबीएस) (सुमारे ३,००० कोटी रुपये) यांच्याकडे स्वेच्छाधीन हस्तांतरणे (Discretionary Transfers) म्हणून निधीचा मोठा हिस्सा दिला जातो, या दोन्हीची एकत्रित बेरीज राज्याच्या स्वतःच्या महसुलाच्या (एसओटीआर) अंदाजे २% इतकी भरते. सूत्राधारित निधी हस्तांतरण पद्धती अवलंबल्यास, स्थानिक संस्थांमध्ये निधीचे अधिक समतोल व पारदर्शक वितरण सुनिश्चित होईल, मनमानी निर्णयप्रक्रिया कमी होईल, आणि स्थानिक संस्थांच्या स्तरावर आर्थिक नियोजन करणे व शिस्त लावणे शक्य होईल.

 # शिफारस १

६.५. आयोगाने शिफारस केली आहे की, राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाच्या (एसओटीआर) २७.३% इतका निधी दरवर्षी स्थानिक स्वराज्य संस्थांना हस्तांतरित (devolution) करावा. ही शिफारस १ एप्रिल, २०२६ पासून सुरू होणाऱ्या पाच वर्षांच्या कालावधीसाठी लागू असेल. आयोगाने पुढे असेही सुचवले आहे की, राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाच्या (एसओटीआर) एकूण ३% निधीला (राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाच्या (एसओटीआर) प्रस्तावित अतिरिक्त १% हस्तांतरण, तसेच वर नमूद केलेले राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाच्या (एसओटीआर) २% इतकी विद्यमान स्वेच्छाधीन हस्तांतरण), शहरी : ग्रामीण अनुक्रमे ५५ : ४५ अशा प्रमाणात, सूत्राधारित (formula-based) हस्तांतरण पद्धती अंतर्गत आणावे आणि तसेच ५% निधी कार्यप्रदर्शन अनुदानासाठी (Performance Grants) आणि आणखी ५% निधी संक्रमणकालीन अनुदानासाठी (Transitional Grants) वेगळा ठेवल्यानंतर पुढील हस्तांतरण लोकसंख्या, क्षेत्रफळ आणि मागासलेपणा निर्देशांक यांवर आधारित असावे.

६.६. आयोग ठळकपणे असे नमूद करू इच्छितो की, राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाच्या (एसओटीआर) १% अतिरिक्त निधी हस्तांतरणामुळे राज्य सरकारवर अतिरिक्त आर्थिक भार येईल. मात्र, आभासी वैयक्तिक ठेव खाते (व्हीपीडीए) प्रणाली लागू केल्यामुळे होणाऱ्या बचतीमुळे हा भार मोठ्या प्रमाणात भरून निघेल. आभासी वैयक्तिक ठेव खाते (व्हीपीडीए) प्रणालीअंतर्गत, राज्य सरकारला आता आधीच निधी देण्याची गरज उरलेली नाही, जो निधी पूर्वी स्थानिक संस्थांकडे न वापरता पडून राहत असे. यापूर्वी असा निधी राज्य सरकार जास्त व्याजदराने कर्ज म्हणून घेत असे, दरम्यान हा निधी स्थानिक संस्थांच्या स्तरावर कमी व्याजदराने निष्क्रिय राहात असे.

६.७. मागील चार वर्षांत सर्व स्थानिक संस्थांकडे सरासरी ₹ ७,४७४ कोटी इतका वार्षिक निधी न वापरता शिल्लक राहिला आहे, जो राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाच्या (एसओटीआर) सुमारे २% इतका आहे. आभासी वैयक्तिक ठेव खाते (व्हीपीडीए) प्रणाली लागू केल्यानंतर, राज्य सरकारची होणारी एकूण बचत ही राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाच्या (एसओटीआर) निधी हस्तांतरणाच्या अतिरिक्त १% पेक्षा जास्त आहे.

नागरी स्थानिक संस्था (युएलबी) आणि ग्रामीण स्थानिक संस्था (आरएलबी) यांमधील वाटप

६.८. या चौकटीअंतर्गत (framework), अतिरिक्त हस्तांतरण निधी आणि सुधारित स्वेच्छाधीन हस्तांतरणे मिळून तयार झालेल्या राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाच्या (एसओटीआर) च्या ३% निधीचे वाटप पुढीलप्रमाणे केले जाईलः-

५५% : नागरी स्थानिक संस्था (युएलबीएस)	४५% : ग्रामीण स्थानिक संस्था (आरएलबीएस)

या वाटपातून राज्यातील सेवा पुरविण्याच्या जबाबदाऱ्या, खर्चाची गरज आणि शहरीकरणाचा वाढता कल दिसून येतो.

कामगिरी आणि संक्रमणकालीन अनुदाने

६.९. नागरी स्थानिक संस्था (युएलबी) यांना आणि ग्रामीण स्थानिक संस्था (आरएलबी) यांना हस्तांतरित केलेल्या एकूण निधीपैकी ५% निधी **'कामगिरी अनुदान'** म्हणून राखून ठेवला जाईल. ही अनुदाने, या राज्य वित्त आयोगाने (एसएफसी) भारताची लोक लेखापाल संस्था (आयपीएआय) यांना सोपवलेल्या **"हस्तांतरण निकषांद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामगिरीला प्रोत्साहन देणे"** या अभ्यासात विकसित केलेल्या, मोजता येण्याजोग्या आणि लेखापरीक्षण करता येण्याजोग्या निर्देशकांचा समावेश असलेल्या एकल संयुक्त निर्देशांकाच्या आधारावर वितरित केली जातील. या निर्देशांकामध्ये प्रशासन, नियोजन, वित्त, सेवा वितरण, पारदर्शकता आणि पर्यावरणीय संरेखन यांचा समावेश असलेल्या सहा मुख्य स्तंभांमधील ३५ मोजता येण्याजोग्या निर्देशकांचा समावेश आहे. या निर्देशांकाच्या आधारावर, परिपक्वता पातळी विश्लेषण तक्त्यात संस्थांची कामगिरी अनुदानासाठीची पात्रता आणि निधी वितरणाचा प्राधान्यक्रम निश्चित करतील

अशा पद्धतीने विशेषतः ९०-१००% गुण मिळवणाऱ्या संस्थाचे 'यशस्वी' (Achievers), ७५-८९% गुण मिळवणाऱ्यांना 'अग्रणी' (Front Runners), ६०-७४% गुण मिळवणाऱ्यांना 'उत्कृष्ट कामगिरी करणारे' (Performers), ४०-५९% गुण मिळवणाऱ्यांना 'इच्छुक' (Aspirants) आणि ४०% पेक्षा कमी गुण मिळवणाऱ्यांना 'नवशिके' (Beginners) असे वर्गीकरण केले जाते. कमी निर्देशांक गुण असलेल्या अशा नागरी स्थानिक संस्था (युएलबी) आणि ग्रामीण स्थानिक संस्था (आरएलबी) योजना आणि प्रकल्प अंमलबजावणीतील कमतरतांची अधिक बारकाईने तपासणी करण्याची गरज दर्शवतात. उत्तरदायित्व टिकवून ठेवण्यासाठी, अहवालात संस्थेने स्वतःच्याच माहितीच्या मूल्यांकनाचे अनिवार्य तृतीयपक्षी पडताळणीच्या आवश्यकतेवर भर दिला आहे आणि निरंतर देखरेख व प्रमाणीकरणासाठी सार्वजनिक लेखापरीक्षण आणि विकास प्रशासनातील तज्ज्ञांना त्यात सामील करण्याची शिफारस केली आहे.

६.१०. याव्यतिरिक्त, एकूण हस्तांतरणाच्या ५% रक्कम 'ग्रामीण-शहरी संक्रमण अनुदान' म्हणून राखून ठेवली जाईल. ही अनुदाने क्षमता बांधणी, प्रणाली बळकटीकरण आणि पूर्वतयारीसाठीच्या गुंतवणुकीवर लक्ष केंद्रित करून संस्थात्मक किंवा कार्यात्मक संक्रमणातून जात असलेल्या किंवा त्याची तयारी करत असलेल्या स्थानिक संस्थांना सहाय्य करतील. औपचारिक संक्रमण धोरण अधिसूचित होईपर्यंत, हा निधी कामगिरी अनुदान म्हणून वापरला जाऊ शकतो.

स्थानिक संस्थांअंतर्गत परस्पर वितरण

६.११. आयोग, प्रादेशिक आणि आर्थिक विषमता दूर करण्यासाठी सूत्र-आधारित परस्पर वितरणाची शिफारस करतो.

ग्रामीण स्थानिक संस्था (आरएलबी):

६.१२. ग्रामीण भागाचा हिस्सा खालीलप्रमाणे विविध स्तरांमध्ये वितरीत केला जाईलः-

ग्रामपंचायती	पंचायत समित्या	जिल्हा परिषदा
७०.००%	१५.००%	१५.००%

तसेच, या स्तरांमधील परस्पर वाटप खालील निकषांवर आधारित असेलः-

- लोकसंख्या (५०%)
- भौगोलिक क्षेत्र (२०%)
- राज्यातील सर्वाधिक दरडोई नाममात्र निव्वळ जिल्हा देशांतर्गत उत्पादनापासून (एनडीडीपी) प्रत्येक जिल्ह्याच्या दरडोई नाममात्र निव्वळ जिल्हा देशांतर्गत उत्पादनापासूनचे (एनडीडीपी) अंतर (३०%)

ग्रामीण स्थानिक संस्थांसाठी (आरएलबी) टीप: 'उत्पन्न अंतरा'च्या निकषांतर्गत, ज्या स्थानिक संस्थेचे/जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न सर्वाधिक आहे, अशा संस्थांना निधीचे शून्य वाटप (निधी अजिबात न देणे) होऊ नये यासाठी या राज्य वित्त आयोगाने (एसएफसी), ज्या स्थानिक संस्थेचे/जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न दुसऱ्या क्रमांकाचे आहे, त्यांच्यासाठी जे अंतर (distance) काढले गेले आहे, तेच अंतर सर्वाधिक उत्पन्न असलेल्या संस्थेसाठीही ग्राह्य धरावे, अशी शिफारस केली आहे.

नागरी स्थानिक संस्था (युएलबी):

६.१३. परस्परांमधील वितरण खालील बाबींवर आधारित असेलः-

- लोकसंख्या (५०%)
- भौगोलिक क्षेत्र (२०%)
- राज्यातील सर्वाधिक दरडोई स्व-महसूल असलेल्या शहरी स्थानिक संस्था (युएलबीएस) आणि इतर प्रत्येक शहरी स्थानिक संस्थेच्या (युएलबीएस) दरडोई स्व-महसूल यांच्यातील अंतर (तफावत) (३०%)

नागरी स्थानिक संस्थांसाठी टीप: उत्पन्नातील-अंतर या निकषांतर्गत सर्वाधिक दरडोई स्वतःचा महसूल (उत्पन्न) असलेल्या स्थानिक संस्थेला शून्य निधीचे वाटप (निधी अजिबात न देणे) टाळण्यासाठी, ही राज्य वित्त समिती (एसएफसी), अशा संस्थांना, दुसऱ्या क्रमांकाच्या सर्वाधिक दरडोई स्वतःचा महसूल (उत्पन्न) असलेल्या स्थानिक संस्थेसाठी जी गणना केलेली आहे तीच गणना केलेली तफावत (अंतर) नेमून देण्याचे सुचवते.

प्रयोज्यता व सशर्तता.—

६.१४. सर्व राज्य स्थानिक स्वराज्य संस्था, नगर पंचायती, नगरपरिषदा आणि महानगरपालिका (वर्ग क आणि ड) यांच्यासाठी हा हस्तांतरित निधी पूर्णपणे निर्बंधमुक्त आणि बिनशर्त असेल.

६.१५. महानगरपालिकांसाठी (वर्ग अ+, अ आणि ब), अधिकार हस्तांतरण हे पाच समान भारांक असलेल्या, ते म्हणजे प्रमाणित लेखांकन व लेखापरीक्षण आणि सार्वजनिक प्रकटीकरण, हवेची गुणवत्ता व्यवस्थापन, सेवा-स्तरीय मानदंडांची पूर्तता, भांडवली मूल्य करप्रणालीचा अवलंब आणि महानगरपालिका रोख्यांसाठी गुंतवणूक-योग्य मानांकन या मापदंडांमधील सुधारणांशी जोडलेले असेल. राज्य शासन या अटी इतर महानगरपालिका आणि वर्ग अ नगरपरिषदांना ३ वर्षांच्या कालावधीमध्ये लागू करू शकते.

६.१६. लहान स्थानिक संस्थांच्या आर्थिक व्यवहार्यतेची सुनिश्चिती करण्यासाठी, आयोग खालील तक्ता ६.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे किमान हमी वार्षिक वाटपाची शिफारस करतोः-

तक्ता ६.१ : महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी निधीचे किमान हमी वाटप

अनु. क्र.	स्थानिक संस्थेचा प्रवर्ग	वर्ग	किमान हमी रक्कम (प्रति वर्ष)
१	ग्रामपंचायती	-	₹१० लाख
२	पंचायत समित्या	-	₹१ कोटी
३	जिल्हा परिषदा	-	₹१५ कोटी
४	नगर पंचायती	-	₹३ कोटी
५	नगरपरिषदा	वर्ग अ, ब आणि क	₹६ कोटी
६	महानगरपालिका	वर्ग क आणि ड	₹१०० कोटी

६.१७. ही चौकट, वित्तीय हस्तांतरणामध्ये पारदर्शकता, समानता आणि पूर्वानुमानक्षमता वाढवते, तसेच मूल्यांकन केलेल्या आर्थिक तुटीचे निराकरण करते आणि राज्यभरातील विकेंद्रित प्रशासनाला बळकट करते.

६.१८. थोडक्यात, आयोग राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाच्या (एसओटीआर) २७.३% निधी स्थानिक स्वराज्य संस्थांना हस्तांतरित करण्याची शिफारस करतो. यापैकी, राज्य सरकार विविध हस्तांतरणांद्वारे स्वतःच्या कर महसुलाच्या (एसओटीआर) अंदाजे २६.३% रक्कम स्थानिक संस्थांना आधीच हस्तांतरित करत आहे आणि हे हस्तांतरण असेच सुरू राहील. याव्यतिरिक्त, आयोग स्थानिक संस्थांना राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाच्या (एसओटीआर) अतिरिक्त १% रकमेचे हस्तांतरण करण्याची शिफारस करतो. आधीच हस्तांतरित केलेल्या राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाच्या (एसओटीआर) २६.३% पैकी, शासनाकडून काही निधी स्वेच्छाधीन तत्त्वावर स्थानिक संस्थांना वितरित केला जातो. अशा योजनांखालील (स्वेच्छाधीन हस्तांतरणे) एकूण खर्चाचा अंदाज राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाच्या (एसओटीआर) सुमारे २% इतका वर्तवण्यात आला आहे. 'हस्तांतरण सूत्रानुसार' (devolution formula) या निधीचे वितरण (सध्या दिले जाणारे राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाचे (एसओटीआर) २% स्वेच्छाधीन हस्तांतरण आणि आयोगाने शिफारस केलेले राज्याच्या स्वतःच्या कर (एसओटीआर) अतिरिक्त १%) हे 'हस्तांतरण सूत्रानुसार' (devolution formula) नियंत्रित केले जाईल.

टीपः आयोगाने असे नमूद केले आहे की, सध्याचा २६.३% हस्तांतरणाचा अंदाज विविध विभागांकडून संकलित केलेल्या उपलब्ध माहितीवर आधारित आहे आणि प्रत्यक्ष हस्तांतरणाचा अधिक अचूक अंदाज काढण्यासाठी वित्त विभाग या अंदाजाचा फेरविचार करू शकतो. या अंदाजात कोणताही बदल (सुधारणा) झाला तरीही, पारदर्शकता, समन्याय आणि वित्तीय निश्चितता बळकट करण्यासाठी-राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाच्या (एसओटीआर) (२% स्वेच्छाधीन हस्तांतरणे आणि येथे शिफारस केलेले अतिरिक्त १% हस्तांतरणाचा समावेश असलेली) किमान ३% रक्कम शिफारस केलेल्या सूत्राद्वारे स्थानिक संस्थांकडे हस्तांतरित केली जावी, यावर आयोगाने भर दिला आहे.

७. अभिहस्तांकित रकमा आणि करांचे हस्तांतरण

(एक) स्थानिक संस्थांना करांचे अभिहस्तांकन

स्थानिक संस्थांना व्यवसाय कराचे अभिहस्तांकन

कारणमीमांसाः

७.१. भारताचे संविधान याच्या कलम २७६ नुसार राज्य विधिमंडळे आणि स्थानिक संस्थांना त्यांच्या संबंधित राज्यांमधील व्यवसाय, व्यापार, आजीविका, आणि नोकऱ्यांवर कर लावण्याचा अधिकार आहे. १९८८ च्या साठाव्या घटनादुरुस्ती अधिनियमान्वये व्यवसाय कराची वार्षिक मर्यादा, सुरुवातीच्या रु. २५० मर्यादेवरून प्रति व्यक्ती रु. २,५०० इतकी लक्षणीय वाढवण्यात आली.

७.२. १९७५ पूर्वी, महाराष्ट्रात स्थानिक संस्थांकडून व्यवसाय कर वसूल केला जात होता. तथापि, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ संमत झाल्यानंतर, राज्य शासनाने व्यवसाय कर वसूल करण्यास सुरुवात केली. महसुलाची हानी भरून काढण्यासाठी, स्थानिक संस्थांना भरपाई देण्याकरिता, या अधिनियमाद्वारे ज्यांचा, असे कर वसूल करण्याचा अधिकार काढून घेण्यात आला आहे, अशा स्थानिक संस्थांना झालेल्या महसूल हानीची भरपाई करण्यासाठी या अधिनियमाच्या कलम २९ नुसार, अनुदान देणे बंधनकारक करण्यात आले. ही नुकसानभरपाई १९७५ मध्ये स्थानिक संस्थांनी वसूल केलेल्या महसुलाच्या आधारे असते आणि यामध्ये कोणत्याही प्रकारची स्वयंचलित वार्षिक वाढ विचारात घेतली जात नाही.

७.३. व्यावसायिक कर हा, सर्व कर्मचाऱ्यांकडून, त्यांना नोकरीवर ठेवणाऱ्या व्यक्तीद्वारे (नियोक्ता) वसूल केला जातो आणि राज्य शासनाकडे जमा केला जातो. यासाठी व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र (पीटीआरसी) गरजेचे असते. व्यापारी, डॉक्टर, सनदी लेखापाल आणि व्यावसायिक यांसारख्या स्वतंत्र व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींकडूनही व्यवसाय कर वसूल केला जातो. यासाठी एक व्यवसाय कर नावनोंदणी प्रमाणपत्र (पीटीईसी) गरजेचे आहे. सध्या, व्यवसाय कर हा राज्य वस्तू व सेवा विभागाकडून वसूल केला जातो.

७.४. सध्याच्या व्यवस्थेमधील गोळा केला जाणारा व्यवसाय कर पुरेसा नाही आणि प्रत्यक्षात जितका कर वसूल केला जाऊ शकतो त्यापेक्षा खूपच कमी आहे. खाली दिलेला तक्ता ७.१ मध्ये हे दिसून येते.

तक्ता ७.१ : महाराष्ट्राच्या वर्षनिहाय जमा झालेल्या व्यवसाय कराच्या रकमा

वित्तीय वर्ष	एकूण जमा (व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र + व्यवसाय नावनोंदणी कर प्रमाणपत्र) (₹ कोटींमध्ये)
२०१९-२०	२,१२२.०७
२०२०-२१	२,४५६.२०
२०२१-२२	२,६१८.०७
२०२२-२३	२,६०५.१८
२०२३-२४	२,९४६.१७
२०२४-२५	३,११२.२५

स्रोतः वस्तू व सेवा कर विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून प्राप्त झालेली आधारसामग्री

टीपः वित्तीय वर्ष अनुक्रमे २०२३-२४ आणि वित्तीय वर्ष २०२४-२५ मध्ये राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनापोटी सुमारे ₹३१८.९२ कोटी आणि ₹३१८.४३ कोटी इतक्या रुपयांचे केलेले व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र (पी.टी.आर.सी.) पुस्तकी समायोजनाचा (Book Adjustment) समावेश करण्यात आला आहे.

तक्ता ७.२ : वित्तीय वर्ष २०२४-२५ मधील महाराष्ट्रातील व्यवसाय कराच्या जमा रकमांचा तपशील

	नोंदणीकृत सक्रीय करदाते ओळख क्रमांक	करदाते ओळख क्रमांकांद्वारे केलेली प्रदाने	महसूल (₹ कोटींमध्ये)
व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र (पी.टी.आर.सी.) (नियोक्ता)	६,७६,४१६	२,१४,०५९	२,५९८.०३
व्यवसाय कर नावनोंदणी प्रमाणपत्र (पी.टी.ई.सी.) (स्वयंरोजगारी/स्वतंत्र व्यवसाय व व्यवसायिक)	३०,५२,९९०	७,५६,१७४	१९५.७९
राज्य शासन (पुस्तकी समायोजन)	-		३१८.४३
एकूण	**-**		**३,११२.२५**

स्रोतः वस्तू व सेवा कर विभाग, महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त आधारसामग्री

७.५. तक्ता ७.२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे, स्वतंत्र व्यवसाय करणारे व्यावसायिक यांच्याकडून व्यवसाय कर नावनोंदणी प्रमाणपत्राद्वारे फक्त रु. १९५.७९ कोटी इतकीच रक्कम वसूल करण्यात आली, म्हणजे फक्त २५ टक्के नोंदणीकृत त्यावसायिकांकडून वसुली झाली आहे. व्यवसाय कर नावनोंदणी प्रमाणपत्राच्या प्रभाव क्षेत्राचा विस्तार करण्याची खरी शक्यता म्हणजे, कराचा आधार वाढविणे जे व्यवसाय कराच्या कक्षेत प्रत्यक्षात आलेले नाहीत अशा डॉक्टर, वकील, सनदी लेखापाल, दुकानदार आणि व्यावसायिक यांसारख्या स्वतंत्र व्यावसायिकांपर्यंत पोहोचणे म्हणजे पी.टी.ई.सी. च्या प्रभावक्षेत्राचा विस्तार करणे. स्थानिक संस्थांना त्यांच्या प्रदेशाविषयी अधिक माहिती असल्यामुळे ते व्यावसायिकांची प्रभावीपणे ओळख पटवून, व्यवसाय कराच्या प्रभावी वसुलीची सुनिश्चिती करू शकतात. अशा प्रकारे, स्थानिक संस्था प्रामुख्याने आपले कर प्रभावक्षेत्र वाढवून, आपल्या महसुलात वाढ करू शकतात. गुजरात, तामिळनाडू आणि केरळ यांसारख्या अनेक राज्यांनी व्यवसाय कर स्थानिक संस्थांकडे अभिहस्तांकित केला आहे, ज्यामुळे त्यांना स्वतःचा कर महसूल म्हणून व्यवसाय कर गोळा करणे शक्य झाले आहे.

 # शिफारस २

७.६. आयोगाने अशी शिफारस केली आहे की, व्यवसाय कराची वसुली राज्य शासनाकडून स्थानिक संस्थांकडे हस्तांतरित केली जावी.

राज्य शासन, राज्य सरकारी कर्मचाऱ्यांकडून व्यवसाय कराची वसुली करून, तो स्वतःकडे ठेवून घेऊ शकतो.

विविध ठिकाणच्या व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र धारकांसाठी (पी.टी.आर.सी.) वित्त विभाग स्वतंत्र धोरण विकसित करू शकेल.

संविधानाच्या अनुच्छेद २७६ आणि दिनांक २०/१२/१९७३ रोजीच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, राज्य आणि विनिर्दिष्ट स्थानिक प्राधिकारणे अशा दोघांनाही निर्धारित सांविधानिक मर्यादेपर्यंत व्यावसायिक कर वसूल करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे, राज्याने तसे ठरविल्यास, राज्य स्वतःची कर आकारणी सुरू ठेऊ शकते आणि स्थानिक संस्था राज्याच्या वतीने तो कर वसूल करू शकतात.

(दोन) करांचे अखंड, स्वयंचलित आणि पारदर्शक हस्तांतरण

क. स्थानिक संस्थांकडे अतिरिक्त मुद्रांक शुल्काचे थेट हस्तांतरण

कारणमीमांसाः

७.७. महाराष्ट्रात मालमत्तेच्या व्यवहारांवर (जसे विक्रीखत, बक्षीसपत्र, आणि गहाणखत) अतिरिक्त १ टक्के मुद्रांक शुल्क आकारले जाते. मुंबई महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १४९-अ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १४७-अ अंतर्गत असे विनिर्दिष्ट करण्यात आले आहे की, राज्य शासन दरवर्षी अनुक्रमे महानगरपालिका आणि परिषदांना, आकारण्यात आलेल्या एक टक्के अतिरिक्त अधिभारापोटी वसूल झालेल्या अतिरिक्त शुल्काच्या रकमेइतकेच सहायक अनुदान देईल. त्याचप्रमाणे, ग्रामीण स्थानिक संस्थांच्या संदर्भात, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १५८ मध्ये असे विनिर्दिष्ट करण्यात आले आहे की, जिल्ह्याचे आणि जिल्हा सह निबंधक आणि मुद्रांक जिल्हाधिकारी हे जिल्हा परिषदेला एक टक्के अतिरिक्त शुल्कापोटी वसूल झालेल्या रकमेइतकीच रक्कम अदा करतील आणि प्रत्येक जिल्हा परिषद तिच्याकडून वसूल करण्यात आलेल्या रकमेपैकी सुमारे पन्नास टक्के (५०%) रक्कम आपल्या अधिकारक्षेत्रातील प्रत्येक ग्रामपंचायतीच्या ग्रामनिधीत अंशदान म्हणून देतील.

७.८. राज्य शासनाकडून स्थानिक संस्थांना होणाऱ्या निधीच्या वितरणासाठी अतिरिक्त मुद्रांक शुल्काची प्रक्रिया बहुस्तरीय संरचनेचा अवलंब करते. सध्या, सांविधिक देय रकमा राज्याच्या एकत्रीकृत लेख्यात (Consolidated Fund) संग्रहित केल्या जात आहेत. पुढे असे दिसून येते की, नगरविकास विभाग थेट नागरी स्थानिक संस्थांना निधी देतो, मात्र ग्रामविकास व पंचायत राज विभाग ग्रामीण स्थानिक संस्थांना नोंदणी महानिरीक्षक (आय.जी.आर) यांच्या कार्यालयामार्फत निधी देतो. या हस्तांतरणामध्ये अमर्याद विलंब होत असे. म्हणून वित्त विभाग व महसूल विभागाशी विचारविनिमय करून ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिनांक २२/०९/२००३ रोजी, महिन्याच्या शेवटी जिल्हास्तरावर निधी वितरणाची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी शासन निर्णय निर्गमित केला. तथापि, या प्रक्रियेच्या अंमलबजावणीदरम्यान निर्माण झालेल्या विविध तांत्रिक आणि प्रशासकीय अडचणींमुळे ही प्रक्रिया प्रभावीपणे राबवली गेली नाही. तसेच, 'उपकर' आणि 'अतिरिक्त मुद्रांक शुल्क' या संज्ञा संविधिमध्ये एकमेकांच्या ऐवजी वापरण्यात आल्या आहेत, त्यामुळे कायदेशीर संदिग्धता निर्माण होत आहे.

 # शिफारस ३

७.९. आयोग अशी शिफारस करतो की, 'अतिरिक्त मुद्रांक शुल्क' ही संज्ञा सर्व संबंधित कायद्यांमध्ये स्वीकृत केली जावी. आयोग पुढे असेही बंधनकारक करतो की, स्थानिक संस्थांसाठी स्वतंत्र लेखाशीर्ष तयार करून, त्याद्वारे अतिरिक्त मुद्रांक शुल्क, स्वयंचलित, थेट हस्तांतरण यंत्रणेद्वारे हस्तांतरित केले जावे. शासकीय जमा लेखांकन प्रणाली (ग्रास) मार्फत मुद्रांक शुल्क वसुलीच्या वेळी, प्रणालीने मुद्रांक शुल्क आणि अतिरिक्त मुद्रांक शुल्क स्वतंत्रपणे निश्चित करावे आणि ज्या ठिकाणी जेथे दोन्ही लेखा शीर्ष स्वतंत्रपणे दर्शविली जातात, तेथे मूळ रक्कम (मुद्रांक शुल्क) राज्याच्या खात्यात जमा होईल व अतिरिक्त मुद्रांक शुल्क स्थानिक संस्थांसाठीच्या नव्या स्वतंत्र लेखाशीर्षामध्ये एकाच ई-चलनाद्वारे जमा केले जाईल. आभासी कोषागाराने अतिरिक्त मुद्रांक शुल्क संबंधित स्थानिक संस्थांकडे, थेट आणि तात्काळ हस्तांतरित करावे. ही प्रणाली विकसित होईपर्यंत, शासनाने ग्रामीण स्थानिक संस्थांसाठीच्या दिनांक २२/०९/२००३ च्या शासन निर्णयाचे अनुपालन करावे आणि तो पुढे नागरी स्थानिक संस्थांनाही लागू करावा.

ख. कृषितर कर रद्द केल्यामुळे स्थानिक संस्थांना द्यावयाच्या एकरकमी अधिमूल्यावरील अतिरिक्त उपकर

कारणमीमांसा :

७.१०. जमिनीचा वापर जोपर्यंत कृषितर कारणांसाठी केला जात होता तोपर्यंत, कृषितर कर हा राज्याद्वारे, 'महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६' अन्वये आकारला जाणारा एक वार्षिक जमीन महसूल होता. महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम १४४ व १५५ नुसार, आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ याच्या कलम १२७ व १३१ नुसार, या कृषितर करावर एक उपकर वसूल केला जात होता आणि तो अनुदान म्हणून ग्रामीण स्थानिक संस्थांकडे हस्तांतरित केला जात होता. नागरी स्थानिक संस्थांच्या बाबतीत, कृषितर करातून मिळणाऱ्या महसुलाचा काही भाग, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ याच्या कलम ८२-क अन्वये महानगरपालिकांच्या महानगरपालिका निधीमध्ये जमा केला जातो आणि नगरविकास विभागाद्वारे (युडीडी) अधिसूचित केलेला शासन निर्णय, दिनांक १/०८/१९७५ नुसार कृषितर कराच्या मूल्यांकनाचा काही टक्के हिस्सा अनुदान म्हणून नगर परिषदांकडे हस्तांतरित केला जातो.

७.११. तथापि, राज्य शासनाने दिनांक ३१/१२/२०२५ च्या राजपत्रातील अधिसूचनेनुसार नागरिकांवरील दुहेरी कराचे ओझे दूर करण्याच्या उद्देशाने, निवासी, वाणिज्यिक आणि औद्योगिक इमारतींसाठीचा कृषितर कर पूर्णपणे रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. जमिनीचा वापर कृषीतून कृषितर कारणांसाठी बदलताना, राज्य, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम ४७ अन्वये एकरकमी अधिमूल्य वसूल करण्याचे प्रस्तावित करत आहे, याची गणना तक्ता ७.३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे केली आहे. या एकरकमी अधिमूल्याची 'वार्षिक दर विवरणपत्रावर' (एएसआर) आधारित गणना केली आहे.

तक्ता ७.३: महाराष्ट्रातील एकरकमी अधिमूल्याचा दर

जमिनीचे क्षेत्र	% मधील अधिमूल्याचा दर
१००० चौरस मीटर पर्यंत	०.१०%
१००१ - ४००० चौरस मीटर मधील	०.२५%
४००० चौरस मीटरच्या वरील	०.५०%

स्रोतः दिनांक ३१/१२/२०२५ ची राजपत्रात प्रसिद्ध झालेली अधिसूचना

#शिफारस ४

७.१२. जमिनीच्या वापरामध्ये बदल करताना आकारल्या जाणाऱ्या आणि वसूल केल्या जाणाऱ्या एकरकमी अधिमूल्यावर १०% अतिरिक्त उपकर आकारणे अनिवार्य करण्यासाठी, आयोग महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२५ चे कलम ४७, किंवा ग्रामीण स्थानिक संस्था (आरएलबी) / नागरी स्थानिक संस्था (युएलबी) अधिनियमांमधील संबंद्ध तरतुदींमध्ये सुधारणा करण्याची शिफारस करतो.

आयोगाने आणखी असेही अनिवार्य केले आहे की, स्थानिक संस्थांच्या खात्यात जमा होणारा हा अतिरिक्त उपकर (एकरकमी अधिमूल्याच्या १०%) नोंदवण्यासाठी एक स्वतंत्र लेखाशीर्ष करणे आवश्यक आहे. शासकीय जमा लेखांकन प्रणालीद्वारे (ग्रास) एकरकमी अधिमूल्य वसूल करताना, सदर प्रणालीने एकरकमी अधिमूल्य आणि अतिरिक्त उपकर स्वतंत्रपणे निश्चित करणे आवश्यक आहे, जेथे दोन्ही खाती स्वतंत्रपणे दर्शविलेली असतील. त्या ठिकाणी एकरकमी अधिमूल्याची रक्कम राज्याच्या खात्यात जमा होईल आणि अतिरिक्त उपकराची रक्कम नवीन स्वतंत्र लेखाशीर्षात एकाच 'इ-चलन'द्वारे जमा होईल. आभासी कोषागाराने (व्हर्च्युअल ट्रेझरी) हा अतिरिक्त उपकर संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांकडे वास्तवकालीन (रिअल-टाइम) आधारावर थेट हस्तांतरित करण्यात येईल.

ग. स्थानिक संस्थांना जमीन महसुलावरील उपकराचे मागणी आधारित वितरण

कारणमीमांसाः

७.१३. जमीन महसुलावरील उपकर राज्याद्वारे आकारला जातो, महसूल विभागाच्या यंत्रणेमार्फत तो वसूल केला जातो आणि त्यानंतर स्थानिक संस्थांना दिला जातो. ग्रामीण स्थानिक संस्थांच्या बाबतीत, जेव्हा 'महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१' अंमलात आला, तेव्हा जमीन महसुलावरील उपकर हा त्यांच्या महसुलाच्या प्रमुख स्त्रोतांपैकी एक होता. या अधिनियमाच्या कलम १४४ अनुसार, राज्य शासनाला सर्वसाधारण जमीन महसूल म्हणून 'देय' असलेल्या प्रत्येक रकमेवर हा उपकर आकारण्यात यावा. यामुळे हे अनिवार्य होते की, राज्याकडून या महसुलाच्या रकमेचे हस्तांतरण हे मागणीवर आधारित असावे, वसुलीवर नाही. त्याचप्रमाणे, 'महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९' याच्या कलम १२७ अनुसार, एखाद्या ग्रामपंचायतीच्या अधिकारक्षेत्रात, राज्य शासनाला सर्वसाधारण जमीन महसूल म्हणून 'देय' असलेल्या प्रत्येक रकमेच्या प्रत्येक रुपयामागे शंभर पैसे (१ रुपया) इतका उपकर आकारला जाईल. नागरी स्थानिक संस्थांच्या (यूएलबी) बाबतीत, 'महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९' याच्या कलम ८२-क अन्वये, राज्य शासन महानगरपालिकांना दरवर्षी एक अनुदान प्रदान करते; या अनुदानाची रक्कम 'महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६' अन्वये आकारल्या आणि वसूल केल्या गेलेल्या जमीन महसूल व कृषितर आकारणीच्या उत्पन्नावर (महसुलावर) आधारित निश्चित केली जाते. त्याचप्रमाणे, नगरविकास विभागाने अधिसूचित केलेला शासन निर्णय, दिनांक ०१/०८/१९७५ याद्वारे, राज्य शासन नगर परिषदांना अनुदान म्हणून कृषितर आकारणीतील काही हिस्सा देते. सद्यस्थितीत, राज्य शासन या महसुलाचे हस्तांतरण अधिनियमांमध्ये अनिवार्य केल्याप्रमाणे प्रत्यक्ष 'मागणी'वर आधारित न करता, केवळ 'वसुली'वर आधारित आहे. शिवाय, ग्रामीण स्थानिक संस्था आणि नागरी स्थानिक संस्थांमध्ये 'जमीन महसुलावरील उपकर' या संकल्पनेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी 'उपकर' आणि 'अतिरिक्त आकार' यांसारख्या वेगवेगळ्या संज्ञांचा वापर केला जात आहे; यामुळे कायदेशीर संदिग्धता निर्माण होत असून, कामकाजाच्या पातळीवरही गोंधळ निर्माण होत आहे.

#शिफारस ५

७.१४. आयोगाने अशी शिफारस केली आहे की, राज्य शासनाने स्थानिक संस्था अधिनियमांतील संबंधित कलमांमध्ये सुधारणा करून, ग्रामीण स्थानिक संस्था आणि नागरी स्थानिक संस्था या दोन्ही स्तरांवर 'जमीन महसुलावरील उपकर' या संज्ञेमध्ये एकसूत्रता आणावी; आणि त्याचबरोबर या निधीचे वर्गीकरण 'अनुदाने' म्हणून करण्यापेक्षा 'निर्धारित महसूल' म्हणून करण्यासाठी 'महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९' मध्येही सुधारणा करावी.

आयोगाने अशीही शिफारस केली आहे की, विद्यमान कायदेशीर तरतुदींनुसार, राज्याने 'जमीन महसुलावरील उपकर' हा निधी ग्रामीण स्थानिक संस्था आणि नागरी स्थानिक संस्थांना प्रत्यक्ष वसुलीच्या आधारावर न देता, मागणीच्या आधारावर वितरित करावा. ग्रामीण स्थानिक संस्थांच्या बाबतीत, वार्षिक जमीन महसुलाची मागणी दरवर्षी ऑगस्ट महिन्यापर्यंत संबंधित गाव तलाठ्याद्वारे निश्चित करणे सुरू राहील; त्याचप्रमाणे, नागरी स्थानिक संस्थांच्या बाबतीत, ही मागणी जिल्हाधिकाऱ्यांच्या महसूल शाखेमार्फत अंतिम केली जाईल. या आकडेवारीचे तपशील, त्यानंतर संबंधित ग्रामविकास विभाग आणि नगरविकास विभागाच्या अर्थसंकल्पांमध्ये समाविष्ट करण्यासाठी, ऑक्टोबर महिन्यापर्यंत वित्त विभागाकडे सादर करावयाचे आहेत.

घ. स्थानिक संस्थांना रस्ते अनुदानाचे हस्तांतरण

कारणमीमांसा :

७.१५. 'मोटार वाहन कर अधिनियम, १९५८' अन्वये, मोटार वाहन कराची आकारणी आणि वसुली पूर्णपणे राज्य शासन करते. 'महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९' च्या कलम १४२ अन्वये आणि 'नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५' च्या कलम १०८ अन्वये, नागरी स्थानिक संस्थांना हा कर वसूल करण्यास मनाई करण्यात आली आहे, त्यामुळे त्यांना केवळ सायकली आणि जनावरांनी ओढली जाणारी वाहने यांसारख्या मोटार नसलेल्या वाहनांवर कर आकारण्यापुरतेच मर्यादित ठेवण्यात आले आहे. 'महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९' च्या कलम १२४ मध्येही असाच एक खंड अस्तित्वात आहे, ज्यामध्ये ग्रामपंचायतींना मोटार नसलेल्या वाहनांवर कर आकारण्याची परवानगी देण्यात आली आहे. ऐतिहासिकदृष्ट्या, या मोटार वाहन कराची आकारणी आणि वसुली करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेकडे होते; परंतु हे अधिकार कालांतराने रद्द करण्यात आले आणि ते राज्य शासनाकडे हस्तांतरित करण्यात आले. या मर्यादांची दखल घेऊन, शहरांच्या संदर्भात, राज्य शासनाद्वारे वसूल केल्या जाणाऱ्या एकूण मोटार वाहन कराच्या १०% इतकी 'रस्ते अनुदाने' देण्याची तरतूद करण्यात आल्याचा एक शासन निर्णय नगरविकास विभागाने दिनांक १६/०१/२०१६ रोजी निर्गमित

केला आहे. नागरी स्थानिक संस्थांना वसूल झालेल्या वाहन करातून काही प्रमाणात हिस्सा मिळत असला तरी (तक्ता ७.४ पहा), जिल्हा परिषदांना मात्र यातून वगळण्यात आले आहे आणि जिल्हा परिषदांना केवळ 'वाहन कर रद्द केल्याऐवजी भरपाई' मिळते; ही भरपाई मोटार वाहन कराच्या वसुलीतील वाढीशी जोडलेली नसते आणि ती रक्कम प्रति जिल्ह्यासाठी[५] साधारणपणे ₹३५,००० इतकी असते.

तक्ता ७.४ः महाराष्ट्रातील नागरी स्थानिक संस्थांच्या स्तरांना वाटप करण्यात आलेल्या रस्ते अनुदानांची विभागणी

स्थानिक संस्थांचा प्रवर्ग	वर्गीकरण	वार्षिक अनुदानाची रक्कम
महानगरपालिका	"अ+" वर्ग	₹१७५ लाख
	"अ" वर्ग	₹१५० लाख
	"ब" वर्ग	₹१२५ लाख
	"क" वर्ग	₹१०० लाख
	"ड" वर्ग	₹७५ लाख
नगरपरिषदा	"अ" वर्ग	₹६५ लाख
	"ब" वर्ग	₹५० लाख
	"क" वर्ग	₹३५ लाख
नगरपंचायती	-	₹२० लाख

स्रोतः शासन निर्णय, दिनांक १६/०१/२०१६, नागरी स्थानिक संस्थांना रस्ते अनुदान

७.१६. २०१६ च्या शासन निर्णयानुसार, वरील बाबींव्यतिरिक्त, नागरी स्थानिक संस्थांना स्थानिक संस्थेची आर्थिक स्थिती, नागरीकरणाचा दर, स्थानिक गरजा आणि आपत्तींची संभाव्यता यांवर आधारित विशेष अनुदाने दिली जातात.

#शिफारस ६

७.१७. आयोग, रस्ते अनुदानांसाठी एक एकसंध हस्तांतरण यंत्रणा अंगीकारण्याची शिफारस करतो. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मोटार वाहन कराच्या १०% रक्कम रस्ते अनुदान म्हणून प्राप्त होते. ७०:३० (नागरीः ग्रामीण) हे प्रमाण राखण्यासाठी, या करापैकी ४% रक्कम रस्ते अनुदान म्हणून जिल्हा परिषदांना स्वतंत्रपणे देण्यात यावी, असे आयोगाने अनिवार्य केले आहे. या रकमेचे अंतर्गत वितरण हे #शिफारस १ मध्ये शिफारस केलेल्या हस्तांतरण सूत्रानुसार (५०:२०:३०) असावे.

ङ. आपत्ती व्यवस्थापन आणि निवारणासाठी स्थानिक संस्थांना निधीचे वाटप

कारणमीमांसा :

७.१८. १५ व्या वित्त आयोगाने, एकत्रितपणे राष्ट्रीय आपत्ती जोखीम व्यवस्थापन निधी (एनडीआरएमएफ) आणि राज्य आपत्ती जोखीम व्यवस्थापन निधी (एसडीआरएमएफ)[६] म्हणून आपत्ती प्रतिसादासोबतच आपत्ती निवारणासाठी निधी निर्माण करण्याची शिफारस केली होती. या आराखड्याअंतर्गत, राज्य आपत्ती जोखीम व्यवस्थापन निधीचा (एसडीआरएमएफ) ८०% निधी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीला (एसडीआरएफ) आणि उर्वरित २०% निधी राज्य आपत्ती निवारण निधीला (एसडीएमएफ) वाटप केला जातो. ही वाटप रचना राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थानाला बळकट करत असली तरी, आपत्ती प्रतिसाद, पुनर्वसन आणि निवारणामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांनी बजावलेल्या महत्त्वपूर्ण कार्यान्वयन भूमिकेला ती पुरेसे महत्त्व देत नाही.

---

५ पाचवा महाराष्ट्र वित्त आयोग अहवाल पृ. ३३,६. १४.२.१

६ गृहमंत्रालय, भारत सरकार यांचा आपती व्यवस्थापन विभाग, राष्ट्रीय आपत्ती जोखीम व्यवस्थापन निधी आणि राज्य आपत्ती जोखीम व्यवस्थापन निधी.

७.१९. स्थानिक स्वराज्य संस्था त्यांच्या थेट तळागाळातील उपस्थितीमुळे आणि समुदायांशी, विशेषतः असुरक्षित गटांशी असलेल्या जवळिकतेमुळे "प्रथम प्रतिसादकर्ता" म्हणून काम करतात. स्थानिक परिसराविषयीच्या त्यांच्या ज्ञानामुळे जलद संघटन, सामुदायिक सहभाग आणि सूचना व मदत वेळेवर पोहोचवणे शक्य होते, तसेच शासनाचे उच्चस्तरावरील अवलंबित्व कमी होते. तथापि, स्थानिक संस्थांना विशेषतः आपत्तीप्रवण मत्तांचे कार्यान्वयन आणि देखभालीसाठी अपेक्षित निधीची तीव्र कमतरता भासते. यामुळे अनेकदा आपत्कालीन परिस्थितीत महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा अकार्यक्षम ठरतात आणि परिणामी एकूण आपत्तीला केला जाणारा प्रतिकार कमकुवत होतो.

७.२०. प्रभावी आणि स्थानिक पातळीवर प्रशासनिक आपत्ती निवारणाची सुनिश्चिती करण्यासाठी, राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांना निधी वाटपात प्राधान्य देण्याची स्पष्ट गरज आहे. अशा व्यवस्थेमुळे स्थानिक सज्जता मजबूत होईल, आपत्ती प्रतिसाद पायाभूत सुविधांची कार्यात्मक तयारी सुनिश्चित होईल आणि राज्यभरातील आपत्ती व्यवस्थापनाच्या परिणामांची परिणामकारकता व वेळेवर अंमलबजावणी यामध्ये सुधारणा होईल.

#शिफारस ७

७.२१. आयोगाची अशी शिफारस आहे की, वित्त विभाग आणि मदत व पुनर्वसन विभाग यांनी संयुक्तपणे असा निर्देश द्यावा की, राज्य आपत्ती निवारण निधी पैकी (एसडीएमएफ) दोन-तृतीयांश निधी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे हस्तांतरित केला जावा, आणि उर्वरित एक-तृतीयांश निधी राज्यस्तरीय प्रतिसाद व समन्वयासाठी राज्य स्तरावरच राखून ठेवण्यात यावा.

आयोगाची अशी शिफारस आहे की, ग्रामविकास विभाग आणि नगरविकास विभाग यांनी, स्थानिक संस्थांकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या राज्य आपत्ती निवारण निधीचे एसडीएमएफ जोखीम-आधारित वाटप करण्यासाठी, केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीशी सुसंगत आपत्ती जोखीम निर्देशांक तयार करताना 'धोका जोखीम आणि संवेदनशीलता विश्लेषण' (एचआरव्हीए) याला आधारभूत घटक मानावे.

च. जिल्हा नियोजन समितीच्या निधीचे समन्याय वितरण

कारणमीमांसाः

७.२२. आयोगाच्या असे निदर्शनास आले की, राज्याकडून स्थानिक संस्थांकडे थेट हस्तांतरित होणाऱ्या निधीव्यतिरिक्त, नियोजन विभागाकडून जिल्हा नियोजन समितीमार्फत (DPC) देखील निधीचा मोठा ओघ येत असतो. या विकेंद्रित रचनेद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांकडे येणाऱ्या निधीची एकूण रक्कम अंदाजे ₹१२,००० कोटी इतकी आहे (तक्ता ७.५); यामध्ये सर्वसाधारण योजना, विशेष घटक योजना, जनजाति उप-योजना आणि इतर जनजाति उप-योजना यांसाठीच्या वाटपाचा समावेश आहे.

तक्ता ७.५: महाराष्ट्रातील जिल्हा नियोजन समिती (डीपीसी) निधीचे वितरण

(₹ कोटीत)

विभाग / अभिकरण	२०२०-२१	२०२१-२२	२०२२-२३	२०२३-२४	२०२४-२५
ग्रामीण स्थानिक संस्था	६,२८२	६,७५०	७,५७०	७,६५८	८,८१५
नागरी स्थानिक संस्था	१,९६१	२,१९५	२,८९२	३,१७७	४,११३
राज्य-स्तरीय विभाग / अभिकरण	६,१५२	६,५३२	७,६३०	९,२९७	१०,३७१
एकूण	**१४,३९५**	**१५,४७८**	**१८,०९२**	**२०,१३२**	**२३,२९९**

स्त्रोतः नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन सर्वसाधारण योजना, विशेष घटक योजना, जनजाति उप-योजना आणि इतर जनजाति उप-योजना यांचा एकूण निधी आहे.

७.२३. जिल्हा स्तरावर, निधीचे विभाजन ग्रामीण स्थानिक संस्था, नागरी स्थानिक संस्था आणि इतर राज्य अभिकरण/विभाग यांच्यामध्ये केले जाते. जिल्हा नियोजन समिती यंत्रणेमार्फत हस्तांतरित केल्या जाणाऱ्या एकूण निधीपैकी ५० टक्क्यांहून अधिक निधी स्थानिक संस्थांना हस्तांतरित केला जातो. असे निदर्शनास आले आहे की, या निधीचे ग्रामीण आणि नागरी स्थानिक संस्थांमध्ये परस्पर वाटप करताना कोणत्याही विशिष्ट सूत्राचे पालन केले जात नाही. अशा प्रकारे, विशिष्ट सूत्रावर आधारित वाटपाचा अभाव असल्यामुळे, दीर्घकालीन भांडवली अर्थसंकल्पीय नियोजनामध्ये अनिश्चितता निर्माण होते आणि प्रादेशिक विषमतांचे निराकरण करण्यात अडचणी येतात.

 # शिफारस ८

७.२४. स्थानिक संस्थांमध्ये जिल्हा नियोजन समिती निधीचे वाटप करताना, ते समन्यायी आणि गरजांवर आधारित, नंतरच्या काळात टप्प्याटप्प्याने असावे याची सुनिश्चिती करण्यासाठी, आयोगाने लोकसंख्या, क्षेत्रफळ आणि मागासलेपणाचे निर्देशांक (प्रकरण ६) यांवर आधारित प्रमाणित वाटप सूत्राचा वापर करण्याची शिफारस केली आहे.

छ. प्रलंबित वाहतूक नियमांच्या उल्लंघनाच्या थकीत वसुलीसाठी स्थानिक संस्थांना अधिकार देणे

कारणमीमांसाः

७.२५. महाराष्ट्र शासनाने गृह आणि परिवहन विभागांमार्फत वाहतूक नियमांच्या उल्लंघनावर देखरेख ठेवण्यासाठी, २०१९ पासून एक केंद्रीकृत आणि तंत्रज्ञान-आधारित 'इ-चलन' प्रणाली कार्यान्वित केली आहे. या प्रणालीचा उद्देश रस्ते सुरक्षा वाढवणे आणि नियमांची अंमलबजावणी पारदर्शकपणे करणे हा असला, तरी वसुलीची कामगिरी मात्र अपेक्षित पातळीपेक्षा कमी राहिली आहे. राज्यभरातून वसूल न झालेल्या वाहतूक दंडांची रक्कम अंदाजे ₹४,७३५ कोटी इतकी आहे; ज्यामुळे नियमभंगाचा धाक आणि राज्याचा महसूल या दोन्ही बाबींना बाधा पोहोचते. राज्याचा सरासरी वसुली दर ३६% इतका आहे (तक्ता ७.६ पहा). यावरून असे दिसून येते की, राज्य वाहतूक पोलीस विभागाचे कामकाज केंद्रीकृत स्वरूपाचे असल्यामुळे, स्थानिक पातळीवरून नियमभंगाचे थकीत दंड वसूल करणे कठीण जाते.

तक्ता ७.६: महाराष्ट्रातील वाहतूक नियमांच्या उल्लंघनावरील इ-चलनाचे वार्षिक विवरण

वर्ष	एकूण चलनांची संख्या	एकूण शास्तीची रक्कम (₹)	भरलेली रक्कम (₹)	न भरलेली रक्कम (₹)	वसुली (%)
२०१९	१,२१,७९,११०	३,७९,४३,१७,३५७	२,२३,६०,३२,४५७	१,५५,८२,८४,९००	५८.९३%
२०२०	१,६०,४३,८४२	५,७८,०५,५६,०१०	२,९८,८८,८३,०१०	२,७९,१७,६८,०००	५१.७०%
२०२१	२,१४,३३,६६६	८,२८,३१,७०,१००	४,१०,१४,७५,२५०	४,१८,१६,९४,८५०	४९.५१%
२०२२	१,५७,४६,४९८	१२,०६,८६,०९,२५०	५,३३,२०,३९,२००	६,७३,६५,७०,०५०	४४.१८%
२०२३	१,६२,३८,४२५	१२,५७,०९,३९,३००	४,८७,४२,५६,८५०	७,६९,६६,८२,४५०	३८.७७%
२०२४	१,६८,७५,१३५	१५,२६,९३,८१,८००	४,३२,१६,३८,४५०	१०,९४,७७,४३,३५०	२८.३०%
२०२५	१,६७,४५,७०९	१६,३२,९३,५२,९५०	२,८९,१३,६७,६००	१३,४३,७९,८५,३५०	१७.७०%
एकूण बेरीज	**११,५२,६२,३८५**	**७४,०९,६४,२६,७६७**	**२६,७४,५६,९७,८१७**	**४७,३५,०७,२८,९५०**	**३६.०९%**

स्रोतः गृह विभाग, महाराष्ट्र शासन

 # शिफारस ९

७.२६. आयोगाने अशी शिफारस केली आहे की, स्थानिक संस्थांना विद्यमान महाट्रॅफिक उपयोजकामध्ये (ॲप) प्रवेश (लॉगिन एक्सेस) देऊन, थकीत वाहतूक ई-चलन वसुलीसाठी वैधानिक अधिकार प्रदान करण्यात यावेत. आयोगाने पुढे असाही निर्देश दिला आहे की, वसूल केलेल्या थकबाकीपैकी २०% रक्कम सेवा शुल्क म्हणून आकारावी आणि ती रक्कम वसूल करणाऱ्या स्थानिक संस्थेने अबद्ध अनुदाने म्हणून स्वतःकडे राखून ठेवावी यासाठी एक समर्थकारी नियम राज्याने तयार करावा.

८. स्वतःच्या महसुलात वाढ

एक) स्वतःच्या कर महसुलात वाढ

क. स्थानिक संस्थांसाठी मालमत्ता करात सुधारणा आणि बळकटीकरण

८.१. महाराष्ट्रातील मालमत्ता कर प्रणाली ही, नागरी स्थानिक संस्था आणि ग्रामपंचायतींसाठी स्वतःच्या महसुलाचा मुख्य आधारस्तंभ आहे. नागरी क्षेत्राच्या संदर्भात, ‘महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९’, ‘महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५’ आणि ‘मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८’ मालमत्ता कराची आकारणी, निर्धारण आणि वसुली अनिवार्य करतात. ग्रामीण भागात, ‘महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९’ नुसार ग्रामपंचायतींनी इमारतींवर आणि कृषितर जमिनीवर कर लावणे आवश्यक केले आहे. तथापि, या विविध स्थानिक संस्थांमध्ये मूल्यमापनाच्या पद्धती मोठ्या प्रमाणात भिन्न आहेत.

८.२. दिनांक ३१/१२/२०१५ च्या शासकीय अधिसूचनेअनुसार, ग्रामपंचायतींनी मालमत्ता कर आकारणीसाठी भांडवली मूल्य (सीव्ही) पद्धतीचा अवलंब केला आहे. याउलट, अनेक नागरी स्थानिक संस्था अजूनही मालमत्ता कराच्या गणनेसाठी वार्षिक भाडे मूल्य (एआरव्ही) पद्धतीचा वापर करतात. तंत्रज्ञानाच्या आघाडीवर, बृहन्मुंबई महानगरपालिका (एमसीजीएम), ठाणे महानगरपालिका (टीएमसी), पुणे महानगरपालिका (पीएमसी), पिंपरी चिंचवड महानगरपालिका (पीसीएमसी) आणि नवी मुंबई महानगरपालिका (एनएमएमसी) यांसारख्या नागरी स्थानिक संस्थांनी भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस) किंवा ड्रोन आधारित सर्वेक्षणे स्वीकारली आहेत. आणि ग्रामीण स्थानिक संस्थांमध्ये ग्रामपंचायतींमधील गावठाण भागातील मालमत्तांचे (गावांच्या आबादी क्षेत्रांचे) सर्वेक्षण व प्रगत तंत्रज्ञानाद्वारे ग्रामीण क्षेत्रातील नकाशांकन (मॅपिंग) योजना (स्वामित्व) याअंतर्गत ड्रोन सर्वेक्षणाद्वारे नकाशांकन करण्यात आले आहे. त्यामुळे मालमत्ता कर आधाराचा १००% पेक्षा जास्त विस्तार झाला आहे.

तक्ता ८.१. महाराष्ट्रातील नागरी स्थानिक संस्थांसाठी मालमत्ता कर आधारसामग्री (डेटा)

वर्ष	मालमत्ता कर (₹ कोटीत)	एकूण स्वतःचा महसूल (ओ एस आर) (₹ कोटीत)	स्वतःच्या महसूला (ओ एस आर) मधील वाटा (%)
२०१९-२०	१०,७५६	३१,९४४	३४%
२०२०-२१	११,२८९	२८,७७०	३९%
२०२१-२२	१३,०९१	५०,९२८	२६%
२०२२-२३	१३,७८३	४०,३६३	३४%
२०२३-२४	१३,६२३	४५,८०६	३०%

स्रोत : नगर प्रशासन संचालनालय यांच्याकडील आधारसामग्री

तक्ता ८.२. महाराष्ट्रातील ग्रामीण स्थानिक संस्थांसाठी मालमत्ता कर आधारसामग्री (डेटा)

वर्ष	मालमत्ता कर (रुपये कोटीत)	एकूण स्वतःचा महसूल (ओ एस आर) (रुपये कोटीत)	एकूण स्वतःच्या महसुलात (ओ एस आर) या मधील वाटा (%)
२०१९-२०	१,१८८	२,२६९	५२%
२०२०-२१	१,३४३	२,६०६	५२%
२०२१-२२	१,५५१	२,९४४	५३%
२०२२-२३	१,७१५	३,१५८	५४%
२०२३-२४	१,८०३	३,४५८	५२%

स्रोत : ग्रामपंचायतींसाठी जिल्हावार (आधारसामग्री) माहिती

८.३. तक्ता ८.१ आणि तक्ता ८.२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे, मालमत्ता कर हा आधीच स्वतःच्या महसुलातील (ओएसआर) एक मोठा भाग आहे, म्हणजेच नागरी स्थानिक संस्थांसाठी ३० ते ३४% आणि ग्रामपंचायतींसाठी ५०% पेक्षा जास्त आहे.

क.१. महाराष्ट्रातील महानगरपालिका मालमत्ता कर मंडळाची (एम एम पी टी बी) भूमिका निश्चित करणे आणि तिचा विस्तार करणे.

कारणमीमांसा :

८.४. 'महाराष्ट्र महानगरपालिका मालमत्ता कर मंडळ अधिनियम, २०११' अन्वये मालमत्ता कराचे निर्धारण, आकारणी आणि वसुली याबाबत नागरी स्थानिक संस्थांना मार्गदर्शन करण्यासाठी एक विशेष तांत्रिक प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका मालमत्ता कर मंडळाची स्थापना अधिसूचित केली आहे. हे मंडळ, नागरी अधिकार क्षेत्रामध्ये मूल्यांकन पद्धतीचे मानकीकरण करणे, प्रशासकीय क्षमता बळकट करणे आणि मालमत्ता कर प्रणालीची एकूण कार्यक्षमता सुधारणे यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, ही बाब नजरेसमोर ठेवण्यात आली होती. तथापि, अधिनियमाची सांविधिक अधिसूचना येऊनही, महाराष्ट्र महानगरपालिका मालमत्ता कर मंडळ अद्याप घटित झालेले नाही; परिणामी एक समर्पित संस्थात्मक यंत्रणा अस्तित्वात नाही. प्रस्तावित मंडळाचे अधिकारक्षेत्र स्पष्टपणे 'मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८', 'महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९', 'नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८' आणि 'महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५' यासारख्या महानगरपालिका अधिनियमितींअन्वये आकारल्या जाणाऱ्या मालमत्ता करापुरते मर्यादित आहे. ही बाब स्पष्टपणे निश्चित करते की, मंडळाचा आदेश 'महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९' अंतर्गत शासित ग्रामीण स्थानिक संस्थांना किंवा ग्रामपंचायतींना लागू होत नाही.

#शिफारस १०

८.५. आयोग शिफारस करतो की, नगर विकास विभागाने 'महाराष्ट्र महानगरपालिका मालमत्ता कर मंडळ अधिनियम, २०११' नुसार महाराष्ट्र महानगरपालिका मालमत्ता कर मंडळ तात्काळ घटित करावे.

#शिफारस ११

८.६. आयोग शिफारस करतो की, ग्रामविकास व पंचायतराज विभागाने प्रभावी वसुली करिता कराच्या दरात सुधारणा, आणि मालमत्ता कराचे सनियंत्रणयांसाठी सल्लागार सहाय्य व मार्गदर्शन उपलब्ध करण्यासाठी, 'महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९' च्या कलम १२४(१) मध्ये तरतुदी समाविष्ट करून महाराष्ट्र महानगरपालिका मालमत्ता कर मंडळाचे अधिकार ग्रामीण स्थानिक संस्थांपर्यंत (म्हणजेच ग्रामपंचायतींपर्यंत) वाढवावेत.

#शिफारस १२

८.७. आयोग शिफारस करतो की, राज्य शासनाने 'महाराष्ट्र महानगरपालिका मालमत्ता कर मंडळ अधिनियम, २०११' च्या कलम १२ मध्ये सुधारणा करून नियामक संस्था म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका मालमत्ता कर मंडळाचे अधिकार ग्रामपंचायतींपर्यंत वाढवावेत. या मंडळाला वापरकर्ते शुल्क, पाणीपट्टी आणि विशेष पाणीपट्टी आणि विकास कर आकार यांसह सर्व स्थानिक महसूल स्त्रोतांच्या प्रभावी वसुलीसाठी नियम विहित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात यावेत.

क.२. महाराष्ट्र स्थानिक प्रशासन संस्था महसूल पोर्टलची स्थापना

कारणमीमांसाः

८.८. बृहन्मुंबई महानगरपालिका, पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि नवी मुंबई महानगरपालिका यासारख्या महाराष्ट्रातील मोजक्याच नागरी स्थानिक संस्थांनी मालमत्ता कर संकलन आधारसामग्रीचे (डेटाचे), निरीक्षण आणि नोंद करण्यासाठी स्वतंत्र डिजिटल प्रणाली विकसित केली आहे. मर्यादित तांत्रिक आणि आर्थिक पाठबळामुळे, इतर नागरी स्थानिक संस्था आणि ग्रामीण स्थानिक संस्था अशा प्रकारच्या पायाभूत सोयी उभारू शकलेले नाहीत आणि त्यामुळे त्या अनेक राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील व्यासपीठांवर (प्लॅटफॉर्मवर) अवलंबून आहेत. परिणामी स्थानिक संस्थांमध्ये अ-प्रमाणित आणि तुकड्या-तुकड्यांमध्ये नोंदी दिसून येतात. एकात्मिक व्यासपीठाच्या प्लॅटफॉर्मच्या अभावामुळे संपूर्ण राज्यातील मालमत्ता कराची अधिकृत, विश्वासार्ह आणि वास्तवकालीन (रियल टाईम) आधारसामग्री (डेटा) मिळवण्यात राज्य शासनाला अडचणी येत आहेत, त्यामुळे स्थानिक संस्थांसाठी स्थानिक महसूल स्त्रोतात वाढ करण्यासाठी केलेल्या सुधारणांची व्याप्ती कमी होत आहे.

#शिफारस १३

८.९. आयोग शिफारस करतो की, राज्याने नागरी स्थानिक संस्था आणि ग्रामीण स्थानिक संस्थांच्या सर्व कर आणि करेतर महसुलाचे निर्धारण, आकारणी, संकलन आणि निरीक्षणासाठी एक एकत्रित राज्यस्तरीय डिजिटल व्यासपीठ (पोर्टल) स्थापन करावे. हे व्यासपीठ महाराष्ट्र महानगरपालिका मालमत्ता कर मंडळाच्या तांत्रिक मार्गदर्शन आणि नियामक देखरेखीखाली चालविण्यात यावे, त्याकरिता मंडळाच्या अधिकार क्षेत्राचा योग्य विस्तार करण्यात यावा.

याबाबतीत, मंडळाने पुढील कृती कराव्यात :

- विद्यमान स्थानिक कराधान आणि महसूल प्रणालींचा सर्वसमावेशक आढावा घ्यावा आणि माहिती तंत्रज्ञान विभागाच्या सहकार्याने प्रस्तावित पोर्टलसाठी राज्यव्यापी अंमलबजावणी योजना तयार करावी.
- नोंदणी आणि मुद्रांक विभाग पोर्टल आणि इमारत परवानगी व्यवस्थापन प्रणाली यासारख्या संबद्ध राज्य आणि राष्ट्रीय डिजिटल प्रणालीशी एकत्रीकरण निश्चित करावे आणि त्याची शिफारस करावी, ज्यामुळे आधारसामग्रीचे (डेटा) अखंड देवाण-घेवाण शक्य होईल आणि स्थानिक महसूल प्रशासन व अंमलबजावणी मजबूत होईल.

क.३. सर्व स्थानिक संस्थांमध्ये भौगोलिक माहिती प्रणाली (जी आय एस) / एल आय डी ए आर / ड्रोन सर्वेक्षणातून अनिवार्य मालमत्ता नकाशांकन (मॅपिंग) नागरी स्थानिक संस्थांसाठी :

कारणमीमांसाः

८.१०. ठाणे महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे महानगरपालिका यासारख्या काही महानगरपालिकांनी नवीन मालमत्ता शोधण्यासाठी व निर्धारण न केलेल्या मालमत्ता निश्चित करण्यासाठी बाह्य संस्थांची नियुक्ती करून भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस) / एलआयडीए / ड्रोन सर्वेक्षण केले आहे. तथापि, अनेक नागरी स्थानिक संस्था, त्यांच्या मालमत्ता नोंदवह्या अद्ययावत करण्यासाठी असा उपक्रम राबवण्यासाठी समर्थ नाहीत, त्याचा थेट परिणाम त्यांच्या मालमत्ता कर संकलन कार्यक्षमतेवर होतो. भारत सरकारने देशात ड्रोन-आधारित मालमत्ता नकाशांकन (मॅपिंग) कार्यक्रम सुरू केले आहेत. भारत सरकारच्या अतिरिक्त सचिवांनी दि. २५ सप्टेंबर २०२४ रोजी जारी केलेल्या पत्रानुसार गृहनिर्माण व मालमत्तेसाठी राष्ट्रीय स्वयंचलित खसरा प्रणाली (NAKSHA) योजनेअंतर्गत उच्च स्पष्टता (रिझोल्युशन) भूखंड नकाशे तयार करण्यासाठी एक पथदर्शी (Pilot) ड्रोन सर्वेक्षण महाराष्ट्रातील १० नागरी शहरांमध्ये करण्यात येत आहे.

#शिफारस १४

८.११. आयोगाची शिफारस आहे की, नगर विकास विभागाने पायाभूत मालमत्ता कराचा आधार बळकट करण्यासाठी सर्व नागरी स्थानिक संस्थांमध्ये प्रमाणभूत जीआयएस आधारित मालमत्ता नकाशांकन (मानचित्रण) (मॅपिंग) आराखडा म्हणून NAKSHA योजनेचा अवलंब अनिवार्य करावा. नगर विकास विभागाने जमाबंदी आयुक्त, महसूल व वन विभाग यांच्यामार्फत एका वर्षामध्ये या योजनेची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक अर्थसंकल्पीय सहाय्याची तरतूद करावी; हा खर्च मालमत्ता पत्रक (प्रॉपर्टी कार्ड्स) जारी करून (देऊन) वसूल केला जाऊ शकतो. नगर विकास विभागाने महाराष्ट्र दूरसंवेदी अनुप्रयोग केंद्राकडून (MRSAC) ठराविक अंतराने उपग्रह प्रतिमा प्राप्त केल्या आहेत आणि त्या जीआयएस आधारित नकाशांकनावर (मॅपिंगवर) ठेवल्या आहेत याची खात्री करावी, ज्यामुळे स्थानिक संस्थांना त्यांच्या क्षेत्रातील कोणत्याही अनधिकृत विकासाबाबत माहिती मिळेल.

ग्रामपंचायतींसाठी :

कारणमीमांसाः

८.१२. भारत सरकारने एप्रिल २०२० मध्ये स्वामित्व (SVAMITVA) योजना सुरू केली, ज्यामध्ये क्षेत्रातील मालमत्तांचे मूल्यांकन करण्यासाठी गावातील गावठाण क्षेत्रांमध्ये ड्रोन आधारित सर्वेक्षण करण्यावर भर देण्यात आला आहे. गेल्या काही वर्षांत, गावठाण क्षेत्राबाहेर मोठ्या प्रमाणावर विकास झाला आहे. सध्या, जरी गावठाण क्षेत्राबाहेरील मालमत्तांसाठी बांधकाम परवानगी, नगररचना विभागाच्या तांत्रिक मंजुरीनंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत दिली जात असली तरी, नागरी सुविधा मात्र स्थानिक ग्रामपंचायतीकडूनच पुरवल्या जातात. त्यामुळे, या विकसित मालमत्तांना कराच्या कक्षेत आणण्यासाठी गावठाणाबाहेरील क्षेत्रामधील त्या विकसित मालमत्तांचे नकाशे तयार करणे महत्त्वाचे बनले आहे.

चौकट ८.१: पथदर्शी प्रकरण अभ्यास

गाव-मुंजावडी, तालुका-पुरंदर, जिल्हा-पुणे

येथील मालमत्ता करातील वाढः

- स्वामित्व योजनेअंतर्गत गावठाण सीमेबाहेरील अंदाजे ६५२ मालमत्तांचे सर्वेक्षण करण्यात आले.
- अंदाजे ७७,००० चौरस मीटर अतिरिक्त क्षेत्र मूल्यांकनाखाली आणले गेले.
- रुपये १.६० प्रति चौरस मीटर हा प्रमाणित मालमत्ता कराचा दर लागू केल्यावर, ग्रामपंचायतीला केवळ गावठाण क्षेत्राबाहेर वसलेल्या या मालमत्तांमधून रुपये १,२३,२०० इतका महसूल प्राप्त झाला.

गावठाणाबाहेरील मालमत्तांचे सर्वेक्षण केल्यामुळे आणि कर आकारणी केल्यामुळे ग्रामपंचायतीच्या मालमत्ता कर महसुलात अंदाजे ५०% वाढ झाली.

स्त्रोतः राज्य महसूल विभाग, महाराष्ट्र शासन

#शिफारस १५

८.१३. आयोगाची अशी शिफारस आहे की, ग्राम विकास आणि पंचायत राज विभागाने ग्रामपंचायतींमधील गावठाणाबाहेरील क्षेत्रांचे नकाशांकन (मॅपिंग) करण्याकरिता ड्रोन आधारित सर्वेक्षण करण्यासाठी आणि या क्षेत्रामधील विकसित मालमत्तांना मालमत्ता कराच्या क्षेत्रात आणण्यासाठी स्वामित्व योजनेचा विस्तार करावा. आयोगाची आणखी अशी शिफारस आहे की, या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी, शिफारसींच्या स्वीकृतीपासून एका वर्षाच्या आत जमाबंदी आयुक्तांच्या कार्यालयामार्फत गावठाणाच्या सीमाबाहेरील पुरेशा क्षेत्राच्या समावेशासह अंदाजे रुपये ४० कोटी निधी समर्पित करावा. या निधीच्या शिफारशीच्या व्याप्तीमध्ये २डी आणि ३डी नकाशांकन (मॅपिंग), जीआयएस, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, डिजिटल स्टोरेज सिस्टिम, प्लॉटर सुविधा आणि छपाईच्या खर्चासह ड्रोन सर्वेक्षणाचा समावेश आहे.

#शिफारस १६

८.१४. आयोग शिफारस करतो की, महाराष्ट्र स्थानिक शासन महसूल पोर्टल व इतर संबद्ध आधारसामग्रीमध्ये अखंड समावेशासह, नक्शा (NAKSHA), स्वामित्व (SVAMITVA) आणि विस्तारित स्वामित्व (SVAMITVA) योजनेअंतर्गत नकाशांकन (मॅपिंग) केलेल्या आधारसामग्री (डेटा) वापर करून प्रत्येक मालमत्तेला एक विशेष (युनिक)मालमत्ता ओळख क्रमांक (प्रॉपर्टी आयडी) देण्यात यावा.

क.४. सर्व नागरी स्थानिक संस्थांमध्ये भांडवली मूल्य आधारित मालमत्ता कर प्रणालीचा राज्यव्यापी अवलंब

कारणमीमांसाः

८.१५. भांडवली मूल्यावर आधारित मालमत्ता कर प्रणाली ही वार्षिक दरच्या आधारे आणि मालमत्तेचे स्वरूप, वय किती वर्षे व स्थान यासारख्या विशिष्ट घटकांच्या आधारे परिगणित केलेली आहे; त्यामुळे ही एक पारदर्शक प्रणाली बनते. भांडवली मूल्यावर आधारित कर प्रणाली यापूर्वीच ग्रामपंचायतींमध्ये आणि काही नागरी स्थानिक संस्थांमध्ये स्वीकारली गेली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका, नांदेड-वाघळा शहर, कोल्हापूर शहर यासारख्या महानगरपालिकांमध्ये आणि बदलापूर व सावदा यासारख्या नगरपरिषदांमध्ये भांडवली मूल्य पद्धतीस मिळालेले यश तसेच २०१५ च्या अनिवार्य शासकीय अधिसूचनेनंतर झालेल्या भरीव महसुली वाढीमुळे ग्रामपंचायतींसाठी या दृष्टिकोनाला अधिकच बळकटी मिळते.

चौकट ८.२ : प्रकरण अभ्यासः वार्षिक दरदेय मूल्य (एआरव्ही) पद्धतीतून भांडवली मूल्य पद्धतीकडे संक्रमण (बृहन्मुंबई महानगरपालिका)

वित्तीय वर्ष	वार्षिक कर वसुली (₹ कोटीमध्ये)	मागील वर्षाच्या तुलनेत वाढ (टक्केवारी %)
२०१०-११	३,३८७.०३	—
२०११-१२	३,६५०.९२	७.७९
२०१२-१३	३,८९७.५७	६.७६
२०१३-१४	४,२६२.७४	९.३७
२०१४-१५	४,६७५.८०	९.६९
२०१५-१६	४,९२२.६७	५.२८
२०१६-१७	५,३०६.०६	७.७९
२०१७-१८	५,७१६.५६	७.७४
२०१८-१९	६,०२५.८२	५.४१
२०१९-२०	६,१९९.८५	२.८९
२०२०-२१	६,३९७.७५	३.१९
२०२१-२२	६,५९१.९५	३.०४
२०२२-२३	६,७७३.१५	२.७५
२०२३-२४	७,२७३.०२	७.३८
२०२४-२५	७,७४८.३३	६.५४
२०२५-२६	९,११६.४७	१७.६६

- २०१०-११ मध्ये वार्षिक दरदेय मूल्य (एआरव्ही) पद्धतीतून भांडवली मूल्य पद्धतीकडे संक्रमण होताना मालमत्ता कर मागणीत रुपये ३,६२५ कोटींवरून रुपये ३,६७२ कोटी इतकी किरकोळ वाढ झाली. हे व्यवस्थेत व्यत्यय न आणणाऱ्या सुधारणांचे निदर्शक आहे, ज्यामुळे करदात्यांनी भांडवली मूल्य पद्धतीचा सहजरीत्या स्वीकार केला.
- भांडवली मूल्य पद्धतीअंतर्गत वार्षिक वसुलीत २०१०-११ मधील रुपये ३,३८७ कोटींवरून सातत्याने ती ७,७४८ कोटी (२०२४-२५) आणि ९,११६ कोटी (२०२५-२६) इतकी झाली. ही १५ वर्षांत सुमारे २.७ पट वाढ आहे.
- मागील वर्षाच्या तुलनेत ही वाढ इतकी मुख्यत्वे ५ ते ९% च्या मर्यादेत राहिली, परंतु २०२५-२६ मध्ये यात १७.६६% इतकी तीव्र वाढ दिसून आली. हे भांडवली मूल्य आराखड्याअंतर्गत होणाऱ्या नियतकालिक पुनर्मूल्यांकनांचा परिणाम दर्शविते.
- तक्त्यात टप्प्याटप्प्याने होणाऱ्या वाढीसह महसुलात झालेली हळूहळू आणि सातत्यपूर्ण वाढ अधोरेखित केली आहे, ज्यामुळे भांडवली मूल्य पद्धत ही वार्षिक दरदेय मूल्य (एआरव्ही) पद्धतीपेक्षा दीर्घकालीन दृष्टीने अधिक प्रभावी सुधारणा असल्याचे सिद्ध होते.

स्रोतः बृहन्मुंबई महानगरपालिका

#शिफारस १७

८.१६. आयोग, सर्व नागरी स्थानिक संस्थांमध्ये भांडवली मूल्य आधारित मालमत्ता कर प्रणाली अंमलबजावणीसह एका वर्षाच्या आत स्वीकारण्याची शिफारस करत आहे. मालमत्ता करासाठी भांडवली मूल्य आधारित प्रणालीची अंमलबजावणी किंवा अवलंब हा 'कामगिरी अनुदानाशी' जोडला जाईल. आयोग आणखी असे आदेश देतो की, महाराष्ट्र महानगरपालिका मालमत्ता कर मंडळ सर्व नागरी स्थानिक संस्थांमधील वार्षिक तांत्रिक अंमलबजावणी, प्रामाणीकरण आणि दर विवरण प्रणालीच्या स्वयंचलित जोडणीचे पर्यवेक्षण करील.

ख. स्थानिक संस्थांच्या हद्दीत कार्यरत असणाऱ्या सर्व वाणिज्यिक आस्थापनांची डिजिटल नोंदणी करून स्वतःच्या कर महसुलात वाढ करणे.

कारणमीमांसाः

८.१७. महाराष्ट्रातील महानगरपालिका कायद्यांनुसार, जे व्यवसाय आरोग्य, जीवन किंवा पर्यावरणासाठी धोकादायक ठरू शकतात किंवा धोकादायक पदार्थ हाताळतात किंवा त्यांची साठवण करत असतात किंवा सार्वजनिक त्रास निर्माण करू शकतात अशा काही विनिर्देशित/अधिसूचित व्यवसाय व उपक्रमांसाठी व्यापार परवाना आवश्यक आहे. या परवान्याचा मुख्य उद्देश म्हणजे अशा धोकादायक परिस्थितींवर संनियंत्रण ठेवणे, सार्वजनिक आरोग्यविषयक धोक्यांना आळा घालणे आणि आपत्कालीन परिस्थितीत प्रभावी संपर्क साधण्याची सुनिश्चिती करणे यांसाठी नागरी स्थानिक संस्थांना सक्षम करणे हा आहे.

८.१८. पण अनेक वाणिज्यिक आस्थापना (उदा. वकील, सनदी लेखापाल, कंपनी सचिव, वास्तुशास्त्रज्ञ आणि सल्लागार) अजूनही स्थानिक संस्थांच्या नियंत्रणाबाहेर आहेत. तसेच, ग्रामपंचायतींनाही त्यांच्या अधिकार क्षेत्रातील सर्व व्यावसायिकांची पूर्ण माहिती नसते.

८.१९. सर्वसमावेशक आस्थापना नोंदवह्यांच्या अभावामुळे, स्थानिक संस्थांना घनकचरा व्यवस्थापन, वाहनतळ (पार्किंग), वाहतूक नियोजन, अग्निशमन दलाची सिद्धता आणि आपत्कालीन प्रतिसाद यांसारख्या जोखमींचे व्यवस्थापन अशा नागरी सुविधांचे स्थानिक

आर्थिक नियोजन करणे व त्याकरिता तरतूद करणे यांवर मर्यादा येतात. तसेच यामुळे, अनेक पात्र आस्थापना व व्यवसायांची ओळख न पटल्यामुळे किंवा त्यांचा पद्धतशीरपणे पाठपुरावा न केल्यामुळे कराचा आधार कमी होतो आणि अंमलबजावणीच्या प्रयत्नांमध्ये अडथळा येतो.

#शिफारस १८

८.२०. आयोगाने शिफारस केली आहे की, नगर विकास विभाग (युडीडी) आणि ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीत महानगरपालिका किंवा ग्रामपंचायत क्षेत्रातील (दुकाने, कार्यालये, सेवा पुरवठादार आणि व्यावसायिक कार्यालये) कार्यरत सर्व आस्थापनांसाठी एक सुलभ, त्वरित-मान्यतेवर आधारित स्थानिक संस्था वाणिज्यिक ओळख पटवणारे (पोर्टल) (एलजीसीआय) सुरू करावे. तसेच विद्यमान महानगरपालिका कायद्यांतर्गत, व्यवसाय परवाना प्रक्रिया केवळ जोखीम आधारित/श्रेणींवर आधारित व्यवसायाच्या लायसनवर लक्ष केंद्रित करताना या नवीन ओळख पटवणाऱ्या पोर्टलची अंमलबजावणी अनिवार्य करावी.

आयोगाद्वारे पुढे असे आदेश देण्यात आले आहेत की, माहिती तंत्रज्ञान (आयटी) विभागाच्या सहकार्याने या सर्व प्रक्रियेत एकरूपता आणणे, माहिती तंत्रज्ञान संबंधी तांत्रिक ओझे कमी करणे याची सुनिश्चिती करण्यासाठी आणि राज्यस्तरीय विश्लेषण व डॅशबोर्ड शक्य करण्यासाठी एक राज्यस्तरीय पोर्टल विकसित करावे या सर्व नागरी स्थानिक संस्था (युएलबी) आणि ग्रामपंचायतींकडून (जीपी) स्वीकारले जाईल, असे एक राज्यस्तरीय पोर्टल विकसित करावे. एकदा का स्थानिक संस्थांची व्यवसायिक ओळख पटविणारे पोर्टल कार्यान्वित झाले की, या ओळख क्रमांकाशिवाय कोणतेही नवीन दुकान व आस्थापना किंवा व्यावसायिक कर नोंदणी जारी केली जाऊ नये. विद्यमान आस्थापनांना कोणताही दंड न भरता नोंदणी करण्यासाठी १२० दिवसांचा सवलत कालावधी देण्यात यावा. नियमांचे अनुपालन सुलभ व्हावे आणि कोणाचाही छळ होऊ नये यासाठी पुरेशा सुरक्षा उपायांसह, श्रेणीबद्ध अंमलबजावणीच्या उपयोजनांचे अनुपालन केले जावे.

दोन) करेतर महसुलाची वृद्धी

क. स्थानिक संस्थांमधील सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पी पी पी) बळकट करणे

कारणमीमांसाः

८.२१. लहान स्थानिक स्वराज्य संस्थांकडे महसूल निर्मितीचे अत्यंत मर्यादित स्त्रोत आहेत, आणि त्यामुळे त्या प्रामुख्याने राज्य आणि केंद्र सरकारच्या अनुदानावर अवलंबून असतात. आपली कर्तव्ये प्रभावीपणे पार पाडण्यासाठी, या संस्थांनी अनुदानावरील अवलंबित्व कमी करून खाजगी भांडवलाचा लाभ घेण्याकडे वळले पाहिजे. जरी महाराष्ट्राने राज्यस्तरीय सार्वजनिक-खाजगी भागीदारी उपक्रमांमध्ये यश मिळवले असले तरी, बहुतेक सार्वजनिक-खाजगी भागीदारी मॉडेल्स मुंबई, पुणे आणि पिंपरी-चिंचवड यांसारख्या मोठ्या शहरांमध्ये केंद्रित राहिली आहेत. पायाभूत सुविधांमधील तफावत दूर करण्यासाठी आणि महसुलाचे अतिरिक्त स्त्रोत निर्माण करण्यासाठी, स्थानिक स्वराज्य संस्थांना खाजगी गुंतवणूक आकर्षित करण्याची आणि स्वतंत्रपणे सार्वजनिक-खाजगी भागीदारी प्रकल्प विकसित करण्याची क्षमता प्रदान करणे आवश्यक आहे.

८.२२. सध्या लहान नगरपालिकांसाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारी प्रकल्पांची परिस्थिती काही अडचणींमुळे मर्यादित आहे. मुख्य अडचणी म्हणजे, व्यवहार खर्च जास्त असणे, स्वतंत्र पत मानांकन (क्रेडिट रेटिंग) नसणे, यामुळे तसेच मोठ्या प्रमाणावर राज्य हमी नसल्यामुळे गुंतवणूकदारांना आकर्षित करणे कठीण जाते. कडक जमीन-वापर विनियमांमुळे हे अधिकच आव्हानात्मक ठरते. तसेच, गेल्या काही वर्षांत स्थानिक संस्थांचे भाडे उत्पन्न फारसे वाढलेले नाही ते तक्ता ४.७ मध्ये दाखवले आहे. ही बाब, सार्वजनिक-खाजगी भागीदारी मॉडेल्सचा अवलंब आणि अधिक कार्यक्षम मालमत्ता व्यवस्थापन पद्धती यांद्वारे भाडे महसुलात वाढ करण्यास लक्षणीय वाव असल्याचे दर्शविते.

#शिफारस १९

८.२३. आयोगाने अशी शिफारस केली आहे की, नगरविकास विभाग आणि ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांनी ही शिफारस स्वीकारल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत, नागरी स्थानिक संस्था व ग्रामीण स्थानिक संस्था या दोहोंना सक्षम करण्यासाठी “स्थानिक संस्था सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) मार्गदर्शक माहिती पुस्तिका" तयार करावी. नागरी स्थानिक संस्था आणि ग्रामीण स्थानिक संस्था (आय एल बी) यांना सक्षम करण्यासाठी असावी आणि या माहितीपुस्तिकेमध्ये पुढीलप्रमाणे प्रमाण मार्गदर्शक तत्वे आणि आराखडे यांचा समावेश असावाः

- विविध क्षेत्रांचे नकाशीकरण आणि "पायाभूत सोयी-सुविधा प्रथम" हा दृष्टिकोन.
- समूह प्रकल्प (क्लस्टर) मॉडेलद्वारे "गट प्रकल्प" प्रोत्साहित करणे.
- जिल्हा सार्वजनिक-खाजगी भागीदारी सहाय्य युनिट (District PPP Support Unit) आणि त्यांची भूमिका.
- टप्प्याटप्प्याने आर्थिक मंजुरी आणि देखरेख.
- प्रमाणित खरेदी प्रक्रिया आणि कागदपत्रांसह आर्थिक सहाय्य.

८.२४. आयोगाने पुढे असे सुचविले आहे की, 'प्रायोगिक समूहांच्या' (Pilot Clusters) पहिल्या तुकडीसाठी व्यवहार्यता अभ्यास सुरू करण्यासाठी जिल्हास्तरावरील व्यवहार सल्लागारांची (Transaction Advisors) नियुक्ती करण्यात यावी. नगर विकास विभाग आणि ग्राम विकास व पंचायत राज विभागाने 'गट प्रकल्पातून' (ज्यामध्ये अनेक ग्रामपंचायती/परिषदांचा समावेश आहे) मिळणारा महसूल वैयक्तिक स्थानिक निधीमध्ये परत कसा वितरित करावा, याबद्दल स्पष्ट आर्थिक मार्गदर्शक तत्वे तयार करावीत.

#शिफारस २०

८.२५. आयोग अशी शिफारस करतो की, राज्य शासनाने संबद्ध कायद्यांमध्ये स्थानिक संस्थांना ३० वर्षांपर्यंतच्या कालावधीसाठी मालमत्ता भाडेतत्त्वावर देण्याचे स्वायत्त अधिकार प्रदान करावेत यासाठी सुधारणा करावी. या दीर्घ मुदतीचा भाडेपट्टा आणि भाडे करार यांचे प्रमाणीकरण केल्यामुळे, स्थानिक संस्थांना शाश्वत खाजगी भांडवल आकर्षित करण्यास, भाडे उत्पन्नाचे जास्तीत जास्त फायदे मिळवण्यास आणि 'सार्वजनिक-खाजगी भागीदारी' (पीपीपी) द्वारे आर्थिकदृष्ट्या सक्षम पायाभूत सुविधा प्रकल्प स्वतंत्रपणे विकसित करण्यास मदत होईल. स्थानिक संस्थांनी मालमत्ता भाड्याने देताना सार्वजनिक खरेदी मार्गदर्शक तत्त्वांचे / निविदा प्रक्रियेचे काटेकोरपणे अनुसरण करणे आवश्यक आहे; यामध्ये कोणत्याही अपवादासाठी, शासनाची मान्यता आवश्यक असते.

ख. गावठाण क्षेत्राबाहेरील इमारत आराखड्यास मंजुरी

कारणमीमांसाः

८.२६. महाराष्ट्र राज्यात, सध्याची नियामक चौकट 'गावठाण क्षेत्र' (ज्याला गावची वसाहत असे म्हटले जाते) आणि विद्यमान गावठाण क्षेत्राबाहेर विकसित झालेले क्षेत्र, यांच्या मंजुरी प्रणालींना वेगळे करते. 'महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९' च्या कलम ५२ अन्वये, ग्रामपंचायतीला केवळ गावांच्या सीमेतच (गावठाण क्षेत्रासाठी) 'नियोजन प्राधिकरण' म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. हे स्पष्ट करते की, गावठाण क्षेत्रामध्ये बांधकामाशी संबंधित उपक्रमांसाठी परवानगी देण्याचे अधिकार ग्रामपंचायतीकडे आहेत, ही बाब यावर भर देते. 'महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६' च्या कलम १८ नुसार, जे क्षेत्र पारंपरिक गावठाणांच्या बाहेर येते, अशा क्षेत्रांसाठी नगररचना विभागाची तांत्रिक मान्यता मिळवल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांकडून बांधकाम परवानग्या घेणे आवश्यक आहे. या परवानग्या जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दिल्या जात असल्या तरी, गावठाणाबाहेरील क्षेत्रांना पाणीपुरवठा, अंतर्गत रस्ते, मलनिस्सारण इत्यादी मूलभूत सुविधा ग्रामपंचायतीमार्फत पुरवल्या जातात.

८.२७. सध्याच्या पद्धतीमुळे गावठाणाबाहेरील क्षेत्रात राहणाऱ्या, या लहान गावांमधील नागरिकांना जिल्हाधिकारी कार्यालयातील नगररचना विभागाकडून बांधकामाची परवानगी मिळवण्यासाठी लांबचा प्रवास करावा लागतो, त्यामुळे ही प्रक्रिया वेळखाऊ आणि कंटाळवाणी आहे. ग्रामपंचायतींना गावठाण हद्दीतील इमारतीचे बांधकाम करण्याची परवानगी देण्याचे अधिकार आधीच दिलेले आहेत आणि त्या गावठाण क्षेत्राबाहेरील क्षेत्रांना पायाभूत सोयी-सुविधा व सार्वजनिक सेवा पुरवण्यासाठी देखील जबाबदार आहेत. त्यामुळे गावठाणाबाहेरील क्षेत्रात इमारत बांधण्याची परवानगी देण्याचे अधिकार ग्रामपंचायतींना देणे अनिवार्य करण्याची एक लक्षणीय संधी येथे उपलब्ध आहे. यामुळे २,००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या गावांसाठी ग्रामपंचायतींना अतिरिक्त महसूल प्राप्त होईल (ज्यांचे राज्यातील प्रमाण सुमारे ६२% आहे — तक्ता ३.२).

#शिफारस २१

८.२८. आयोग सुचवितो की, राज्य शासनाने २,००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या आणि जवळच्या नागरी स्थानिक संस्थेपासून (यु एल बी) ५ कि मी पेक्षा जास्त अंतरावर स्थित असलेल्या गावठाणाबाहेरील भागांसाठी इमारत बांधण्याची परवानगी देण्याचा अधिकार, सहायक संचालक नगररचना यांच्याकडून या प्राधिकरणाकडे अधिकृतपणे हस्तांतरणासह ग्रामपंचायतींना द्यावा. ही बाब सुकर करण्यासाठी, 'महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६' मधील कलम १८ आणि 'महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९' मधील कलम ५२ मध्ये सुधारणा करून, त्यांच्या संपूर्ण भौगोलिक अधिकारक्षेत्रासाठी 'नियोजन प्राधिकरण' म्हणून ग्रामपंचायतींना नियुक्त करावे.

तसेच आयोगाने गावठाण आणि गावठाणाबाहेरील विकासकामांसाठी मंजुरी देण्यासाठी इमारत आराखडा व्यवस्थापन प्रणाली मध्ये ग्रामपंचायतींसाठी स्वतंत्र प्रवेश देण्यासाठी लॉगिन आयडी तयार करावेत. मंजुरी प्रक्रिया सोपी असावी जसे की चेक बॉक्स आणि ड्रॉप-डाऊन, जेणेकरून ग्रामपंचायत स्तरावर ती चालवता येईल. याशिवाय, सामान्य निवासी बांधकामासाठी विशेषतः ग्राउंड + १ मजले आणि एकूण ९ मीटरपेक्षा कमी उंचीसाठी व्यावसायिक वास्तुशास्त्रज्ञाची अट रद्द करावी. सुरक्षिततेचे आवश्यक नियम पाळून, अर्जदारांना स्थानिक स्तरावरील नकाशे सादर करण्याची मुभा द्यावी. तसेच ग्रामविकास व पंचायत राज विभागाने ग्रामपंचायतींना आवश्यक माहिती तंत्रज्ञान पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून इमारत आराखडा व्यवस्थापन प्रणाली स्थानिक पातळीवर चालवता येईल, आणि तज्ञ संसाधने उपलब्ध करून देण्यासाठी मार्गदर्शक तत्वेही निश्चित करावीत.

ग. राज्य-स्तरीय वाहनतळ (पार्किंग) आणि एकात्मिक वाहनतळ प्रणाली

कारणमीमांसाः

८.२९. महाराष्ट्रामध्ये वाहनतळ (पार्किंग) व्यवस्थापन आणि त्याचे नियंत्रण, महानगरपालिकांसाठी 'मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८' चे कलम ३२६ अ व ३२६ ब, 'महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९' चे कलम २४३ अ आणि नगरपरिषदांसाठी 'महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५' च्या कलम १०८ नुसार केले जाते. जरी हे अधिनियम महानगरपालिका आयुक्त आणि मुख्याधिकाऱ्यांना वाहन उभे करण्याचे क्षेत्र निश्चित करण्याचे आणि उपविधींद्वारे शुल्क आकारण्याचे अधिकार देत असले, तरी प्रत्यक्ष कार्यपद्धती मात्र खाजगी संस्थांसोबतच्या अल्पकालीन, प्रत्यक्ष हाताने करावयाच्या (मॅन्युअल) आणि रोख रकमेच्या स्वरूपातील करारांवर आधारित आहे. या पारंपरिक निविदा प्रक्रियेमध्ये वाहनतळाच्या (पार्किंगच्या) उपलब्धतेबद्दल वास्तवकालीन (रियल टाईम) माहितीचा अभाव असतो, ज्यामुळे महसुलाची मोठी गळती होते आणि स्थानिक संस्थांच्या कामकाजात पारदर्शकतेचा अभाव राहतो. याशिवाय, जरी एकीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० द्वारे रस्त्याबाहेरील (ऑफ-स्ट्रीट) पार्किंगचे निकष प्रस्थापित केले असले, तरी रस्त्यावरील (ऑन स्ट्रीट) वाहनतळ (पार्किंगसाठी) एकात्मिक धोरण नसल्यामुळे अनियंत्रित वाहने उभी करण्याची क्षेत्रे, अस्ताव्यस्त वाहनतळ (पार्किंग) अशा समस्या उभ्या राहिल्या आणि शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. डिजिटल एकत्रीकरणाच्या अभावामुळे वाहनतळाच्या (पार्किंग) नियमांच्या अंमलबजावणीमध्येही गंभीर त्रुटी जाणवतात. जरी 'मोटार वाहन अधिनियम, १९८८' चे कलम १२७ आणि 'महाराष्ट्र मोटर वाहन नियम, १९८९' मधील नियम २२२ यांनुसार वाहन जप्त करणे आणि उचलून नेण्याचा कायदेशीर अधिकार आहे, तरी प्रत्यक्षात वास्तव वेळेत त्याचा मागोवा घेता येत नसल्यामुळे (रियल टाईम ट्रॅकिंग) हे अधिकार प्रभावीपणे वापरता येत नाहीत. म्हणूनच, राज्यभरातील विखुरलेल्या स्थानिक पद्धती एकत्र आणण्यासाठी, खाजगी कामकाजामुळे उद्‌भवणाऱ्या प्रतिमेवरील जोखमी कमी करण्यासाठी, आणि संपूर्ण राज्यातील नागरिकांसाठी एक समान व माहिती-आधारित अनुभव निर्माण करण्यासाठी एक राज्य-स्तरीय सर्वसमावेशक चौकट तयार करणे आवश्यक आहे.

चौकट ८.३: प्रत्यक्ष अनुभवातून पुरावाः

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका (पी सी एम सी) स्मार्ट वाहनतळाचे (पार्किंगचे) यश (२०२५)

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने (पी सी एम सी), 'पार्किंगपाल' या नवोद्योगाच्या (स्टार्टअपच्या) सहकार्याने, पारंपरिक हाताने चालवणाऱ्या (मॅन्युअल) व्हेंडर मॉडेलकडून, १००% डिजिटल पर्यावरणामध्ये (इकोसिस्टीम) यशस्वीरित्या स्थित्यंतर केले आहे. हे निकाल असे सिद्ध करतात की डिजिटल रूपांतरण हे स्वतःचे स्त्रोत वाढवण्यासाठी, करा-व्यतिरिक्त महसूल वाढवण्यासाठी एक शक्तिशाली साधन आहे.

अ. आर्थिक कामगिरी आणि महसूल वाढ

कालावधी (एप्रिल ते डिसेंबर)	पूर्वीची हाताने चालवायची व्हेंडर मशीन (मॅन्युअल व्हेंडर)	पार्किंगपाल (डिजिटल)	वाढ (%)
एकूण वसुली	₹ ८,२५,७८५	₹ १०,३०,४४३	+२४.८%

ख. गळती रोखणेः क्यूआर कोड्स आणि युपीआय द्वारे १००% डिजिटल व्यवहारांकडे वळल्यामुळे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने संपूर्ण महसूल गोळा करण्याचे साध्य केले आहे आणि रोख रक्कम हाताळणीतील जोखीम दूर केली.

ग. मासिक गतीः या प्रणालीने, तिच्या प्रायोगिक टप्प्यामध्येच १९,८३७ पेक्षा जास्त नोंदी (बुकिंग) करून व्यवहार केले, आणि ₹१,०९,०८८ चा मासिक महसूल उच्चांक साधला.

घ. नागरिकांवर विश्वासः हे डिजिटल मॉडेल विश्वासावर आधारित आहे, ज्यामध्ये नागरिक पार्किंग सुविधांचा वापर करू शकतात आणि स्वेच्छेने दिलेल्या सेवेसाठी योग्य मोबदला देण्याची मुभा दिलेली आहे.

डिजिटल आणि ॲप-आधारित वाहनतळ (पार्किंग) मुळे काय बदलले:

- १००% डिजिटल व्यवहारांमुळे महसुलाची पारदर्शकता सुधारली.
- वाहनतळ (पार्किंग) शुल्कातून मिळणाऱ्या महसुलात (अंदाजे २५%) वाढ झाली.
- स्वयंचलित पुनर्मेळामुळे प्रशासकीय कामाचा बोजा अंदाजे ४०% कमी झाला.
- सुमारे १८% इतक्या प्रमाणात नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांची ओळख पटल्यामुळे अंमलबजावणीची परिणामकारकता सुधारली.
- नागरिकांसाठी वाहनतळ (पार्किंग) शोधण्याची आणि पैसे देणे यातील वेळ ७०-९०% ने कमी झाला.

मुख्य निष्कर्ष (Core Learning): विश्वसनीय आणि प्रमाणित वाहनतळाची माहिती (पार्किंग डेटा) महानगरपालिकेचे नियंत्रण, अंमलबजावणी आणि महसूल नियोजनाला बळकट करतो. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा अनुभव हे सिद्ध करतो की वाहनतळ (पार्किंग) ही एक सहज साध्य होणारी आणि उच्च प्रभाव साधणारी महसुलाची संधी आहे. योग्य धोरण आणि तंत्रज्ञानाच्या पाठबळासह, याचे रूपांतर एका संरचित महानगरपालिका उपयुक्तता सेवेमध्ये होऊ शकते.

स्त्रोतः पार्किंगपाल

#शिफारस २२

८.३०. आयोगाने अशी शिफारस केली आहे की, नगर विकास विभाग आणि ग्राम विकास आणि पंचायत राज विभाग यांनी "राज्य वाहनतळ धोरण (पार्किंग पॉलिसी)" तयार करून अधिसूचित करावे आणि तिचा स्वीकार करण्यासाठी टप्पानिहाय अंमलबजावणी योजना तयार करावी. हे धोरण स्थानिक संस्थांच्या पातळीवर वाहनतळ (पार्किंग) व्यवस्थापन, वाहनतळासाठी क्षेत्र तयार करणे (झोनिंग), डिजिटल प्लॅटफॉर्म आणि विक्रेता एकत्रिकरण यासाठी प्रमाण मार्गदर्शक पुस्तिका (आराखडा) म्हणून काम करेल. आयोग पुढे असा आदेश देतो की, माहिती तंत्रज्ञान विभागाने, स्थानिक संस्थांसाठी डिजिटल वाहनतळ मंच (पार्किंग प्लॅटफॉर्म) तयार करावा व तो कार्यान्वित करावा.

घ. जाहिराती आणि बाह्य जाहिरात माध्यमांद्वारे महसूल वाढवणे

कारणमीमांसाः

८.३१. महाराष्ट्र राज्य, कायदेशीर चौकटीद्वारे, स्थानिक संस्थांना जाहिरात आणि बाह्य जाहिरात माध्यमाद्वारे (आउटडोर मीडिया) कर-व्यतिरिक्त महसूल निर्माण करण्यासाठी भक्कम वैधानिक अधिकार प्रदान करते. 'मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८' च्या कलम ३२८ आणि ३२८अ अन्वये, महापालिका आयुक्तांना परवाना पद्धतीद्वारे आकाशचिन्ह (स्काय साईन्स) आणि जाहिरातींचे नियमन करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. 'महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९' मधील कलम २४४ आणि २४५ इतर महानगरपालिकांना अशाच प्रकारचे नियामक अधिकार प्रदान करतात.

८.३२. दिनांक १५/०९/२०२५ चा शासन निर्णय महाराष्ट्राचे पहिले राज्यव्यापी "बाह्य जाहिरात फलकांसाठी धोरण (Outdoor Hoarding Policy)" सादर करतो. हे धोरण बाह्य ठिकाणच्या जाहिराती आणि माध्यमांसाठी सर्व जिल्ह्यांमध्ये एकसमान नियमावली लागू करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल आहे. तथापि, या धोरणात छोट्या स्थावर मालमत्तांवरील (मायक्रो-रिअल इस्टेट) छोट्या जाहिरातींचा समावेश होत नाही, त्यामुळे या क्षेत्राची पूर्ण आर्थिक आणि नियामक क्षमता अद्याप पूर्णपणे साध्य झालेली नाही.

#शिफारस २३

८.३३. आयोगाने अशी शिफारस केली आहे की, नगर विकास विभाग आणि ग्राम विकास आणि पंचायत राज विभाग यांनी एक 'प्रमाणित चलन प्रक्रिया' तयार करावी, ज्यामध्ये, स्थानिक संस्थांना जाहिरातींसाठी "छोट्या स्थावर मालमत्ता (मायक्रो-रिअल इस्टेट)" भाड्याने देण्यासाठी मुभा असेल. हा बदल मोठ्या जाहिरात फलकाकडून जास्त वापर होणारी (हाय-फ्रिक्वेन्सी) रस्त्यावरील सार्वजनिक सुविधा (स्ट्रीट फर्निचर)' कडे लक्ष केंद्रित करतो. या प्रमाणित कार्यचालनपद्धतीनुसार अंमलबजावणी करणे सर्व स्थानिक संस्थांसाठी बंधनकारक असावे.

आयोग पुढे असेही आदेश देतो की, ६० दिवसांच्या आत परवाने देणे आणि संनियंत्रण यासाठी पथदिवे, बस थांबे, सार्वजनिक शौचालये आणि इतर तत्सम मालमत्तांना 'युनिक डिजिटल आयडी (क्यूआर कोड्स)' सह संदर्भखुणा (टॅग) देण्याकरिता 'भौगोलिक माहिती प्रणाली (जी आय एस) आधारे मालमत्ता गणना करण्यात यावी.

९. संस्थांचे बळकटीकरण / संविधान (चौऱ्याहत्तरावी सुधारणा अधिनियम, १९९२)

९.१ संविधानात्मक तरतुदीनुसार "विकेंद्रीकरण प्रत्यक्षात साकार होईल याची खात्री करणे", "नागरिकांच्या सहभागासाठी व्यासपीठे स्थापन करणे", "नियोजन समित्यांची स्थापना करून नियोजन प्रक्रिया बळकट करणे", आणि "नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची (युएलएसजीएस) वित्तीय शाश्वतता सुधारणे", यासाठी चौऱ्याहत्तरावी संविधान सुधारणा अधिनियम, १९९२ ची अंमलबजावणी करताना, महाराष्ट्रासह १८ राज्यांमध्ये करण्यात आलेल्या कार्याभिमुख लेखापरीक्षेच्या आधारे, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (कॅग) यांनी महत्त्वाच्या शिफारशी केल्या आहेत. भारतातील राज्यांमध्ये, संबंधित राज्य वित्त आयोगांनी (एसएफसीएस) स्थानिक संस्थांना निधी हस्तांतरणाबाबत शिफारशी करण्याबरोबरच ग्रामीण व नागरी स्थानिक संस्थांच्या (आरएलबीएस व युएलबीएस) कार्याशी संबंधित सर्व बाबी बळकट करण्याची गरजही अधोरेखित केली आहे.

९.२ महाराष्ट्र राज्यात (संविधान चौऱ्याहत्तराव्या सुधारणा) अधिनियमाच्या अंमलबजावणीच्या कार्यक्षमतेबाबत भारताच्या नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या अहवालातील शिफारशींची आयोगाने दखल घेतली आहे. सदर अहवालात २०१५-१६ ते २०२०-२१ या कालावधीचा समावेश असला तरी, त्यातील अनेक शिफारशी (बॉक्स ९.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे) आजच्या घडीलाही लागू होतात. आर्थिक बाबींशी संबंधित काही शिफारशींचा विचार यापूर्वीच्या प्रकरणांमध्ये करण्यात आला आहे.

९.३ वरील निरीक्षणांच्या पार्श्वभूमीवर, आयोग ठळकपणे नमूद करतो की, केवळ आर्थिक (राजकोषीय) बदलामुळे विकेंद्रीकरण साध्य होऊ शकत नाही, तर त्याला स्थानिक संस्थांच्या बळकटीकरणाची जोड देणेही गरजेचे आहे. यामध्ये, पारदर्शकता, कार्यक्षमता आणि विशेषतः प्रभावी देखरेख, याचे सुनिश्चिती करण्यासाठी, लेखाप्रणाली मजबूत करण्याकडे, परिणामाभिमुख नियोजनाकडे आणि विविध कामाच्या सुसूत्र व सुलभ अंमलबजावणीकडे लक्ष देणे, याचा समावेश आहे. दीर्घकालीन वित्तीय तसेच प्रशासकीय शाश्वततेला प्रोत्साहित करण्यासाठी आणि माहिती आधारित निर्णय प्रक्रियेस सहाय्य करण्यासाठी डिजिटल माहिती प्रणाली विकसित करण्याची आवश्यकता आहे.

९.४ या सुधारणा अंमलात आल्यास, स्थानिक संस्था अधिक सक्षम व परिणामकारक स्वराज्य संस्था म्हणून कार्य करू शकतील.

चौकट ९.१: भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कॅग) यांच्या द्वारे करण्यात आलेल्या कार्याभिमुख लेखापरीक्षेच्या आधारावर करण्यात आलेल्या शिफारशी.

- नागरी स्थानिक संस्थांचे सक्षमीकरण आणि त्यांच्या कार्यपद्धतीः

१. संविधानानुसार नागरी स्थानिक संस्थांकडे अधिकार व जबाबदाऱ्यांचे पूर्ण हस्तांतरण सुनिश्चित करण्यासाठी, शासनाने कालमर्यादीत कार्यवाही करणे आवश्यक असून, आणि त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात अशा अधिकार व जबाबदाऱ्यांच्या अंमलबजावणीसाठी पर्याप्त स्वायत्तता देण्याची आवश्यकता आहे.

२. राज्य शासनाने महापौरांना कार्यकारी अधिकार सोपवणे तसेच महापौर / नगराध्यक्ष यांची लोकांद्वारे थेट निवड करण्याबाबत प्रशासकीय सुधारणा समितीच्या शिफारशींचा विचार करावा.

३. राज्य शासनाने महानगर क्षेत्राच्या एकात्मिकृत विकासासाठी महानगर नियोजन समिती प्रभावीपणे काम करेल याची सुनिश्चिती करावी.

४. शासनाने वॉर्ड समित्या व क्षेत्र सभा स्थापन करण्यासाठी आवश्यक पावले उचलावीत आणि त्यांच्या प्रभावी कार्यान्वयनाची खात्री करावी.

५. राज्य शासनाने, निर्धारित कालमर्यादेत राज्य वित्त आयोगाची स्थापना करावी व राज्य वित्त आयोगाचा अहवाल शासनास त्वरित सादर होईल याची खात्री करावी. राज्य शासनाने, आयोगाच्या शिफारशींचा सुद्धा ठराविक कालमर्यादेत विचार करावा आणि स्वीकारण्यात आलेल्या शिफारशींची तत्परतेने अंमलबजावणी होईल याची देखील सुनिश्चिती करावी.

६. राज्य शासन, नागरी क्षेत्रांमध्ये वसूल केल्या जाणाऱ्या व्यवसाय कराची माहिती जमा करण्यासाठी एक यंत्रणा उभारू शकेल आणि त्यातील ५०% रक्कम नागरी स्थानिक संस्थांना निश्चित कालांतराने हस्तांतरित केली जाईल याची सुनिश्चिती करेल.

- **नागरी स्थानिक संस्थांची वित्तीय संसाधनेः**

७. केंद्रीय आणि राज्य शासनाच्या मालमत्तांवर व्यवसाय कराऐवजी आकारण्यात येणारे शुल्क सर्व नागरी स्थानिक संस्थांद्वारे वेळेत वसूल करण्यात येईल हे सुनिश्चित करण्यासाठी नागरी स्थानिक संस्थांमधील अंतर्गत नियंत्रण यंत्रणा बळकट करण्यात येईल. राज्य शासन, हेही सुनिश्चित करेल की, सर्व नागरी स्थानिक संस्थांकडून मालमत्तेच्या भांडवली मूल्यांच्या आधारावर मालमत्ता कर आकारला जाईल आणि मालमत्तेचे भौगोलिक माहिती प्रणाली द्वारे मानचित्रण (नकाशांकन) निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्यात येईल.

८. शासनाने पाचव्या राज्य वित्त आयोगाने शिफारस केल्याप्रमाणे, अतिरिक्त मुद्रांक शुल्काची रक्कम थेट नागरी स्थानिक संस्थांच्या खात्यात जमा करण्यासाठी यंत्रणेचा विचार करावा आणि दरम्यानच्या काळात वसूल झालेली संपूर्ण रक्कम नागरी स्थानिक संस्थांकडे त्वरित हस्तांतरित करण्याची व्यवस्था करावी.

९. शासनाने, नागरी स्थानिक संस्थांना (युएलबीएस) देय असलेला महसूल व अनुदाने कोणताही विलंब न करता पूर्णपणे वितरित करण्यात येतील याची खात्री करावी.

- **नागरी स्थानिक संस्थांमधील मानवी संसाधनेः**

१०. शासनाने पाचव्या राज्य वित्त आयोगाच्या शिफारशींचा विचार करून नागरी स्थानिक संस्थांमधील मंजूर पदसंख्येचे पुनरावलोकन करावे आणि रिक्त पदे निश्चित कालमर्यादेत भरण्यात येतील याची खात्री करावी.

११. शासन सामान्य सेवांसाठी कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीसंदर्भात सल्लागार प्राधिकरण म्हणून काम करण्याची जबाबदारी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास देण्यासाठी कार्यवाही करेल आणि महानगरपालिकांसाठी संवर्ग (कॅडर) सेवा विकसित करण्यासाठी तातडीने पावले उचलू शकेल.

- **पाणीपुरवठा, स्वच्छता व अग्निशमन सेवांच्या सेवा पुरवठ्याची परिणामकारकताः**

१२. शासन, पाणीपुरवठा व सांडपाणी सेवासंदर्भातील सेवा स्तर मानके साहय करण्यातील नागरी स्थानिक संस्थांच्या निकृष्ट कामगिरीचे पुनरावलोकन करेल आणि त्यात सुधारणा करण्यासाठी निश्चित कालमर्यादेत आवश्यक ती पावले उचलेल.

१३. शासनाने, वसुली कार्यक्षमता सुधारण्यासाठी व महसुलातील तूट टाळण्यासाठी, सर्व नागरी स्थानिक संस्थांमधील पाणी जोडण्यांना १००% मीटर जोडण्याची सुनिश्चित करावी, ज्यामुळे नागरी स्थानिक संस्थांच्या वित्तीय संसाधनात वाढ होईल.

१४. शासन, नागरी स्थानिक संस्थांमधील अग्निशमन केंद्रांची कमतरता या बाबीला सर्वोच्च प्राधान्य देऊन हा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करेल.

स्रोतः महाराष्ट्र राज्यातील संविधान (चौऱ्याहत्तरावी सुधारणा) अधिनियमाच्या अंमलबजावणीच्या परिणामकारकतेसंदर्भातील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा अहवाल.

एक. स्थानिक संस्थांमध्ये वित्तीय व्यवस्थापनासाठी प्रमाणित आराखडा स्वीकारणे.

कारणमीमांसाः

९.५. 'महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, २००५' नुसार राजकोषीय व्यवस्थापनात पिढ्यानपिढ्यातील समता (निर्णयात पुढील पिढ्यावरील परिणामांचा विचार) करणे सुनिश्चित करणे, पर्याप्त महसूल अधिशेष प्राप्त करून आणि वित्तीय शाश्वततेस अनुरूप असे विवेकपूर्ण कर्ज व्यवस्थापन करून त्याद्वारे वित्तीय स्थैर्य साध्य करणे ही राज्य शासनाची जबाबदारी आहे. राज्य शासनाच्या वित्तीय कार्यप्रणालीत पारदर्शकता वाढविणे आणि मध्यम मुदतीच्या चौकटीत वित्तीय धोरण राबविणे. या (वित्तीय) चौकटीमुळे, राज्याच्या अर्थसंकल्पाच्या गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा झाली आहे, उत्तरदायित्व अधिक मजबूत झाले आहे, सार्वजनिक वित्त व्यवस्थेत पारदर्शकता वाढली आहे, आणि सार्वजनिक कर्जाच्या शाश्वततेची सुनिश्चिती झाली आहे.

९.६. स्थानिक संस्थांकडे, संविधान आणि राज्य नगरपालिका अधिनियमांतर्गत वाढत्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आलेल्या असल्या तरीही, वित्तीय जबाबदारी, मध्यम मुदतीचे वित्तीय नियोजन, कर्ज घेणे, माहिती प्रकटीकरण व उत्तरदायित्व यांसाठी कोणतीही एकरूप (वित्तीय) आराखड्यामुळे चौकट नसताना या संस्थांनी आपले कार्य चालू ठेवले. परिणामी, सर्व स्थानिक संस्थांच्या राजकोषीय कामकाजात निकृष्ट वित्तीय नियोजन, प्रलंबित लेखापरीक्षा, सर्वसामान्यांना मर्यादित माहितीचा पुरवठा, आणि वित्तीय कामगिरीतील लक्षणीय तफावत या समस्यांसह दीर्घकालीन आव्हाने आढळून येत आहेत.

९.७. स्थानिक संस्थांच्या राजकोषीय संरचनेला (चौकटीला) मजबूत करण्यासाठी कर्नाटक राज्यात लागू करण्यात आलेल्या अधिनियमाच्या धर्तीवर 'महाराष्ट्र स्थानिक संस्था राजकोषीय उत्तरदायित्व आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम' लागू करण्याबाबत महाराष्ट्र शासन विचार करू शकते. कर्नाटकातील 'स्थानिक निधी प्राधिकरणे राजकोषीय उत्तरदायित्व अधिनियम, २००३' ची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेतः

- स्थानिक संस्थांसाठी मध्यम मुदतीची राजकोषीय योजना (MTFP) अनिवार्य करणे.
- वित्तीय व्यवस्थापनासाठी मार्गदर्शकतत्वे निश्चित करणे.
- स्थानिक स्तरावरील राजकोषीय व्यवस्थापनामध्ये पारदर्शकता सुनिश्चित करणे.
- लेख्यांची तयारी, सादरीकरण व लेखापरीक्षण यासाठी योग्य कार्यपद्धती सुनिश्चित करणे.
- लेखापरीक्षण अहवालांचे वेळेत परीक्षण व त्यांचे अनुपालन सुनिश्चित करणे.
- अधिनियमातील तरतुदींचे पालन सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजना तयार करणे.

#शिफारस २४

९.८. आयोगाने अशी शिफारस केली आहे की, वित्त विभागाने स्थानिक संस्थांसाठी विद्यमान महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व आणि अर्थसंकल्पीय अधिनियमाच्या धर्तीवर राजकोषीय उत्तरदायित्व आराखडा तयार करावा व प्रस्तावित अधिनियमास विधिविधानास "महाराष्ट्र स्थानिक संस्था राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पिय व्यवस्थापन अधिनियम" (एमएलबीएफआरबीएम अधिनियम) असे शीर्षक देता येईल.

दोन. स्थानिक संस्थांमधील वित्तीय लेखांकन (Accounting) यंत्रणा बळकट करणे

कारणमीमांसाः

९.९. महाराष्ट्र शासनाने, स्थानिक संस्थांना त्यांच्या प्रवर्गानुसार, 'राष्ट्रीय नगरपालिका लेखांकन पुस्तिका' (२००४), 'महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता' (२०१३), 'जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या लेखासंहिता' (१९६८), आणि 'महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता' (२०११) यांच्या सह विहित लेखांकन पुस्तिका आणि संहितांनुसार लेखे ठेवणे बंधनकारक केले आहे. या प्रमाणित लेखा चौकटी अस्तित्वात असूनही, स्थानिक संस्थांची आर्थिक विवरणपत्रे अनेकदा त्यांच्या आर्थिक स्थितीचे सर्वसमावेशक व अचूक चित्र दर्शविण्यात अपयशी ठरतात. अनेक प्रकरणांमध्ये, तांत्रिक क्षमेतेतील त्रुटी, अपुरा कर्मचारीवर्ग आणि लेखा संदर्भातील सॉफ्टवेअरचा मर्यादित वापर यामुळे आर्थिक अहवालांच्या गुणवत्तेवर व विश्वसनीयतेवर परिणाम होतो.

९.१०. बहुतेक स्थानिक संस्था अर्थसंकल्प तयार करतात आणि अर्थसंकल्पाची प्रत्यक्ष खर्चाशी तुलना करतात मात्र असे करताना, ताळेबंद व्यवस्थापन करण्यासाठी, रोख रकमांचे विनियोजन करण्यासाठी, मालमत्ता व दायित्वाच्या संनिरीक्षणासाठी आणि माहिती आधारित आर्थिक निर्णय घेण्यासाठी वित्तीय विवरणपत्रांचा पुरेसा वापर होत नाही, परिणामी वित्तीय व्यवस्थापनात अकार्यक्षमता निर्माण होते. वित्तीय विवरणपत्रे वेळेत सादर करताना, अधिक शिस्तीची आणि नमुन्यांचे काटेकोर पालन करताना विहित लेखासंबंधित मानके व अहवालाचे नमुनेविहीत करताना कडक अनुपालनाची गरज आहे. पारदर्शकता व सार्वजनिक उत्तरदायित्व वाढविण्यासाठी, लेखापरीक्षित वित्तीय विवरणपत्रे आणि महत्त्वपूर्ण वित्तीय माहिती सार्वजनिकरित्या उपलब्ध असलेल्या डिजिटल व्यासपीठांवर उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. स्थानिक संस्थांच्या स्तरावर पारदर्शकता, उत्तरदायित्व व एकूण राजकोषीय व्यवस्थापनात सुधारणा करण्यासाठी लेखापद्धती अधिक सक्षम करणे, संस्थात्मक क्षमता विकसित करणे, आणि वित्तीय विवरणपत्रांच्या विश्लेषणात्मक वापरास प्रोत्साहित करणे आत्यावश्यक आहे.

 # शिफारस २५

९.११. आयोगाने शिफारस केली आहे की, ग्रामविकास व पंचायत राज विभाग (आरडीडी) व नगरविकास विभाग (युडीडी) यांनी स्थानिक संस्थांना लेखापरीक्षित खात्यांच्या सादरीकरणासाठी निश्चित अंतिम दिनांक स्वीकृत करणे यासह निर्धारित लेखांकन नियम पुस्तिका व संहितांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक करावे. आयोगाने पुढे अशीही शिफारस केली आहे की, सर्व स्थानिक संस्थांची लेखापरिक्षित खाती ऑनलाइन, शक्यतो शासनाच्या संबंधित स्थानिक संस्थांच्या संकेतस्थळावर अशा दोन्ही ठिकाणी प्रसिद्ध करण्यात यावीत.

तीन. स्थानिक संस्थांमधील लेखापरीक्षण यंत्रणा बळकट करणे.

कारणमीमांसाः

९.१२. महाराष्ट्रातील सर्व स्थानिक संस्थांचे संविधिक लेखापरीक्षण करण्याची जबाबदारी स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयावर (डीएलएफएए) सोपविण्यात आली आहे. स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय दरवर्षी महत्त्वाच्या लेखापरीक्षा अभिप्रायांचा समावेश असलेला, लेखापरीक्षण आढावा अहवाल तयार करते, जो, नगर विकास विभाग (युडीडी) व ग्रामविकास व पंचायतराज विभाग (आरडीडी) यांच्या मार्फत राज्य विधानमंडळासमोर सादर केला जातो. तथापि, लेख्यांच्या लेखापरीक्षणास होणारा विलंब, अपुरे अंतर्गत नियंत्रण, लेखापरीक्षण हरकतींचे प्रलंबन आणि क्षेत्रीय कार्यालयाकडून उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्यात होणारा विलंब यांच्यासह लेखापरीक्षण आढाव्यामध्ये वारंवार अधोरेखित करण्यात आलेल्या प्रणालीगत समस्यांमुळे लेखापरीक्षणाचे निष्कर्ष व संदर्भातील पाठपुरावा हा अजूनही एक आव्हानात्मक मुद्दा ठरत आहे. त्यामुळे, लेखापरीक्षण प्रक्रियेला वित्तीय प्रशासन सुधारण्यासाठीचे व्यवस्थापन साधन म्हणून पाहण्यापेक्षा केवळ अनुपालन प्रक्रिया म्हणून पाहिली जात आहे.

९.१३. भारत सरकारने, या विसंगतीवर मात करण्यासाठी 'ऑडिट ऑनलाईन' हे तंत्रज्ञान सज्ज लेखापरीक्षण व्यासपीठ विकसित केले आहे. हे व्यासपीठ सध्या लेखापरीक्षण प्रक्रिया मजबूत करण्यासाठी, लेखापरीक्षणाच्या मानकांचे अनुपालनात वाढ करण्यासाठी आणि स्थानिक संस्थांच्या लेखापरीक्षणामधील पारदर्शकता आणि उत्तरदायित्वात सुधारणा करण्यासाठी ग्रामीण स्थानिक संस्थांना (आरएलबीस) उपलब्ध आहे.

चौकट ९.२: नागरी स्थानिक संस्थांसाठी (युएलबी) 'ऑडिटऑनलाइन' प्रणालीचा उपयोग करणे.

"ऑडिटऑनलाईन" हा असा अनुकूलनयोग्य (configurable) डिजिटल मंच आहे की, जो सरकारी संस्थांना, भारताच्या नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांच्या (CAG) मानके आणि मार्गदर्शकतत्त्वानुसार, अंतर्गत व बाह्य लेखापरीक्षण करण्यास मदत करतो. हा मंच लेखापरीक्षा निरीक्षणे, लेखापरीक्षण परिच्छेद आणि कृती अहवालाबरोबरच लेखापरीक्षण प्रक्रियेचा सुरुवातीपासून शेवटपर्यंत (end-to-end) मागोवा घेणे आणि संनिरीक्षण करण्यास मदत करतो. या मंचामुळे जिल्हा, तालुका, आणि गावच्या पातळीवरील पंचायतींची योजनानिहाय लेखापरीक्षणाची प्रक्रिया मोठ्या प्रमाणात सुलभ केली आहे आणि हा मंच सर्वसमावेशक लेखापरीक्षण नोंदी, लेखापरीक्षकांची माहिती, आणि लेखापरीक्षण पथकांची माहिती जतन करताकरता राज्यनिहाय लेखापरीक्षण पुस्तकांना सहाय्य करते.पारदर्शकता व उत्तरदायित्वाला बळकटी देऊन त्याद्वारे ऑडिट ऑनलाईन हे प्रभावी लेखापरीक्षण व्यवस्थापनाचे साधन म्हणून उदयास आले आहे. याची, सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापनातील लेखापरीक्षणाची महत्त्वाची भूमिका लक्षात घेता मंचाच्या सहज बदल स्वीकारण्याच्या (adaptable) संरचनेत, थोडाफार बदल करून त्या संरचनेचा, नागरी स्थानिक संस्था आणि त्याच्या संबंधित विभागांच्या लेखापरीक्षणात यथोचित वापर करता येऊ शकेल.

 # शिफारस २६

९.१४. आयोगाने, राज्य शासनाला अशी शिफारस केली आहे की, ग्रामीण स्थानिक संस्थांसाठी (आरएलबी) सध्या वापरात असलेली ऑडिट ऑनलाईन व्यवस्था, लेखापरीक्षण प्रक्रियेतील एकरूपता सुनिश्चित करण्यासाठी, लेखापरीक्षण निरीक्षणांचा पद्धतशीर पाठपुरावा करण्यासाठी, आणि सर्व स्थानिक संस्थांमधील पारदर्शकता व उत्तरदायित्वात वाढ व्हावी यासाठी नागरी स्थानिक संस्थांना सुद्धा लागू करण्यात यावी. आयोग पुढे असे आदेश देतो की, भारताची सार्वजनिक लेखापरीक्षक संस्था आणि महाराष्ट्राचे महालेखापाल यांच्याशी सल्लामसलत करून, जिल्हा स्थानिक निधी लेखापरीक्षण प्राधिकरणाद्वारे स्थानिक संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी प्रमाणित करण्यात आलेल्या सनदी लेखापाल संस्थांची नामिका (पॅनेल) तयार करण्यात यावी. तसेच संबंधित संस्थांना योग्य भौगोलिक समूहांसाठी नामिका प्रविष्ट करता येऊ शकेल.

चार. स्थानिक संस्थांच्या खर्च क्षमतेचे बळकटीकरण.

क. अधिक चांगल्या कामाची निवड.

कारणमीमांसा :

९.१५. स्थानिक संस्था, वाढत्या जबाबदाऱ्या आणि सेवा मागण्यांना सामोरे जात, मर्यादित आर्थिक संसाधनाच्या आधारे काम करत असतात. अशा परिस्थितीत, प्रकल्पांची सुयोग्य निवड अत्यंत महत्त्वाची ठरते. अशावेळी, तात्पुरत्या भांडवली खर्चाऐवजी, स्पष्ट आणि दीर्घकालीन परिणाम देणाऱ्या प्रकल्पांकडे सार्वजनिक निधी वळविणे आवश्यक असते. तथापि, प्रकल्पाची निवड अनेकदा दीर्घकालीन खर्च, महसूल क्षमता, स्थानिक प्राधान्यावर होणारा परिणाम किंवा त्यांच्याशी असलेली सुसंगती याचे पुरेसे मूल्यांकन न करता केली जाते. म्हणूनच, स्थानिक संस्थांच्या प्रकल्प निवडीच्या निर्णयांना मार्गदर्शन करण्यासाठी वस्तुनिष्ठ व परिणामाभिमुख चौकटीची आवश्यकता आहे.

 # शिफारस २७ क

९.१६. आयोग अशी शिफारस करतो की, नगर विकास विभाग (युडीडी) आणि ग्राम विकास विभाग (आरडीडी) यांनी स्थानिक संस्थांद्वारे वस्तुनिष्ठ, परिणामाधारित व मूल्यधारित प्रकल्पांची निवड शक्य करण्यासाठी प्रमाणित मूल्यांकन मार्गदर्शक तत्त्वांद्वारे ‘पुरस्कृत प्रकल्प प्राधान्यक्रम आधारक सारणी’ (मॅट्रिक्स) लागू करावी.

ख. भांडवली गुंतवणूक योजना

कारणमीमांसाः

९.१७. मध्यम मुदतीच्या भांडवली गुंतवणूक योजनेच्या अभावी, नागरी स्थानिक संस्थांमधील भांडवली खर्च अनेकदा तुकड्या तुकड्यांमध्ये होतो आणि तो स्थानिक विकास गरजा व सेवेतील त्रुटींचे पद्धतशीर मूल्यांकन करण्याऐवजी, उपलब्ध योजना किंवा अल्पकालीन विचारावर आधारित असतो. परिणामी, गुंतवणुकीत स्थानिक प्राधान्यक्रम किंवा दीर्घकालीन पायाभूत सुविधांच्या गरजा पूर्णपणे प्रतिबिंबित होत नाहीत.

९.१८. या पार्श्वभूमीवर पंचवार्षिक भांडवली गुंतवणूक योजना तयार करण्याचे महत्त्व लक्षात येते. अशा योजनेमुळे, नागरी स्थानिक संस्थांना, स्थानिक विकास गरजांनुसार भांडवली गुंतवणूक निश्चित करून त्यांचा प्राधान्यक्रम निश्चित करता येईल, भांडवली खर्चाला मध्यम मुदतीच्या विकास उद्दिष्टांशी सुसंगत ठेवता येईल आणि एकूण आर्थिक गरजांचा अंदाज घेता येईल. या योजनेमुळे निर्माण होणाऱ्या मालमत्तांवर होणारा खर्च आर्थिक क्षमतेशी सुसंगत आहे का आणि त्या मालमत्तांच्या कार्यान्वयन व देखभालीसाठी पुरेशी तरतूद करण्यात आली आहे का याची खात्री करण्यासही मदत होईल.

 # शिफारस २७ ख

९.१९. आयोगाने अशी शिफारस केली आहे की, नगरविकास विभागाने (युडीडी) सर्व नागरी स्थानिक संस्थांना (युएलबीस) पंचवार्षिक भांडवली गुंतवणूक योजना तयार करण्याचे आदेश द्यावेत जी नंतर संबंधित संस्थेच्या प्रकल्प प्राधान्यक्रम आधारक सारणी (मॅट्रिक्स) शी जोडण्यात येईल. प्रत्येक नागरीक स्थानिक संस्थेने ही योजना तयार करावी आणि त्याच्या अंमलबजावणीवर जिल्हाधिकाऱ्याद्वारे वर्षातून दोनदा सनियंत्रण केले जावे.

ग. राज्यव्यापी कार्य व्यवस्थापन प्रणाली आणि डॅशबोर्ड

कारणमीमांसाः

९.२०. सध्या, नागरी स्थानिक संस्था आणि ग्रामीण स्थानिक संस्था या बहुतेकदा विविध विभागांमध्ये अनेक कामे हाती घेत आहेत, ज्यामध्ये भांडवली गुंतवणूक प्रकल्पांसह पाठपुरावा करणे (लक्ष ठेवणे) आणि सनियंत्रण करणे यांसाठी अशी एकात्मिक प्रणाली नसते. स्वच्छता, हरितीकरण, आणि कचरा व्यवस्थापन यासारख्या तत्सम उपक्रमांची केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांतर्गत विविध विभागांकडून वारंवार अंमलबजावणी केली जाते, यामुळे कामाची पुनरावृत्ती होते आणि जबाबदाऱ्या परस्परव्याप्त होण्याचा धोका वाढतो. स्थानिक संस्थांमधील विभागांच्या स्वतंत्रपणे काम करण्याच्या पद्धतीमुळे, समन्वयात तफावत निर्माण होते व सनियंत्रणाची आव्हाने निर्माण होतात. स्थानिक संस्थांची वाढती कार्ये लक्षात घेता, समन्वयाचे बळकटीकरण, उत्तरदायित्वात सुधारणा आणि संनियंत्रण कार्यक्षेत्रात सुधारणा होण्यासाठी, एक तंत्रज्ञान सक्षम कार्य व्यवस्थापन आराखड्याची गरज आहे.

 # शिफारस २७ ग

९.२१. आयोग अशी शिफारस करतो की, माहिती तंत्रज्ञान सचिवासोबत सामायिक केलेल्या क्रमवार तक्त्यांच्या धर्तीवर, माहिती तंत्रज्ञान विभागाने राज्यनिहाय कृती व्यवस्थापन प्रणाली विकसित करावी. या प्रणालीमध्ये गती शक्ती रचनेशी सुसंगत असलेल्या एकाच, भौगोलिक माहिती प्रणाली-सक्षम व्यासपीठावर विभाग आणि योजनांमध्ये हाती घेतलेल्या सर्व कामांचा समावेश असलेला रियल-टाईम डॅशबोर्ड आणि मालमत्ता निर्देशिकेचा समावेश असावा. प्रकल्पाच्या प्रगतीचा आणि विभागांमधील देयकांचा मागोवा घेण्यास सक्षम करण्यासाठी आणि कामांची पुनरावृत्ती कमी करण्याकरिता प्रत्येक कामासाठी एक अद्वितीय मालमत्ता ओळख क्रमांक नेमून देण्यात यावा.

घ. स्थानिक संस्थांमधील इ-निविदा प्रक्रियेचे मजबुतीकरण

कारणमीमांसा :

९.२२. स्थानिक संस्थांमधील खरेदी पद्धती विशेषतः लहान स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये, स्वतः केलेल्या आणि प्रमाणित नसलेल्या कार्यपद्धतीवर, लक्षणीय अवलंबून असून पुष्कळच बदलत असते. महा टेंडर आणि गव्हर्नमेंट इ-मार्केटप्लेस (जी.ई.एम.) यासारखे डिजिटल खरेदी मंच उपलब्ध असले तरी, खरेदीच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या समान संचाच्या अभावामुळे या मंचाचा स्वीकार असमान राहिला आहे. मोठ्या महानगरपालिकांनी इ-निविदा प्रणालीचा अधिकाधिक अवलंब केला आहे, तर नगरपालिका, परिषदा, नगरपंचायती आणि ग्रामपंचायती कागदाधारित प्रक्रियांचे पालन करत आहेत. या संदर्भात, प्रमाणित संदर्भ आराखड्याचा अभाव, खरेदीतील सातत्य, कार्यक्षमता आणि पारदर्शकता यांना मर्यादित करतो. प्रमाणित खरेदी साधनसामग्रीच्या विकासामुळे स्थानिक संस्थांनाही एकसमान मार्गदर्शन मिळेल आणि कार्यक्षम आणि जबाबदार खरेदी पद्धतींचा अवलंब करण्यास मदत होईल.

 # शिफारस २७ घ

९.२३. आयोगाने अशी शिफारस केली आहे की, स्थानिक संस्थांमध्ये प्रभावी आणि एकसमान खरेदी पद्धतींसाठी धोरणात्मक मार्गदर्शक म्हणून काम करण्यासाठी, नगर विकास विभाग आणि ग्राम विकास विभाग यांनी प्रमाणित खरेदी साधनसंच विकसित करावा.

ङ. कामांची सामाजिक लेखापरीक्षा

कारणमीमांसाः

९.२४. ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही आघाड्यांवर सामाजिक लेखापरीक्षा संरचना अस्तित्वात आहेत. ग्रामीण स्थानिक संस्थांच्या बाबतीत, राष्ट्रीय ग्राम विकास आणि पंचायती राज संस्थेकडे नोंदणीकृत असलेल्या स्वतंत्र सामाजिक लेखापरीक्षा संस्थांद्वारे विविध सरकारी योजनांसाठी सामाजिक लेखापरीक्षा सुलभ केली जाते. या सामाजिक लेखापरीक्षा संस्था, केंद्रीय समन्वय संस्था म्हणून काम करतात आणि दर सहा महिन्यांनी किमान एकदा तरी कार्यालयीन अभिलेखांची १०० टक्के पडताळणी करण्यासाठी ग्रामसभेच्या माध्यमातून सामाजिक लेखापरीक्षण हाती घेतात. नागरी स्थानिक संस्थांसाठी महाराष्ट्रातील निवडक शहरी प्रभागांमध्ये प्रायोगिक सामाजिक लेखापरीक्षण अभ्यास करण्यासाठी, भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (सी.ए.जी.) यांच्या लेखापरीक्षण मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले जात आहे; मात्र, त्यांची नियमित आणि पद्धतशीर पद्धतीने अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

९.२५. स्थानिक संस्था अनेक कामे हाती घेत असल्याने तसेच सार्वजनिक निधीचे व्यवस्थापन करत असल्याने आणि पारदर्शकता आणि जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी जबाबदार असल्याने, प्रशासकीय प्रक्रियेवर नागरिकांचा विश्वास कायम राखणे आवश्यक ठरते. अर्थातच सुधारणा आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी अभिप्राय मिळविण्यासाठी सातत्याने जनतेचा सहभाग महत्त्वाचा ठरतो. प्रस्तावित राज्यव्यापी कार्य व्यवस्थापन प्रणाली आणि रियल टाईम डॅशबोर्डसह, नियमित सामाजिक लेखापरीक्षण संस्थात्मक केल्याने संरचित सामुदायिक देखरेख, सार्वजनिक कामांचा पारदर्शक मागोवा घेणे, माहितीची विषमता कमी करणे आणि सार्वजनिक खर्चातील जबाबदारी निश्चित करणे शक्य होईल.

 # शिफारस २८

९.२६. आयोगाने अशी शिफारस केली आहे की, स्थानिक संस्थांनी हाती घेतलेल्या कामांसाठी नगरविकास विभाग आणि ग्रामविकास विभागाने सर्वसमावेशक सामाजिक लेखापरीक्षा आराखडा विकसित करावा आणि हा आराखडा राज्यव्यापी कार्य व्यवस्थापन प्रणालीमध्ये अंतर्भूत करावा.

आयोगाने पुढे असेही अनिवार्य केले आहे की, राष्ट्रीय ग्रामीण विकास आणि पंचायत राज संस्थेने दिलेल्या संरचनेप्रमाणेच स्वतंत्र सामाजिक लेखापरीक्षा केंद्र स्थापन करून आणि भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांनी अहवालात नमूद केलेल्या लेखा परीक्षण मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून, ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरी स्थानिक संस्थांनी नागरिकांचा सहभाग संस्थात्मक करावा. ही सामाजिक लेखापरीक्षा करण्यासाठीचे अंदाजपत्रक स्थानिक संस्थांना प्रकल्पांसाठी नियतवाटप केलेल्या अंदाजाच्या ०.२% इतके मर्यादित केले जाऊ शकते.

पाच. स्थानिक संस्थांच्या स्तरावर उद्योगांच्या (कॉर्पोरेट) सामाजिक उत्तरदायित्व निधीचे वाटप.

कारणमीमांसा :

९.२७. कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १३५ अन्वये उद्योगांचे (कॉर्पोरेट) सामाजिक उत्तरदायित्व जपणे अनिवार्य केले आहे, ज्यामध्ये कंपन्यांना सरासरी निव्वळ नफ्यातील किमान २ टक्के सामाजिक उपक्रमांवर[७] खर्च करणे आवश्यक आहे. उद्योग (कॉर्पोरेट) सामाजिक जबाबदारी निधी अनुसूची ७ मध्ये नमूद केलेल्या उपक्रमांकडे निर्देशित केला जावा, ज्यात शिक्षणाला प्रोत्साहन देणे, दारिद्र्य आणि कुपोषण दूर करणे, आरोग्यसेवेस प्रोत्साहन देणे, सुरक्षित पेयजल आणि स्वच्छता प्रदान करणे, पर्यावरणीय शाश्वतता आणि पर्यावरणीय संतुलन सुनिश्चित करणे आणि ग्रामीण किंवा झोपडपट्टी विकास प्रकल्पांची अंमलबजावणी करणे यांचा समावेश आहे.

९.२८. उद्योग (कॉर्पोरेट) व्यवहार मंत्रालय, राष्ट्रीय स्तरावरील एक परिभाषित केलेल्या उद्योग सामाजिक उत्तरदायित्व कक्षामार्फत याच्या आराखड्याचे नियमन करते आणि उच्चस्तरीय सल्लागार संस्थेद्वारे सनियंत्रण आणि अनुपालनावर मार्गदर्शन करण्यासाठी तरतूद करते. २०२१ च्या उद्योग (कॉर्पोरेट) सामाजिक उत्तरदायित्व सुधारणा नियमांनी (नियम ४, उप-नियम (१) खंड (ग)) हा आदेश आणखी मजबूत केला, ज्यामुळे संसदेच्या कायद्याखाली किंवा राज्य विधिमंडळाच्या अधिनियमांतर्गत स्थापन झालेल्या वैधानिक संस्था किंवा संस्थांना, ज्यात स्थानिक सरकारी संस्थांचा समावेश आहे, उद्योगांचे (कॉर्पोरेट) सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांची[८] अंमलबजावणी करणारे म्हणून नोंदणी करण्याची आणि काम करण्याची परवानगी मिळाली.

९.२९. भारतातील सर्वात मोठ्या औद्योगिक आणि व्यावसायिक केंद्रांपैकी एक असलेल्या महाराष्ट्र राज्यात विकासाशी संबंधित अनेक प्रकल्पांसाठी उद्योगांच्या (कॉर्पोरेट) सामाजिक उत्तरदायित्व निधीचा कार्यक्षमतेने वापर करण्याची मोठी क्षमता आहे. या क्षमतेचा वापर करण्यासाठी, स्थानिक संस्थांना कंपनी अधिनियम, २०१३ च्या अनुसूची ७ अंतर्गत येणारे संबंधित आणि प्राधान्य प्रकल्प ओळखण्यासाठी पद्धतशीर यंत्रणेची आवश्यकता आहे, जे उद्योगांच्या (कॉर्पोरेट) सामाजिक उत्तरदायित्व द्वारे निधी सुनिश्चित करतील.

---

७ कंपनी अधिनियम २०१३, कलम १३५, पृ ९३.

८ २२ जानेवारी २०२१ उद्योग (कॉर्पोरेट) सामाजिक उत्तरदायित्व धोरण सुधारणा नियम, २०२१ (२२ जानेवारी २०२१ रोजीचा कंपनी जी.एस.आर ४०(ई) द्वारे अधिसूचित) नियम ७(४) आणि ८ (३)

 # शिफारस २९

९.३०. आयोगाने शिफारस केली आहे की, स्थानिक संस्थांच्या स्तरावर उद्योगांच्या (कॉर्पोरेट) सामाजिक उत्तरदायित्वाचे उपक्रम आयोजित करण्यासाठी राज्य सरकारने महानगरपालिका, जिल्हा प्रशासन कार्यालय (परिषद आणि नगरपालिका) आणि जिल्हा परिषदेमध्ये समर्पित उद्योग (कॉर्पोरेट) सामाजिक उत्तरदायित्व कक्ष स्थापन करावे. राज्याने या उद्योग (कॉर्पोरेट) सामाजिक उत्तरदायित्वाच्या कक्षांची भूमिका, कार्य आणि अपेक्षित परिणामही निश्चित करावेत. हे कक्ष स्थानिक संस्थांना त्यांच्या विकासात्मक उद्दिष्टांसह उद्योग (कॉर्पोरेट) सामाजिक उत्तरदायित्व देणग्यांचे संरेखन करण्याची प्रक्रिया सुव्यवस्थित करून अक्रियाशीलतेपासून सक्रिय भूमिकेकडे वळण्यास सक्षम करतील.

आयोगाने स्थानिक संस्थांना मिळणाऱ्या निधीचा मागोवा ठेवण्यासाठी आणि त्यांनी केलेल्या विविध प्रकारच्या उपक्रमांचे दस्तऐवजीकरण करण्यासाठी, स्थानिक संस्थांच्या सर्व उद्योगांच्या (कॉर्पोरेट) सामाजिक उत्तरदायित्वाशी संबंधित उपक्रमांची माहिती देणारे राज्य उद्योग जगत (कॉर्पोरेट) सामाजिक उत्तरदायित्व पोर्टल स्थापन करणे अनिवार्य केले आहे.

सहा. नगरपालिका रोखे

कारणमीमांसाः

९.३१. शहरांना चांगल्या पायाभूत सुविधा आणि सेवांच्या वाढत्या मागणीला सामोरे जावे लागत आहे. या गरजा पूर्ण करण्यासाठी केवळ सरकारी अनुदान आणि पारंपरिक निधी पुरेसा राहिलेला नाही. त्यामुळे नागरी स्थानिक संस्थांनी त्यांच्या महसुलाच्या स्त्रोतांमध्ये विविधता आणली पाहिजे आणि संसाधने एकत्रित करण्याच्या पर्यायी पद्धतींचा सक्रियपणे वापर केला पाहिजे.

९.३२. नागरी स्थानिक संस्थांना पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी दीर्घकालीन देशांतर्गत खाजगी भांडवल उपलब्ध करून देण्यासाठी नगरपालिका रोखे हे एक शक्तिशाली साधन आहे. रोख्यांच्या माध्यमातून निधी उभारणी करून, नागरी स्थानिक संस्था कर्ज बाजारपेठेचा लाभ घेऊ शकतात. सरकारी हस्तांतरणावरील अवलंबित्व कमी करू शकतात आणि प्रकल्पाच्या अंमलबजावणीला गती देऊ शकतात. त्याच वेळी, नगरपालिका रोखे जारी केल्याने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि जबाबदारीची उच्च मानके स्वीकारण्यास भाग पाडले जाते, ज्यामुळे त्यांचे एकूण प्रशासन बळकट होते.

९.३३. एकूण नगरपालिका, महसुलाचे पाठबळ असलेले सामान्य दायित्व रोखे म्हणून किंवा विशिष्ट उत्पन्न देणाऱ्या प्रकल्पांशी जोडलेले महसूल रोखे म्हणून नगरपालिका रोखे जारी केले जाऊ शकतात. महानगरपालिकेने स्पष्टपणे ओळखता येण्याजोग्या आणि आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य प्रकल्पांसाठी महसुली रोखे मार्गाचा अवलंब केला पाहिजे आणि पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत उपक्रमांसाठी हरित रोखे देखील शोधले पाहिजेत. तथापि, रोख्यांची रचना, नियामक अनुपालन आणि वितरणानंतरच्या प्रशासनाच्या आवश्यकतांच्या तांत्रिक गुंतागुंतीमुळे नागरी स्थानिक संस्थांना नगरपालिका रोख्यांच्या वित्तपुरवठ्यात प्रवेश करण्याच्या क्षमतेच्या अडथळ्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे संस्थात्मक सज्जता निर्माण करण्यासाठी आणि पालिकेच्या रोखे बाजारात विश्वासार्ह, सुव्यवस्थित सहभाग सुनिश्चित करण्यासाठी पालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी लक्ष्यित, अल्पकालीन प्रशिक्षण कार्यक्रम आवश्यक आहेत.

 # शिफारस ३०

९.३४. आयोगाने शिफारस केली आहे की, नगर विकास विभागाने सर्व २९ महानगरपालिकांना मार्च २०३० पर्यंत किमान एक तरी महानगरपालिका रोखे जारी करण्याचे आदेश द्यावेत. यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे (यशदा) आणि भारतीय रोखे आणि विनिमय मंडळ (सेबी), स्टॉक एक्सचेंज, पत मानांकन अभिकरणे (क्रेडिट रेटिंग एजन्सीज्) आणि मर्चेंट बँकर्स यासारख्या विशेष संस्थांच्या सहकार्याने नगरविकास विभागाला नगरपालिका रोखे वित्तपुरवठ्यावर नियमित प्रशिक्षण आखावेत आणि आयोजित करावेत असे आदेश आयोगाने दिले आहेत. हे कार्यक्रम आयोजित केले जावेत आणि नगरपालिकेचे आयुक्त आणि प्रमुख अधिकाऱ्यांनी ते नियंत्रित करावेत. संस्थात्मक तयारी निर्माण करणे आणि नगरपालिकेचे रोखे बाजारात शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विश्वासार्ह सहभागाला पाठबळ देणे हा यामागचा उद्देश असेल.

सात. माहिती आधारित निर्णय घेणे

कारणमीमांसाः

९.३५. स्थानिक संस्थांचे कामकाज सुधारण्यासाठी माहिती आणि पारदर्शकता ही महत्त्वाची साधनं आहेत. देखरेख, पर्यवेक्षण आणि धोरण निर्मिती अधिक प्रभावी होते जेव्हा सरकार तसेच स्थानिक संस्थांना विश्वासार्ह आणि वेळेवर माहिती सहज उपलब्ध होते, ज्यामुळे त्यांना समस्या ओळखणे, पर्यायांचे मूल्यांकन करणे आणि पुराव्यांवर आधारित निर्णय घेणे शक्य होते.

९.३६. दैनंदिन कामकाजाचा भाग म्हणून स्थानिक संस्था भरीव माहिती तयार करतात, ज्यात पुढील गोष्टींचा समावेश आहेः

- **वित्तीय व्यवस्थापनः** महसूल, खर्च, तूट / अधिशेष, दायित्वे, उपयोगिता प्रमाणपत्रे.
- **योजना व्यवस्थापनः** लाभार्थी तपशील, प्रत्यक्ष आणि आर्थिक प्रगती, अंमलबजावणीची स्थिती.
- **आस्थापनाः** कर्मचारीवर्ग, मंजूर पदे, रिक्त पदे, पगारपत्रकाची माहिती.
- **खरेदीः** निविदा, कामाच्या मागण्या, विक्रेत्याचे तपशील, कंत्राटाचे टप्पे, देयके.
- **सामाजिक आणि आर्थिक पायाभूत सुविधाः** शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, व्यावसायिक विभाग इत्यादी.
- **मत्ता नोंदवहीः** मालकीची मत्ता, भाडेपट्टीवर दिलेली / भाड्याने दिलेली मत्ता, देखभाल आणि देखभालीचा अभिलेख.
- **सेवा वितरण आणि सेवा स्तरावरील करारः** पाणीपुरवठा, स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, रस्ते, पथदिवे, इमारतींच्या परवानग्या, व्यापार परवाने.
- **नागरिकांशी संवादः** सार्वजनिक तक्रारी, सेवा विनंत्या, प्रतिसाद आणि समस्या निराकरण कालमर्यादा.

९.३७. तथापि, यातील बहुतांश माहिती प्रत्यक्ष नोंदवही किंवा कागदपत्रांमध्ये राहते आणि ती डिजिटल स्वरूपात उपलब्ध नाही. सध्याच्या विखुरलेल्या माहिती तंत्रज्ञान परिसंस्थेमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांनी वेगवेगळ्या योजना आणि विभाग-विशिष्ट सरकारी प्रणालींमध्ये एकाच आधारसामग्री (डेटा) अनेक वेळा प्रविष्ट करणे आवश्यक आहे, ज्यामुळे प्रशासकीय ओझे वाढते आणि अहवालात विसंगती निर्माण होते.

 # शिफारस ३१

९.३८. आयोगाने शिफारस केली आहे की, नगरविकास विभाग, ग्रामविकास विभाग आणि माहिती तंत्रज्ञान विभागाने संयुक्तपणे सर्व ग्रामीण स्थानिक संस्था आणि नागरी स्थानिक संस्थांसाठी एक सर्वसमावेशक राज्यस्तरीय माहिती मंच असलेल्या एकीकृत स्थानिक संस्था माहिती प्रणालीची रचना आणि अंमलबजावणी करावी. एकीकृत स्थानिक संस्थांच्या माहिती प्रणालीने स्थानिक संस्थांच्या विद्यमान माहिती तंत्रज्ञान प्रणालीशी अखंडपणे समाकलित केले पाहिजे, जेणेकरून एकच माहिती प्रविष्ट करून पुनरावृत्ती होणार नाही.

आठ. प्रशिक्षण आणि क्षमता निर्माण

कारणमीमांसाः

९.३९. स्थानिक प्रशासनाची वाढती व्याप्ती, गुंतागुंत आणि जबाबदाऱ्यांमुळे सरकारी अधिकाऱ्यांकडे प्रगत प्रशासकीय, तांत्रिक आणि विशेषीकृत कौशल्ये असणे आवश्यक आहे. जलद गतीने होणारे शहरीकरण, सेवा वितरण आदेशांचा विस्तार, बदलत जाणारी नियामक चौकट आणि नागरिकांच्या वाढत्या अपेक्षा यांमुळे विद्यमान संस्थात्मक क्षमतेवर लक्षणीय ताण आला आहे. या संदर्भात, विकास कार्यक्रम आणि सार्वजनिक सेवा उपक्रमांचे प्रभावीपणे नियोजन, अंमलबजावणी, देखरेख आणि मूल्यांकन करण्यासाठी अधिकाऱ्यांना सक्षम करण्याकरिता सातत्यपूर्ण आणि संरचित क्षमता बांधणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे, प्रशासनाच्या सुधारित परिणामांमध्ये अधिक चांगल्या प्रकारे योगदान देण्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांसाठी सर्वसमावेशक आणि संस्थात्मक प्रशिक्षण आराखड्याची आवश्यकता आहे.

९.४०. प्रशासकीय प्रशिक्षण आराखड्यासह, तांत्रिक आणि विशेष कार्यक्रम खालील व्यापक क्षेत्रांचा समावेश करण्यासाठी तयार केले जाऊ शकतातः

तांत्रिक / अभियांत्रिकी शाखाः

- स्थापत्य अभियांत्रिकी आणि नागरी पायाभूत सुविधा.
- पाणी पुरवठा आणि स्वच्छता अभियांत्रिकी.
- पर्यावरण अभियांत्रिकी.
- विद्युत आणि ऊर्जा प्रणाली अभियांत्रिकी.

विशेषज्ञ / विषयाधारित कार्यक्रमः

- अग्नि सुरक्षा आणि आपत्ती व्यवस्थापन.
- नगरपालिका रोखे आणि पायाभूत सुविधा वित्तपुरवठा.
- शाश्वत आणि हरित वित्तपुरवठा.
- हवामान अनुकूलन नगर नियोजन.
- सार्वजनिक-खाजगी भागीदारी.

शिफारस ३२

९.४१. आयोगाने शिफारस केली आहे की, राज्य शासनाने सरकारी अधिकाऱ्यांसाठी प्रशासकीय, तांत्रिक आणि विशेषीकृत कार्यक्रमांचा समावेश असलेला सर्वसमावेशक प्रशिक्षण आराखडा संस्थात्मक पातळीवर लागू करावा. यशदाच्या सहकार्याने प्रशासकीय प्रशिक्षण घेतले जाऊ शकते, तर एम.सी.जी.एम. सेंटर फॉर मुनिसिपल कॅपॅसिटी बिल्डिंग अँड रिसर्च (MCMCR) च्या माध्यमातून तांत्रिक आणि विशेष कार्यक्रम आयोजित केले जाऊ शकतात आणि विशिष्ट संस्थांद्वारे विशेष / विषयासंबंधी कार्यक्रम आयोजित केले जाऊ शकतात.

९. मनुष्यबळ संरचना तज्ञ समिती

कारणमीमांसाः

९.४२. जुलै २०१६ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या राज्य पंचायत तज्ञ समितीच्या अहवालानुसार, ग्रामीण स्थानिक संस्थांमध्ये (आर एल बी) राज्यभर एकत्रितपणे सुमारे ७ लाख कर्मचारी कार्यरत आहेत, ज्यामध्ये आरोग्य कर्मचारी, आशा कार्यकर्त्या, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका आणि शिक्षक [१] यांचा समावेश आहे. राज्य पंचायत तज्ञ समितीच्या अहवालानुसार, या मनुष्यबळाचा मोठा हिस्सा या विशिष्ट योजनांशी संबंधित असून तो ग्रामपंचायतीच्या थेट प्रशासकीय नियंत्रणाच्या बाहेर कार्य करतो. ग्रामपंचायत स्तरावरील कर्मचारी व्यवस्था अजूनही दिनांक २१/०१/२००० च्या कर्मचारी नियुक्ती संदर्भातील शासन निर्णयानुसार चालविली जाते. या शासन निर्णयामध्ये कर्मचारी संख्या मुख्यतः लोकसंख्येच्या समूहांच्या आधारावर निश्चित करण्यात आली आहे, तसेच विशेष तांत्रिक किंवा प्रशासकीय पदांसाठी स्वतंत्र तरतूद करण्यात आलेली नाही.

९.४३. शहरी क्षेत्रातही वर्तमान कर्मचारी नियमन ज्या काळात तयार करण्यात आले होते, तेव्हा शहरी सेवा पुरवठा, भांडवली गुंतवणूक नियोजन, इ-शासन आणि वित्तीय व्यवस्थापन यांची व्याप्ती आणि गुंतागुंत आजच्या तुलनेत लक्षणीयरित्या कमी होती. नागरी स्थानिक संस्थांची कार्य आणि जबाबदाऱ्या वाढल्यामुळे, वर्तमान कर्मचारी संरचनेचा आढावा घेऊन, सध्याच्या कार्यकारी गरजांनुसार त्यांची पुनर्रचना करण्याची आवश्यकता आहे. यामध्ये स्थानिक संस्थांना संस्थाप्रमाणे प्रभावीपणे कार्य करता यावे, यासाठी योग्य तांत्रिक व व्यावसायिक पदांची निर्मिती, भूमिकांची स्पष्ट व्याख्या आणि अधिकारांचे योग्य प्रमाणात विकेंद्रीकरण यांचा समावेश असावा.

 # शिफारस ३३

९.४४. आयोग शिफारस करतो की, राज्य शासनाने नागरी आणि ग्रामीण स्थानिक संस्था या दोन्हींसाठी संघटनात्मक रचना आणि कर्मचारी मानके यांचे पुनरावलोकन व पुनर्रचना करण्यासाठी राज्यस्तरीय तज्ञ समिती स्थापन करावी. स्थानिक संस्थांच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन दर दहा वर्षाच्या कालावधीत अशा प्रकारचे पुनरावलोकन नियमितपणे करण्यात यावे, अशीही शिफारस आयोग पुढे करतो.

[१] महाराष्ट्रातील पंचायत राज साठी यथार्थदर्शी योजना, राज्य पंचायत तज्ज्ञ समिती, पंचायत राज संस्थांमधील कर्मचाऱ्यांचे हस्तांतरण, पृष्ठ १४९.

राज्यस्तरीय तज्ञ समितीची कार्ये खालीलप्रमाणे :—

- नागरी स्थानिक संस्था (यूएलबीएस) आणि ग्रामीण स्थानिक संस्था (आरएलबीएस) यांना लागू असलेल्या वर्तमान कर्मचारी संरचनेचे, कायदे नियम, मानके आणि शासन निर्णयांचा आढावा घेणे.
- स्थानिक संस्थांच्या कार्यात्मक जबाबदाऱ्यांमध्ये झालेल्या बदलांचे मूल्यांकन करणे, ज्यामध्ये कामाचा वाढलेला ताण, योजनांशी संबंधित जबाबदारी तसेच आर्थिक व प्रशासकीय गुंतागुंत यांचा समावेश आहे.
- महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत यांच्यासाठी स्तरनिहाय संघटनात्मक रचनांचा विकास करणे.
- अभियांत्रिकी सेवा, वित्त व लेखा व्यवस्थापन, नगर व क्षेत्र नियोजन, इ-प्रशासन तसेच घनकचरा व्यवस्थापन या महत्त्वाच्या कार्यक्षेत्रांसाठी आवश्यक तांत्रिक मनुष्यबळाचा विचार करून किमान कर्मचारी मानके निश्चित करण्याबाबत शिफारशी करणे.

१०. ग्रामीण-नागरी संक्रमण धोरण

९.४५. सन २०११ मध्ये महाराष्ट्राची लोकसंख्या भारताच्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे ९.३% म्हणजे ११.२३ कोटी होती. २०२६ मध्ये महाराष्ट्राची लोकसंख्या १२.९३ कोटी होण्याचा अंदाज आहे, यापैकी ६.३८ कोटी शहरी भागांत[१०] राहणारी असेल. ही वाढ विद्यमान शहरे व खेडी यांपुरती मर्यादित न राहता मोठी खेडी, लहान खेडी, निमशहरी ग्रामपंचायती येथे वाढत्या प्रमाणात केंद्रित होत आहेत. या वसाहती शहरी वैशिष्ट्ये दर्शवितात, जसे की उच्च लोकसंख्या घनता, उपजीविकेच्या विविध संधी आणि नागरी सेवांची वाढती मागणी, तरीसुद्धा या वसाहतींचे प्रशासन अद्याप ग्रामीण संस्थात्मक चौकटीअंतर्गत केले जाते.

९.४६. जिल्हा ग्राम विकास निधी आणि नगर रचना योजनांमधील जमीन एकत्रीकरण यांसारख्या उपक्रमांनी पायाभूत सुविधांच्या विकासाला आणि स्थानिक क्षेत्र नियोजनाला मदत केली असली तरी नियोजन क्षमता, आर्थिक स्वायत्तता आणि संस्थात्मक तयारी या बाबतीत अद्याप मोठ्या तफावती कायम आहेत. वेगाने वाढणारी शहरी परिधीय क्षेत्रांची नागरी सुविधांची मागणी वाढत आहे. "ओडिशाच्या ग्रामीण शहरी संक्रमण धोरण २०२३" मधून शिकण्यासारखे म्हणजे, ज्यामध्ये प्रारंभिक सेवा पुरवठा, लवचिक नियोजन, टप्प्याटप्प्याने आर्थिक सुधारणा आणि समर्पित संस्थात्मक समर्थन यावर भर देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, महाराष्ट्राला सुद्धा सुव्यवस्थित ग्रामीण-शहरी संक्रमण आणि शाश्वत प्रादेशिक विकास सुनिश्चित करण्यासाठी अशाच प्रकारच्या संरचित आणि दूरदृष्टी असलेल्या दृष्टिकोनाची आवश्यकता आहे.

 # शिफारस ३४

९.४७. आयोगाने, महाराष्ट्रासाठी ग्रामीण-शहरी स्थलांतर धोरण तयार करण्यासाठी नगर विकास विभाग (युडीडी), ग्रामविकास व पंचायत राज विभाग (आरडीडी) आणि राज्य वित्त विभाग यांच्या प्रतिनिधींचा समावेश असलेली बहुविभागीय समिती स्थापन करण्याची शिफारस केली आहे.

- या धोरणाअंतर्गत, किमान ५००० लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना (जीपीएस) औपचारिकरित्या निम-शहरी क्षेत्राचा भाग म्हणून मान्यता दिली जावी. त्यांच्यासाठी वेगळा कर्मचारी नमुना ग्राम विकास व पंचायत राज विभागाने (आर डी डी) मंजूर करावा. आयोगाच्या शिफारशीनंतर दोन वर्षाच्या आत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत संरचित आराखडा तयार करण्याचे निर्देश सहाय्यक नगररचना संचालकांना द्यावेत. या आराखड्यात भविष्यातील लोकसंख्या वाढ, पायाभूत सुविधांची गरज आणि सेवा मानकांवर लक्ष केंद्रित करण्यात यावे.

- जेव्हा एखाद्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या १०००० या मर्यादेपेक्षा जास्त होते, तेव्हा तिला नगरपंचायत / नगरपरिषदेत रूपांतरित करणे किंवा मोठ्या नागरी स्थानिक संस्थेमध्ये (युएलबी) विलीनीकरण करण्यासाठी धोरणात स्पष्ट संक्रमण आराखडा नमूद केला पाहिजे. सदर धोरणामध्ये इतर बाबींबरोबरच आवश्यक मनुष्यबळ निर्मिती, मालमत्तेच्या हस्तांतरणासाठीची कार्यपद्धती व कालमर्यादा, तसेच देयकांच्या व्यवस्थापनाबाबत तरतुदींचा समावेश असावा. ही संक्रमण प्रक्रिया पाच वर्षाच्या कालावधीत किंवा त्यापेक्षा कमी कालावधीत पूर्ण करण्यात यावी.

संक्रमण अनुदानाचे वाटप प्रकरण ६ मधील शिफारशीनुसार करण्यात यावे.

११. स्थानिक संस्थांच्या वित्तीय दायित्वांना मर्यादा घालण्यासाठी आणि राजकोषीय शाश्वतता निश्चित करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे.

---

[१०] जनगणना २०११, लोकसंख्या विस्तार अहवाल २०११-२०३६, तक्ता क्र. ८ आणि ९.

कारणमीमांसा :

९.४८. स्थानिक संस्थांना, मर्यादित आर्थिक संसाधनांचे अनेक प्रकल्पांमध्ये कमी प्रमाणात वाटप केल्यामुळे प्रकल्प व्यवस्थापनामध्ये अनेकदा मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. जेव्हा स्थानिक संस्था विद्यमान दायित्वांचा विचार न करता, एकाचवेळी अनेक प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देतात, तेव्हा निधीविना दायित्वे वाढतात आणि अपूर्ण राहिलेल्या पायाभूत सोयी सुविधांच्या प्रकल्पांचा अनुशेष निर्माण होतो. अशा विखंडीकरणामुळे स्थानिक संस्थांची एकूण राजकोषीय आरोग्य (स्थिती) सुद्धा धोक्यात येते. स्थानिक संस्थांचे राजकोषीय आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी, प्रशासकीय मंजुरी देताना सावध आणि सुव्यवस्थित दृष्टिकोन स्वीकारणे गरजेचे आहे. नियोजन विभागाने आपल्या दिनांक १६/०२/२००८ च्या शासन निर्णयाद्वारे, नवीन बाबींचा प्रस्ताव मांडण्यापूर्वी अपूर्ण कामांसाठी पूर्ण तरतूद करणे बंधनकारक करून, या (उपरोक्त) शिस्तीसाठी मूलभूत मानके स्थापित केली आहेत.

९.४९. सदर शासन निर्णयामध्ये पुढे असेही नमूद करण्यात आले आहे की, सदर कामे दोन वर्षाच्या कालावधीत पूर्ण व्हावीत अशी अपेक्षा ठेवून, विद्यमान दायित्वांचा विचार करून उपलब्ध उर्वरित निधीच्या १.५ पट मर्यादेपर्यंतच नवीन कामे प्रस्तावित करावीत. या मार्गदर्शक तत्त्वांशी स्थानिक संस्थांच्या कार्यपद्धती अनुरूप केल्यास, विद्यमान दायित्वांचा विचार केल्यानंतरच नवीन बांधीलकी स्वीकारली जाईल याची खात्री होते. तसेच यामुळे जबाबदार नियोजन, वित्तीय शिस्त, प्रकल्प सातत्य आणि दीर्घकालीन राजकोषीय शाश्वततेच्या संस्कृतीस प्रोत्साहन मिळते. यामुळे, नवीन कामांसाठी निधी राखून ठेवण्यापेक्षा प्रलंबित मत्ता (प्रकल्प) पूर्ण करण्यास प्राधान्य दिल्यास, स्थानिक संस्था नियोजित व सुव्यवस्थित खर्च करू शकतील आणि नागरिकांना विश्वासार्ह व सातत्यपूर्ण सेवा पुरवू शकतील.

 # शिफारस ३५

९.५०. आयोग शिफारस करतो की, राज्य शासनाने वित्तीय दायित्वांवर मर्यादा वाढण्यासाठी प्रस्तावित चौकट औपचारिकरित्या कायद्यात समाविष्ट (codify) करावी. नागरी स्थानिक संस्था व ग्रामीण स्थानिक संस्थांना लागू असलेल्या संबंधित सांविधिक अधिनियम व नियमांमध्ये ही चौकट समाविष्ट करून असे करता येईल. त्यामुळे ती नागरी व ग्रामीण स्थानिक संस्थांवर अनिवार्य व कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक होईल. उपलब्ध अवशिष्ट क्षमता (residual capacity) निश्चित करण्यासाठी आयोग पुढील गणना पद्धत सुचविते.

(क) ज्या लेखाशीर्षाखाली प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव आहे, त्या लेखाशीर्षाखाली मागील तीन वर्षांमध्ये करण्यात आलेल्या सरासरी आर्थिक तरतुदीची गणना करावी.

(ख) सध्या सुरू असलेल्या कामांच्या उर्वरित खर्चाबरोबरच प्रशासकीय मान्यता मिळालेल्या परंतु अद्याप सुरु न झालेल्या कामांचा खर्च निश्चित करावा.

(ग) अवशिष्ट क्षमता ठरवण्यासाठी (अ) मधून (ब) वजा करावा.

(घ) चालू आर्थिक वर्षात नवीन कामांसाठी प्रशासकीय मान्यता देण्याची एकूण खर्च मर्यादा ही (क) मधून प्राप्त झालेल्या रकमेच्या १.५ पट असेल.

१२. अधिकृत शासकीय दस्तऐवजांचे एकत्रीकरण व डिजिटायझेशन.

कारणमीमांसाः

९.५१. विविध विभागांकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या अनेक अधिनियम, नियम, विनियम, शासन निर्णय व अधिसूचनांमुळे स्थानिक संस्थांना प्रशासन व अनुपालनाच्या बाबतीत अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. ही सर्व सांविधिक साधने त्यांच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने परस्परांशी घनिष्ठपणे संबंधित विशिष्ट विषयांसंदर्भात (परस्परावलंबी) असतात. तथापि, सद्यस्थितीत ही कागदपत्रे विविध संकेतस्थळे व अभिलेख संग्रहालयामध्ये विखुरलेल्या स्वरूपात उपलब्ध असल्यामुळे ती मिळवणे, वाचणे, त्याचा योग्य अर्थ लावणे व त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे कठीण होते.

९.५२. विविध अधिनियम, नियम व त्यातील सुधारणांमधील परस्पर संदर्भ अधिकाऱ्यांना हाताने शोधावे लागतात, त्यामुळे प्रक्रियात्मक त्रुटी होण्याचा धोका वाढतो. या विखुरलेल्या व्यवस्थेचा नागरिक व उद्योग क्षेत्रावरही, लागू असलेल्या कायदेशीर तरतुदी समजून घेण्यातील अनिश्चिततेमुळे प्रतिकूल परिणाम होतो.

९.५३. कायदेशीर स्पष्टता, प्रशासकीय कार्यक्षमता व अनुपालन मजबूत करण्यासाठी कायदेशीर माहितीच्या उपलब्धतेसाठी सुव्यवस्थित व तंत्रज्ञानाआधारित दृष्टिकोन अवलंबणे आवश्यक आहे. सर्व राज्य अधिनियम व अधिनस्त कायदे, त्यांच्याशी संबंधित सर्व तरतुदींचे संदर्भ हुशारीने एकाच डिजिटल व्यासपीठावर आणल्यास, माहितीपूर्ण निर्णय प्रक्रिया सुलभ होईल. तरतुदींचा अर्थ लावण्यात सुसंगती वाढेल आणि दीर्घकालीन कार्यक्षमतेस बळकटी मिळेल.

 # शिफारस ३६

९.५४. आयोग राज्य शासनास शिफारस करतो की, सर्व राज्य अधिनियम, नियम, विनियम, शासन निर्णय, अधिसूचना व दुरुस्ती समाविष्ट असलेले एकच एकात्मिक डिजिटल व्यासपीठ तयार करण्यात यावे.

- सर्व विद्यमान राज्यस्तरीय अधिनियम व अधीनस्थ कायद्यांचे, त्यांच्या जुन्या आवृत्त्या व त्यातील सुधारणांसह, प्रमाणित व एकत्रित स्वरूपात संकलन करून त्यांचे डिजिटायझेशन करावे.
- अधिनियम, नियम व इतर संबंधित कायदेशीर साधनांमधील परस्पर संदर्भ, अवलंबित्वे, व समानता ओळखणे, त्यांचे मॅपिंग करणे आणि त्यांना परस्पर संदर्भ जुळवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित वापरासाठी कार्यान्वित करावीत.
- वापरकर्त्यांना एकाच इंटरफेसद्वारे विविध कायद्यांतील परस्पर संबंधित तरतुदींमध्ये सहजपणे शोध घेता यावा, यासाठी बुद्धिमान (हुशारी) शोध व संचलन सुविधा उपलब्ध करून द्यावी.
- संकेतस्थळावर जेव्हा जेव्हा नवीन कायदे, सुधारणा, किंवा अधिसूचना जारी केल्या जातील तेव्हा तेव्हा त्या नियमित अद्ययावत करून अधिकृत संदर्भ, धोरणनिर्मिती, तसेच प्रशासकीय निर्णयप्रक्रियेसाठी या व्यासपीठाचा वापर अनिवार्य करावा.

तसेच आयोग, हे डिजिटल व्यासपीठ विकसित करताना सर्व विभागांनी आवश्यक माहिती/संदर्भ उपलब्ध करून देण्यात सक्रिय सहभाग देणे अनिवार्य करतो.

१३. आयोगाद्वारे आयोजित कार्यशाळा/संवादादरम्यान स्थानिक संस्थांनी मांडलेल्या अतिरिक्त मागण्या व मुद्दे.

कारणमीमांसाः

९.५५. आयोगाने, ग्रामीण स्थानिक संस्था व नागरी स्थानिक संस्थांच्या प्रतिनिधींशी त्यांच्या गरजा, मागण्या व अडचणी समजून घेण्यासाठी अनेक हितसंबंधितांशी सल्लामसलत बैठका आयोजित केल्या. या सल्लामसलतीतून अनेक महत्त्वपूर्ण मुद्दे (माहिती) समोर आले. अशाश्वत (पर्यावरणावर परिणाम करणाऱ्या) वाहतुकीवर हरित कर लादणे, रस्त्यावरील दिव्यांसाठी सौर ऊर्जेच्या वापरास प्रोत्साहन देणे, रिक्त शासकीय मालमत्तांचा भाड्याच्या स्वरूपातील उत्पन्नासाठी वापर करणे, मूल्य अधिग्रहण वित्त व्यवस्था पद्धतीचा अवलंब करणे, स्थानिक संस्थांसाठी योग्य कर्ज उभारणीसाठीच्या चौकटीची आवश्यकता, जाहिरात करासह महसूल स्त्रोतांचे विविधीकरण, जास्त वीज दरांमुळे वाढणारा आर्थिक भार, मर्यादित तांत्रिक व आर्थिक अधिकार, कार्यान्वयन व देखभालीचा वाढता खर्च, अनेक आयटी पोर्टल्स असल्याची समस्या, आणि स्थानिक कंत्राटांमधील मक्तेदारीची समस्या असे अनेक महत्त्वाचे मुद्दे समोर आले. या चर्चेतूनच पुढे आलेले आणखी मुद्दे म्हणजे, ग्रामपंचायतीकडून नगरपंचायतीकडे हस्तांतरण प्रक्रियेदरम्यान वाढलेला प्रशासकीय खर्च, महसुलाचे मर्यादित आधार स्त्रोत, पाणीपुरवठ्याचा वाढता खर्च, अक्षय ऊर्जेसाठीच्या शासनाकडून मिळणारी भरपाई मिळविण्यात येणाऱ्या मर्यादा/अडचणी, व राज्य शासनाकडून निधी वितरणात होणारा विलंब.

९.५६. आयोगाने, कार्यशाळांमध्ये स्थानिक संस्थांनी मांडलेल्या सर्व चिंता वाटणाऱ्या बाबी व मागण्यांचे संकलन करून त्या परिशिष्ट अ मध्ये समाविष्ट केल्या आहेत.

 # शिफारस ३७

९.५७. आयोग राज्य शासनाला शिफारस करतो की, स्थानिक संस्थांची आर्थिक शाश्वतता आणि प्रभावी कार्यान्वयन बळकट करण्यासाठी, व्यवहार्यता आणि धोरणात्मक प्राधान्यक्रम यांच्या अनुषंगाने वरील मुद्द्यांचे परीक्षण व सखोल विश्लेषण करावे व योग्य त्या सुधारणात्मक उपाययोजना हाती घ्याव्यात. ज्यामुळे त्यांची कार्यकारी शाश्वतता आणि कार्यक्षमता बळकट होईल.

१०. महाराष्ट्र वित्त आयोगाचे बळकटीकरण.

१०.१. लागोपाठच्या केंद्रीय वित्त आयोगांनी राज्य वित्त आयोग बळकट करण्याच्या गरजेवर भर दिला आहे. ही चिंता भारताच्या नियंत्रक आणि महालेखा परीक्षकांनी "संविधान (चौऱ्याहत्तरावी सुधारणा) अधिनियम, २०२४ याची अंमलबजावणीवर कार्यभिमुख लेखापरीक्षणाचे संकलन" या शीर्षकाच्या अहवालात देखील ठळकपणे व्यक्त केली आहे. भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांनी असे निरीक्षण नोंदवले आहे की, सरासरी, राज्यांनी राज्य वित्त आयोगांच्या स्थापनेमध्ये ४१२ दिवसांचा विलंब केला आहे. या अहवालात राज्यशासनांनी राज्य वित्त आयोगाच्या शिफारशींना प्रतिसाद देण्यासाठी आणि त्यावर कार्यवाही करण्यासाठी केलेल्या विलंबाची देखील नोंद घेण्यात आली आहे.

१०.२. महाराष्ट्राच्या वित्त आयोगांनी लागोपाठच्या आयोगांमध्ये, आर्थिक सुधारणा, प्रशासकीय सुधारणा आणि इतर उपाययोजना यांचा समावेश असलेल्या शिफारशी मोठ्या संख्येने केल्या आहेत. पूर्वीच्या महाराष्ट्र वित्त आयोगांनी केलेल्या शिफारशींचा सारांश तक्ता १०.१ मध्ये सादर केला आहे.

तक्ता १०.१: शिफारशींचा सारांश तक्ता

अ. क्र.	राज्य वित्त आयोग	शिफारशींची एकूण संख्या	प्रत्यक्ष वित्तीय भार	अप्रत्यक्ष वित्तीय भार	प्रशासकीय सुधारणा	इतर शिफारशी
१	पहिला	१२९	२१	२३	७०	१४
२	दुसरा	२२७	३१	७१	६९	५६
३	तिसरा	११३	२३	१०	६६	१४
४	चौथा	११८	२३	३८	५७	०
५	पाचवा	१६९	६२		१०७	

स्रोतः ४ था आणि ५ वा महाराष्ट्र वित्त आयोग अहवालः १ ल्या, २ ऱ्या, ३ ऱ्या, ४ थ्या आणि ५ व्या महाराष्ट्र वित्त आयोगांच्या शिफारशींवरील कृती अहवाल.

१०.३. महाराष्ट्र शासनाने सादर केलेल्या कृती अहवालानुसार, पूर्वीच्या महाराष्ट्र वित्त आयोगांनी केलेल्या शिफारसींच्या स्वीकृतीचा स्थितीचा तक्ता १०.२ मध्ये सारांशित केला आहे.

तक्ता १०.२: स्वीकारलेल्या, अंशतः स्वीकारलेल्या आणि नाकारलेल्या शिफारशींचा सारांश

अ. क्र.	राज्य वित्त आयोग	शिफारशींची एकूण संख्या	स्वीकारलेल्या	अंशतः स्वीकारलेल्या	नाकारलेल्या
१	पहिला	१२९	११०	१४	०५
२	दुसरा	२२७	१६२	२५	४०
३	तिसरा	११३	५०	११	५२
४	चौथा	११८	०१	०६	१११
५	पाचवा	१६९	९१	३०	४८

स्रोतः ४ था महाराष्ट्र वित्त आयोग अहवाल : महाराष्ट्र वित्त आयोग अहवालाच्या शिफारशींवरील कृती अहवाल.

पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या बाबतीत, १६९ शिफारशीं पैकी ९१ शिफारशीं पूर्णपणे स्वीकारल्या गेल्या, ३० शिफारशीं अंशत स्वीकारल्या गेल्या आणि ४८ शिफारशी नाकारल्या.

१०.४. पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या स्वीकारलेल्या आणि अंशतः स्वीकारलेल्या शिफारशींच्या अंमलबजावणीची स्थिती तक्ता १०.३ मध्ये सादर केली आहे.

तक्ता १०.३: अंमलबजावणी केलेल्या, अंशतः अंमलबजावणी केलेल्या आणि विचाराधीन असलेल्या शिफारशींचा सारांश

अ. क्र.	प्रवर्ग	शिफारशींची एकूण संख्या	अंमलबजावणी केलेल्या	अंशतः अंमलबजावणी केलेल्या	विचाराधीन / अंमलबजावणी करणे अद्याप बाकी आहे
१.	स्वीकारलेल्या शिफारशी	९१	१६	१३	६२
२.	अंशतः स्वीकारलेल्या	३०	०१	०६	२३

स्रोतः नगर विकास विभाग आणि ग्रामविकास व पंचायतराज विभाग यांच्याकडून मिळालेली आधारसामग्री.

११. भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या 'संविधान (चौऱ्याहत्तरावी सुधारणा) अधिनियम, १९९२ च्या अंमलबजावणीवरील कार्याभिमुख लेखापरीक्षणाचे संकलन खंड १' या अहवालातील पृष्ठ ३१ वर आधारित आहे.

१०. ५. पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाने केलेल्या एकूण १६९ शिफारशींपैकी १२१ शिफारशी स्वीकारल्या गेल्या किंवा अंशतः स्वीकारल्या गेल्या (तक्ता १०. २) तथापि, यापैकी फक्त ३६ शिफारशींची अंमलबजावणी करण्यात आली आहे. (किंवा अंशतः करण्यात आली आहे.) (तक्ता १०. ३)

१०. ६. पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या शिफारशीं मोठ्या प्रमाणात स्वीकारल्या गेल्या किंवा अंशतः स्वीकारल्या असल्या तरी,अंमलबजावणी अपेक्षित गतीने झाली नाही. यांची मुख्य कारणे म्हणजे वेळेवर अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी, समन्वय साधण्यासाठी आणि चालना देण्यासाठी समर्पित संस्थात्मक यंत्रणेचा अभाव हे असू शकते.

१०. ७. संस्थात्मक आव्हाने ओळखून आयोगाने, इतर राज्य वित्त आयोगांच्या अनुभवातून धडा घेण्यासाठी, १७/०१/२०२६ रोजी पुणे इंटरनॅशनल केंद्र आणि जनआग्रह यांच्या सहकार्याने, पुणे इंटरनॅशनल केंद्रामध्ये राज्य वित्त आयोगांची राष्ट्रीय स्तरावरील परिषद आयोजित केली होती. या चर्चेत राज्य वित्त आयोगांसाठी पुढील महत्त्वाच्या मुद्द्यांवर, जसे की कार्यपद्धती, दृष्टिकोन, आधारसामग्री मिळवण्यावरील मर्यादा, कार्यात्मक आव्हाने, शिफारशींचा पाठपुरावा घेण्याची यंत्रणा, यासह आणि, पुढील अंमलबजावणी यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. या चर्चेत राज्य वित्त आयोगाचा आराखडा मजबूत करण्याची गरज आणि अशा नियमित आंतर-राज्य वित्त आयोग संवादांना संस्थात्मक स्वरूप देण्याचे महत्त्व, तसेच सामायिक शिक्षण पद्धतीचे एकत्रीकरण आणि सर्व राज्यांमध्ये सामूहिक क्षमता बांधणीसाठी एक व्यासपीठ म्हणून अशा परिषदांचे दरवर्षी किंवा किमान दोन वर्षातून एकदा तरी आयोजन करणे, या बाबी ठळकपणे दर्शवण्यात आल्या.

#शिफारस ३८

१०.८. आयोग अशी शिफारस करतो की, राज्य शासनाने 'महाराष्ट्र वित्त आयोग' (संकीर्ण तरतुदी) अधिनियम,१९९४ मध्ये यथोचितरित्या सुधारणा करून, राज्य वित्त आयोगाची संस्था बळकट करावी. सुधारित अधिनियमांमध्ये इतर गोष्टींबरोबरच पुढील बाबी असाव्यात :-

- राज्य वित्त आयोग, त्यासाठी दिलेला कालावधी सुरू होण्यापूर्वी किमान दोन वर्ष आधी घटित केला जाईल, असे विनिर्दिष्ट करणे.
- भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ - आय आणि २४३ - वाय अंतर्गत विनिर्दिष्ट केलेल्या संदर्भा बरोबरच अतिरिक्त विचारार्थ विषय समाविष्ट करण्यासाठी राज्य सरकारला लवचिकता प्रदान करणे.
- राज्य वित्त आयोगाच्या भूमिका, जबाबदाऱ्या आणि कार्यात्मक स्वायत्तता स्पष्टपणे विशद करणे.
- आयोगाचा अहवाल सादर करण्यासाठी कालबद्ध आराखडा विहित करणे.
- राज्य सरकार ज्या कालावधीत शिफारशी स्वीकारेल किंवा नाकारेल, शिफारशी नाकारल्यास त्याच्या कारणांसह,तो कालावधी विनिर्दिष्ट करणे.
- आयोगाच्या शिफारशींवर केलेला कृती अहवाल (ॲक्शन टेकन रिपोर्ट) राज्य विधिमंडळासमोर सादर करण्यासाठी विहित कालमर्यादेची तरतूद करणे.
- आयोगासाठी संरचित आधारसामग्री प्रवेश, सल्लामसलत आणि विश्लेषणात्मक समर्थनासाठी संस्थात्मक यंत्रणा.
- आयोगाने केलेल्या शिफारशींच्या अंमलबजावणीचा संरचित पाठपुरावा व संनियंत्रण अनिवार्य करणे.

#शिफारस ३९

१०.९. आयोग अशी शिफारस करतो की, दोन राज्य वित्त आयोगांच्या मधील अंतरिम काळात राज्य वित्त आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी एक स्थायी कार्य दल घटित करण्यात यावे. या कार्य दलाचे अध्यक्ष राज्य सरकारद्वारे नियुक्त केले जातील आणि नगर विकास विभाग (युडीडी) व ग्रामविकास विभाग (आरडीडी)चे सचिव हे सदस्य म्हणून असतील. तर सचिव (वित्तीय सुधारणा) हे सदस्य सचिव म्हणून कार्यरत असतील. अशा कार्य दलाची आवश्यकता सुधारित महाराष्ट्र वित्त आयोग (संकीर्ण तरतुदी) अधिनियम, १९९४ मध्ये नमूद करता येऊ शकेल.

१०.१०. हे कार्य दल पुढील बाबींसाठी जबाबदार असेल :

- पूर्वीच्या राज्य वित्त आयोगांच्या स्वीकारलेल्या शिफारशींच्या अंमलबजावणीच्या स्थितीवर संनियंत्रण करणे.
- शिफारशींच्या अंमलबजावणीसाठी आंतरविभागीय समन्वयन सुकर करणे.
- महाराष्ट्राच्या वार्षिक आर्थिक पाहणी अहवालात आणि अर्थसंकल्पीय दस्तऐवजांमध्ये, ग्रामीण स्थानिक संस्था आणि नागरी स्थानिक संस्थांसाठीच्या निधीच्या ओघाचा सविस्तर तपशील देणारे एक प्रकरण समाविष्ट केलेले असेल, याची खात्री करणे.
- स्थानिक संस्थांच्या गरजा आणि वित्त यांच्याशी संबंधित अभ्यासाचे आयोजन करणे.

१०.११. कार्य दलाची बैठक दर तीन महिन्यातून किमान एकदा होईल आणि तिचे कार्यवृत्त व शिफारशी रीतसर नोंदवून, जनव्यासपीठावर (पब्लिक डोमेन) खुल्या केल्या जातील.

१०.१२. तसेच, अचूक आणि अद्ययावत आधारसामग्री उपलब्ध होण्याच्या बाबतीत आयोगाला मोठ्या आव्हांनाचा सामना करावा लागला त्या संदर्भात, आयोग अशी शिफारस करतो की, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), राज्य ग्रामीण विकास संस्था आणि राज्य नगर विकास संस्था यांनी पदनिर्देशित केलेले ज्ञान भागीदार म्हणून महाराष्ट्र वित्त आयोगासाठी काम करावे. या संस्थांनी ग्रामीण आणि नागरी स्थानिक संस्थांच्या वित्तसंबंधीचा महाराष्ट्र वित्त आयोगाच्या कामकाजासाठी आवश्यक असलेल्या इतर संबंधित माहितीसह, एक केंद्रीकृत आधारसामग्री (डेटा) संग्रह जतन करावा.

११. राज्य वित्तव्यवस्थेबाबतच्या शिफारशी

क. मध्यम मुदतीचे कर्ज व्यवस्थापन कार्यतंत्र

११. १. महाराष्ट्राच्या थकीत कर्ज परतफेडीच्या रूपरेषेचे (तक्ता २. ३) मूल्यमापन असे दर्शवते की, २०३० - ३३ या कालावधीत कर्ज परतफेडीचे प्रमाण उच्चांकी असेल. राज्याचे एकूण थकीत कर्जापैकी सुमारे ३१.१ टक्के अदत्त कर्ज या वर्षांमध्ये देय होणार आहे, ज्यामुळे राज्याच्या तिजोरीवर परतफेडीचा मोठा ताण पडणार आहे. त्यानुसार, या परतफेडीच्या जबाबदाऱ्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी सक्रिय वित्तीय नियोजन करणे अत्यंत चिंताजनक होईल.

 # शिफारस ४०

११. २. आयोग शिफारस करतो की, थकीत रोख्यांच्या मुदतपूर्तीच्या रूपरेखेमध्ये (मॅच्युरिटी प्रोफाइलमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी, वित्त विभागाने भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सल्लामसलतीने एक 'मध्यम मुदतीचे कर्ज व्यवस्थापन कार्यतंत्र' विकसित करावे, अशी शिफारस आयोग करत आहे.

ख. केंद्रीय अनुदान व्यवस्थापन आणि अनुपालन

११. ३. महाराष्ट्राच्या एकूण महसुली जमेमध्ये तक्ता २.५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे केंद्र सरकारच्या अनुदानांचा लक्षणीय वाटा आहे. मोठ्या प्रमाणात केंद्रीय सहाय्य उपलब्ध होत असले तरी, या निधीचा पूर्णपणे विनियोग मर्यादित राहिला आहे. उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यास विलंब आणि योजनेतील महत्त्वाच्या टप्प्यांना अनुसरून न राहणे यांसह याबाबतची मर्यादित जाणीव, तांत्रिक क्षमतेवर निर्बंध, कमी प्राधान्य आणि प्रक्रियात्मक अनुपालन न करणे, हे सर्व घटक एकत्र आल्यामुळे हे घडत आहे. २०२० - २१ आणि २०२४-२५ दरम्यान स्थानिक संस्थांना मिळणाऱ्या केंद्र सरकारच्या अनुदानात झालेली घट ही(तक्ता २. ५) संनियंत्रणाची व्यवस्था, निधीचा विनियोग आणि अनुपालन याचा मागोवा घेण्यासाठी एक समर्पित संनियंत्रण कक्षाची स्थापना करणे यांसह मजबूत करण्याच्या गरजेवर प्रकाश टाकते.

 # शिफारस ४१

११. ४. आयोग शिफारस करतो की, वित्त विभागाने, केंद्र सरकारच्या अनुदानासाठी पात्र असलेल्या योजना निश्चित करण्यासाठी आणि अशा योजनांच्या अंमलबजावणीवर संनियंत्रण ठेवण्यासाठी, राज्य विभागांशी समन्वय साधून काम करणारा एक समर्पित अनुदान व्यवस्थापन आणि संनियंत्रण कक्ष स्थापन करावा.

ग. आर्थिक पाहणी आणि अर्थसंकल्पीय दस्तऐवजांमध्ये स्थानिक संस्थांना होणाऱ्या निधी हस्तांतरणाचे सादरीकरण

११. ५. विविध योजना, कर हस्तांतरण आणि करांचे वाटप याद्वारे स्थानिक संस्थांना वितरित केलेल्या एकूण निधीची माहिती सध्या अधिकृत दस्तऐवजांमध्ये सर्वसमावेशकपणे नमूद केलेली नाही. आर्थिक पाहणी आणि अर्थसंकल्पीय दस्तऐवज यांसारख्या प्रकाशनांमध्ये या माहितीचा पद्धतशीर समावेश केल्यास शहरी आणि ग्रामीण स्थानिक संस्थांना होणाऱ्या निधीच्या प्रवाहाचे स्वतंत्र आणि स्पष्ट सादरीकरण करणे शक्य होईल. अशा पारदर्शक आणि सुव्यवस्थित अहवालामुळे, स्थानिक स्तरावर जबाबदारी निश्चित होईल. आंतरशासकीय समन्वयन सुधारेल आणि वित्तीय विकेंद्रीकरणाच्या परिणामांचे अधिक प्रभावीपणे निरीक्षण करणे सुलभ होईल.

 # शिफारस ४२

११.६. आयोगाने अशी शिफारस करतो की, वित्त विभागाने, महाराष्ट्राच्या वार्षिक आर्थिक पाहणीमध्ये आणि राज्याच्या अर्थसंकल्पीय दस्तऐवजांमध्ये, स्थानिक संस्थांना निधी हस्तांतरणाबाबत एक स्वतंत्र प्रकरण समाविष्ट करावे या प्रकरणामध्ये विविध स्रोतांकडून योजना-आधारित हस्तांतरण, कर हस्तांतरण आणि करांचे वाटप, स्थानिक संस्थांना होणाऱ्या निधी हस्तांतरणाची सर्वसमावेशक आणि स्तरनिहाय माहिती सादर करावी. अशा अहवालामुळे पारदर्शकता वाढेल, उत्तरदायित्व मजबूत होईल आणि राज्यातील वित्तीय विकेंद्रीकरणाचे अधिक स्पष्ट मूल्यमापन करणे सुकर होईल.

परिशिष्टे

परिशिष्ट कः हितसंबंधितांकडून सूचना

आयोगाला, त्याने प्रायोजित केलेल्या अभ्यासादरम्यान आयोजित केलेल्या विविध कार्यशाळांमधून अनेक सूचना प्राप्त झाल्या. यापैकी अनेक सूचनांचे मूल्यमापन करून आयोगाच्या अहवालात शिफारशी म्हणून त्या समाविष्ट करण्यात आल्या आहेत. आयोग असा सल्ला देतो की, नगर विकास विभाग आणि ग्रामविकास व पंचायतराज विभाग यांनी खाली दिलेल्या सविस्तर बाबींचा बारकाईने अभ्यास करून, त्यांच्या व्यवहार्यतेनुसार योग्य ती कार्यवाही करावी.

एक. वर्ग 'अ' आणि 'ब' महानगरपालिका

- **मूल्य अधिग्रहण वित्तव्यवस्था (व्ही सी एफ):** वेगाने वाढणाऱ्या शहरांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी केवळ राज्याच्या अनुदानांवर अवलंबून राहणे पुरेसे नाही, त्यामुळे महानगरपालिकेचा महसूल वाढवण्यासाठी धोरणात्मक यंत्रणां शोधणे आवश्यक झाले आहे. मूल्य अधिग्रहण वित्तव्यवस्था (व्ही सी एफ) ही अशीच एक यंत्रणा आहे की, जिचा, नागरी स्थानिक संस्थांना रस्ते, पाणीपुरवठा आणि मलनिस्सारण जाळ्यांसारख्या सार्वजनिक पायाभूत सुविधांमध्ये केलेल्या गुंतवणुकीमुळे जमिनीच्या किंमतीत झालेल्या वाढीचा आर्थिक फायदा घेण्यासाठी वापर करता येईल. जास्तीत जास्त परतावा मिळवण्यासाठी, विकास आराखड्यांमध्ये सुरुवातीच्या टप्प्यातच सर्व संभाव्य क्षेत्रांचा समावेश करून, नागरी वृद्धीच्या विकासाच्या टप्प्यावर 'मूल्य अधिग्रहण' (व्हॅल्यू कल्चर) यंत्रणा लागू करणे आवश्यक आहे. विस्कळीत नियोजन किंवा विलंबित विस्तारामुळे मूल्य अधिग्रहण वित्त व्यवस्थेच्या परिणामकतेवर गंभीर परिणाम होतो.
- **नागरी शाश्वतता आणि चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय) वाढवणे:** चटई क्षेत्र निर्देशांकात (एफ एस आय) अनिर्बंध वाढ प्रतिगामी ठरू शकतो, परिणामी पर्यावरणीय ताण, पायाभूत सुविधांवरील भार, आणि गर्दी वाढून, शहरी भागातील जीवनमानाचा दर्जा खालावतो. उच्च-विकास दर असलेल्या क्षेत्रांमधील दीर्घकालीन शाश्वतता आणि जीवनाचा दर्जा सुनिश्चित करण्यासाठी, एकात्मिक विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन विनियमांचे (यु डी सी पी आर) पुनर्विलोकन आणि त्यात फेरबदल करणे आवश्यक आहे.
- **जीवनमानाचा दर्जा सुधारणारी महसूल पद्धती:** महानगरपालिकांचा महसूल वाढवण्यासाठी केवळ पारंपरिक कर संकलनावर अवलंबून न राहता, पर्यावरणीय शाश्वतता आणि सामाजिक कल्याणला सुद्धा प्राधान्य देईल अशी महसूल पद्धती स्वीकारणे आवश्यक आहे. स्वच्छ हवा आणि प्रदूषण नियंत्रण, स्मार्ट ऊर्जा ग्रीड्स, वाहतूक कोंडी कमी करणे, एकात्मिक कचरा व्यवस्थापन, आणि नदीकाठचा विकास यांचा समावेश असणाऱ्या उपक्रमांना पाठबळ देण्यासाठी उपभोक्ता शुल्क, पर्यावरणीय कर, आणि सेवा - आधारित शुल्क यासारख्या (कर) साधनांचा समावेश असलेली व्यापक महसूल संरचना तयार केली जाऊ शकते. असा दृष्टिकोन, नागरी विकास आणि महसूल निर्मितीला थेट नागरिकांच्या जीवनमानातील होणाऱ्या दर्शनीय सुधारणांशी जोडतो.
- **जमिनीच्या तुकड्यांमधून अप्रयुक्त (न मिळालेला) महसूलः** नागरी विकास आणि नियोजित शहराच्या वितरणाला अनेकदा क्षेत्रांकन (झोनिंग) विनियम आणि कायदेशीर आणि आर्थिक मर्यादांमुळे वापराशिवाय राहिलेल्या राखीव जमिनींमुळे मर्यादा येतात. अनेक प्रकरणांमध्ये, निधीच्या कमतरतेमुळे राखीव जमिनी संपादित केल्या जाऊ शकल्या नाहीत, परिणामी जमिनीचे भूखंड अडकून पडले आहेत आणि वापराविना तसेच पडून आहेत. अशा भूखंडामध्ये मोठ्या प्रमाणावर महसुलाची अप्रयुक्त क्षमता आहे, या वस्तुस्थितीवरून सुविधांच्या जागांमधून आर्थिक लाभ मिळवण्यासाठी अधिक लवचिकतेची गरज अधोरेखित होते.
- **अ-शाश्वत वाहतुकीवर हरित करः** पर्यावरणीय पायाभूत सुविधांसाठी हरित रोखे (ग्रीन बॉण्ड्स) जारी करायचे असल्यास त्यासाठी घेतलेल्या कर्जावरील व्याज फेडण्यासाठी स्थिर उत्पन्नाचा स्रोत असणे आवश्यक असते, जे महानगरपालिकांसाठी एक आव्हान ठरते. अशाश्वत वाहतूक पद्धतींवर कर आकारण्यासाठी "प्रदूषण करणारा भरपाई देईल" हे तत्त्व लागू केले जाऊ शकते, आणि हरित रोख्यांवरील व्याजाची परतफेड करण्यासाठी आकारण्यात आलेल्या करातून समर्पित निधी तयार केला जावा.
- **महानगरपालिकांच्या वित्त व्यवस्थेचे वार्षिक मूल्यांकन:** महानगरपालिकांमधील वाढता खर्च हा बऱ्याचदा महसुलापेक्षा जास्त असतो, ज्यामुळे लक्षणीय आर्थिक अस्थिरता निर्माण होते, आणि त्यामुळे दीर्घकालीन नियोजन करणे कठीण होते. महानगरपालिकांच्या वित्तीय कलाचे अचूकपणे संनिरीक्षण करण्यासाठी आणि समुदायाच्या प्राधान्यक्रमांशी खर्चाला जोडून 'हुशारीने खर्च' करण्याकडे त्यांना प्रवृत्त करण्यासाठी स्थानिक संस्थेच्या पातळीवर निर्धारित स्वरूपानुसार महानगरपालिकांच्या वित्त व्यवस्थेचे वार्षिक मूल्यांकन करता येऊ शकते.

- **शासनांतर्गत थकबाकीचे समायोजनः** अनेकदा विविध शासकीय विभाग आणि स्थानिक संस्था यांच्यातील थकीत आर्थिक थकबाकीचे दीर्घकाळासाठी समायोजन न झाल्यामुळे, वर्षाखेरीस राजकोषीय विसंगती निर्माण होते. या समस्येचे निराकरण करण्यासाठी, प्रत्येक विभागाला स्वतःची अर्थसंकल्पीय तरतूद करणे बंधनकारक करणे किंवा अनुदानांच्या स्वरूपात संचयी (रक्कम) थेट हस्तांतरित करण्याची पद्धत प्रचलित करणे, यांसारख्या शासनांतर्गतचे समायोजन करण्यासाठीच्या संरचनात्मक यंत्रणा (पद्धती) सुरू केल्या जाऊ शकतात, अशा यंत्रणा, अदत्त थकीत रक्कमांचे उचित समायोजन केल्यानंतर स्थानिक संस्थांना त्यांचे हक्काचे पैसे वेळेवर मिळतील याची सुनिश्चिती करतील.

- **अनधिकृत बांधकामांचे व्यवस्थापनः** मोठ्या प्रमाणावरील मूल्यांकन न झालेल्या, अनधिकृत आणि बेकायदेशीर मालमत्तांमुळे महानगरपालिकेच्या संसाधनांवर ताण येतो आणि त्यामुळे कर जाळ्यातील त्यांच्या योगदानात अडथळा येतो. अशा मालमत्तांची ओळख पटवण्यासाठी वेळोवेळी विशेष मोहीम राबवून आणि त्यांच्यावर कडक दंडात्मक कारवाई केल्यास, परिणामी एकदाच भरीव उत्पन्न मिळेल आणि नियमित उत्पन्नात कायमस्वरूपी वाढ होईल.

दोन. क आणि ड वर्गातील महानगरपालिकाः

- **सामाजिक क्षेत्राला प्राधान्यक्रमः** क आणि ड संवर्गातील लहान महानगरपालिकांकडे सामाजिक क्षेत्रात प्रभावीपणे करावयाच्या खर्चाचा प्राधान्यक्रम ठरविण्यासाठी संस्थात्मक संरचना आणि पुरेसे आर्थिक क्षमता नसते. ही समस्या सोडवण्याकरिता, सामाजिक पायाभूत सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी, आरोग्य आणि शिक्षणासाठी विशेष अनुदान देण्याची खात्री केली पाहिजे. बद्ध आणि अबद्ध निधी एकत्र करून या क्षेत्रांना प्राधान्य देता येऊ शकेल.

- **नागरी स्थानिक संस्थांसाठी सौर ऊर्जा धोरणः** पथदिवे, पाणीपुरवठा, मलनिस्सारण आणि इतर पायाभूत प्रकल्पांसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करणे आर्थिक दृष्ट्या कठीण ठरत आहे. पथदिवे, पंपिंग आणि इतर कामांसाठी लागणारा विजेचा खर्च खूप जास्त आहे. हा खर्च सौर ऊर्जा प्रकल्प राबवून कमी करता येऊ शकतो. पण काही तांत्रिक मर्यादांमुळे सौर प्रकल्प उभारून तयार होणारी वीज फक्त त्याच सर्वेक्षण नंबर किंवा आसपासच्या भागातच वापरता येते. त्यामुळे जवळच्या पंपांना किंवा रस्त्यावरील दिव्यांना ही वीज योग्य प्रकारे वापरता येत नाही. यावरील उपाय म्हणजे, या समस्येसाठी एक समर्पित सौर ऊर्जा धोरण आवश्यक आहे, ज्यात नगरपालिका मालमत्ता, इमारती, छतांवर सौर प्रकल्प कसे बसवायचे. याबाबत मार्गदर्शन करणारा तसेच अर्थसहाय्य आणि वीज खरेदी करार यांसाठी सुस्पष्ट आराखडा असेल.

- **वस्तू व सेवा कर (जी एस टी) आणि वृद्धी निर्देशांकः** सध्याची वस्तू व सेवा कर (जी एस टी) नुकसान भरपाई २०१७-१८ च्या निश्चित केलेल्या आधाररेषेशी (बेसलाईनशी) जोडलेली असून त्यात केवळ ८% निश्चित वार्षिक वाढ आहे, जी राज्यांच्या महसुलाच्या वास्तविक गतीपेक्षा लक्षणीयरीत्या कमी आहे. शहरांचा वेगाने विस्तार होत असल्यामुळे नव्याने स्थापन झालेल्या किंवा झपाट्याने वाढणाऱ्या महानगरपालिकांमध्ये आर्थिक असमतोल निर्माण होतो. यासाठी उपाय म्हणून, जी सध्याची उत्पन्न पातळी, मानव विकास निर्देशांक (एच डी आय) आणि प्रत्यक्ष लोकसंख्येचा आकडा यांसारख्या महत्त्वाच्या घटकांसह अधिक तेजीत/ परिणामकारक असलेल्या मापदंडासह असेल, असे निधी वाटपासाठी एक (निधी) हस्तांतरण सूत्र पद्धती तयार करावी.

- **स्वच्छ पाणी कर देयके व सिंचन विभागाच्या थकबाकीबाबतचा वित्तीय ताणः** नागरी स्थानिक संस्थांवर सिंचन विभागाकडून पाण्याच्या वापरासाठी जास्त देयक आकारले जाते, त्यामुळे मोठ्या प्रमाणात ताण येतो. प्रत्यक्ष वापरावर आधारित देयक ठरवण्यासाठी स्पष्ट अशी पद्धत नाही, आणि (व्यावसायिक आणि औद्योगिक वापरातील) व्यवच्छेदक फरकही नीट लक्षात घेतला जात नाही, आणि अनेक वेळा संपूर्ण देयक थेट महानगरपालिकांवर टाकले जाते, (कधी कधी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या बाबतीतही केलेल्या वापराचा देखील) पाणी शुल्काच्या या वाढत्या थकबाकीचा भार कमी करण्यासाठी, सध्याचे दर, दंडात्मक शुल्क, आणि औद्योगिक व व्यावसायिक दरांचे विश्लेषण यासाठी योग्य मूल्यांकन व देयक पद्धतींसह तर्कसंगत शुल्क आकारणी तपशीलवार अभ्यास शास्त्रीय पद्धतीने करणे आवश्यक आहे.

- **आस्थापनाविषयक समस्याः** आस्थापना खर्चावर ३५% ची कडक मर्यादा असल्याने लहान महानगरपालिकांना तांत्रिक रिक्त पदे भरता येत नाहीत, त्यामुळे रिक्त पदांचे प्रमाण ८०% पर्यंत पोहोचले असून सेवा वितरणावर त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे. लहान मंडळांसाठी याचे पुनर्विलोकन करायला हवे आणि ही मर्यादा शिथिल करून, तांत्रिक काम आणि महसूल जमा करणे यासाठी किमान आवश्यक अभियंते आणि कर अधिकारी यांची भरती करण्याची परवानगी द्यावी. तसेच, सरकारी अनुदानांवर अवलंबून असलेल्या संस्थांसाठी ही मर्यादा टप्प्याटप्प्याने असावी, त्याचबरोबर नगरविकास विभाग-२ (यु डी-२) ने महानगरपालिका कर्मचारी (कंत्राटी कर्मचारी वगळून), 'महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ या अंतर्गत येतात किंवा कसे हे पडताळून पाहणे व तसे स्पष्ट करण्याची गरज आहे.

- **नागरी स्थानिक संस्थांसाठी दुकाने भाड्याने देण्याबाबत नियमासाठी प्रमाणित मार्गदर्शक सूचनाः** नागरी स्थानिक संस्थांसाठी दुकाने भाड्याने देण्याबाबत कालावधी, दर आणि अटी वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या असतात आणि त्यामुळे करेतर महसूल वाढण्यात लक्षणीय अडथळे येतात. विद्यमान कायदेशीर निर्बंध नगरपरिषदा (मुंबई महानगरपालिका अधिनियम, १९६५) भाडे कालावधी ९ वर्षांपर्यंत (३+३+३) आणि महानगरपालिका (महानगरपालिका अधिनियम, १९४९), यांच्यासाठी १० वर्ष इतका कालावधी मर्यादित केला असल्याने, भाडे वाढवण्यासाठी राज्यस्तरीय परवानगी घ्यावी लागते, त्यामुळे खूप विलंब होतो. म्हणूनच, भाडे कालावधी, भाड्याच्या दरांचे पुनरावलोकन आणि एकसमान कागदपत्रे पुरवणे यांसाठी प्रमाणित मार्गदर्शक सूचना तयार करून, हा प्रश्न सुसूत्रपणे सोडवणे व सोपा करण्याची आवश्यकता आहे.

तीन. नगरपरिषदा आणि नगरपंचायती (एन पी):

- **अनिवार्य पाणी मोजणीः** सध्याचे वापरकर्ते शुल्क, कार्यान्वयन आणि देखभाल खर्चाच्या २०% पेक्षा कमी आहे, ज्यामुळे ही सार्वजनिक सेवा अशाश्वत बनली आहे. पाणीपुरवठ्याच्या बाबतीत, पाणी मोजणी मीटरचा (मीटरिंगचा अवलंब अनिवार्य केल्यास, महसूल संकलन थेट प्रत्यक्ष वापराशी जोडले जाऊ शकते, त्यामुळे पाणीपट्टी वसुलीत वाढ होईल आणि पाण्याचा अपव्यय टाळता येईल.
- **अर्थसहाय्यात वाढ करून प्रकल्पांची व्यवहार्यता सुनिश्चित करणेः** राज्य किंवा केंद्रीय प्रकल्पांसाठी आवश्यक असलेल्या १०-२० टक्क्यांच्या स्थानिक हिश्शाची जुळवाजुळव करण्यात नगरपरिषदांना अडचणी येतात, परिणामी अत्यावश्यक निधी मिळविण्यात अडचणी निर्माण होतात आणि त्यामुळे विकास कामे ठप्प होतात. सौर ऊर्जा प्रकल्पांच्या बाबतीत, अनुदान मिळवण्यासाठीचे अनुरूप अंशदान ५० टक्के इतके जास्त असते. प्रकल्पासाठीचा निधी अधिक व्यवहार्य करण्यासाठी शासनाच्या अंशदानाच्या अर्थसहाय्याचा हिस्सा वाढवता येऊ शकतो. मुंन्फ्रा (MUNFRA) कर्जांसाठीच्या समभाग अंशदानाचा सुद्धा पुनर्विचार करण्यात यावा.
- **मंजुरी अधिकारांचे हस्तांतरणः** सध्या जमीन मान्यतेसाठी असलेली बहुतस्तरीय मंजुरी प्रक्रिया अनावश्यक विलंब निर्माण करते आणि तांत्रिक अंदाजासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांसारख्या बाहेरील संस्थांवर अवलंबून राहिल्याने स्थानिक प्रकल्पांच्या खर्चात वाढ होते. जमिनीच्या मान्यतेचे अधिकार जिल्हाधिकारी/विभागीय आयुक्त यांना हस्तांतरित करता येऊ शकतात, आणि तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार नागरी स्थानिक संस्थांच्या अभियंत्यांकडे, किंवा नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या अंतर्गत येणाऱ्या प्रकल्प संचालनालयाकडे हस्तांतरित करता येऊ शकतात. यामुळे प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेसाठीच्या प्रक्रियेस होणाऱ्या विलंबात लक्षणीय घट होऊ शकते.
- **शासकीय इमारतींवरील मालमत्ता कराची वसुलीः** विविध शासकीय विभागांच्या मालकीच्या इमारतींवरील कर दीर्घकाळ न भरल्यामुळे एकूण मालमत्ता कराच्या संभाव्य महसुलापैकी दहा टक्के पेक्षा अधिक महसूल गमावला जातो. हा निधी, अनुदानाच्या स्वरूपात एकत्रित थेट हस्तांतरणाद्वारे किंवा स्थानिक संस्थांना कोणत्याही प्रशासकीय विलंबाशिवाय ही देयके पद्धतशीरपणे मिळतील याची खात्री करण्यासाठी प्रत्येक विभागात अर्थसंकल्पात अनिवार्य तरतूद करून,वसूल केले जाऊ शकतो.
- **शिक्षकांचे वेतन आणि शिक्षण उपकरः** शिक्षकांचे वेतन आणि शाळांचे संचालन व देखभाल यांच्या मोठ्या वित्तीय भारामुळे नगरपालिकांच्या अर्थसंकल्पावर लक्षणीय ताण निर्माण होतो, परिणामी थकबाकीत वाढ होते. यावर दोन प्रकारे उपाय करता येऊ शकतातः एकतर राज्य शासनाने, किमान माध्यमिक शिक्षणासाठी, या वेतनाचा १०० टक्के खर्च उचलावा, किंवा शिक्षण उपकारासाठी आवश्यक कायदेशीर तरतुदी कराव्यात, जेणेकरून, वेतन व देखभाल दायित्वांचा खर्च भागवण्यासाठी, हा निधी नागरी स्थानिक संस्थांच्या स्वतंत्र निधीत जमा होईल.
- **भांडवली प्रकल्पांचे कार्यान्वयन आणि देखभाल या संदर्भातील मार्गदर्शक तत्त्वेः** नागरी स्थानिक संस्था भांडवली खर्चाच्या नियोजनावर अधिक लक्ष केंद्रित करतात आणि कार्यान्वयन खर्चाच्या (ओपेक्स) नियोजनाकडे फारसे लक्ष देत नाहीत. यामुळे मालमत्तेच्या घसाऱ्यामुळे त्या भांडवली प्रकल्पांची देखभाल करण्याच्या महत्त्वाच्या गरजेकडे दुर्लक्ष होते, आणि देखभाल व दुरुस्तीची गरज असलेल्या विद्यमान प्रकल्पांची दुरुस्ती करण्याऐवजी नवीन भांडवली प्रकल्प हाती घेण्याची वृत्ती वाढते. म्हणून, कार्यान्वयन खर्चासाठी (ओपेक्स) पुरेशी तरतूद सुनिश्चित करण्यासाठी आणि आधीच निर्माण केलेल्या पायाभूत मालमत्तांचे चालू देखभालीस सहाय्य देण्यासाठी स्वतंत्र कार्यान्वयन व देखभाल मार्गदर्शकतत्त्वांची आवश्यकता आहे.
- **प्रकल्पाची व्यवहार्यता वाढविण्यासाठी सुधारित तपशीलवार प्रकल्प अहवालामध्ये पुढील बाबींचा समावेशः** विलंब कमी करण्यासाठी आणि खर्चात होणारी वाढ टाळण्यासाठी, तांत्रिक मंजुरी खर्च, प्रकल्प व्यवस्थापनासंदर्भातील सल्लामसलतीवरील खर्च, त्रयस्थ पक्षाद्वारे करण्यात येणाऱ्या लेखापरीक्षेचे शुल्क आणि सार्वजनिक सेवा सुविधांचे (utility) हस्तांतरण करणे या

गोष्टींचा सविस्तर प्रकल्प अहवालात अनिवार्य घटक म्हणून समावेश केला पाहिजे. बऱ्याच प्रकरणांमध्ये, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित (एमएसईडीसीएल) कडून अतिरिक्त शुल्क भरूनही मंजुरी मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे, विजेचा खांब दुसऱ्या जागी बसविणे यास स्वतंत्र प्रकल्पाप्रमाणे हाताळले जाते, परिणामी केलेल्या खर्चाचा पुरेपूर मोबदला मिळत नाही (cost ineffectiveness). सर्व रस्ते / पूल / पाणीपुरवठा/ मलनिस्सारणाच्या कामांसाठी विजेचे खांब दुसऱ्या ठिकाणी हलवण्याचा खर्चाचा भार जो स्थानिक संस्थांवर टाकला जातो, तो खर्च सविस्तर प्रकल्प अहवालाचा भाग म्हणून समाविष्ट करण्यात यावा, जेणेकरून, प्रकल्पाचा प्रत्यक्ष खर्च सुरुवातीलाच हिशेबात घेतला जाईल.

- **मुख्य अधिकाऱ्यांना अधिकार प्रदान करणे**ः सध्या मुख्य अधिकाऱ्यांचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार हे १० लाखांपर्यंतच मर्यादित आहेत. कार्यक्षमता सुधारण्यासाठी, या सोपविण्यात आलेल्या अधिकाऱ्यांमध्ये वाढ केली जाऊ शकते. तसेच, स्थानिक नियोजन आणि मालमत्ता मूल्यांकन अधिक बळकट करण्यासाठी, मुख्य अधिकाऱ्यांना वार्षिक दर विवरणपत्राच्या पुनरावलोकनाच्या प्रक्रियेत औपचारिक पद्धतीने समाविष्ट करता येऊ शकेल. हा प्रश्न सोडवण्यासाठी, एक समिती स्थापन करण्याची आवश्यकता आहे.
- **निधी हस्तांतरणामध्ये विलंब**ः विकास योजना निधी आणि केंद्रीय वित्त आयोग (युएफसी) अनुदानांच्या वितरणामध्ये सातत्याने होणाऱ्या विलंबामुळे नागरी स्थानिक संस्थांना मोठ्या प्रमाणावर कार्यान्वयनात्मक अनिश्चिततेला सामोरे जावे लागते, ज्यामुळे प्रकल्पाची वेळेवर अंमलबजावणी करण्यात अडथळा निर्माण होतो. ही समस्या दूर करण्यासाठी, नागरी स्थानिक संस्थांना वेळेवर निधीचे वाटप सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने, योजनांसाठी निधी आणि अनुदानांचे वितरण करण्यासाठी, पूर्तता करावयाच्या सुस्पष्ट व विनिर्दिष्ट कालावधी आणि शर्ती अधिसूचित करण्याची गरज आहे.

चार. ग्रामीण स्थानिक संस्था (आरएलबीएस)

- **जिल्हा परिषद महसूल शाश्वतता**ः आभासी वैयक्तिक ठेव खात्यांच्या अंमलबजावणीमुळे, जिल्हा परिषदांसमोर शाश्वत अरिष्ट निर्माण झाले आहे कारण, जिल्हा परिषदा पूर्वापारपणे या संस्था त्यांच्या खात्यात जमा असलेल्या निधीवर मिळणाऱ्या व्याजाच्या उत्पन्नावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असायच्या आणि ही बाब या नवीन संवितरण पद्धती अंतर्गत बंद झाली आहे. ग्रामपंचायतीकडे स्वतःचे उत्पन्न निर्माण करण्यासाठी अधिक लवचिकता असते, मात्र त्याच्या उलट जिल्हा परिषदांना निधीच्या कमी झालेल्या स्तराला सामोरे जावे लागते. या परिस्थितीला तोंड देण्यासाठी, परिषदांना केवळ पारंपरिक आणि स्थिर कर स्रोतांवर अवलंबून न राहता, महामार्गावरील जाहिरात फलकांवरील कर, पर्यटन कर आणि वन्यजीव संबंधित शुल्कांसारख्या, विविधिकृत आधुनिक कर साधनांच्या शोध घेण्यास प्रोत्साहित केले जाऊ शकते.
- **माहिती तंत्रज्ञान प्रणालीचे एकात्मिकरण आणि समर्थ पोर्टल**ः सध्या इ-ग्राम सॉफ्ट, जिल्हा परिषद वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (झेड पी एफ एम एस) आणि आय पास यांसारख्या विविध माहिती तंत्रज्ञान पोर्टल्स आणि डॅशबोर्डसचे "बाहुल्य आणि गुंतागुंत" यांमुळे कामांची आणि माहिती भरण्याची (डाटा एन्ट्री पुनरावृत्ती होत असल्याने) प्रशासकीय कामाचा ताण वाढत आहे, ही प्रणाली अधिक प्रभावी संनियंत्रण आणि वास्तव कालीन वित्तीय पारदर्शकता आणि आणि संनियंत्रण यांसाठी एक खिडकी (सिंगल विंडो) डॅशबोर्ड उपलब्ध करून देणाऱ्या, सामायिक पोर्टलमध्ये एकत्र करता येऊ शकेल.
- **"बद्ध निधी आणि करजाळ्याचा विस्तार**ः सध्या जिल्हा परिषदेच्या उपकर निधीपैकी सुमारे ७० टक्के निधी विशिष्ट खर्चासाठी " बद्ध" असतो, परिणामी निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींकडे स्थानिक नियोजनासाठी अत्यंत कमी लवचिकता (निधी वापरण्याचे स्वातंत्र्य) उरते. याचा पुनर्विचार करून नियोजनात लवचिकता (निधी वापराचे स्वातंत्र्य) आणले पाहिजे.
- **कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता आणि समूह आधारित नेमणूक**ः ग्रामीण स्थानिक संस्थाना मोठ्या प्रमाणावरील वेतनाचा भार आणि गाव पातळीवर लेखापाल आणि अभियंता यांसारख्या तांत्रिक तज्ज्ञ कर्मचारी यांची मोठी कमतरता अशा दुहेरी आव्हानाचा सामना करावा लागत आहे अशावेळी कर्मचाऱ्यांवरील थेट खर्चावर नियंत्रण असतानाच, तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी, १० ग्रामपंचायतींच्या गटासाठी एक प्रशिक्षित तांत्रिक कर्मचारी किंवा लेखापाल नियुक्त करण्याची समूहाधारित पद्धती प्रस्तावित केली जाऊ शकते.
- **कार्बन क्रेडिट यंत्रणा**ः ग्रामीण स्थानिक संस्था, कार्बन क्रेडिट यंत्रणेला प्रोत्साहन देत धोरणात्मक पद्धतीने आपला महसूल आधार मजबूत करू शकतात. अशा यंत्रणेसाठी राज्याने अधिसूचित केलेली चौकट असण्यावर जोर देण्यात आला आहे आणि त्याची अंमलबजावणी अधिक गुणवत्ता नियंत्रण मानकांसह केली पाहिजे.

- **सिंचन संदर्भातील थकबाकी आणि जिल्हा परिषद दायित्वांचे समायोजनः** जिल्हा परिषदांसमोर, एक वारंवार उद्‌भवणारे राजकोषीय आव्हान आहे, ज्यामध्ये राज्याचा पाटबंधारे विभाग, ग्रामपंचायतींच्या पाणीपुरवठा योजनांसाठी केलेल्या पाणी संचयासंदर्भातील थकबाकीची वसुली करण्यासाठी, जिल्हा परिषदांसाठी असणाऱ्या निधीतून परस्पर समायोजन करतो, ज्याची जिल्हा परिषदांना कल्पना नसते, कधीकधी, टंचाईच्या काळात केलेल्या पाण्याच्या संचयासंदर्भातील रकमा देखील, आपत्ती व्यवस्थापन निधीतून देण्याऐवजी परस्पर समायोजित केल्या जातात, याबाबतीत जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, (जिल्हा परिषद) आणि पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता यांची समिती स्थापन करण्यात यावी, जी दर तीन महिन्यांनी याचा आढावा घेईल.
- **कामाच्या विहित कालमर्यादेचे काटेकोर पालन :** २०/०६/२००८ च्या शासनाच्या परिपत्रकानुसार, जिल्हा परिषदांच्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी काल मर्यादा विहित करण्यात आली होती. तथापि, प्रशासकीय कारणांमुळे या कालमर्यादांचे पालन केले जात नव्हते, परिणामी लेखापरीक्षणात आक्षेप नोंदवले गेले. त्यामुळे, १९/०५/२०१६ रोजी जिल्हा परिषदेसाठीच्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी अनुसरावयाची मार्गदर्शक तत्त्वे उपलब्ध करून देणारे, नवीन शासकीय परिपत्रक निर्गमित करण्यात आले. प्रकल्पांना वेळेवर मंजुरी मिळावी आणि त्यांची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी संसाधनाचा अधिक चांगला वापर होण्यासाठी आणि विभागांमध्ये उत्तम समन्वय साधण्यासाठी अस्तित्वात असलेल्या या शासकीय मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे आवश्यक आहे..
- **ग्रामीण स्थानिक संस्थांसाठी सौर ऊर्जा धोरणः** रस्त्यावरील दिवाबत्ती,पाणीपुरवठा, मलनिःसारण साठीचा प्रकल्प खर्च आणि इतर पायाभूत पथदिवे सुविधांसाठीचे प्रकल्प ग्रामीण स्थानिक संस्थांवर वित्तीय भार टाकतात. सौर ऊर्जा प्रकल्पांद्वारे पथ दिवे लावणे, पंपिंग आणि कामकाजासाठीचा उच्च विद्युत खर्च केला जाऊ शकत असला तरी, वर्तमान तांत्रिक निर्बंधांमुळे जिथे लहान सौर एकके बसवली आहेत त्या सर्वे क्रमांकावर किंवा जवळच्या ठिकाणांपुरताच विजेचा वापर करता येऊ शकतो. परिणाम, ऑफ ग्रीड सौर ऊर्जेचा अकार्यक्षम वापर विशेषतः जवळच्या म्हणजेच जिथे सौर युनिट बसवले आहे, त्या सर्वेक्षण क्रमांकाच्या बाहेरील पंप आणि रस्त्यांवरील दिवे यांच्या जोडणीसाठी होतो. ही समस्या सोडवण्यासाठी, शासकीय मालमत्ता, इमारती, आणि छतावर सौर प्रकल्प बसविण्यासाठी अर्थसहाय्य आणि वीज खरेदी करांसाठीच्या, स्पष्ट आराखड्यासह, एक समर्पित सौर ऊर्जा धोरण विकसित केले जाऊ शकते.

(शा.म.मु.) एच ३००-१२ (५०–६-२०२६)

परिशिष्ट ख : दृष्टिकोन व कार्यपद्धती

सहाव्या महाराष्ट्र वित्त आयोगाने, अंमलबजावणी केंद्रित असे स्थानिक संस्थांची आर्थिक स्थिती मजबूत करण्याचे प्रमुख उद्दिष्ट दृष्टीसमोर ठेऊन, नियोजनबद्ध दृष्टिकोन स्वीकारला आहे. आयोगाने, स्थानिक संस्थांना भेडसावणाऱ्या प्रमुख अडचणींचा अभ्यास केला. त्यांनंतर आयोगाने अंमलबजावणीसाठीच्या सुस्पष्ट व सविस्तर उपाययोजनांसह शिफारशी विकसित करण्यासाठी संबंधित हितसंबंधितांबरोबर विचारविनिमय केला. या विचारविनिमय प्रक्रियेमुळे हितसंबंधितांची पाठबळ मिळवण्यात मदत झाली आणि शिफारशींमध्ये प्रत्यक्ष वस्तुस्थितीचे प्रतिबिंब दिसेल याची खात्री झाली.

आयोगाने पुढीलप्रमाणे उपाययोजना हाती घेतल्या,

एक. वित्तविषयक साहित्याचा आढावा

आयोगाने, भूतकाळातील अनुभवांचा वापर करण्यासाठी आणि पुनरावृत्ती टाळण्यासाठी विद्यमान उपलब्ध साहित्याचा (संबंधित दस्तऐवज) सविस्तर आढावा घेत आपले काम सुरू केले. इतर बाबींबरोबरच पुढील बाबींचा समावेश आहे :—

- महाराष्ट्र राज्याच्या मागील पाच राज्य वित्त आयोगांच्या अहवालांचे सविस्तर विश्लेषण.
- केंद्रीय वित्त आयोगाचे अहवाल.
- इतर राज्यांच्या वित्त आयोगाचे अहवाल.
- महाराष्ट्र आर्थिक सर्वेक्षण आणि संबंधित सांख्यिकी प्रकाशने.
- महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पाची कागदपत्रे व मध्यम मुदतींचे राजकोषीय आराखडे.
- भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे प्रसिद्ध करण्यात आलेला अभ्यास व माहिती.
- सोळाव्या वित्त आयोगाकडे महाराष्ट्र शासनाने सादर केलेले निवेदन.
- मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५; महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१; महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९; यांच्या संबध्द राज्य आणि महानगरपालिका कायदे आणि त्या अंतर्गत तयार करण्यात आलेले नियम.
- नागरी आणि ग्रामीण स्थानिक शासनव्यवस्थेसंदर्भात राष्ट्रीय आणि राज्यस्तरावरील समित्यांनी दिलेले अहवाल; आणि
- राजकोषीय विकेंद्रीकरण आणि स्थानिक सार्वजनिक वित्तव्यवस्था यांच्याशी संबंधित शैक्षणिक आणि धोरणात्मक साहित्य.

या वित्तविषयक साहित्याचा आढावा घेतल्यामुळे आयोगाच्या विश्लेषणात्मक कामासाठी संकल्पनात्मक आणि संस्थात्मक पार्श्वभूमी उपलब्ध झाली.

दोन. माहिती संकलन

आयोगाने, खालील बाबींसंदर्भात व्यापक माहिती संकलन हाती घेतले:

- एकूण महसुलातील ग्रामीण व नागरी स्थानिक संस्थांचा स्वतःच्या महसुलातील (कर व करेतर) वाटा आणि राज्याच्या अनुदान/योजनांवरील त्यांचे अवलंबित्व समजून घेण्यासाठी ग्रामीण आणि नागरी स्थानिक संस्थांच्या वित्त व्यवस्थेसंदर्भातील माहितीचे संकलन.
- स्थानिक संस्थांना आधीच हस्तांतरित करण्यात आलेले राज्य निधी, विशेषतः स्थानिक गरजांच्या प्राधान्य क्रमानुसार वापरात येऊ शकतात असे अबद्ध निधी (untied funds). त्याच्या आधारावर आयोगाने, स्थानिक संस्थांना हस्तांतरित करता येऊ शकेल अशा राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाच्या (एसओटीआर) अतिरिक्त हिश्श्याचा अंदाज घेतला.
- राज्याच्या वस्तू व सेवा कर विभागाकडून आणि स्थानिक शासकीय क्षेत्रात काम करणाऱ्या इतर अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारावर, स्थानिक संस्थांचा महसुली आधार मजबूत करण्यासाठी, त्यांना नेमून देता येईल अशी कर व अधिभार आकारणी (संदर्भातील माहिती).

आयोगाने, वित्त विभाग, नगर विकास विभाग, ग्राम विकास आणि पंचायतराज विभाग, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, लेखापरीक्षण व कोषागार संचालनालय तसेच इतर विभाग आणि स्थानिक संस्था यांनी ही माहिती पुरवण्यासाठी आणि तिची पडताळणी करण्यासाठी दिलेल्या सहकार्याची दखल घेतली आहे.

आयोगाला विविध स्त्रोतांकडून मिळालेली सर्व माहिती, आयोगाद्वारे घेण्यात आलेल्या विविध बैठका व विचारविनिमयांच्या परामर्शांसह बैठकीची कार्यवृत्तं, मिळालेल्या नोंदी / अहवाल आणि आयोगाद्वारे संदर्भ म्हणून वापरण्यात आलेले विविध अधिनियम / शासन निर्णय या सर्व गोष्टी अहवालाच्या परिशिष्टांमध्ये चार जोडलेल्या आहेत. या सर्व गोष्टी डिजिटल स्वरूपात संकलित केल्या असून भविष्यातील संदर्भासाठी वित्त विभागासोबतच यशदाला (यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे) सुद्धा दिल्या गेल्या आहेत.

तीन. कार्यशाळा आणि बैठका

आयोगाने, क्षेत्रीय पातळीवरील कार्यकर्त्यांकडून पद्धतशीर अभिप्राय मिळवण्यासाठी प्रमुख हितसंबंधित गटांसोबत विषयाधारित कार्यशाळांचे आयोजन केले, ज्यामध्ये (पुढील घटकांचा) समावेश होतोः

१. महानगरपालिका (वर्ग ब, क आणि ड) महानगरपालिकेचे आयुक्त आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत दि. २० नोव्हेंबर २०२५ रोजी अर्बन रिसर्च सेंटर, ठाणे येथे कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

२. ग्रामीण स्थानिक संस्था- मुख्य लेखा आणि वित्त अधिकारी (सी ए एफ ओज) आणि (ग्रामपंचायतीचे) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (डेप्युटी सीईओ) यांच्यासोबत दि. २७ नोव्हेंबर २०२५ रोजी पुणे येथील यशदा येथे कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

३. महानगरपालिका (वर्ग अ, ब, क आणि ड) - विविध महानगरपालिकांचे आयुक्त आणि वरिष्ठ अधिकारी यांच्यासोबत दि. ५ डिसेंबर २०२५ रोजी जे. डब्ल्यू. मॅरिएट हॉटेल, शिवाजीनगर, पुणे येथे कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

४. नगरपरिषदा आणि नगरपंचायती- नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या मुख्य अधिकारी आणि महत्त्वाच्या कर्मचाऱ्यांसोबत दि. २७ डिसेंबर २०२५ रोजी यशदा, पुणे येथे कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

या कार्यशाळांमुळे आयोगाला प्रत्यक्ष माहिती संकलित करण्यास आणि कार्यात्मक अडचणी समजून घेण्यास, क्षमतेतील त्रुटी लक्षात घेण्यास आणि स्थानिक नवोत्मषांसह पुढील मुद्दे समजून घेण्यास मदत झाली :—

१. स्थानिक संस्थांसमोरील मुख्य आव्हानांची ओळख पटविणे आणि स्वतःच्या कर व करेतर महसुलात वाढ करण्यासाठीच्या शिफारशी माहित करून घेणे.

२. स्थानिक संस्थांद्वारे निधीचा अधिक परिणामकारक व कार्यक्षम वापर करण्यासंबंधातील समस्या जाणून घेणे व त्यासंदर्भातील शिफारशी.

अंतिम अहवाल तयार करण्यासाठी, आयोगाने, पुढील शासकीय अधिकाऱ्यांबरोबर देखील सल्लामसलत केली :—

अनु. क्र.	नाव	पदनाम
१	श्री. ओम प्रकाश गुप्ता	अपर मुख्य सचिव, वित्त विभाग
२	श्री.विकास रस्तोगी	अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग
३	श्री. सौरभ विजय	प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग
४	श्री विरेंद्र सिंह	सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग
५	श्री. अभिषेक कृष्णा	आयुक्त व संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय
६	श्री. सुहास दिवसे	जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमि अभिलेख
७	श्री. रवींद्र बिनवडे	नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
८	श्रीमती जोत्स्ना पडियार	संचालक, अर्थ आणि सांख्यिकी
९	श्रीमती दीपा देशपांडे	संचालक, लेखा व कोषागारे
१०	श्रीमती अश्विनी वाघमाले	सह आयुक्त, नगरपालिका प्रशासन संचालनालय
११	श्री. संतोष हिंगणे	जिल्हा सहनिबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे
१२	श्री. विश्वास शंकरवार	सह आयुक्त (कर निर्धारण व संकलन) बृहन्मुंबई महानगरपालिका

१३	श्री. नरेंद्र देशमुख	सह आयुक्त, व्यवसाय कर
१४	श्री.चंद्रकांत पाटील	उप सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग
१५	श्री. राहुल संपत कदम	मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा
१६	श्री प्रकाश दलपत राठोड	मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा

चार. आयोगाद्वारे अभ्यास आणि विचारविनिमय

आयोगाने विशेषीकृत अभ्यास करण्यासाठी पुढील बाह्य तज्ज्ञांना सहभागी करून घेतलेः—

अनु. क्र.	अभिकरण / तज्ज्ञांचे नाव	अभ्यासाचा विषय
१	श्री. सुनील दाढे (भारताचे निवृत्त उप नियंत्रक व महालेखा परीक्षक), इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ऑडिटर्स ऑफ इंडिया, (आयपीएआय)	हस्तांतरणाच्या निकषांच्या आधारे स्थानिक (स्वराज्य) संस्थांद्वारे कामगिरीला प्रोत्साहन.
२	प्रो. माला लालवानी	महाराष्ट्रातील नागरी व ग्रामीण स्थानिक संस्थांना आवश्यक असलेल्या आर्थिक संसाधनांचा तर्कसंगत अंदाज.

या अभ्यासांच्या निष्कर्षांनी आयोगाच्या हस्तांतरण आराखडा आणि त्या अनुषंगाने होणाऱ्या सुधारणांसाठी महत्त्वपूर्ण तांत्रिक माहिती उपलब्ध करून दिली आहे.

आयोग, जनाग्रहाचे श्री. श्रीकांत विश्वनाथन आणि श्री. के. श्रीनिवासन यांचे सखोल चर्चा केल्याबद्दल आणि पुणे येथे राज्य वित्त आयोगाची राष्ट्रीय स्तरावरील परिषद आयोजित करण्यास सहकार्य केल्याबद्दल आभार मानतो.

पाच. शिफारशींचा मसुदा तयार करणे.

आयोगाने, साहित्य, माहितीचे विश्लेषण, विविध हितधारकांशी केलेली सल्लामसलत आणि सुरू करण्यात आलेल्या अभ्यासामधून प्राप्त झालेल्या पुराव्यांच्या आधारे आपल्या शिफारशी तयार करण्यासाठी अंतर्गत स्तरावर वारंवार सविस्तर विचारविनिमयाची प्रक्रिया अवलंबली. या शिफारशींचा पुढील दृष्टिकोनातून विचार करण्यात आला.

- घटनात्मक व कायदेशीर सुसंगती.
- राजकोषीय वास्तवता व शाश्वतता.
- कामगिरीत सुधारणा आणि संसाधन सुसज्जीकरण यांसाठी प्रोत्साहके; आणि
- प्रशासकीय व्यवहार्यता.

परिशिष्ट ग: गुणांवर आधारित सुधारणा – संलग्न हस्तांतरण आराखडा

एक. प्रयोज्यता

हा आराखडा महानगरपालिकांना (वर्ग अ + अ आणि ब) लागू होतो. या स्थानिक संस्थांसाठी, हस्तांतरित निधीचे वितरण हे कटाक्षाने सुधारणा कामगिरीशी जोडलेले असेल.

दोन. सुधारणा – पात्र हस्तांतरण रक्कम (आरइडीए)

सुधारणा-पात्र हस्तांतरण रक्कम (आरइडीए) ही या आयोगाच्या शिफारशींनुसार प्रत्येक पात्र स्थानिक संस्थेसाठी गणली जाणारी वार्षिक सूत्राधारित हस्तांतरण रक्कम असेल.

तीन. सुधारणेचे मापदंड आणि गुणांकन

सुधारणेच्या कामगिरीचे मूल्यांकन प्रत्येकी २०% भारांक असलेल्या पाच मापदंडांचा वापर करून केले जाईल. प्रत्येक मापदंडाची गणना ० ते २० च्या श्रेणीत केली जाईल, ज्यामुळे १०० पैकी एकूण गुण मिळतील.

सुधारणा मापदंड	कमाल गुण
प्रमाणित लेखांकन आणि लेखापरीक्षण आणि सार्वजनिक प्रकटीकरण	२०
हवा गुणवत्ता व्यवस्थापन	२०
सेवा स्तर मापदंडांची (एसएलबी) पूर्तता	२०
भांडवली मूल्य (सीव्ही) कर आकारणीचा अवलंब	२०
नगरपालिका रोख्यांसाठी गुंतवणूक-श्रेणी मानांकन	२०
एकूण गूण	**१००**

- गुणांवर आधारित सुधारणा-पात्र हस्तांतरण रकमेचे (आरइडीए) वितरण

दरवर्षी वितरित होणाऱ्या गुणांवर आधारित सुधारणा-पात्र हस्तांतरण रकमेच्या (आरइडीए) वितरणाची टक्केवारी ही मिळवलेल्या एकूण सुधारणा गुणांवर अवलंबून असेल.

सुधारणा गुणसंख्या	सुधारणा – पात्र हस्तांतरण रक्कमेचे (आरइडीए) वितरण
४० पेक्षा कमी	निरंक
४०-४९	५०%
५०-५९	६०%
६०-६९	७५%
७०-७९	९०%
८० आणि त्यापेक्षा जास्त	१००%

चार. वितरित न झालेल्या रकमेची हाताळणी

एका वर्षात वितरित न झालेल्या, सुधारणा-पात्र हस्तांतरण रकमेचा (आरइडीए) कोणताही भाग व्यपगत होणार नाही आणि राज्य शासनाच्या निर्णयानुसार, सुधारणा गुणांमध्ये सुधारणा झाल्यावर ती रक्कम पुढील वर्षांमध्ये वितरित केली जाऊ शकते.

पाच. मूल्यांकन आणि प्रमाणीकरण

गुणांचे मूल्यांकन दरवर्षी पडताळणीयोग्य नोंदींच्या आधारे केले जाईल आणि नेमून दिलेल्या राज्य प्राधिकरणाद्वारे प्रमाणित केले जाईल. राज्य शासनाकडून गुणांकनासंबंधी सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे स्वतंत्रपणे अधिसूचित केली जातील.

सहा. उद्देश

या आराखड्याचा उद्देश नियमन, सेवा वितरण, पारदर्शकता, पर्यावरणीय व्यवस्थापन आणि आर्थिक सुलभ शाश्वतता यांमधील, मोजता येण्याजोग्या सुधारणांशी जोडण्यासाठी एक सुलभ पारदर्शक आणि प्रोत्साहन-आधारित यंत्रणा उपलब्ध करून देणे, हा आहे.

जोडपत्र

डिजिटल नमुन्यातील जोडपत्रांची पुढील यादी भविष्यातील संदर्भासाठी, वित्त विभाग आणि यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे (यशदा) यांना उपलब्ध करून देण्यात येत आहे.

क) आयोगाच्या बैठकीचे इतिवृत्त.

- १२ ऑगस्ट २०२५ रोजी सायं ४.३० वाजता.
- २४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता.
- ३ डिसेंबर २०२५ रोजी सायं ५.०० वाजता.
- ६ जानेवारी २०२६ रोजी सायं ५.०० वाजता.
- २१ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता

ख) कार्यशाळेच्या बैठकीचे इतिवृत्त कार्यवृत

- २० नोव्हेंबर, २०२५ रोजी झालेली महानगरपालिकांची (वर्ग ब, क आणि ड) बैठक.
- २७ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेली ग्रामीण स्थानिक संस्थांची बैठक.
- ५ डिसेंबर २०२५ रोजी झालेली महानगरपालिकांची वर्ग (अ, ब, क आणि ड) बैठक.
- २७ डिसेंबर २०२५ रोजी झालेली नगरपरिषद आणि नगरपंचायतीची बैठक.

ग) आयोग व कार्यशाळांची छायाचित्रे.

घ) कार्यशाळेमध्ये आयोगास सादर करण्यात आलेले सादरीकरण.

- ग्रामीण स्थानिक संस्था (आर एल बी एस)
- नागरी शहरी स्थानिक संस्था (यु ल बी एस).

ङ) आयोगास सादर केलेली माहिती.

- ग्रामीण स्थानिक संस्था (आर एल बी एस).
- नागरी स्थानिक संस्था (यु एल बी एस)
- स्थानिक संस्थांना निधीची माहिती हस्तांतरित करण्यात आली

च) आयोगास सादर करण्यात आलेल्या नोंदी.

छ) अधिनियम

- महाराष्ट्र वित्त आयोग (संकीर्ण तरतुदी) अधिनियम १९९४.
- महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन (एम एफ आर बीएम) अधिनियम, २००५.
- महाराष्ट्र महानगरपालिका (एम एस सी) अधिनियम, १९४९.
- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी (एम एम सी एन आय) अधिनियम, १९६५.
- महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळ अधिनियम, २०११.
- महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना (एम आर टी पी) अधिनियम, १९६६.
- महाराष्ट्र ग्रामपंचायत (एम व्ही पी) अधिनियम, १९५९.
- महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती (एम झेड पी पी एस) अधिनियम, १९६१.
- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १८८८.
- महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५.

- महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.
- महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२५.
- कंपनी कायदा, २०१३.
- महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम, १९५८.
- मोटरवाहन अधिनियम, १९८८ .
- नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८.
- कर्नाटक स्थानिक निधी प्राधिकरण वित्तीय जबाबदारी अधिनियम, २००३.
- महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२.
- महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८.
- महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७.
- वस्तू व सेवा कर (राज्यांना भरपाई) अधिनियम, २०१७.

ज. शासनाच्या अधिसूचना/ निर्णय / परिपत्रके .

- महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या आदेशानुसार दिनांक २७ मार्च २०२५ ची राजपत्रात प्रसिद्ध झालेली अधिसूचना.
- महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या आदेशानुसार दिनांक ३१/०७/२०२५ ची राजपत्रात प्रसिद्ध झालेली अधिसूचना.
- महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या आदेशानुसार दिनांक ३१/१२/२०२५ ची राजपत्रात प्रसिद्ध झालेली अधिसूचना.
- वित्त विभागाचा दिनांक १४/०५/२०२५ चा शासन निर्णय.
- वित्त विभागाचा दिनांक २४/०७/२०२५ चा शासन निर्णय.
- नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचा दिनांक ०१/०८/१९७५ चा शासन निर्णय.
- ग्रामीण विकास आणि जलसंधारण विभाग,महाराष्ट्र शासन यांचा २१/०१/२००० चा शासन निर्णय.
- महसूल आणि वन विभाग, महाराष्ट्र शासन यांचा दिनांक २२/०९/२००३ चा शासन निर्णय.
- नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन यांचा दिनांक १६/०२/२००८ चा शासन निर्णय.
- नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचा दिनांक १६/०१/२०१६ चा शासन निर्णय.
- महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासनाचा दिनांक १५/०९/२०२५ चा शासन निर्णय.
- ग्राम विकास आणि जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांचा दिनांक ३१/१२/२०१५ ची अधिसूचना.
- ग्राम विकास आणि पंचायत राज विभाग, महाराष्ट्र शासनाचे दिनांक १९/०५/२०१६ चे परिपत्रक.
- ग्राम विकास आणि पंचायत राज विभाग, महाराष्ट्र शासनाचे दिनांक २०/०६/२००८ चे शासनाचे परिपत्रक.

झ. झालेला अभ्यास.

- Incentivising performance by Local Bodies (Self Governments) through Devolution criteria by Institute of Public Auditors of India.
- Rationalised Estimate of Finantial Resources Required By Urban And Rural Local Bodies In Maharashtra by Prof. Mala Lalvani and Team.

ञ. संदर्भित कागदपत्रे.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई